


# माणूस


दिवाळी ७७

रूपये ६



# दिवाळी ७७

## अनुक्रम




### कथा

ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे !
दि. बा मोकाशी ६

थांब, मी आलोच !
रत्नाकर मतकरी २४

सणंग
वि. ग. कानिटकर ४७

एक सश्रद्ध ! एक सूर्य !
अशोक प्रभाकर डांगे ५६

भेटि लागि जीवा…
रंगा मराठे ७६

उद्‌ध्वस्त
अनिल किणीकर ८१

गॅंग
रवींद्र पिंगे ८८

### कविता

राजा दीक्षित
वि. द. कुलकर्णी
सतीश इनामदार
अरुणा ढेरे
मृणालिनी रानडे
किशोर पाठक १८ ते २३

वार्षिक वर्गणी
चाळीस रुपये

परदेशची वर्गणी
पंचावन्न रुपये

अंक
बावीस ते सव्वीस

किंमत
सहा रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**विशेष लेख**

आम्ही आणि बदमाष काळ!
विनय हर्डीकर ६२

काळे इजिप्त, एक सेंट आणि व्हिन्सेंट
माधुरी पुरंदरे ९४
आयर्व्हिंग स्टोनच्या
' लस्ट फॉर लाईफ 'वर आधारित.

**मुलाखती**

मीरा के प्रभु
किशोरी आमोणकर
संकलन : विनय धुमाळे १०

परलोकाचे अवलोकन
शब्दांकन : रत्नाकर मतकरी ३७


मुखपृष्ठ
माधुरी पुरंदरे

चित्रकार
विवेक सवनीस
माधव फळणीकर
प्राणेश जोशी

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**' माणूस 'चा यापुढील अंक शनिवार ३ डिसेंबर १९७७ या दिवशी प्रसिद्ध होईल.**




Tom & Bay GN-7792/M

# मांडणी

'बोल बोल म्हणता मुबईतली जे. जे. स्कूलमधली दोन वर्षं सपली. डिप्लोमा पदरात पडला. रितीप्रमाणे मीही परदेशी जायला निघाले. एक वर्ष पॅरिसमध्ये. पोचल्या पोचल्या गॅलरीज्, म्युझिअम्स पाहायचा सपाटा लावला. तिथल्या निम्म्या–अर्ध्या चित्रकाराची तर नावंही कधी ऐकली नव्हती. असंच भटकताना एक दिवस शोध लागला म्यूझे द ज द पोम्रचा. 'तो *मला प्रथम जाणवला* तो तिथेच. लूव्हच्या समोरची त्विलरीची बाग ओलांडली की, एका मोठ्या तळ्याजवळ दोन इमारती आहेत. एक आहे ल' ओरॉजरी अन् दुसरी म्यूझे द ज द पोम्र. हे इम्प्रेशनिस्टस्‌च कायम स्वरूपाचं म्युझिअम. खालचा मजला खऱ्या इम्प्रेशनिस्टस्‌चा आहे. दगाच्या 'नर्तकी'. मानेची 'बाल्कनी', 'बासरीवाला', 'ऑलिम्पिया', बेर्थ मोरीसोचा 'पाळणा', मोनेची निसर्गदृश्यं आहेत. वरच्या मजल्यावर एका बाजूला परत मोने, रन्वा, माने आहेत. 'डावीकडची पाटी मी वाचली होती–'*व्हान गॉग दालनाकडे.*' पण मोने, रन्वाची ओढ जास्त होती. त्याचे उजळ, प्रसन्न रंग, कोवळा सोनेरी सूर्यप्रकाश, सुदर बायका हेच हवंसं वाटत होतं. 'तिथं बराच वेळ घोटाळल्यानंतर अखेर व्हान गॉग दालनाकडे वळले. पहिली गाठ पडली ती आर्लेच्या कॅथॉलिक चर्चशी. त्यातला आकाशाचा निळा रंग पाहिला अन् पोटात खड्डा पडल्यासारखं झालं. जमिनीतून उसळून वर आकाशाला टेकू पाहणाऱ्या चर्चच्या रेषा, संध्याकाळचा निळा प्रकाश. शेजारीच लावलंय त्याचं स्वत.चं चित्र. फिक्या निळया-पिवळ्या रंगात केलेलं. त्याच्या कपड्याच्या रेषा, केस, चेहऱ्याची रचना, *पार्श्वभूमीवरच्या* रेषांची वळणं, सगळं एक होऊन आलेलं, पण अस्वस्थ वाटणारं. आतून पिळवटून आल्यासारखं. अन् या सर्वातिनं काळीज भेदून जाणारी त्याची नजर. त्याचा अशात, अस्वस्थ आत्मा त्याच्या प्रत्येक फटकाऱ्यात जाणवत होता. 'तो एक जिवत अनुभव असतो. त्यातलं सच्चेपण, आच, साऱ्या ताकदीनिशी तो अनुभव व्यक्त करण्याकरता शोषून घेणं, हे आत खरोखर कुठं तरी खोलवर जाणवतं... 'आर्लेला जाऊन आले. सँन्त मारी द ला मेर, सँ रेमी वगैरे ठिकाणं पाहिली. ओव्हेरला त्याचं थडगं पाहिलं. त्या ठिकाणी गेल्यावर कळले की, तो इथं राहत होता. तो माझा पिच्छाच धरून होता. सँ रेमीच्या छोट्याशा चर्चभोवतालचा निसर्ग अतिशय देखणा, मोहक आहे. पण व्हान गॉगच्या डोळ्यांनी पाहिला की, तो त्याच्यासारखाच अस्वस्थ वाटतो. जमिनीतनं हिरव्यागार, लवलवत्या ज्वाळा उसळाव्यात तशी उसळणारी सिप्रसची झाडं, आर्लेच्या पिसाट वाऱ्यावर सळसळणारी पिवळी धमक शेतं. त्याच्या चित्रात एक जबरदस्त, झपाटून टाकणारी शक्ती आहे. 'एव्हाना व्हान गॉगचं न् माझं प्रेम फारच घट्ट व्हायला लागल होतं. त्यामुळं केवळ त्याच्याकरता हॉलडला गेले– *ॲमस्टरडॅमला त्याच्या नावाचं* चार मजली म्युझिअम बाधलं आहे. दोन–अडीचशे कॅनव्हास अन् तितकीच रेखाचित्रं. एका मजल्यावरची पन्नास चित्रं काही एका दमात पाहवत नाहीत. धाप लागते. श्वास कोंडतो...'

¤

माधुरी पुरदरेला विचारलं, 'तू व्हान गॉगवर का लिहिते आहेस?' तर तिनं असं कळवलं.

¤

साहित्य, कला, चित्रपट, नाट्य,समाजसेवा यातील उत्तुंग शिखरांचं दर्शन घडविणं हे आजवरच्या माणूस दिवाळी अंकाचं वैशिष्ट्य. कधी रवीद्र पिंगे यांनी यासाठी देवासला जाऊन कुमार गंधर्वांचं शांत, तृप्त जीवन जवळून न्याहाळल. कधी बालगंधर्वांच्या आत्मचरित्राची फाटकी-तुटकी हस्तलिखित पानं धुडाळली. सुमतीबाई देवस्थळे यांनी उभा केलेला गॉर्की किंवा श्वाइत्झर, भाऊ पाध्ये याचा गुरुदत्त, तत्पूर्वी दिलेली हसा वाडकरांची 'सागत्ये ऐका' ही आत्मकथा...याच मालिकेत माधुरी पुरंदरे हिचा व्हान गॉग आता जाऊन बसेल यात शंका वाटत नाही.

¤

या विषयाशी तोल साधण्यासाठी किशोरीताई आमोणकर यांची मुलाखत आवर्जून घेतली.तीही वाचकांना एका वेगळ्या पातळीवर आपल्यापरीने घेऊन जाईल.

¤

आणि आत्मपरीक्षणासाठी विनय हर्डीकर यांनी भरपूर खाद्य पुरविले आहेच!

¤

*नामवत कथाकारांची* उपस्थिती आहे. नवीन कविमित्र आहेत. नेहमीच्या 'माणूस' अंकात या सर्वांची अनुपस्थिती असते. दिवाळी अंकात ही उणीव या साहित्यिक कविमित्रमडळीच्या सहकार्यामुळे राहिलेली नाही.

या लेखनसहकार्याबद्दल सर्वांचे आभार

आणि

दिवाळीचे शुभचिंतन!

लेखकांना, वाचकांना, जाहिरातदारांना यंदाची दिवाळी आनंदाची जावो!

—संपादक




दि. बा. मोकाशी

बहुतेक दुकानांतून 'आज रोख उद्या उधार' 'वेळ हा पैसा आहे' 'चूकभूल द्यावी घ्यावी' अशा छोटया पाटया असतात. दुकानदार आपल्या स्वभावानुसार नि गिन्ह-इकांच्या अनुभवानुसार आणखीही पाटया लावतात; पण मिस्त्रींच्या दुकानात फक्त एक अभंग लिहिलेला होता.

ज्ञानदेव म्हणे । व्यासांचिया खुणे ॥
द्वारिकेचे राणे । पांडवा घरी ॥

मिस्त्रींकडे अनेक लोक येत. बसत. गप्पा मारीत. मिस्त्रींचे काम चालू असे. एकाने मिस्त्रींना या अभंगाबद्दल विचारले. आपल्या आयुष्यातील सर्व तऱ्हेचे. विशेषतः आध्यात्मिक अनुभव सांगणे मिस्त्रींना फार आवडे. अभंगाबद्दल विचारलं तेव्हा ते म्हणाले,

'मी वारकरी आहे. ज्ञानेश्वरीचे अनेकदा पारायण केले आहे. तुकाराममहाराजांचे शेकडो अभंग पाठ आहेत. शेकडो प्रवचने ऐकली आहेत. दिलीही आहेत; पण ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील या अभंगाशी मी आलो की, मी माझा राहात नाही. हा अभंग विलक्षणच आहे. तुम्ही वाचून पहा. प्रत्येक शब्दात अध्यात्म्याचे गूढ लपलेले आहे. या अभंगाशी आलो की, मी हतबल होतो. हात-पाय गळून जातात. प्रचितीचा क्षण हाताशी आला आहे असं वाटतं. त्यासाठीच मी लिहून तो समोर लावला आहे. काम करता करता मधेच मी त्याच्याकडे पाहतो. या अभंगात काय आहे ? मी शोधीत असतो. तसा त्याचा अर्थ शाळेतला पोरगाही सांगेल. मी पुष्कळ

पुस्तकांतून त्याचे अर्थ पाहिले. विद्वान लोक लिहितात त्यातून शिकायला मिळत. नाही तर मी एक अडाणी. खेड्यातला, शेतकरी माणूस, मला कधी ज्ञानेश्वर वाचता आले असते! त्यानीच शिकवल मला, पण प्रत्येकाचा अनुभव वेगळा असतो. माझाही अनुभव आहे. त्या अनुभवातून मला या अभगात गूढ दिसते केव्हा तरी दिवाळीत फटाका उडतो तसा त्याचा स्फोट होणार आहे मी पेटून निघणार आहे!'

कुणी तरी विचारतं,

'हा स्फोट केव्हा होणार, मिस्त्री ? आज वीस वर्षं हा अभग इथे पाहतो आहोत!'

मिस्त्री हसून म्हणतात,

'स्फोट होईपर्यंत वाट पाहावयाची. आपल्या हातात काय आहे? या जन्मोजन्मीच्या गोष्टी! या जन्मी नाही तर पुढच्या जन्मी. या जन्मी इथपर्यंत आलो. या जन्मात विठ्ठलानं आपल्याला रधा मारण्याचे काम दिले असे मानावयाचे. त्यातही कमीपणा नाही. नरजन्मात आल्यावर देहधारणेसाठी सतानाही काम करावे लागले. तुकाराममहाराजानी वाणीदुकान चालविले सावतानं माळीकाम केल. गोरानं मडकी घडवली. मला रंधा, पटाशी, करवत घेऊन लाकडाशी झगडावे लागत आहे त्यानीही रोज हरिपाठाचे पठण केले आणि याच अभगावर प्रारंभी ते अडले असतील. पुढे त्याना प्रचिती आली. मलाही येईल!'

मिस्त्रीचं हे ऐकून कुणी तरी विचारतं,

'प्रचिती आल्यावर काय होईल?'

गूढ हसून मिस्त्री म्हणत,

'प्रचिती आल्यावर काय सागावं राव! प्रचिती आल्यावर जे होईल ते सगळंच न्यारं! ते शब्दांपलीकडच आहे. ते झाल्यावर हातात रंधा राहील का जाईल? मग राहिला काय आणि नाही काय त्याला महत्त्व उरणार नाही. ती प्रचिती येईपर्यंत झगडा करीत रहायला हवं!'

कुणी म्हणाले, 'मिस्त्री! पण किती वर्षे? आम्हीच वीस वर्षं पाहतो आहोत!'

मिस्त्री म्हणाले, 'विठ्ठलान आम्हाला जन्माला घातले ते झगड्यातच जन्मलो तो सावत्रपणात. माझ्या आईला मारून त्यानं झगडा मागं लावला. तो म्हणाला, 'मर लेका! माझ्या नादी लागायचाय ना? जन्मापासून तुला हिसका दाखवितो!' मी म्हणालो, 'या जन्मी तुझी भक्ती होणाराय हे काय कमी आहे.? बैलाच्या जन्माला घातलं असतस तर काय केल असत?'

'मिस्त्री! काय, पाळण्यात असतानाच तुम्ही भक्ती करायला लागलात?'

'नाही!' मिस्त्री म्हणत 'उगीच खोटं का बोलू? पण तेव्हापासून त्यान मला ओढायला सुरुवात केली. मला तेव्हा कळलं नाही लहानपणी सावत्रपणाला तोड द्याव लागलं. बाप दुसऱ्या आईच्या नादी लागलेला. तिला मी नको होतो. ती माझे खाण्या-पिण्याचे हाल करी. मला घालूनपाडून बोले. तिच्या मुलाना सभाळायला लावी माझा बाप मिस्त्री होता. काही झालं तरी ते काम शिकून घ्यायच ठरवल. बाप घर बाधायला मला बरोबर घेऊन जावयाचा. मी शिकेन म्हणून आईला ते आवडायच नाही, पण बापाला घरचा माणूस मदतीला घेणच फायद्याचं होतं. आईपासून लाब असला की बाप माझ्याशी बरं वागायाचा. माझ्या हातावर तो अधूनमधून दोन आणे ठेवायचा. ते पैसे मी साठवून ठेवायचे ठरविल. काम येऊ लागल की, मी गाव सोडायच ठरविलं होतं. या घरात मला सुख नव्हतं मधे माझं लग्न केल होतं. माझी सासुरवाडी पुण्याला होती'

मिस्त्री असं बोलत राहात. मग मधेच कुणी तरी विचारी,

'मिस्त्री! तुमच्या भक्तीचं काय झालं?'

'सांगतो' मिस्त्री विनोदान म्हणत, 'गाडी रुळावरच आहे. बरोबर स्टेशनावर पोहोचवणार! पहाल! मी पुण्याला जाव असा विचार करू लागलो. माझ्या सावत्र आईन ते हेरलं असाव. बापानं मला दिडकी देऊ नये म्हणून ती आटोकाट प्रयत्न करू लागली. तोही तिला संशय आला असावा. मी आंघोळीला गेलो की ती कपडे चाचपून पहावयाची. एकदा खिशातून पावली गेली तेव्हा मला ते कळल. मग बापाकडून ती रोज पैशाचा हिशेब घेऊ लागली. खिशातून चार आणे गेल्यावर मीही सावध झालो. माझा एक गुरव मित्र होता. देवळात जाऊन मी त्याच्याकडे पैसे ठेवू लागलो त्या वेळी कसला विठ्ठल आणि कसली भक्ती! त्याने त्याची आठवण येण्यास मला सवडच ठेवली नव्हती पुरात झाडाची फादी टाकावी तस त्यान माझ केल होतं, पण हे करता करता तो मला त्याच्याकडे खेचीत होता. जन्माला आल्यानतर चोवीस वर्षं अशी गेली. चोवीस वर्षांनंतर अचानक त्यान मला दर्शन दिलं!'

'दर्शन?' कुणी तरी चकित सुरात विचारल. 'तुम्हाला देवान दर्शन दिल?'

'दर्शनच. कुणी मानेल. कुणी मानणार नाही; पण ती पुष्कळ पुढची गोष्ट आहे. दोन दोन आणे करीत मी सात रुपये जमविले आणि पुण्याची गाडी गाठली! मी पुण्याला गेलो हे फक्त गुरवाला ठाऊक होतं; पण तो माझा विश्वासाचा मित्र होता. माझा सासरा पुण्यात कुठं राहतो, त्या पेठेच नाव फक्त ठाऊक होत. मला वाटल होतं, तेवढ पुरे आहे. पांडु मिस्त्री म्हटल की कुणीही सांगेल मी पाडू मिस्त्री विचारीत हिंडू लागलो आणि लोक हसू लागले. पेठ मला गवसली; पण एक पेठ म्हणजे आमचं शभर गाव होत. भिरभिर हिंडलो जवळ सव्वा रुपया शिल्लक होता परतही जाता येत नव्हतं. असाच हिंडता हिंडता नकळत सासऱ्याच्या घरावरून गेलो. आमच्या मडळींनी खिडकीतून मला पाहिल तिन तिच्या वडिलांना सांगितल. ते धावत खाली आले. मला गाठून घरी घेऊन गेले.

'दोन वर्षं सासऱ्याकडे राहिलो, पण ते काही खर नव्हत सासऱ्यांच्या फर्निचरच्या कारखान्यात काम करीत होतो; पण सासऱ्याकडे राहणं अपमानाच वाटू लागलं रोज वाद होऊ लागले. बायकोला मी म्हणे, इथून जाऊ. एका खोलीत राहू. ती तयार होत नव्हती. तेव्हा माथ गरम होतं. एके दिवशी भडका झाला. खूप शिवीगाळी केली. सासऱ्यानं घराबाहेर काढल बायकोही बरोबर आली. जवळ पैसे नव्हते. एका वाड्यात खोली घेतली. हथरायला नव्हतं, पाघरायला नव्हत. एक भाडं जवळ होत स्टोव्ह नव्हता. मग शेजाऱ्यापाजाऱ्यानी आमची कीव केली. कुणी एकदोन भांडी दिली, कुणी चादर दिली, कुणी स्टोव्ह दिला. पैसेही दिले!

'काही दिवस इकडे तिकडे कामं केली. पैसा खूप असला तरी भाडण होतात, नसला तरी भाडणं होतात! घरात झगडे होऊ लागले. एके दिवशी ठरवलं 'बस् झाल पुणं— आता गावी जावं! तिथ धंदा सुरू करावा.' त्या दिवशी घराबाहेर पडलो आणि स्टेशनाकडे तोंड वळवल रिक्षा पाहू लागलो. चौकात आलो. रिक्षा थाबवली आत बसलो. रिक्षा सुरू होणार तोच पोलिसाचा हात रिक्षात आला. त्यानं मला बाहेर ओढलं. रिक्षा तशीच गेली बाहेर उभं राहून पाहिलं पोलिस गेला होता. दुसरी रिक्षा थाबवली. आत बसलो. तोच दोन बाजून दोन पोलिस आले आणि मला खाली उतरण्याची खूण केली. मी उतरलो. 'का उतरवता?' अस रागानं मी विचारणार तोच दोघेही निघून गेले होते!

मग तिसरी रिक्षा केली. आता मात्र पोलिस येवो- पोलिसाचा बाप येवो, खाली उतरायचं नाही असा निश्चय केला. रिक्षेत बसलो नाही तोच पोलिसांच्या हातांनी मला बाहेर फेकलं. रिक्षावाला म्हणाला, 'काय राव, काय झालं ?'

मी रागानं म्हटलं, 'पाहिलं नाही ? साले ! मला बाहेर खेचताहेत !'

'कुणी खेचलं ?'

'पोलिसानी.'

रिक्षावाला म्हणाला, 'पोलिस ? कुठे आहेत पोलिस ?'

मी अवतीभोवती पाहिलं. रस्ता मोकळा होता. पोलिस रिक्षाशी आला असता तर तो जाताना दिसायला हवा होता. मी चमकलो. डोक्यात विचार सुरू झाले. आता पोलिस नव्हता, मागच्या दोन वेळा तरी पोलिस होता का ? मला तर दर वेळी पोलिस दिसले; पण प्रत्यक्षात नव्हते ! हा काय चमत्कार असावा ?

'माझ्या टाळक्यात एकदम प्रकाश पडला. कुणी दैवी शक्ती आपल्याला रिक्षात बसू देत नाही. तिला आपण रिक्षातून जायला नको आहे. ती सांगते आहे 'पुण सोडू नको !' ते पोलिस नव्हते. परमेश्वर होता.

दैवी शक्तीचं अस प्रत्यतर मला पूर्वी कधी आलं नव्हतं. हा प्रकार झाला काय आणि याचा अर्थ काय ? मी रस्ते हिंडत विचार करू लागलो. मी देव देव करणारातला नव्हतो. सावत्रपणाच्या त्रासात आणि पोटाच्या चिंतेत देवाशिवाय दिवस गेले होते. मी करीत आलो ते सर्व माझं कर्म होतं. मी माझ्या बुद्धीनं बरं-वाईट करावं, करू नये ठरवीत होतो. माझे आई बाप, बायको, सासरा याशिवाय तिसरा कुणी आयुष्याला जबरदस्त कलाटणी देणारा आहे हे मला त्या रिक्षातून कळलं परमेश्वरशक्तीचा पहिला प्रत्यय येऊन मी भक्तिमार्गाला लागलो.'

'तुम्ही परत घरी आलात ?'

'परत आलो नाही. तडक सासुरवाडीला गेलो. सासऱ्यासमोर लोटांगण घातलं. त्यांनीही वाईट वाटत होतं. दिलजमाई झाली मग त्यानी हे दुकान दिलं.'

मिस्त्रीच्या आयुष्याचे वाहालेले तारू विठ्ठलाने ताळ्यावर आणले. सासऱ्याशी समझोता झाला. दुकान मिळाले हे ऐकन ऐकणारांना बरे वाटे. श्रद्धा तीव्र असेल तर परमेश्वर पावतो, हे खरे आहे. आपल्या आयुष्यात असे घडत नाही. कारण तेवढी श्रद्धा नाही. बायकोला मोठ्या शहरात बिऱ्हाडात सोडून आपण गात्री जाणार नाही. स्वतःच्या श्रद्धेचा कमीपणा, ऐकणाऱ्यांची मने अस्वस्थ करी.

पण मिस्त्रीचे आयुष्य ईश्वराच्या कृपेखाली चालले असूनही एवढे सुखाचे नव्हते. किंबहुना ईश्वराची ज्यांच्यावर कृपा नव्हती त्या त्यांच्या श्रोत्याचे आयुष्य जास्त सुखाचे म्हणावे लागले असते; पण मिस्त्री सागू लागले की, मिस्त्रीचे सुख फार मोठे वाटे. 'काय मिस्त्री, कसं काय चालल आहे ?' कुणी मधे विचारताच मिस्त्री म्हणत, 'तुमच्या आणि ईश्वराच्या कृपेने उत्तम चालले आहे. परवा औदुंबरास जाऊन आलो !'

'तरीच दुकान तीन चार दिवस बंद होत.'

'धाकटी लेक टायफाइडने आजारी होती. औदुबरास जाऊन जप करीन म्हणालो होतो. तीन महिने होऊन गेले, सवड होईना. परवा दत्तमहाराज स्वप्नात आले, 'काय रे ! केव्हा येणार ?' त्यांनी विचारलं. मी ताडकन म्हटलं, 'निघालो हा महाराज !' सकाळी उठताच घरातले पैसे मोजले. तीन रुपये होते. ते बायकोला देऊन म्हटले, 'आम्ही औदुबरला जाऊन येतो. तोपर्यंत एवढ्यात भागवा !' स्नान करून गुरुचरित्राचा अध्याय वाचून दुकानात येऊन बसलो. दुकानातल्या दत्ताच्या तसबिरीपुढे उभा राहिलो. म्हटले, 'महाराज, घरातून निघालो आहे आपल्याकडे. आपली इच्छा असेल तर येणं होईल, महाराज ! भाड्याला पैसा लागतो. एकची गाडी आहे. बारापर्यंत पैशाची वाट पाहीन. नाही तर विदाउट येईन.' अस महाराजाना सागून दुकानात बसून राहिलो. महाराजांनी अकराला माणूस धाडला गिऱ्हाईकं आलं. त्यानं कपाटाची ऑर्डर दिली. पन्नास रुपये अॅडव्हान्स देऊन गेला. गिऱ्हाईक जाताच पिशवी उचलली, दुकानाला टाळं मारलं आणि स्टेशनकडे निघालो !'

कुणी विचारलं, 'मिस्त्री ! गिऱ्हाईकाचा अॅडव्हान्स वापरून पुढं कसं करणार ?'

मिस्त्री म्हणत, 'गिऱ्हाइकाचा नव्हे, तो महाराजानी धाडला. महाराज त्याची काळजी घेतील. आपल्याला त्याची फिकीर कशाला?' ¤

मिस्त्रीची आणि माझी ओळख या अॅडव्हान्स–प्रकरणात झाली अॅडव्हान्स देणारा मीच होतो. मी जे कपाट सागितलं होतं त्यात काही बदल सागावासा वाटला म्हणून नंतर चार दिवस त्यांच्या दुकानात जात राहिलो. चारही दिवस दुकान बद होतं. मी जरा घाबरलोच; पण पाचव्या दिवशी मिस्त्रीची गाठ पडून खुलासा झाला. आपण औदुंबरला गेल्याच त्यांनी सांगितलं. बोलता बोलता माझ्या अॅडव्हान्समुळं औदुबरयात्रा झाल्याचा त्यांनी उल्लेखही केला, माझे पैसे यात्रेत खर्च झाले हे त्यानी सुचवलं असं मला वाटल. महाराजानीच पैशाची सोय केली, असही म्हणून पैसे देण्याचं माझं श्रेय काढून घेऊनच ते थांबले नाहीन, तर त्यावर आपल तत्त्वज्ञानही बसविल. ते म्हणाले,

'चागल्यातून वाईट होतं आणि वाइटातून चागलं होत. चांगल्यासाठी म्हणजे घरात कपाट येण्यासाठी तुम्ही मला अॅडव्हान्स दिलात. त्यातून वाईट झालं म्हणजे मी तो

पृष्ठ १३७ वर

दीपावली अभीष्ट चिंतन

**दि कोल्हापूर केनशुगर वर्क्स लिमिटेड**

**प्रत्येक कुटुंबाची आवड**

शुभ्र दाणेदार, मोहक व गोडच गोड साखर

भारतातील एक प्रमुख अद्यावत कारखाना

**दि कोल्हापूर केनशुगर वर्क्स लिमिटेड**

कसबा बावडा, कोल्हापूर–६.

# सह्याद्री को-ऑप. फर्टीलायझर्स ॲन्ड केमिकल्स लिमिटेड

ऑफिस

**युकॅरिस्टिक कॉंग्रेस बिल्डिंग नं. ३, ३ रा मजला,**
**५ कॉन्व्हेन्ट स्ट्रीट, मुंबई नं. ४०० ०३९.**

टे. नं. (१) २११०६५ (२) २१५६८६ (३) २१४६९०

फॅक्टरी


**भारत फर्टीलायझर्स इंडस्ट्रीज, इस्टेट, कपूर बावडीजवळ,**
**माजीवाडा, ठाणा.**

टे नं. (१) ५९२२३९ (२) ५९२२३०

उत्कृष्ट व भरघोस सर्व प्रकारच्या पिकांसाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली
तयार केलेले ' कृषिधन छाप ' दाणेदार मिश्रखत.
उसाच्या एकरी जास्त उत्पादनासाठी
' कृषिधन छाप ' १५ : ५ : ५
स्पेशल दाणेदार मिश्रखत.

**एस्. एन्. सप्रे**
आय्. ए. एस्. ( निवृत्त )
व्हाईस चेअरमन

**मुळचंद गोठी**
एम्. एल्. सी.
चेअरमन



# मीराके प्रभू

मुलाखत :

विनय धुमाळे

पाठीमागून संथपणे वाहणारी कुठलीही नदी नाही, की समोर उत्तुंग पर्वतराजींची शोभा नाही. उंचच उंच होत जाणाऱ्या मुंबई-मधल्या अनेक ठोकळेबाज घरांपैकीच एक घर. खाली क्रिकेट खेळणाऱ्या मुलांचा गलका असह्य होतोय. टेलिफोन आणि दारावरची घंटा एकमेकांशी खो खो खेळताहेत.

असं म्हणतात की, कलाकाराला निरामय शांतीची जरूर असते. परंतु वरती वर्णन केलेल्या घरात किशोरीताईंची संगीतसाधना ऐकली की निरामय शांती वगैरे कल्पना ही कथा-कादंबरीतली वाटते. आणि याच घरात बसून बिलक्षण विरक्त मनःस्थितीत परंतु वेगळ्याच आवेगाने त्या सहज बिभास गुणगुणायला लागतात. त्यांची बिभास म्हणण्याची एक खास शैली आहे.

माईवरील डॉक्युमेंटरीच्या शूटिंगला चार-साडेचारला निघालो. शूटिंगला निघताना कल्पनाही नव्हती की, आज एक अवर्णनीय प्रसंग पहायला मिळेल म्हणून.



.... आणि एका क्षणी किशोरीताई बिभासात जणू विलीन होतात.

पोहोचेपर्यंत ५ वाजले. कुंद आभाळ आणि चर्नी रोडच्या कबरस्थानात पोहोचलो तेव्हा तिथलं वातावरण नेहमीचच. दोन-चार नजरशून्य माणसं इकडून तिकडे जात आहेत, आमच्यासारखी माणसं आत जात आहेत हे पाहून त्यांना कदाचित आश्चर्य वाटलं असावं. काही माणसं भवताली गोळा झाली. कबरस्थानात प्रथमच जात असल्यानं आम्हीही थोडे बावरलेले, थोडे conscious. माई मात्र एका विवक्षित दिशेने चालल्या होत्या. त्यांचं त्या वेळी असणं हे जणू त्यांच्या व्यक्तित्वाचा काहीही अंशच नसावं इतकं विभिन्न होतं आणि पाहता पाहता [माई आमच्यापासून वेगळ्या झाल्या. त्यांना खाँसाहेबांची कबर दिसली असावी. माई आमच्याच काय पण स्वतः-पासूनही वेगळ्या झाल्या. माईंच्या त्या रूपाकडे पाहून साक्षात सळाळत्या चैतन्याची आठवण झाली. विलक्षण साध्या, परंतु तितक्याच तेजस्वी आणि त्यांचा पुढं जाण्याचा आवेग तर इतका की, समुद्रही मागे हटावा.

माई कबरीजवळ गेलेल्या आहेत. त्यांनी हळूवार हाताने कबर स्वच्छ केली. पुन्हा ती संगमरवरी कबर स्वतःच्या तेजाने झळाळू लागली. कबरीवर एक मुकुट कोरलेला आहे. ही कबर काही अशा तशा माणसाची नाही आहे. ती कबर आहे गानसम्राट उस्ताद अल्लादियाखाँची. समोर उदबत्त्यांच्या धुराचं वलय वरवर जात आहे आणि त्या पाठी कबरीला मिठी मारून बसलेल्या, मुसमुसत असलेल्या माई. माईचे कृश हात कबरीवरून इतक्या आवेगानं फिरत आहेत की कुणाचीही खात्री पटावी की, तो संगमरवरच माईशी काही तरी बोलतोय. हे सारं तो कबरीवरचा विस्तीर्ण पिंपळ शांत नजरेने पाहतोय. हे सारं चालू असताना आमचा कॅमेरा चालूच होता. आम्ही सर्व माईच्या समोरच होतो. इतरही मुस्लिम बांधव गोळा झाले होते; पण माईना या कश्याकश्याचं भान नव्हतं. अलगदपणं जणू त्यांना कुणी तरी या वातावरणातून उचलून वेगळ्याच विश्वात नेलं होतं. स्वतःच्या गुरूवरच्या अलोट श्रद्धेपायीच ते सारं होत होतं. हे कुणी करायला सांगत नव्हतं. माईंच्या त्या रूपाकडे पाहात असताना मात्र त्यातला आठवतो तो आवेग. 'जगावेगळा' 'सळाळता,'

हे सारं चालू असताना दिङ्मूढ होऊन एखाद्या लहान मुलानं नजर फिरवावी तसं किशोरीताईचं रूप होतं. येताना कुणीच काही बोललं नाही. माई परत शांत झाल्या. चेहऱ्यावरचं मृदू हसू पुन्हा प्रकटलं पण किशोरीताई तशाच अस्वस्थ. किशोरीताईंच्यात एवढा आवेग कुठून येतो असा एक मला नेहमी प्रश्न पडायचा; पण मघाचं माईचं रूप मी पाहिलं आणि प्रश्न क्षणार्धात सुटला. तसेच आम्ही सर्व जण घरी आलो आणि हातपाय धुऊन किशोरीताईंनी पहिलं काय केलं असेल तर तंबोरे काढले आणि त्या वेळेला विलक्षण आर्त अशी बिभासामधली चीज त्या आळवू लागल्या–'अल्ला तूही मौला तूही!'

हळूहळू तो बिभास तीव्र स्वरूप धारण करू लागतो आणि एका क्षणी किशोरीताई बिभासात जणू विलीन होतात. त्यांच्या तीक्ष्ण

आवाजातली विलक्षण लयकारी, तो अपरिचित आवेग आणि या गानसमाधीतूनही अंगावर उडणारे आनंदतुषार !

उंच कड्यावरून कोसळताना भव्य जलस्रोतान मुद्दामच आपलं अंग चोरून घ्यावं आणि खाली पडणाऱ्या प्रपातानं आपल्या रुंदीची भव्यता कोसळणाऱ्या खोलीत झोकून द्यावी आणि नतर तलवारीच्या तीक्ष्ण पात्यासारख त्या प्रपातानं आपल्या भोवतालचा आसमंत कापीत विलक्षण आत्मविश्वासानं धरित्रीवर झेप घ्यावी, तसं किशोरीताईंचं गाणं आहे. धरित्रीवर झेपावल्यावर क्षणार्धात त्या वेगवान तीक्ष्ण जलप्रपाताचं रूपांतर शुभ्र धवल फेसाच्या विविध मृदू फुलांत व्हावं, तसाच प्रत्यय किशोरीताईंच्या गाण्यानं येतो. जणू काही असामत कापीत त्या प्रपातानं यावं तसच किशोरीताईंच्या गाण्याच पहिलं स्वरूप असतं. परंतु एकदा का त्या षड्जावर स्थिरावल्या, रागाचं रागत्व व्यक्त झालं की सुरुवात होते ती मृद फेसाच्या फुलाच्या लडिवाळपणाला.

किशोरीताईंच गाणं ऐकत असताना सूर-तालाच्या अन्योन्य संबंधाचं दर्शन फार जवळून घडतं आणि त्यांच्या नंतरच्या बोलण्यातून ते जास्त स्पष्ट होतं ही स्पष्टीकरणं मिळविण्याकरिता नाही नाही त्या वेळेला मी किशोरीताईंना त्रास दिला. कधी रात्री ११ च्यानंतर, तर कधी सकाळी ७॥ ला, तर कधी शिष्याना शिकविताना भर दुपारी १२ वाजता !

त्या दिवशीही असच बोलणं चाललं असता संगीतातल्या मूल घटकाकडे आम्ही वळलो. मला वाटतं त्यांना स्वरविषयक काही तरी बोलायचं होतं. योग्य ते शब्द सापडत नव्हते. त्यामुळं त्या विलक्षण अस्वस्थ होत्या. हाताची हालचाल करीत असतानाच त्या थांबल्या; पण किती वेळ, निमिषभर आणि मग क्षणार्धात उद्गारल्या, 'स्वर ही एक State of Mind आहे. स्वर ही एक मनाची अवस्था आहे.' सुभाषितासारखं ते वाक्य कानांवरून पुढं गेलं. त्या वाक्यावरून मीही पुढ गेलो; पण मनात ते वाक्य कुठे तरी खोलवर रुजलं होतं आणि बोलणं चालू असतानाच त्या वाक्याचा मी मनाशी विचार करू लागलो.

स्वर ही एक मनाची अवस्था आहे....गाण्यामधल्या सप्त सुरांचं इतकं यथार्थ वर्णन क्वचितच कुणी केलं असेल. गांधार, पंचम, ऋषभ. पहायला गेलं तर स्वर म्हणजे निव्वळ एक विशिष्ट कंपनध्वनी. पण त्या निव्वळ कंपनध्वनीला मानवी मनाचं अधिष्ठान प्राप्त झालं की, तोच ध्वनी क्षणार्धात कवचकुंडल घातलेल्या दिव्य यक्षगंधर्वांच्यासारखा आपल्यासमोर विललक्षण तेजानं झळाळू लागतो आणि मग त्याला स्वरत्व प्राप्त होतं.

किशोरीताई विलक्षण आवेगानं बोलत होत्या. त्यातच त्या पुढं म्हणाल्या, 'स्वरांचा भावाशी संबंध असतो. त्यामुळं मनाची एक विवक्षित अवस्था, ज्याला आपण भाव म्हणू, नेमकं तेच स्वराचं महात्म्य आहे.'

मला नेहमी प्रश्न पडे की, सूर-तालामागच्या संकल्पना कुठल्या ? किशोरीताईंच्या वरच्या उद्गारानं तिढा थोडासा सुटल्यासारखा वाटला. आयुष्य समजून जगण्याकरता अत्यंत आवश्यक अशा दोन गोष्टी एक म्हणजे भाव आणि दुसरी म्हणजे त्या भावाच स्वरूप चौकटीत मांडणारी आणि ती समजावून देणारी अशी बुद्धी. मला असं सारखं वाटतं की, सूर-तालाच्या मागे कुठं तरी भावबुद्धीचा संबंध असावा. आसपासच सारं सौंदर्य पाहणं, ते ग्रहण करणं आणि त्यातल्या विभिन्न संभ्रमाच्या संकल्पना जाणवून घेणं हे भावाचं काम आणि ते सारं करत असताना कुणाकडून ते करून घ्यावं, कसं करून घ्यावं हे बुद्धीच काम. त्यामुळं गाण्यातदेखील भाव आणि बुद्धीचा समन्वयच असायला हवा.

आणि मग यातूनच तालाचं महत्त्व जाणवतं. अनेक सुरांच्या लडिवाळ भेंडोळ्यातच जर माणूस स्वत:ला हरवून बसला तर विलक्षण विभ्रमांच्या भुलभुलैयात स्वत:ला हरवून बसेल; पण तस न करू देता, कणाकणानं पुढं सरकणारा ताल त्या 'भावाला' समोरच्या लक्ष्याची आठवण करून देत असतो. या भावालाही भोवतालच्या विभ्रमात गुंतून राहण्याची खोड असावी. तेव्हा या मायावी विभ्रमातून पुढं खेचण्याकरताच ताल असावा आणि त्यामुळंच भोवतालच्या विभ्रमांची गोडी चाखत परंतु आपल्या लक्ष्यावरील नजर तसूमात्रही न ढळवता एखादा गायक सूर-तालाच्या हातात हात घालून पुढं चालायला लागला की, क्षणार्धात त्या गायकाला विश्वकर्म्याचं रूप प्राप्त होतं. गाण्यात तबला घेतला की, त्यात भावबुद्धीचं नातं आलं असं नव्हे. आयुष्यभर या दोन खट्याळ सवंगड्याची मनधरणी करावी, तेव्हा कुठं ते तुमच्याबरोबर थोडंफार अंतर यायला तयार होतात आणि हे जेव्हा साध्य होत तेव्हा अवचित कोणी तरी पुटपुटत, 'वा ! काय लय साधली आहे !'

किशोरीताईंचं गाणं हे असं लयीचं गाणं आहे.

नायकी कानडा अथवा बसंती केदारसारखे 'जयपुरी' राग त्या आळवीत असाव्यात, तेव्हा त्यांच्या गाण्याला जी धार लाभते ती अवर्णनीय असते.

एका भल्या मोठ्या विस्तीर्ण माळरानावर सहस्र नागांनी आपले फणे वर काढून डोलावं आणि त्या डोलण्याला धार असावी, जो डौल असावा, तीच धार, तोच डौल किशोरीताईंच्या गाण्याला लाभला आहे.

नेहमीच ऐकवल्या जाणाऱ्या यमन, भूप, बागेश्री रागाच्या जगतात जेव्हा त्या घुसतात तेव्हाच उमजतं की, प्रत्येक स्वराची जात प्रत्येक रागात किती वेगळी आहे. आपल्या आयुष्यातल्या नेहमीच्याच घटनांना एखादा हेमिंग्वे संपूर्ण वेगळं रूप प्राप्त करून देतो तसच, त्याच सुराना किशोरीताई आपल्या परिसस्पर्शानं संपूर्ण वेगळं रूप प्राप्त करून देतात.

जुन्या गायकाचं गाणं दुर्दैवान ऐकता आलं नाही; परंतु गाण्यातला अद्भुततेचा अथवा अतिमानवीपणाचा स्पर्श कुणाला पाहायचा असेल तर, त्यान किशोरीताईंचं गाणं ऐकावं. (इथं तुलना मुळीसुद्धा अभिप्रेत नाही किंवा इतर गायकाना कमी लेखायचाही उद्देश नाही. सारेच आपापल्या सूरसंस्थानचे राजे; परंतु गाण्याला या अद्भुततेचा स्पर्श करून द्यायचा आणि नंतर ते सारं जाणवून द्यायचं. मला वाटत, हे किशोरीताईंचं वेगळं सामर्थ्य आहे. बागेश्रीवरनंच त्या म्हणाल्या, 'पार्ल्याला का कुठं मैफल होती. मी बागेश्री म्हणत होते. पाहता पाहता मनात चहूबाजूनी भरून यायला लागलं. मी आणि बागेश्री संपूर्ण एक होऊ लागलो आणि एक क्षण असा आला की, माझ्या गाण्यापासून माझं वेगळ अस अस्तित्वच राहिल नाही

इथं स्थल-कालाच भान सुटलेलं असतं. जाणिवेच्या पातळीवरले सर्व संकेत दिसेनासे होतात आणि मग किशोरीचं Spirit तिथं गात असत. फारच विचित्र अवस्था असते ती त्या क्षणी माझा ब्रॉंकॉयटिस, माझा आजार, सारा शिणवटा कुठल्या कुठं गेलेला असतो आणि असं वाटत असत की, गायल नाही तर पुढच्या क्षणी मोडून पडेन.

'हे सार आत्ता लक्षात येतं; पण तेव्हा एवढंच कळत असतं की, आपण कुठल्या तरी उन्मन अवस्थेत होतो. भानावर असताना चालू केलेला बागेश्री तसाच चालू असतो. त्यात एका सुराची गफलत होत नाही की तालाचा अशमात्र गोंधळ होत नाही बागेश्री तिच्या रूपात हळूहळू माझ्या वाटे प्रगट होत असते. ही सारी बेभान अवस्था असते. कसं काय, कुठं चाललंय याचा मला काहीच पत्ता नसतो; पण येणारी दाद-त्यावरून समजत असतं की, बागेश्री उभी राहातेय. बागेश्रीचे सूर आपापल्यात बोलायला लागतात माझ्या नकळत बागेश्री साकार होऊ लागते.

'हे सार कसं होतं याचा मी शोध घेते तेव्हा मला एक गोष्ट निश्चितपणे लक्षात येते. ती ही की, मी सुरू करायच्या आधीही अंतराळात, आसमंतात बागेश्री कुठे तरी असतेच. फक्त माझ्या आवाहनाने ती दृग्गोचर होऊ लागते.' किशोरीताई विलक्षण वेगाने बोलत होत्या- 'बागेश्रीच असण ही एक जिवत घटना आहे' त्यावरूनच त्यानी पुढं एक अत्यंत मर्मग्राही मुद्दा माडला की, ज्ञान हे नेहमीच जिवत असतं. जरूर असते ती त्याला साद घालणाराची.

'या उन्मन अवस्थेचा तुम्ही कधी नंतर विचार करीत नाही ?' मी.

'करते ना आणि मग माझ्या हेच लक्षात येतं की, जेव्हा केव्हा मला अशा अवस्था प्राप्त होतात, तिथं माझं गाणं आणि मी याच्यातलं अंतर नाहीसं होतं. Conscious Level वरचे व्यवहार थांबतात तरीही गाण्यात तसूभरही कमतरता येत नाही की रागाच रागत्व लुप्त होत नाही. याचाच अर्थ असा की, मी जे स्वर लावते त्या स्वराच्याही मागे काही तरी दडलेल आहे. या दिसणाऱ्या किशोरीच्याही पाठीमागं दुसरी किशोरी दडलेली आहे. त्या मनापाठच्या मनाचा शोध घेण्याकरिताच माझी अखड धडपड सुरू आहे.' या किशोरीताईंच्या वाक्यावरून अल्बर्ट कामूच्या एका विकाराची अभावितपणे आठवण झाली. कामू लिहितो की, गेली ५० वर्षं अणू फोडणं चालू आहे दर दोन-चार वर्षांनी, अणूच्याही आतला अणू कुण्या एका शास्त्रज्ञाला गवसतो.

इलेक्ट्रॉन-प्रोटॉन-न्यूट्रॉन हा प्रवास, ही फोड चालूच आहे. सूक्ष्मातल्या सूक्ष्म कणातही पुन्हा एक सूक्ष्म कण आहेच तेव्हा या हताश अवस्थेकडे बघून कामू म्हणतो की, A step comes when philosophy reduces to a metaphor & physics takes the shape of poetry.

नाही तरी प्रत्येक स्वयंभू विचारवंताची, कलावंताची दुसरी ओढ तरी कुठली असते ? 'मनापाठच्या मनाचा मनानेच केलेला शोध !' ◻

अत्यंत साध्या पातळात, घरभर धावपळ करणाऱ्या किशोरीताईंकडे पाहिलं की, असामान्य गानाविष्कार तर सोडाच-पण नेहमीचंच साधं पिठल-भात तरी या बाईंना जमेल किंवा नाही याची शका वाटते; पण याच किशोरीताई दोन तबोऱ्यांच्या स्वराज्यात दिमाखात बसल्या की, या किरकोळ यष्टीच्या बाईची प्रज्ञा क्षणार्धात जाणवते. पहाता पहाता आवेगाने त्या षड्जाकडे झेपावतात आणि कळत-नकळत क्षणार्धात षड्जावर स्थिरावतात, तेव्हा नकळतच मनातल्या मनात त्याची प्रतिमा सध्याकाळच्या सावलीसारखी विस्तीर्ण होते.

आणि मग त्या स्वरसाम्राज्यात एक वेगळाच आनदसोहळा दृग्गोचर होऊ लागतो. मैफिली आणि किशोरीताई, दोघही क्षणभर आपापलं अस्तित्व विसरतात. इतर इंद्रियानुभवाचा विसर पडतो. कर्णेंद्रियात झिरपत असतो तो किशोरीताईंचं यमन अथवा भूप !

कुठल्याही कलेची स्वत ची काही शक्तिस्थान असतात. 'देगा'चं एखाद्या नृत्यांगनेचं चित्र पाहता पाहता त्या चित्रातल्या रंगाच्या, आकाराच्या मोहविणाऱ्या खुणात विरघळून जावं आणि त्या लयीच्या आभासात आपणही एक चीजच होऊन जाव, तसाच तो अनुभव असतो. अथवा कुठल्या तरी दूरस्थ कॅलिफोर्निआतल्या सॅलिनास नदीचं नाव प्रथमच वाचाव आणि स्टाइनबेकच्या परिसस्पर्शीत त्या सॅलीनासमध्ये मनसोक्त डुंबाव, तो सारा प्रदेश, ती सारी माणसं आपलीच वाटत रहावीत. मला वाटतं हेच नेमकं कलावंताच सामर्थ्य आहे.

तत्कालीन ऐहिक गोष्टीचा विसर पाडून एका वेगळ्या आनदयात्रेची वाट दाखवणं हेच कलावंताचं काम आणि नेमक हेच किशोरीताईंच्या गाण्यातून अनुभवाला येत. दोन-चार मिनिटांपूर्वीच गजबजत्या बाजाररस्त्यावरून येणाऱ्या माणसाला किशोरीताईंच्या गाण्यामुळ यक्षाचा कान प्राप्त होतो आणि प्रत्येक माणसाला हेच वाटत रहातं की, मी पण एक शापित यक्ष. मला वाटतं, त्याच्या गाण्यातल वैभव हे इथं साठवलंय.


गाण्याव्यतिरिक्त किशोरीताईंना इतर अस्तित्व नसावं. असलंच तर ते त्यांच्या स्वत.च्या खिजगणतीत नसावं. दिवसाच्या कुठल्याही वेळेला त्या गाण्यातच वावरत असतात. महत्त्वाचा टेलिफोन करत असतानाच आत रियाज करणाऱ्या शिष्येला फोन थांबवून सागतील, 'नाकातून आवाज येतोय. पुन्हा एकदा घे.' त्यांचं हे सदैव गाण्यात रहाणं हेच त्याचं शक्तिमान स्थान आहे आणि तिथच...हो, त्या सदैव गाण्यात असल्याकारणानं त्याच्या भाषेत सागायचं तर 'मी


नूतन वर्षाभिनंदन

मध्यमवर्गीयांना उपयोगासाठी लागणारे
घरगुती सर्व प्रकारचे सुदर, मजबूत
आणि टिकाऊ, तसेच हॉस्पिटल्स आणि
ऑफिसेस यांना लागणारे उत्तम फर्निचर
ऑर्डरप्रमाणे बनवून मिळण्याचे
एकमेव ठिकाण.

**स्टँडर्ड फर्निचर वर्क्स**

नूर बिल्डिंग, तुळशी पाइप रोड,
दादर, (बी. बी.) रेल्वे स्टेशनजवळ,
मुबई २८.



**समोर सारं लख्ख दिसतंय, पण ...!**

सतत एअर-कंडिशन केलेल्या विश्वात वावरत असते.' यामुळं त्यांना इतर ऐहिक गोष्टींचा फारसा स्पर्श होत नसावा. त्यामुळं त्या सुरक्षित कवचकुंडलात असतात; पण म्हणूनच इतर भोवतालच्या परिस्थितीची त्यांना तितकीशी ओळख नसते किंवा त्यात त्या Interested नसतात. त्याचमुळं ज्याला आपण सर्वसामान्य व्यवहार म्हणू तो त्यांच्या लेखी फारसा नसतो. हा सर्वसामान्य व्यवहार अथवा हल्लीच्या भाषेत ज्याला Public relationing म्हणतात ते त्यांना जमत नाही. त्याबद्दल त्यांना खंतही नाही. त्यापेक्षा फटकळ म्हणवून घेऊन स्वरांशी संवाद करणंच त्यांना जास्ती मानवतं.

'किशोरीताई, तुमच्याबद्दल बाहेर अनेक समज–गैरसमज पसरलेले आहेत. 'एक अत्यंत लहरी गायिका' असं आपलं वर्णन करण्यात येतं हे असं का?'

माझ्या प्रश्नानं किशोरीताई क्षणभर दुखावलेल्या दिसल्या; पण दुसऱ्याच क्षणी त्यांनी स्वच्छपणे सांगून टाकलं, 'मी मनातल्या मनात कुठं तरी खोल दुखावले आहे. माझ्या आयुष्यात सर्वांत वाईट अनुभव मला माणसांकडून आले आहेत. त्यामुळे त्याला अनुसरून माझं वर्तन होत असावं; परंतु एक मात्र निश्चित की, मी हे मुद्दाम करत नाही.'

'मला सांगा, तुम्ही या प्रसंगानंतर काय केलं असतं?' किशोरीताई विलक्षण खिन्न होतात. मला वाटतं, मी हा प्रश्नच विचारायला नको होता. त्या बोलतच असतात...

'महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे शेजारच्याच एका देशाचे राजेसाहेब, पाहुणे म्हणून आले होते. त्यांच्या करमणुकीखातर काही तरी सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य मंत्र्यांच्या निवासस्थानी करावयाचा होता. सहसा उच्चपदस्थांकडे मी निमंत्रण स्वीकारीत नाही. नंतर उगीचच वादंग निर्माण होते.

'तेव्हा महाराष्ट्र सरकारच्या एका अधिकाऱ्याच्या मैत्रीमुळे, केवळ त्याच्या विनवणीमुळे मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी गायचं मान्य केलं. बरोबर नऊ वाजता साथीदारांसह तिथं पोहोचले. खाली मुख्यमंत्री आणि राजेसाहेब जेवत होते. अर्ध्या–पाऊण तासाने मंडळी डुलतडुलत आली. मला वाटतं तेव्हा मी बागेश्री चालू केला. मंडळी नुकतीच जेवून आली होती. बागेश्री सुरू करून दोन–चार मिनिटं होताहेत इतक्यात बाजूच्या दारातून चार–पाच वेटर्स हातात सुक्या मेव्याची ताटं घेऊन आले आणि ते शाही खाणं चालू झालं. मला विलक्षण संताप आला. तरीही माझ्या अधिकारी मित्राकरिता मी गाणं सुरूच ठेवलं. आणखी एक पाच मिनिटं गेली आणि थंड कॉफीचे मोठे प्याले आले आणि सुकामेवा तोंडात टाकीत, कॉफीचे घुटके घेत ही मंडळी गाणं ऐकताहेत. माझा राग अनावर झाला. त्याच झटक्यात अक्षरशः दहा एक मिनिटात बागेश्री आटपला. तरीही त्या मुख्यमंत्र्यांच्या आणि राजेसाहेबांच्या गप्पा, खाणाखुणा चालूच! माझ्या रागाचा पारा क्षणार्धात वर चढला आणि त्या संतापलेल्या अवस्थेतच मी हे सूरदासाचं भजन त्यांना ऐकवलं 'उधो करमन की गती न्यारी ...

मूरख मूरख राजे किन्हे
पंडित फिरत भिकारी
उधो करमन की गती न्यारी!'

आणि सहाव्या मिनिटाला तंबोरा आडवा ठेवला,

'वृत्तपत्रं ह्या घटना त्यांच्या बाजूनंच छापतात तेव्हा लोकात समज पसरतो. किशोरी आमोणकर उद्धट आहेत. एका केंद्रीय मंत्र्यांनी एकदा मात्र माझं गाणं ऐकून निरोप पाठवला,... 'साहेबांना तुम्हाला भेटायची इच्छा आहे!' मी म्हटलं, 'वा! फारच छान!' आणि माझं गाणं संपल्यावर मी मंचावर जवळजवळ दहा–एक मिनिटं बसून होते; पण ते गृहस्थ काही आले नाहीत. मी निघून गेले. दुसऱ्या दिवशी त्या मंत्र्याच्या हितसंबंधीयांचा मला फोन आला. 'काल साहेब तुम्हाला भेटायला थांबले होते; पण तुम्ही भेटला नाहीत?' मी म्हटलं 'शक्यच नाही. माझं गाणं संपल्यावर तब्बल दहा मिनिटं मी मंचावर बसून होते. तेच आले नाहीत!' तो माणूस एकदम गप्पच झाला. त्याची साहजिक इच्छा अशी की, मंचावरून उतरून किशोरीताईंनी खाली यावं; पण हे कसं शक्य आहे? ते काही किशोरी आमोणकर या व्यक्तीला भेटायला येत नसतात. ते येतात ते तिच्या गाण्याशी बोलायला, भेटायला. मग त्यांना जर गाण्याला भेटायला यायचं असेल तर त्यांनी मंचावरच यायला हवं! यात त्यांच्या अपमानाचा प्रश्न येतोच कुठं? पण बाहेर एकाचं दहा होतं आणि पसरतं की, किशोरी आमोणकर शिष्ठ आहेत आणि खरं सांगू विनय, मी आता इतक्या लांबवर जाऊन पोहचलेय की, हा गैरसमज निराकरण करण्याचीही माझी इच्छा नाही!'

पण मी मात्र किशोरीताईंना एका प्रख्यात संपादकाला झापताना

पाहिलं आहे. वैऱ्यावरही तो प्रसंग यऊ नये !

हे संपादकमहाशय चोरून माईंच्या (मोगुबाई कुर्डीकर) गाण्याचं ध्वनिमुद्रण करीत होते आणि हे किशोरीताईंना समजलं. त्यांनी त्या संपादकाला बोलावलं. तो राष्ट्रीय पातळीवरच्या वृत्तपत्राचा संपादकही आज्ञाधारकपणे त्यांच्यासमोर उभा राहिला. एखादी फ्रॉंटिअर मेल जावी तसं किशोरीताई त्याला झापत होत्या. (इथं असल्या प्रसंगात त्या मुळीसुद्धा अडखडळत नाहीत.)

त्या संपादकानं गेल्या दहा वर्षात त्याच्या अग्रलेखातून लोकांना जेव्हढं झापलं नसेल तेव्हढं सारं, किशोरीताईंनी त्याला दहा मिनिटांत सुनावलं. इवलसं तोंड करून तो बिचारा परत गेला; पण अशा घटनांवरून किशोरीताईंविषयक लोक उगाचच बोलू लागतात, 'बाई उद्धट आहे !'

□

किशोरीताईंना निःशब्द करायचे जे एक-दोन मार्ग आहेत त्यातला एक हमखास म्हणजे त्यांना प्रश्न टाकावा, 'किशोरीताई, माईंविषयी (त्यांच्या आई, विख्यात गायिका मोगुबाई कुर्डीकर) तुम्हाला काय वाटतं ?' त्या विलक्षण गोंधळतात. कदाचित आठवणींवर आठवणी येऊन कोसळत असाव्यात. त्यामुळं त्या अवाक् होत असाव्यात; पण अवाक् होताना हळू हळू डोळयांच्या कडा मात्र ओलावत जातात !

'विनय, माईंविषयी मी काय सांगू ? आई, गुरू, माझी मैत्रीण... ती सारं सारं काही आहे.' किशोरीताईंच्या लहानपणीच त्यांचे वडील गेले. तेव्हापासूनचा खडतर मार्गप्रवास मोगुबाईंनी मोठ्या तेजस्वीपणानं केला. त्यामुळं माई म्हणजे किशोरीताईंचं दैवत आहे आणि माईंनाही याची कल्पना आहे. त्यामुळंच अनेकविध पदर असलेलं माई-किशोरी नातं पाहणं हा एक निखळ आनंद आहे. या अनेक पदरी नात्यातला एखादा तरी पदर आपल्याला दिसावा म्हणून अनेक दिवस मनाशी आशा बाळगून होतो आणि एक दिवस ती आशा पुरी झाली.

मालकंसची तालीम चालली होती.

मैफिलीत अथवा अन्यथा बाहेर वावरणाऱ्या किशोरीताईंचं स्वरूप आणि हे स्वरूप यात जमीन–अस्मानाचं अंतर होतं. एका राजाला भर मैफिलीत 'उधो करमनकी गती न्यारी। मूरख मूरख राजे किन्हे । पंडित फिरत गिरवारी' असं तडकावणाऱ्या किशोरी आमोणकर' आपल्या गुरुसमोर मान खाली घालून विलक्षण भक्तीने बसल्या होत्या.

भारताच्या एक आघाडीच्या गायिका, एक सर्जनशील कलावंत, आपल्या 'गुरुमाउली'ला अक्षरशः शरण गेला होता. विद्यार्थी शब्दाचं ते जणू दृश्य रूपच होतं. माईंपासून लांब, अंग चोरून किशोरीताई बसल्या होत्या. मांडीवर डग्गा घेऊन माई बसल्या होत्या. तो सारा प्रसंग कसा लख्ख आठवतोय ! काश्याच्या भांड्यासारखी लख्ख कांती, पांढरेशुभ्र केस, चेहरा विलक्षण बुद्धिमत्तेनं तेजाळलेला आणि या सर्वांना अवगुंठित करणारं एक स्फुट हास्य-यामुळं माई खरोखर वेगळ्याच विश्वातल्या दिसत होत्या. शांतपणे डग्ग्यावर ताल देत माईंची तालीम चालू होती. माईंच्या आविष्काराचा प्रत्येक कण न् कण वेचण्याची किशोरीताईंची धडपड चालू होती. एकेक पाठ त्या हळूहळू घोळवीत होत्या.

एका असामान्य माय–लेकींचा तो अद्भुत संवाद.

चीजेत काही तरी 'करत कृपा प्रभू' असे शब्द होते. माईंना पाहिजे तेवढा गाण्यातला 'प्रभू' शब्द ऱ्हस्व येत नव्हता. त्यामुळे चीजेचा डौल थोडा बिघडत होता. (अर्थात हे माईंनी नंतर सांगितल्यावर उमजलं) माईंनी ते शब्द म्हटल्यावर सारं सुरळीत वाटत होतं; पण किशोरीताईंनी म्हटल्यावर थोडं वेगळं वाटत होतं. एक-दोन वेळा असं घडलं आणि तिसऱ्या वेळी माई खेकसल्या, 'ह्यॉं...का वाढवतेस माझे आई ? लक्ष कुठं आहे ?' आम्ही सर्वच दचकलो. पुढच्याच क्षणी किशोरीताईंनी सफाईनं चीज म्हटली आणि ती अलौकिक शिकवणी पुढं सुरू झाली.

मुळात किशोरीताईंचं गाणं अफाट ! त्यात त्याला विलक्षण सर्जनशीलतेची जोड; पण अशा किशोरीताई देखील जेव्हा माईंसमोर नतमस्तक होतात तेव्हा उमजतं, आकाशगंगेत तारका किती आहेत आणि ज्ञानाच्या पायऱ्या किती असंख्य आहेत त्या !

हा अद्भुत गानसंवाद ऐकल्यावर भारतीय 'गुरु-शिष्य' परंपरा यावरील माझा विश्वास आणखीनच दृढ झाला,

किशोरीताई सांगू लागल्या : माईंनं कधी माझे भलते लाड केले नाहीत. कुठल्या तरी मैफलीत मी माईला साथ करीत होते. थोडी चूक झाली असेल माझ्याकडून; पण तत्काळ माई कडाडल्या, 'गाता येत नसेल तर चालतो हो !' तो सारा प्रसंग स्पष्ट आठवतोय ! पण तीच माई माझा आवाज गेला होता त्या वेळी एखाद्या लहान मुलासारखी रडली होती. माईला मी फार क्वचित वेळेला रडताना पाहिलंय; पण त्या दिवशीचं माईचं रडणं हे कधीच माझ्या नजरेसमोरून जाणार नाही.'

मला वाटतं की, किशोरीताईंचं गाणं हा माईंच्या अस्तित्वाचा फार मोठा आधार आहे आणि किशोरीताईंना विचारलंत तर त्या क्षणार्धात सांगतील, 'माझ्या गाण्यातला माईचा वेस काढून टाका आणि पहा कसं किशोरी आमोणकरांचं गाणं कोसळतं ते !' एक-मेकांच्या आविष्काराचा मायलेकींना परस्पर आधार–केवढी अद्भुत घटना आहे ही !

'शप्पथ बाबा,ही माई असली की ही रेडीओवरची गाणी सुद्धा ऐकता येत नाहीत !' किशोरीताई म्हणतात आणि हे सारं माईंच्या समोरच


*With Best Compliments from:*

**Proficient Shorthand and Typewriting Institute**

**Shanwar Peth, Poona 30.**

चाललेलं असतं. यावर माईचं एक मृदू, मिस्कील हास्य! मला वाटतं, किशोरीताईंचं सारखं चाललेलं 'माई ग', 'माई ग' हे त्याच्या नकळ-तच होत असाव माईंच्या अस्तित्वाभोवती चाललेल हे किशोरीताईंचं गुजन पाहिल की, या असामान्य माय-लेकीच्या ऋणानुबंधाचे गहिरे पदर दिसायला लागतात आणि एका अनामिक भावनेनं आपलेच डोळे पाणावतात.

'ज्या गोष्टी मी माझ्या मैत्रिणीनाही सागू शकत नाही त्या मी माझ्या माईला सांगते' आयुष्यातले अनेक असे सुखद आणि दु खद प्रसंग आहेत, की जे माईशिवाय मी कुणालाच सागितले नाहीत आणि विचार करा माझी माई किती कर्मठ आहे ती. एक-दोन मिनिटं बागडचा काढून ठेवल्या तरी ते माईला कळत आणि माई मला लगेच तडकावते. अशी कर्मठ आहे ती! पण त्याच माईपाशी माझी सारी गुपित मी खुली करते कुठल्याही मैत्रिणीपेक्षा माझी माई मला अत्यंत जवळची मैत्रीण आहे!' मला उमजतंय की याच्यापुढं बोलण किशोरीताईंना जड जातंय, आवाज भरून येतोय.

¤

'मी जेव्हा गाणं शिकायला सुरुवात केली, तेव्हा मला र का ठ कळत नव्हत; पण कदाचित माझ्यातल्या सुप्त गुणाचा अदाज माईला आला असावा. आणि माईन शिकवणं चालूच ठेवलं जसजसा आवाज तयार होऊ लागला, समज वाढू लागली तसतसा गाण्याविषयी मी विचार करू लागले. तेव्हाही मी रेडिओवरची भावगीतं ऐकायचीच आणि त्या भावाचा तेव्हापासून मला वेध लागला. मी गाता गाता मला अस नेहमी वाटायचं की, माणिकताईंसारखा भाव का अजून माझ्या गाण्यात येत नाही? आणि या विचारानंच मी जास्तीत जास्त 'भावा'कडे खेचली गेले आणि त्याचमुळे मधे एकदा मी चित्रपटा-तूनही गायले! 'गीत गाया पत्थरोने' यातली काही गाणी विलक्षण गाजली. अक्षरशः हिट् झाली. Best Three मधे त्यांचा नंबर होता पण काय झालं कुणास ठाऊक, एका रात्रीत त्या साऱ्या Records गायब झाल्या! कुठेच त्या मिळेनात! त्या Records त्या दिवशी ज्या गायब झाल्या त्या आजगायत दिसत नाहीत! या साऱ्यांना मी कंटाळले आणि नाही तरी माझा जीव तिथं रमला नसताच. तेव्हापासून त्या हलकल्लोळापासून मी दूरच राहिले आणि त्याचा मला थोडाही पश्चात्ताप होत नाही. माझ्या सुरांच्या मधे मी मस्त आहे!

'माईने साऱ्या गाण्याविषयक एक दृष्टिकोन दिला होता. आवाज तयार झाला होता. हळूहळू मी नावा-रूपास येत होते खूप खोलवर विचार करायचा ही माझी पहिल्यापासून सवय. त्यामुळं गाणं शिक-तानाही माझा विचार सुरूच होता. गानसाधना अखंड चालू होती.

'किशोरी आमोणकराची मैफल म्हणजे काही तरी वेगळं ऐकायला मिळणार ही लोकाची अटकळ असे आणि ती पुरी करण्याकरिता मी जिवापाड धडपडत असे. अशा वेळेलाच १० वर्षांपूर्वी मला आजार आला. संपूर्ण आवाजच गेला! जगण्याचं प्रयोजनच सपलं!

'यानतर मुबईतले अनेक डॉक्टर्स झाले. पाण्यासारखा पैसा खर्च केला गेला; पण सगळीकडे निराशा! अशा वेळी देशमुखमहाराज पुढे आले. त्यानी माझी नाडी तपासली आणि तिथल्या तिथ माईला आश्वासन दिल. 'किशोरीचा आवाज मी बरा करतो. इतकच नाही तर पूर्वीपेक्षाही तो सुधारून दाखवितो!' आणि हे सारं पहिल्या भेटीत. त्यांचं औषध सुरू झालं. तुम्ही चमत्कार म्हणा किंवा काही म्हणा, पण देशमुखमहाराजांचं बोलणं अथपासून इतिपर्यंत खर झालं!

'आणि माझा आवाज पुन्हा लागला. तो एक पुनर्जन्म होता. या मधल्या कालखंडात गाण्याविषयी मी पुष्कळ विचार केला होता. आणि मला समजून चुकलं होतं की, गाण्यात भावाचं महत्त्व केवळ अन्योन्य आहे. त्याचमुळं मी पुढ पुढं थोडी वेगळी वाट धुडाळली. जेव्हा मला असं वाटल की, मी जे घराणेदार गाणं म्हणतेय त्यात भाव कमी दिसताहेत. मी निर्णय घेतला, की नाही; भावाशिवाय गाणं आणि गाण्याशिवाय मी, जगूच शकणार नाही! यातूनच लोक म्हण-तात की, किशोरीने जयपूर घराणं सोडलं. मुळीच नाही! जयपूर घराणं हे मला आजही अत्यंत प्रिय आहे आणि त्या घराण्याची असल्याबद्दल मला अभिमानही आहे!'

'किशोरीताई, तुम्ही अजूनही जयपूर घराण्याच्याच आणि तुम्हीच म्हणता की, 'मी वेगळी वाट धुडाळली!' तर हे नक्की काय आहे?' मी.

'त्याचं काय झालं की, मला जेव्हा गाण्यातून जास्तीत जास्त भाव प्रगट करावा असं वाटायला लागलं, तसतसं मी वेगळी वाट धुडा-ळली हे खरं आहे; पण मी घराणं सोडलं नाही! जयपूर घराणं ही माझी आई आहे अनेक वेळा माझ्या वरील विचारामुळं मी घराण्या-पासून लांब गेले. जेव्हा यशस्वी झाले तेव्हा एक ओरिजिनल कलावंत म्हणून लोकांनी मान्यता दिली. जेव्हा प्रयोग फसला आणि मी दिङ्मूढ झाले, तेव्हा पुन्हा जवळ घेतल ते माझ्या जयपूर घराण्या-नच! एखाद्या आईच्या ममत्वानं आणि क्षमाशीलतनं जयपूर घराणं माझ्याकडे पहातं. तिच्यापासून लांब होऊन काही नवीन प्रदेश पाहून आले की, ते सारं मी तिलाच सागते आणि ते करीत असताना कुठे लागलं, खरचटलं की पुन्हा तिच्याकडेच धाव घेते आणि माझ जयपूर घराणदेखील तितक्याच क्षमाशीलतेनं मला जवळ घेतं आणि पाठीवरून हात फिरवतं. नाही... माझं आणि जयपूर घराण्याचं नातं शब्दात सांगता येण्यासारखं नाही! सूर आणि ताल याच अत्यंत प्रमाणबद्ध मिश्रण असलेली ती गायकी आहे; अत्यंत subtle आहे, तितकीच अवघड आहे. तिला सौंदर्याची ओढ आहे, पण हावरेपणा नाही. कुठेही एखादी सुंदर जागा दिसली की, त्या क्षणापुरती वाहवा घेण्याकरिता भर ती जागा, असं नाही. त्या जागी तें आभूषण जर समर्थनीय होऊ शकत असेल तरच जयपूर घराणं ती जागा घेईल! सतत सौंदर्यानुभव मिळवून देणारं ते घराणं आहे, एव्हढंच मी म्हणेन!'

¤

किशोरताईंचा गाण्याचा अभ्यास आता अशा एका प्रगत अवस्थेला आला आहे की, जिथं वर्तमानपत्रातले reviews आणि श्रोत्यांची दाद याची ओढ संपली आहे. गाण्यातूनच फार एका वेगळ्या दिशेनं त्याचा प्रवास चालला आहे. शेवटी गाणं, चित्रकला या साऱ्या कला तरी काय आहेत? जीवनाची विविध रूपं दाखवायची आणि एक विलक्षण आत्मिक आनंद प्राप्त करून द्यायचा. विख्यात कलावंत, धर्मसस्थापक, सत याचा तरी प्रयत्न दुसरा कोणता असतो? आजू-बाजूच्या रखरखीत वाळवंटाचा विसर पाडून आत्मानंदाची शाती प्राप्त करून द्यायची. तो मिळणारा आनद क्षणभर असेल किंवा

तासाचा असेल. जो हा आनंद दुसऱ्याला देऊ शकतो आणि जितका जास्ती वेळ देऊ शकतो त्यालाच देवत्व लाभत जातं. अजूनही खवळलेल्या उद्ध्वस्त मनाला ज्ञानेश्वरीमधली ओवी शात करू शकते, हेच ज्ञानेश्वरीच महत्त्व! ज्ञानेश्वराना देवत्व लाभतं ते इथंच आणि नेमका याच प्रश्नावर किशोरीताईंचा विचार सतत सुरू असतो.

'विनय, माझ्या मैफिलीला लोक येतात; तास दोन-तास बसतात. आनदित होऊन निघून जातात. पण पुढं काय? पुढं त्याना सोबत? हा दोन तासांचा आनंद शाश्वत कसा करायचा? मला दिसणाऱ्या, जाणवणाऱ्या यमनला त्यांच्यापर्यंत कसं पोहचवायच? त्या मला जाणवणाऱ्या अनुभवाला universality कशी प्राप्त करून द्यायची? हाच माझ्या समोरचा प्रश्न आहे. माझ्याकडून मिळणाऱ्या आनंदाला शाश्वत स्वरूप आणि universality मिळाली की मी सुटले! मीरेची कृष्णभक्ती इतकी तीव्र होती की, तो आविष्कार केवळ एकटचा मीरेचा राहू शकलाच नाही! आपोआप त्या कृष्णभक्तीनं universal स्वरूप घेतल. तो वैयक्तिक अनुभव वैश्विक पातळीवर गेला! माझा ध्यास त्याचकरिता आहे.

'नाही तरी कलावंत काय शोधीत असतो? 'सौदर्य!' त्या सौदर्याचा साक्षात्कार इतराना घडविण्याकरिताच तर त्याची अखड धडपड चालू असते; परतु जसजसा कलावंत प्रगल्भ होऊ लागतो तसतसं त्याला जाणवत की, शेवटी सौदर्यशोधाच्या प्रवासाचीदेखील वाट आहे. It travels from Estehtics to Ethics.

'यानंतरच्या अवस्थेत इतर आभूषण, इतर वाहनं, इतकंच काय, इतर सुराचीही जरूर भासत नाही. फक्त षड्ज्. या षड्जातूनच पुढचं सारं लख्ख दिसायला लागतं.' इथं किशोरीताई चटकन बोलून गेल्या, 'का कुणास ठाऊक; पण षड्ज-गांधाराच्या नात्याकडे पाहून मला नेहमीच पुरुष-प्रकृतीची आठवण होते. तर काय सागत होते, षड्ज. फक्त षड्जच तुम्हाला सारं काही सागतो. प्रगल्भ कला ही प्रासादिक होऊ लागते. Art assumes a simpler form; पण मुळात ती सौदर्य गमावून बसते का? नाही. त्या सौदर्याचं हळूहळू सत्यात, अतिम सत्यात रूपातर होत असत. सत्य हळू हळू सौदर्याला आपल्यात सामावून घेत असतं. अंतिम सत्याकडे जाताना Medium चीही विविध आभूषणं हळू हळू उतरवून ठेवावी लागतात आणि मग रहातं ते फक्त सत्य. गाण्यातला एकेक कण, एकेक सूर नंतर जास्तीत जास्त अर्थ आपल्या पाठीवर घेऊ लागतो. पसारा, व्याप्ती हळू हळू कमी होऊ लागते आणि त्याची जागा खोली घेते. राहतात ते अत्यत निवडक सोबती–एखादा षड्जासारखा मित्र आणि इथ प्रचिती येते ती त्या सौदर्यप्रवासाच्या वाटेची आणि जसजसं एकेक आभूषण गळत जातं तसतसा Esthetics—Ethics हा प्रवास डोक्यात स्पष्ट दिसायला लागतो. काय करू? समोरचं सार लख्ख दिसतंय; पण पोहोचेन की नाही?' उद्विग्नतेनं त्यानी दोन्ही हात अंतराळाच्या दिशेन जणू झिडकारले.

हे ऐकलं की आठवण येते त्या उच्च चित्रकाराची. महर्षीच तो. पिएट मॉन्ड्रीऑन. त्याचाही असाच प्रवास. वाहन फक्त वेगळं. सुरांची जागा रगानी घेतली होती. अनेक दैदीप्यमान चित्रं पिएट मॉन्ड्रीआनने चितारली; पण शेवटी तो महामुनी स्थिरावला त्या मूळ रंगावर आणि मूलभूत आकारावर. त्याला साक्षात्कार झाला तेव्हा सारी आभूषण आणि हव्यास गळून पडले होते. राहिले होते ते फक्त Primary colours आणि Primary forms. उत्तमोउत्तम कादंबऱ्या लिहिणारा हेमिंग्वे अथवा स्टाइनबेक स्थिरावले त्यांच्या Old man & the sea किंवा Pearl वरतीच–साधं, अत्यत साध-सारी आभूषणं काढून ठेवली आहेत. सौदर्याच्या राशी हाताशी आहेत; पण ते सौदर्य सत्याला नजराणा म्हणून देत चाललेल्या या कलावंतांचा अद्भुत प्रवास पाहिला की, किशोरीताईंच्या म्हणण्याची यथार्थता पटते आणि वाक्य कानात घोळायला लागतं–The travel is from Esthetics to ethics.

आणि या विलक्षण भावनावेगातच त्या म्हणाल्या, 'नाही, एक कलावत म्हणून मला मरायचं नाही. तर एक सत म्हणून मी देह ठेवला तर त्यासारखा दुसरा आनंद मला होणार नाही.'

जीवनाच्या अशा टप्प्यावर किशोरीताई आता आल्या आहेत की, इथून समोरच्या सागराची आणि त्यात डोकावलेल्या अथाग आभाळाची निळाई त्यांना दिसते आहे. व्यक्तिगत हेवेदावे, मान–अपमान मागे पडत चालले आहेत. त्यांचं मन एका वेगळयाच सुरांभोवती रुंजी घालतय. जीवनातल्या शाश्वत आनदाचं स्वरूप त्याना जाणवलंय आणि ध्यास लागला आहे तो, तो आनद इतराना मिळवून देण्याचा. हा तीक्ष्ण जलस्रोत मोठया विशाल सागराला मिळतो आहे. या अशा अद्भुत आनंदसोहळयात माझ्या डोळयासमोर एक चित्र तरळतय थोडसं बालिश; पण ते चित्र निश्चित तरळतय. त्या विस्तीर्ण जलाशयाच्या शात आश्वस्त पृष्ठावर एका छोटया होडक्यात माई माडीवर डग्गा घेऊन बसल्या आहेत आणि बाजूलाच त्यांची किशोरी बसली आहे. जलाशयाच्या झिलमिलत्या तरंगाना साक्षी ठेवून माई किशोरीताईंना या अद्वितीय जीवनसंगीताची तालीम देत आहेत. आवाज येतोय तो फक्त किनाऱ्यावर येऊन संथपणे विसर्जणाऱ्या लाटांचा. ते होडकं हळूहळू किनाऱ्यापासून दूर चाललं आहे, ते चाललंय जलाशयाच्या मध्यभागी–झिलमिलणाऱ्या सूर्यप्रतिबिंबिन प्रकाशराशीकडे.

[छायाचित्रे : आर सी. महापाक्षी]


With best compliments from:

N. K. Patkar & Sons

Pro : H. P. & L. P. Cables
and
Siemens Switch Gears.

54/8, 2nd Marine Line Station,
Dhobi Talao. Bombay–400 002.

Phone : 319747, 315703




शब्द आणि अर्थ यांच्या संयोगातून काव्याचं विश्व फुलत असतं; कवीच्या मनातील अंधुक, अस्पष्ट कल्पना स्पष्ट होत असतात, आकार घेत असतात. अशाच भावविश्वाचं हे एक मनोरम दर्शन.

'बुजुर्गा'ची काव्य आपण वाचतोच; पण तितक्याच वजनाच्या, तोला-मोलाच्या अशा तरुण मनाच्या संवेदना अनेकदा दखल घेतली न जाताच निसटून जातात. म्हणूनच इथे त्या टिपण्याचा प्रयत्न केला आहे. ही सर्व कवीमंडळी तरुण आहेत-वयाने आणि मनानेही; पण त्यांच्या काव्यामध्ये मात्र परिपक्वता चांगलीच जाणवते.

श्री. राजा दीक्षित हे इतिहास विषय घेऊन एम्. ए. झालेले असून सध्या फर्गसन कॉलेजात इतिहासाचे लेक्चरर आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये त्यांना विशेष रस आहे. त्या दृष्टीने तरुण मंडळीचं संघटन करून असे कार्यक्रम वारंवार घडवण्याचाही प्रयत्न ते करीत असतात.

श्री. सतीश इनामदार सध्या मराठी विषयात एम्. ए. करीत आहेत. त्यांच्या काव्याचा विशेष म्हणजे विषय आणि मांडणीमध्ये आढळणारे वैविध्य. महाविद्यालयात असतानाच त्यांच्या अनेक कविता हस्तलिखित आणि नियतकालिकांमधून चांगल्याच गाजल्या आहेत.

कु. अरुणा ढेरे याही मराठी विषय घेऊन एम. ए. करीत आहेत. बी. ए. ला याच विषयात त्यांनी पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावलं. भविष्यकाळातील त्या एक 'प्रॉमिसिंग' कवयित्री आहेत.

कु. मृणालिनी रानडे सर परशुरामभाऊ महाविद्यालयात टी. वाय्. बी. ए. ला आहेत. महाविद्यालयाच्या साहित्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमात त्या नेहमी सक्रीय भाग घेत असतात. काव्य हा त्यांचा विशेष आवडीचा प्रांत.

श्री. वि. द. कुलकर्णी 'दैनिक केसरी' मध्ये सहसंपादक म्हणून काम करतात. साहित्यामध्ये त्यांना विशेष रस आहे. महाविद्यालयात असल्यापासूनच निरनिराळ्या हस्तलिखित आणि नियतकालिकांमध्ये त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. श्री. कुलकर्णी कथाही लिहितात.

श्री. किशोर पाठक शिक्षण जरी इंजिनियरिंगचे घेत असले तरी त्यांचा मानसिक कल साहित्य आणि कलेकडेच आहे. सध्या आघाडीवर असलेल्या तरुण मराठी कवींपैकी ते एक आहेत. त्यांच्या कविता 'सत्यकथा' 'प्रतिष्ठान' यासारख्या मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. तसेच अनेक काव्य-स्पर्धांमध्येही त्यांनी पारितोषिके मिळविली आहेत.

चोर मी झालो जरासा चोरटी साथीस आली
देखणी पापे जराशी चोरट्या रात्रीत केली
रात्र होती रंगणारी चोरटीला लाज भारी
दंश होते चांदण्याचे गोंदलेले गोड गाली
पेटलो आम्ही जरासे स्पर्श होते पेटलेले
प्रीतिच्या डोहात ओल्या रात्र होती पेटलेली
आमुच्या डोळ्यांत होती गायने आश्वासनांची
मी तिला चोरीत होतो ती मला चोरीत गेली
जाण त्या राती जरा अन् अडाणी ते रंग होते
मी कुणाचा बाप आणि वत्सला ती माय झाली

–राजा दीक्षित



डोळ्यात उतरली रात असे ओठात गीत असताना !
श्वासात उमलली प्रीत असे हातात हात असताना
गवतावर हिरव्यागार कसे हळुवार विहरते वारे
थरथरते पानातून भान हरपून तिने लाजून जरा हसताना
शेवगा शिरी सळसळे गंध दरवळे फुलांचा भोती
चोरून पाहते ऊन जरा बिलगून तिने बसताना
दरवळे मोगरा दूर लाजुनी चूर जाहली राने
ते ओठ तांबडे लाल गुलाबी गाल असे प्रेमात चिंब
भिजताना
अडखळे गीत ओठात फूल देठात बहरल्या बागा
या मंद मंद वाऱ्यात धुंद बाहूत बंद होताना !

–सतीश इनामदार

आभाळ चांदण्याने आले भरून आले
पाण्यात चांदण्याचे कोरीव बिंब डोले
आम्ही तयास साक्षी ठेवून प्रेम केले
ओले कुँवार पक्षी बिंबात बिंबलेले
कोण म्हणे आभाळाने चांदणे दिलेले ?
असे आभाळाला आम्ही चांदणे दिलेले !

–राजा दीक्षित



घन बावऱ्या तमाला स्वप्नील पंग आली
आकाश—मोगरीच्या गंधात रात न्हाली ।
फांदीवरी नभाच्या हिमशुभ्र चंद्रपक्षी
चोचीतुनी स्वरांची स्नेहाळ रंगनक्षी ।
वाऱ्यास सोसवेना स्वरभार गंधलेला
रानात चांदण्यांचा संसार झिंगलेला ।
पाण्यात संथ, काळे अस्मान धुंद झुकले
कमळात दाटलेल्या गंधास गीत सुचले ।
वेल्हाळ शब्द माझे ओठी उगाच अडले
आणीक स्पर्श त्याचे भलतेच बोलु आले ।
डोळ्यात चंद्र झुकता स्वप्ने रसिक झाली
पायात अमृताची अन् वाट वळत गेली ।

—अरुणा ढेरे



जिथे जडविला जीव, त्याने पायी तुडविला
जगाचा हा न्याय फार उशिराने उमगला ।
होते उजळले दिवे कधी तरी कुणासाठी
त्याच्या श्वासांनी विझले, आता अंध माझी दिठी ।
लाख स्वप्न गंधी थवे उधळले कुणासाठी
कुणासाठी गीतातून गुंफलेल्या यक्षगोष्टी ।
ओल्या वेदना जपल्या पदराच्या खाली अशा
कवळल्या, कवळल्या दाट अंधाराच्या दिशा ।
आज कोसळता, माझी रिती ओटी, रिते मन
आसवांच्या ओंजळीत पडे वैफल्याचे दान ।

—अरुणा ढेरे



मी असा निःसंदर्भ
आणि तू पानापानावर पावलं उमटवीत चाललीस
मला भविष्याची भीती नाही
पण कलत्या सायकाळी एक साळुंकी
तुलाच कसा शकुन सागते
आणि तुझ्या काळजात किणकिणणाऱ्या
असंख्य घुगुरघंटा कोणता अनाहत नाद करतात
मला डोळेच नाहीत की
तुझी त्वचाच नैसर्गिक झालीय् ?

—किशोर पाठक

माझ्या शब्दांनी तू गहिवरून यावेस
अशी कोणतीही गाधर्व-आठवण
मी तुला सांगणार नाही ....
काळयाशार डांबरी रस्त्यावर
पावलं उमटत नाहीत हे खरे
भर उन्हात फक्त चटके बसतात
आणि रात्री मऊ तळवे बर्फगार होतात
.... रस्त्यांजवळही उरते फक्त
काळेकुळकुळीत ... नि.शब्द ... सुन्नपण
त्यात कुठे शोधावे माझे अंधारमन
आता मी काय म्हणावे
तू तर हललीस काजव्यासारखी लपकन् !
... तू कशाला बोलतोस ?
फक्त माझ्या डोळचात पहा ...
राणी ! डोळचात किती भरशील काठोकाठ आठवणी
तीही निसटून गालावर ओघळली
तर लोक त्याला अश्रूच म्हणतात
आता तुझा प्रश्न ... स्वच्छ जिवंत झऱ्यात
आठवणी अलगद तरंगतात
की तळाशी बुडून जातात ?
मी काय उत्तर देऊ ...
गहिवरण्याशिवाय ... !

— किशोर पाठक

स्मृति झुल्यावर झुलू नकोस
हळव्या स्पर्शाने भुलू नकोस
वाऱ्याची शीळ . . . वेदनेला पीळ
फसव्या सुरांवर डुलू नकोस !
वाळूत रेषा ओढू नकोस
गीताने लाटा वेढू नकोस
लाटांचे गाणे . . . उदासवाणे
मावळतीवर बुडू नकोस !
माझी आठवण स्मरू नकोस
गुंतलेले धागे विसरू नकोस
येणारा येतो . . . जाणारा जातो
मनात वेडे झुरू नकोस !

— वि. द. कुलकर्णी

खरं सांगू तेव्हापासून चांदण्यांची फुलं मी तोडली नाहीत
वेणी करून केसावर कधीच माळली नाहीत
वाऱ्याची शीळ ऐकून बेभान मी झाले नाही
दारात पाय धावले तरी उंबरठा ओलांडला नाही
केसांच्या झिपऱ्यांना मी आवरलं सावरलं
गालातल्या खळीलाही गुपित नाही सांगू दिलं
तुलाही ते नाहीच समजलं मीही नाही समजावलं
तुझ्यासाठी राखलं ते काळाच्या ओंजळीत दान करावं लागलं

— मृणालिनी रानडे




आग ओकीत ही जळत मी चाललो
सांजसूर्यासवे ढळत मी चाललो
पाय रक्ताळले वाट ही चालता
खात ठेचा पथी वळत मी चाललो
पेटलो मी उरी या मशालीसवे
दाट काळोख हा गिळत मी चाललो
काय मी जन्मलो हाच झाला गुन्हा ?
की जगाला असा सलत मी चाललो !
आज राखेवरी विश्व मी बांधले
प्राक्तनाला असे छळत मी चाललो !

—सतीश इनामदार

### जमाखर्च

कशासाठी मांडतीय ती
तिच्या प्राक्तनाचा जमाखर्च ?
साक्षीला काढले नाहीत चंद्रसूर्य
घातल्या नाहीत भाबडचा शपथा.
तरीही का मांडतीय ती
तिच्या प्राक्तनाचा जमाखर्च ?
मांडला होता संसार तिनं
चाळीतल्या जिन्याखाली
केला होता संसार तिनं
चिरगुटांशी, चूल-बोळक्यांशी !
एवढी समज येऊनही
पाहिली का तिनं स्वप्न
कुण्या कलंदर राजपुत्राची
अहेवपणीही–
नि रोज रात्री भोगली
तीच ती मरगळलेली सुखं
चुरगळलेल्या देहानं
तेव्हा आठवला तिला उगाचच
निष्काम कर्मयोग . . . .
दिवसा आपलं ओंगळवाणं हसू
पसरतं इथं तिथं
लावली तिनं तिच्या
संसाराला ठिगळं
नि त्याच लक्तरात जपला
आसवातला खारटपणा, खरेपणा
डोळ्यांतील खाचांत, आज थिजलेला अश्रू
प्रामाणिकपणं झगडतोय तिच्याबरोबर
शोधण्यासाठी, शून्याचाही अर्थ
न् पुन्हा पुन्हा मांडतीय ती
तिच्या प्राक्तनाचा जमाखर्च.

– मृणालिनी रानडे



### लेणी

नि:शब्द पाखरांचे कापून पंख सारे
आभाळ पेरले मी नक्षत्र-काजव्यांनी
सूर्यास्त झेलताना लाटा अखंड फुटता
किति चंद्र ओतले मी माझ्या रित्या करांनी
स्वप्नात पाकळ्यांना मी स्पर्श देत गेलो
आणि फुले उन्हाची हुंगियली न कोणी
ते स्वप्न-सूर माझे दाही दिशात झाले
मी भग्नतेत उरलो आता तृषार्त लेणी

– बि. द. कुलकर्णी

□ □




सध्या मला थोडी काळजी वाटण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

तशी तर आपण कशाचीच काळजी करीत नाही. अगदी जन्मापासूनच. आपली काळजी लोकच करतात.

बाप म्हणतो की, मी बेफिकीर आहे. निर्ढावलेला आहे. आणखीही पुष्कळ काय काय तो म्हणतो.

जाऊ दे; साला लक्ष कोण देतो ?

बापलोकांचं हे नेहमीचंच असणार. पोरगा चांगला निघाला, की क्रेडिट स्वतःकडे घ्यायचं. म्हणजे मी काही वाईट निघालोय अशातला भाग नाही. पण चांगला म्हणजे लौकिक अर्थानं. ऐंशी टक्के मार्क मिळवून एसेस्सी होणारा आणि नंतर इंजिनिअर, डॉक्टर असा काही तरी घसघशीत व्यवसाय करणारा. तसं पाहिलं तर इंजिनिअर्स, डॉक्टर्स कचऱ्यासारखे झालेत हल्ली. पण बापलोकांना हे समजेल तर ना ? त्यांना आपलं तशाच कशाचं तरी कौतुक ! — तर मुलाचं असं त्यांच्या मतानं सोनं झालं की ते म्हणणार, मुलगा कोणाचा आहे ? नाही तर तो आमच्यासारखा तडीपार निघाला की ते म्हणणार, कुणासारखा झाला कुणास ठाऊक!

सालं आपलं आणि आपल्या बापाचं कधीच पटलं नाही.

लहानपणापासूनचं आहे. आता, नाही आमच्या डोक्यात अभ्यास शिरत ! — पण म्हणून काय येता–जाता आम्हाला 'भीक मागत फिरशील !' असा का आशीर्वाद द्यायचा ? आणि भीकच मागायची तर त्याचं एवढं भविष्य कशाला वर्तवायला हवं ? पण नाही, माझ्याविषयी वाईट बोलण्यात यांना भलताच आनंद !

—मग रोज घरात भांडणं! दोनदा घर सोडून पळणं, तीन वेळा त्यांनीच हाकलवणं, चार वेळा मारामाऱ्या वगैरे वगैरे. प्रत्येक नोकरी गेली की, घरात हा प्रसंग ! शेवटी झालं एकदा बापाच्या मनासारखं. आली आमच्यावर भिकेची पाळी. म्हणजे आता यांना भविष्य खरं ठरल्याचा तरी आनंद व्हायला हवा की नको ?

पण नाही, 'कारट्यानं नाव बुडवलं' म्हणून आक्रोश करीत सगळीकडे फिरताहेत.

आता मला माहीत आहे. माझ्यासारख्या जेमतेम चाळीस टक्क्यांनी एसेस्सी झालेला

गेल्या वर्षीच्या 'माणूस' दिवाळी अंकात रत्नाकर मतकरी यांनी 'एक दिवा विझताना' ही सत्यघटनेवर आधारित एक प्रदीर्घ परलोककथा सादर केली होती. प्रसिद्धीचा त्रास वाचावा एवढ्यासाठी कथेतील नावात फक्त बदल केले होते.

त्या कथेतील साधक श्री. आपटे याची "परलोकाचे अवलोकन' या विषयावर घेतलेली मुलाखत या अंकी पुढे दिली आहे.

तत्पूर्वी एक कथाही. सत्यघटनेवर आधारलेली. रत्नाकर मतकरीलिखित.

मुलगा. त्याला मिळून मिळून कितीशी चांगली नोकरी मिळणार ? अरे पण, माणूस म्हणून जगता येईल एवढा तरी पगार हवा की नको? आणि पोट मारून राहायचं तर नोकरी करायचीच कशाला? शिवाय आपल्याला कुणाची मग्रुरी सहन होत नाही. सख्ख्या बापाच ऐकत नाही तिथं इतरांचं काय ? तेव्हा सुटतात आपल्या नोकऱ्या. कधी आपणहून सोडतो, कधी काढून टाकतात—पण म्हणून काय बापानं 'पोरगा वाया गेला,' अशी सगळीकडे दवंडी पिटायची ?

नाही तर याउलट भाईकाका. कधी चार लोकांत अपमान करायचे नाहीत. उलट म्हणतील, 'डोक्यानं चांगला आहे! पण वर्षं बुडाली त्याची. थोडा हूड आहे, पण या वयात असच चालायचं ! '

भाईकाका मला सांभाळून घेण्याचा खूप प्रयत्न करतात. पण कबूल करतो की, कधीकधी आपण त्यांच्याही हाताबाहेर जातो. तसं पाहिलं तर भाईकाका माझे खरे काका नाहीतच. माझ्या बापाला सख्खा भाऊ नाहीच आणि असता तर त्याचा स्वभाव इतका चागला असणं शक्यच नव्हतं. भाईकाका म्हणजे आमचे दूरचे काका. इतके दूरचे की, खर नातं काय हे सागताना गोंधळच उडायचा ! पण कशी कोण जाणे, पण त्यांची माझ्यावर भलतीच माया ! त्याना दुसरं कुणीच नाही. लग्न तर त्यांनी केलंच नाही. कारण दम्याचा विकार ! म्हणायचे, आजार काढायला कशाला आणायची बायको ? साला, देवाचं पण काही खरं नाही ! असल्या उमद्या स्वभावाच्या माणसाच्या मागं नसत्या व्याधी लावतो, नाही तर आमच्या बापासारख्या — पण जाऊ दे ते !

तात्पर्य, भाईकाकाच मला खरोखर वडिलाच्या जागी. त्यामुळ त्यांना माझी काळजी वाटणं स्वाभाविकच आहे. अधूनमधून ते मला कुठला कुठला कोर्स करायला सागतात, माझ्यासाठी कसल्या कसल्या नोकऱ्या आणतात ! मी कोर्सबिर्स करायची टाळाटाळ करतो. नोकऱ्या पटल्या तर घेतो, सोडायच्या तेव्हा सोडतो; पण भाईकाका कधी रागवत नाहीत. मी नोकरी घालवली की ते कळवळून म्हणतात, 'कसं होणार बाबा तुझं ? मला तुझी काळजी वाटते !' बस्स. एवढच. भाडणं नाहीत की मारामाऱ्या नाहीत. तर अशा या भाईकाकांच्या संदर्भात सध्या अशी परिस्थिती निर्माण झालीय् की, त्यानी माझी करण्याऐवजी मीच त्याची काळजी करावी !

झाल काय, की नेहमी जातो तसा कालही मी भाईकाकाकडे गेलो होतो. तशी आपली दर एक-दोन दिवसाआड त्याच्याकडे खेप असतेच. एखाद्या वेळी दोन-चार दिवसांत गेलो नाही तर भाईकाका घाबरे होतात आपणहून चौकशीसाठी घरी येतात. शिवाय मला त्यांच्याकडे जार्वस वाटतं याच कारण, घरी डोक तापल्यानतर ते शात करायला तेवढं एकच ठिकाण आहे.

तर तसा मी काल भाईकाकाकडे गेलो. काकानी नेहमीप्रमाणे माझ्या आवडीचे मटनसामोसे मागविले. चहा केला. अवातर विषयावर गप्पा मारल्या. काकाचं एक फार चागलं आहे ! त्यांना माझ्याविषयी काळजी वाटते, हे त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवतं. पण म्हणून काही ते एकसारखा उपदेश करीत नाहीत. बरोबरीच्या मित्रासारखे वागतात. तर असेच आम्ही गमतीगमतीनं गप्पा मारीत चहा पीत बसलो होतो. आणि अचानक काकांना खोकल्याची उबळ आली.

आता दम्याचा विकार तर काकाना कैक वर्षांपासून आहे. त्यामुळं खोकला आला तर त्यात घाबरण्यासारखं काहीच नाही. मी त्यांना पाणी दिलं, पाठीवरून हात फिरवला, आणि बिछान्यावर टेकून बसवलं. तरी त्याना जी काही ढास लागली ती थाबेच ना. अगदी घसा खरवडून खरवडून खोकला यायला लागला. घशात चमत्कारिक आवाज व्हायला लागले. छाती ताडताड उडायला लागली. काकाचा चेहरा लालबुद झाला आणि डोळ्यातून पाणी वाहायला लागलं.

आणि एकाएकी, खोकता खोकता काका बेशुद्ध पडले.

मग मात्र मी घाबरलो. दमेकऱ्याचा खोकला मला ठाऊक आहे; पण दमेकरी कधी बेशुद्ध पडत नाही. म्हणजे हा काही तरी वेगळाच प्रकार दिसत होता !

सुदैवानं काकाकडे फोन आहे. मी तिथूनच फोन करून डॉक्टर घैसासांना बोलावलं. तेही तावडतोब हजर झाले.

काका अजूनही शुद्धीवर आलेले नव्हते.

आम्ही दोघांनी काकाना डॉक्टरांच्या कारमधे घातलं आणि 'सुश्रुत नर्सिंग होम'-मधे नेलं तिथले डॉक्टर साठे घैसासांच्या चांगले परिचयाचे होते. त्यांनी भाईकाकाना तपासल आणि एका पाठोपाठ एक अशी दोन इजेक्शन्स दिली. तावडतोब एक्स-रेची व्यवस्था केली.

एव्हाना भाईकाका शुद्धीवर आले होते. म्हणजे डोळे उघडले, एवढंच. पण बोलत काही नव्हते. हालचाल करणं तर त्यांना अतिशय कठीण जात असावं. मात्र मला पाहिल्याबरोबर पडल्या पडल्याच त्यानी

माझा हात दाबला आणि किंचित स्मित केल्यासारख केलं. पण एकाएकी त्याचा चेहरा वेडावाकडा झाला. कुठून तरी एकदम जोराची कळ यावी तसा. काहीच न बोलता ते नुसते वेदनानी तळमळत राहिले. मी विचारलं, 'काका, काय झाल ?' डॉक्टर साठ्यानी एक्स-रेची व्यवस्था केल्यापासून डॉक्टर घैसास गंभीर झाले होते. तसा त्यानाही काही तरी संशय आलाच असावा; पण अजूनपर्यंत त्यांनी तो बोलून दाखवला नव्हता. आता मात्र न राहवून त्यांनी साठ्यांना विचारलं–'काय झालंय् डॉक्टर?'

'स्पाइनला कुठं तरी धक्का बसला असावा अस वाटतं. आता कळेलच काय ते एक्स–रे आल्यावर.' साठे म्हणाले.

इकडे काकाना असह्य वेदना होऊ लागल्या होत्या. ते मोठमोठ्याने ओरडू लागले होते. दहा–पधरा मिनिटांतच एक्स-रेचे रिझल्ट्स आले. 'यू सी व्हॉट् आय् मीन ?' घैसासांना एक्स–रे दाखवून साठे म्हणाले. 'स्पाइनच्या लोअर पार्टमधे एक डिस्क रप्चर झाली आहे. बहुधा खोकल्याची उबळ आली, तेव्हा धक्क्यान ती तुटली केस थोडी चमत्कारिक आहे–'

एव्हाना काकांना कळा सहन होईनाशा झाल्या होत्या. त्याचं जोरजोरानं विव्हळणं चालूच होतं. चेहरा नुसता वेदनांनी पिळवटला होता घामानं थबथबला होता

सगळाच प्रकार अजब होता ! काकाना बोलता बोलता खोकल्याची उबळ येते काय, त्यामधे कण्याच हाड मोडतं काय आणि नुसत्या तपासणीसाठी आणलेल्या काकाना हॉस्पिटलमध्ये अॅडमिट् व्हावं लागतं काय ? सगळंच चमत्कारिक !

आमच्या नशिबात पुढं काय वाढून ठेवलं आहे कोण जाणे !

¤

बिचारा अवी ! त्या दिवशी माझ्याकडे गप्पा मारायला येऊन बसतो काय, अचानक खोकल्याची उबळ येते काय आणि कण्याची दुखापत होते काय ! बापड्याला झक्कत सगळी धावाधाव करावी लागली. डॉक्टर आणण्यापासून ते हॉस्पिटलमधे पोचवण्यापर्यंत !

रोज बेटा इथं येऊन बसतो. शक्य तेवढा वेळ तो इथ हॉस्पिटलमधेच असतो. मुलगा मनानं चागला; पण वेळेवर शिकला नाही आणि आता नोकरीची पंचाइत झाली आहे. तशा नोकऱ्या मिळतात; पण हा अजून तरी कुठं टिकत नाही. बापानं तर त्याला वाया गेल्यातच जमा केला आहे. पण असं करून कस चालेल ? सगळ्यानीच जर त्याच्याशी सबंध तोडला तर त्यानं कुणाच्या तोडाकडे बघायचं ? असेल हूड, असेल फटकळ, पण लेको, त्याच्या पोटा–पाण्याची काही सोय लावायला हवी की नको ? का त्याला आपला उपाशीच मरू द्यायचाय ?

मला म्हणतो कसा, 'काका, मला फक्त एकच ठिकाण आवडतं. तुमचं घर !' मी म्हणतो, 'अरे असं कसं ? सगळीकडं जमवून घेतलं पाहिजे !' तर म्हणतो, 'नाही. माझं नाही कुणाशी जमत. सबंध जगात तुम्ही एकटेच काय ते मला माझे वाटता. मला तुमच्याशिवाय दुसरं कुणीच नाही !' बोलायला लागला की, कधीकधी फारच मायेनं बोलतो आणि लोक म्हणतात की, हा म्हणे फटकळ आहे ! वाटेल त्याच्याशी वाटेल तसा बोलतो. प्रत्यक्ष याच्या बापाचं याच्याविषयी हेच मत ! असेल. आपल्याशी तरी आजवर सरळ वागत आला आहे.

दुखणं बाकी हात–पाय पसरत चाललं ! तपासणी करून घरी परत जायचं, तर इथं हॉस्पिटलमध्ये मुक्काम करावा लागला. इतके दिवस झाले, पण बर होण्याचं नाव नाही. रोज औषधं चालू आहेत, इजेक्शन्स चालू आहेत, पण अधूनमधून कळा येतातच. अगदी बोलवल्यासारख्या ! आणि आल्या म्हणजे अशा भरमसाट येतात की, ज्याचं नाव ते ! नको जीव होतो. अंगाची जशी काही सोलून सालटी काढावीत तशी अगभर कळ पसरते डोळ्यासमोर विस्तव पेटल्यासारखं होतं. दाताखाली दाबून ओठाचे तुकडे पडणारस वाटत. माझ्या वयाच्या माणसाला एखाद्या लहान पोरासारखी बोबाबोब करणं शोभत नाही. पण असह्य झाल की नकळत तोंडातून किंकाळ्या बाहेर पडतात. मग नर्सेस, डॉक्टर्स धावत येतात. हालचाल करणं कठीण असतानाही मी माशासारखा या कुशीवरून त्या कुशीवर तडफडत राहातो. मधेच अवीचे शब्द ऐकू येतात– 'भाईकाका – भाईकाका – असं काय करता ?' डोळे उघडले की समोर त्याचा चेहरा दिसतो – कधी सिस्टरचा – कधी डॉक्टरचा – मग वेदनेच्या पुरात हे सगळे चेहरे वाहून जातात. वाटतं, मरण मरण ते हेच !

या कर्मभोगातून माझी काही लौकर सुटका होईलसं दिसत नाही. कारण 'सुश्रुत'-मधे दोघा–चौघा नामवंत डॉक्टर्सनी मला तपासलं; पण गुण नाही. नुकतच मला एका न्युरोसर्जनला दाखवलं. डॉक्टर कोठीवाला. कोठीवालानी ताबडतोब मला स्वतःच्या नर्सिंगहोममधे हलवलं.


## सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना उपयुक्त अशी पुस्तके

**लग्नानंतरचे पहिले वर्ष**
संपादिका : कृष्णाबाई मोटे
**डेमी २७२ । रु. १०**
समाजाच्या विविध स्तरांमधील वैवाहिक जीवनाचा आलेख

**काळाची पाउले । कृष्णाबाई मोटे**
**डेमी २३२ । रु. १५**
नोकरी करणाऱ्या स्त्रिया आणि अध पतित मुले यांच्या प्रश्नांचा विचार

**भाकरी आणि स्वातंत्र्य**
ग. प्र. प्रधान
**डेमी १०८ । रु ८**
राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक विकास यामधील परस्परसबधाचे सर्वांगीण विवेचन

**लोकसंस्कृतीची क्षितिजे**
रा. चिं. ढेरे
**बारावा डेमी १९२ । रु. ८**
मराठी लोकसंस्कृतीवरील अभ्यासपूर्ण लेखाचा संग्रह

**विश्वकर्मा साहित्यालय**
२०३५/२ सदाशिव पेठ
टिळक पथ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी ४१२०९

डॉक्टर कोठीवालाचं म्हणणं असं पडलं की, माझ्या स्पाइनवर तातडतोब शस्त्रक्रिया करायला हवी. मोडलेल्या डिस्कच्या जागी दुसरं काही तरी कामचलाऊ बसवायला हवं. पण इथंच तर सगळी पंचाईत आहे ! ऑपरेशन करता येईल एवढं गुंगीचं औषध मला झेपेल याची डॉक्टरांना खात्री नाही. कारण माझा मुळचा दम्याचा विकार ! त्यासाठी लंगस्पेशालिस्ट डॉक्टर नायर यांना विचारलं. ते येऊन पाहून गेले. एक्स-रेज झाले, चेकप्स् झाले आणि शेवटी ट्रीटमेंटसाठी मला सेंट मायकेल हॉस्पिटल-मधे ठेवण्यात आलं. हे निव्वळ ऑपरेशनच्या पूर्वतयारीसाठी. इथं ट्रीटमेंटनंतर माझा ब्रॉन्कायटल अस्थमा आटोक्यात आला असता की, मगच माझ्या कण्यावर ऑप-रेशन करणं शक्य होतं.

विचार केला म्हणजे मला हसावं की रडावं तेच समजत नाही. कुठलं दुखणं कुठं गेलं ! आणि अजून ऑपरेशन पुढंच आहे, तोवर मी सारं काही सहन करायचं. कळ आली की बोंबा ठोकत राहायचं आणि डोळे गच्च मिटून घ्यायचे. बरं, इतकं करून ऑपरेशन यशस्वी होईल याची काहीच गॅरंटी नाही !

सेंट मायकेल हॉस्पिटल आहे मात्र छान ! लांब-रुंद आणि प्रशस्त. हवेशीर. सूर्यप्रकाश भरपूर ! कळा येत नसल्या की इतर वेळी मी माझ्या बिछान्यात मजेत पडून असतो. पण एकदा का कळा सुरू झाल्या की मग मात्र नाव नको !

शेवटी ॲनास्थेशिया देणाऱ्या डॉक्टर मेहतांनी माझी परत एकदा तपासणी केली. परवाच ते मला पाहून गेले. माझी प्रगती उत्तम आहे, म्हणाले. आता ऑपरेशनमध्ये ॲनास्थेशिया द्यायला काही हरकत नाही, असं त्यांचं मत पडलं. लगेच डॉक्टर कोठी-वालानं ऑपरेशनची तारीख ठरवून टाकली. थोडी घाईघाईनंच. कारण नंतर ते जर्म-नीला एका कॉन्फरन्सला जायचे आहेत आणि ते परत येईपर्यंत ऑपरेशन फारच लांबणीवर पडेल.

ऑपरेशन शुक्रवारी व्हायचं आहे. काल रविवार ! कालचा दिवस मजेत गेला. थोडी-फार हालचाल करूनही कळा आल्या नाहीत. काल रात्री झोप चांगली लागली. मी बरा होण्याची स्वप्नं पाहात पाहातच काल रात्री झोपी गेलो.

पण आज सकाळी – आज मला पहाटेच जाग आली. तीच मुळी वेदनांच्या कल्लो-ळात. रात्री झोपेत काय झालं होतं कुणास ठाऊक ! पण पाठीतून भयंकर कळा उठू लागल्या होत्या. काही समजेनासंच झालं. मी मोठमोठ्यानं ओरडत होतो, एवढंच मला जाणवत होतं. पण तोंडातून काय शब्द येत होते कुणास ठाऊक ! माझ्या आरडाओर-ड्यानं कोणी तरी दोघं-तिघं धावत आली. पण ती कोण हेही मला कळेना.

– आणि एकाएकी – एकाएकी – परमे-श्वरा ! हा काय प्रकार आहे ?

□

साला सोमवारी सकाळी भाईकाकांनी कमालच केली. सगळ्यांना घाबरवून सोडलं. पहाटे जागे झाले तेच मुळी ओरडत. सुदैवानं मी रात्री हॉस्पिटलमध्ये झोपायला गेलो होतो. गेल्या कित्येक दिवसांत नाही इतकी प्रसन्न झोप त्यांना रविवारी लागली आणि सोमवारी सकाळी हा प्रकार !

ओरडता ओरडताच ते एकदम बेशुद्ध झाले. एकाएकीच. आकस्मिकपणे !

मी घाबरलो. हा आणखी काय चमत्कार ?

मी त्यांच्या कानाशी ओठ नेऊन हाका मारल्या– ‘ काका, भाईकाका–’

पण एक नाही की दोन नाही. ते जणू काही या जगात नव्हतेच !

एक पद्धत म्हणून सांगत नाही. खरोखरच त्या क्षणी माझ्या डोक्यात अशी कल्पना आली की, भाईकाका या जगात नसावेत !

या कल्पनेने मी अधिकच घाबरलो. अंगाला हात लावून पाहिला. तसं ते कोमटंच होतं. नाडी पाहायला मनगट हातात घेतलं; पण नाडी चालू आहे की नाही, काहीच समजेना.

एव्हाना एक नर्स आणि एक वॉर्डबॉय आले होते. मी त्यांना म्हटलं की, परिस्थिती विशेषच काळजी करण्यासारखी दिसतेय. तुम्ही डॉक्टरना बोलवा ! नर्सलाही मनातून धास्ती वाटली असावी. कारण तिनं विशेष वादंग न घालता वॉर्डबॉयला झपाझप सूचना दिल्या आणि स्वतः इंटरकॉमवरून डॉक्टरना बोलावून घेतलं.

भाईकाका अजूनही बेशुद्धच होते. डॉक्टर आले. त्यांनी काकांची अवस्था पाहिली आणि त्यांना ऑक्सिजन द्यायला सांगितला. नर्सनं प्रसंगावधान राखून ऑक्सिजनची तयारी ठेवलीच होती.

आम्ही सारे आशेनं भाईकाकांकडे पाहत बसलो होतो. कुठंही कसलीही हालचाल नव्हती. घड्याळाची टिकटिक तेवढी ऐकू येत होती.

आणि भाईकाकांनी एकदम डोळे उघडले. त्यांची शुद्ध जशी अचानकपणे गेली, तशीच ती अचानकपणे परत आली होती.

डोळे उघडले तरी भाईकाका संपूर्ण भानावर आलेच नव्हते. नजर इकडं तिकडे फिरवून ते आपण कुठं आहोत याचा अंदाज घेत होते.

आम्हा सर्वांना हायसं वाटलं. एकूण सगळा प्रकार पाच-दहा मिनिटंच चालला




असेल; पण तासच्या तास लोटल्यासारखं वाटत होतं. काका हयात नाहीत असं वाटता वाटता ते आमच्यात परत आले होते. मनानं आतल्या आत एक झोका घेतला होता.

थोड्या वेळानं काका नॉर्मलवर आले. एवढा प्रकार होऊनही आता ते मुळीच थकल्यासारखे वाटत नव्हते. उलट त्याच्यात कसली तरी एक नवीन शक्ती संचरली होती, उत्साह भरला होता. त्याचं रोजचं हसणं-बोलणं मात्र आज कमी झालं होतं. ते फार फार गंभीर वाटत होते. कसल्या तरी विचारात पडल्यासारखे !

मग भाईकाकाना झालं होतं तरी काय ?

दोन दिवस कळाही त्याच्या वाटेला गेल्या नाहीत. भाईकाका अगदी शांत पडून होते. आजार अजोबात नसावा आणि नुसती विश्रांती घ्यावी तसे

दुसऱ्या दिवशी म्हणजे–बरोबर, मंगळवार सध्याकाळचीच गोष्ट. नर्स नुकतीच टेंपरेचर वगैरे घेऊन गेली होती. मी काकाना काही तरी वाचून दाखवीत होतो; पण तिकडे त्याचं लक्ष नसावं असा मला संशय आला. तरीही मी वाचीतच राहिलो

*मला मध्येच थांबवून भाईकाका म्हणाले,* –'काय रे, गेल्या महिन्यात तू 'सहकार भांडार'मध्ये अर्ज केला होतास त्याचं काय झालं ?'

मी चक्रावलो. स्वत:च्या आजारामध्ये काकाना माझ्या अर्जाची आठवण राहिली *असेल असं मला वाटलं नव्हतं.*

'कॉल नाही आला. बहुतकरून मी ओव्हरएज ठरलो असणार !'

*'अस्सं !'* एवढंच बोलून काका गप्प बसले.

मी पुन्हा वाचू लागलो.

*पण पुन्हा मला थांबवून काका* दुसऱ्या एका नोकरीबद्दल विचारीत राहिले. त्यानंतर आणखी कुठल्या कंपनीविषयी. नंतर *कुठले पेस्केल्स कसे आहेत याविषयी.* कुणाची ओळख कुठे लावता येईल याविषयी.

मला लाजल्यासारखं झालं. माझ्या प्रत्यक्ष बापाला तर सोडाच, *पण मला* स्वत:लाही माझ्या नोकरीची अजून इतकी चिंता वाटत नव्हती; पण हे आपले किती तरी वेळ त्याच एका विषयावर बोलत होते विशेष म्हणजे दोन दिवस गप्पच राहिल्यानंतर आता एकदम बोलायला लागले होते ते माझ्याच नोकरीविषयी. याचा अर्थ काय लावायचा ?

काकांच्या मनात कसले तरी विलक्षण विचार घोळत होते. पण कसले ? ते त्याचं स्वत:च गुपित होत. निदान मला तरी काका त्याचा थांग-पत्ता लागू देणार नव्हते. पण जे काही होतं त्याच मूळ सोमवारी पहाटे जो प्रकार घडला, त्यात होतं हे नक्की !

□

सोमवारी पहाटे मी जागा झालो, तोच मुळी असह्य कळांमध्ये. माझा आरडाओरडा ऐकून कुणी तरी धावत आले आणि त्याच वेळी माझं भान हरपल्यासारखं झाल.

आणि एकाएकी–

एकाएकी मला खोलीच्या कोपऱ्यात उजेड पडलेला दिसला.

क्षणात माझ्या लक्षात आलं की, तिथं केवळ उजेड पडलेलला नाही तर प्रकाशाचा एक गोलच तिथ अधांतरी तरंगत आहे खरं म्हणजे हे त्याचं वर्णन करण कठीण आहे; कारण एरवी आपण प्रकाश कुठ तरी पडलेला पाहातो नुसताच प्रकाशाचा पुंज आपल्याला कधी दिसत नाही. मला दिसणारा पुंज नुसताच वर्तुळाकार नाही, तर चेंडूसारखा गोल होता. म्हणजे एका गोल भोपळ्यासारखी दिव्याची शेड प्रकाशान उजळलेली असावी; नंतर बाहेरची शेड काढून टाकावी, आतला बल्बही काढून टाकावा आणि तरीही तोच प्रकाश जसाच्या तसा शिल्लक राहिला *तर तो दिसेल, तसा हा पुंज होता.* साधारण फूट–सव्वा फूट रुंदीचा. माझी नजर वर होती तियेच– म्हणजे छताजवळच तो होता.

*त्या प्रकाशाकडे पाहता पाहता* मला एकदम कसली तरी जाणीव झाली. भीतीची नाही– काही तरी विचित्र दिसत असल्याचीही नाही. *मला फक्त शांत शांत वाटल.* सगळा थकवा गेला, ताण सपला आणि अगदी पूर्ण आराम मिळाला अस वाटल.

*एकदम त्या प्रकाशातून शब्द आले–* 'चल. तुला काही दाखवायचय.'

मी लगेच निघालो. अजीबात न घुटमळता. *जसा काय मी तयारच होतो आणि* केवळ आमंत्रणाचीच वाट पाहात होतो.

मी सरळ त्या प्रकाशगोलाच्या दिशेन निघालो. *त्याच क्षणी मला शरीर सोडल्याची* भावना झाली. अगदी सहजपणे– सालपट निघावं आणि आतला गाभा मोकळा व्हावा, *तितक्या सहजपणे मी शरीराच्या आवरणातून* बाहेर पडलो आणि छताजवळ अधांतरी तरगणाऱ्या त्या प्रकाशाच्या दिशेनं झेपावलो. जाताजाता *माग वळून पाहिलं. माझं* शरीर बिछान्यावर पडलं होतं. अवी त्या शरीराला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करीत होता आणि सिस्टर वॉर्डबॉयला काही सूचना देत होती.

माझा जो काही शरीरविहित आकार होता, तो अतिशयच विरळ होता... म्हणजे वाफेसारखा... किंवा सिगरेटचा धूर जसा दिव्यासमोरून जाताना वाटतो तसा... म्हणजे निश्चित आकार नसलेला... पण क्षणोक्षणी नवीन आकार घेणारा... खरं तर शब्दामधून हे असं काही सागण्याचा प्रयत्न करणं वेडेपणाचच आहे. कारण आपल्याला कधी असला काही अनुभवच नसतो. माझा आकार हा असा धुरासारखा होता; पण तो धुरकट नव्हता. त्यात रंग होते. नारंगी, पिवळा आणि एक साधारण निळसर... बराचसा मोरपिसाच्या जवळचा रंग...

झालंच तर मला हात होता. म्हणजे माझा एरवीचा खराखुरा हात नाही. कारण *माझे दोन्ही हात माझ्या शरीराजवळ* जसे असायचे तसे बिछान्यावर दोन्ही बाजूना पसरलेले मला दिसत होते, पण तरीही *माझ्या या वाफेसारख्या* देहाला हात होताच. कारण तोच उंचावून मी ह्या प्रकाशगोलाला धरलं आणि प्रकाशगोलातूनही हातासारखे काही तरी *येऊन त्यानं मला* वर खेचलं.आता वाटतं की, ते दोन्ही हात खरे नसतील; पण पोचण्याची आणि खेचण्याची जी काही *जाणीव होती तिलाच मी आमचे हात* समजत होतो. कदाचित असं असेल का... की इथला देह म्हणजे केवळ जाणीव असेल. *त्या त्या उपयोगापुरती आकाराला येणारी...* नाही तर एरवी गोल गोल एखाद्या ढगासारखी...

मी प्रकाशगोलाशी पोचताच तो हलला... आणि आम्ही दोघेही बरोबर निघालो. तसे आम्ही दोघे स्वतंत्र होतो आणि तरीही दोघे एकत्र असल्यासारखे एकाच गोलाकारात होतो... हे कसे हे सागण कठीण आहे; पण ही एकच असल्याची आणि तरीही वेगळं असल्याची जाणीव मला होती, एवढं खरं.

आम्ही निघालो... खाली खाली निघालो... आपण खालच्या मजल्यावर जात आहोत याची मला जाणीव झाली... भिंतीची आणि बंद दारांची काहीच अडचण येत नव्हती. म्हणजे आम्ही बद दारामधून जात होतो असं नाही; पण दारं-खिडक्याच जशा काही पुसल्या जात होत्या. ठिकाणं बदलत होती; पण वेगाची जाणीव मुळीच होत नव्हती. जसे काही आम्ही स्थिर होतो-- आणि वस्तूच हलत होत्या. खाली तळ-मजल्यावर पोचल्यानंतर एका ठिकाणी आम्ही थांबलो.

ती 'रिकव्हरी रूम' होती. रूम कसली, चांगला हॉलच होता म्हणा ना! ही 'रिकव्हरी रूम' खरी तर मी आधी कधी पाहिलीही नव्हती. आत नर्सेस, डॉक्टर्स वगैरे मडळीची बरीच वर्दळ होती.

आम्ही छताच्या थोडेसे खाली कोपऱ्यात थबकलो. मधा एकटा प्रकाशगोल होता तसेच

आणि कस कोण जाणे, त्यानं मला इथं आणण्याच कारण माझ्या एकदम ध्यानात आलं.

उजव्या कोपऱ्यात एक कॉट होती.

'इथं तुला यायचंय्.' तो म्हणाला

'म्हणाला' अस आपलं मी सोयीसाठी म्हणतो खर तर शब्दांची जुळणी होत नव्हती आणि आवाजही उमटत नव्हता; पण माझ्या मनात विचारच जसा काही परस्पर फेकला गेला होता शब्द असतील तर ते माझे मीच जोडलेले

'ऑपरेशननंतर तुला इथ ठेवतील. इथं तुला आणतील तेव्हा तू गुंगीतच असशील; पण या गुंगीतून तुला जाग येणार नाही. ऑपरेशनसाठी तुला टेबलावर ठेवल्यानंतर पुढच काहीच तुला कळणार नाही कारण लौकिक अर्थानं तू जिवंतच नसशील जागा होशील तो याच लोकात. मी येईनच त्या वेळी तुला भेटायला'

अतिशय प्रेमळपणे, कनवाळूपणे तो माझ्याशी बोलत होता प्रत्यक्ष बोलण नव्हे; पण अर्थ इतका निश्चित होता की, तो माझ्या मनावर कोरला जात होता.

माझी उरलीसुरली सगळी भीती गेली इतक्या प्रेमळ शक्तीकडे मी शेवटी पोचणार होतो. मग मरणाची भीती कसली? ते तर केवळ त्या प्रकाशमय शक्तीच्या मंदिराचं महाद्वार! आणि त्या तेजाचा स्वामी केवळ मंदिराच्या गाभाऱ्यात नव्हता, तर माझ्या स्वागताला या महाद्वाराशीच उभा होता. किंबहुना माझं भाग्य इतकं थोर की, तो स्वतः दोन पावलं पुढं येऊन मला हाताशी धरून महाद्वारातून आत नेत होता. मल भीती वाटू नये म्हणून मला आधीच पुढली कल्पना देत होता. मी ठेचकळू नये म्हणून पुढच्या मार्गावर प्रकाश टाकत होता...

माझी सगळी भीती पार नाहीशी झाली. मन शांत झालं. निश्चल झालं एरवी घोघावणारा तो समुद्र नि स्तब्ध झाला.आता त्याच्यावर एकही लाट उठत नव्हती, की प्रतिबिंब धरत नव्हत. शाती. असीम शाती...अगम्य गूढ...निरंतर शाती...

--मला जाग आली तेव्हा क्षणभर मी कुठं आहे तेच मला कळेना. मग चेहरे दिसले. डॉक्टर्स...नर्सेस..खोलीतला तो औषधांचा वास ..पुन्हा एकदा मी त्या नीरव शाततेला पारखा झालो होतो. गडबड--


सर्व ग्राहकांस दीपावली शुभचिंतन!

**मालक : जी. आर. देशपांडे**

सुलभ हप्ता पद्धत चालू आहे

**पायोनियर रेडिओ क्राफ्टर्स**

अधिकृत विक्रेते :
रेडिओ : मर्फी
पंखे : जी. ई. सी., रॅली, क्रॉम्प्टन
रेफ्रिजरेटर : केल्व्हिनेटर, झेनिथ
टेलिव्हिजन : वेस्टर्न, स्टॅन्डर्ड

**फेमस रेडिओ कंपनी**

रेडिओ : बुश, स्टॅन्डर्ड
अधिकृत विक्रेते :
रेफ्रिजरेटर : ऑल्विन
बेगस्टन, स्टॅन्डर्ड टी. व्ही.

**एस. ट्रायो इलेक्ट्रॉनिक्स**

अधिकृत विक्रेते :
रेडिओ : मर्फी, टेलिफंकन
पंखे : उषा
रेफ्रिजरेटर : गोदरेज, जेम
टेलिव्हिजन : टेलिव्हिस्टा, कोनार्क, पॅनाव्हिजन
मिक्सर : ॲनसन

पत्ता : सेनापती बापट मार्ग, दादर स्टेशनसमोर, (वेस्टर्न रेल्वे)

दादर, मुंबई २८ ☆ फोन : ४५८०३५

अधिक चांगल्या प्रकारे तुमची
सेवा करण्यासाठी

# आम्हांला आपल्या मदतीची गरज आहे




आपण विनातिकिट प्रवास केलात तर कायदा आपला मार्ग निःसंशय अनुसरेलच. आणि त्यामुळे होणारे नुकसान आपल्याला फारच जास्त वाटेल जर आपल्या जवळ योग्य तिकिट असेल तर आपली सेवा अधिक चांगल्या प्रकारे करण्यास आम्हाला मदत होते.

आपल्या सेवेसाठी **मध्य रेल्वे**

SUSHMITA—78017

गोंधळ—वेदना— औषधं — हिशेब—हे इथलं जिणं...कशाला परत आलो मी इथं ? या गदारोळात ?

,—आणि मला एकदम अवीचा चेहरा दिसला.

अवी म्हणायचा, 'काका, या जगात मला तुमच्याशिवाय दुसरं कुणी नाही.'

बेटा अवी, तुझा काकाही फार दिवस या जगात राहणार नाही रे !

ते काही नाही. अवीला जाणीव दिलीच पाहिजे. त्याला आता माझ्याशिवाय एकटंच राह्यचंय. चार दिवसानी. फक्त या—या शुक्रवारनंतर ! त्याला ते जमायला हवं. त्याला आपल्या पायावर उभ राहता यायला हवं.

मी गेल्यानंतर अवीचं काय होईल याचा मी गेले दोन दिवस विचार करीत होतो. निदान त्याला नोकरी मिळायला हवी होती; पण अजून तरी मिळालेली दिसत नाही. शुक्रवारपर्यंत—फक्त चार दिवस ! चार दिवसांत काय होणार ? त्यातून हा तर कुठं जात नाही. कुणाकडे शब्द टाकत नाही. सारखा माझ्या उशाशी बसून असतो, माझं औषध-पाणी करीत, माझ्याशी गप्पा मारीत, नाही तर, मला काही तरी वाचून दाखवीत !

काल असाच काही तरी वाचून दाखवीत होता. काय कुणास ठाऊक ! माझ्या काही लक्षात येत नव्हतं. माझ्या मनात त्याचेच विचार चालले होते

शेवटी मला आठवलं. गेल्या महिन्यात यानं 'सहकारी भाडारा'त अर्ज केला होता. त्याच काय झाल, असं मी विचारल. आणखीही बऱ्याच ठिकाणाबद्दल मी विचारलं. सगळीकडे नन्नाचा पाढा !

हा मुलगा इतका बेफिकीर कसा ? याला स्वत:च्या भवितव्याची काहीच काळजी नसावी म्हणजे काय ?

मी शांतपणे त्याला एकेक विचारीत होतो, पण मनातून मी ढासळत चाललो होतो. खरंच, काय होणार याचं मी गेल्या-नंतर ? म्हणजे शुक्रवारनंतर ? फक्त चार दिवसानतर ? माझी काळजी मला बाहेर दिसू द्यायची नव्हती. पण मन आक्रोश करीत होत. मी आहे तोवर याला वडिलानी निदान घरात तरी ठेवलाय. माझ्यानतर ते याला हाकलून द्यायला कमी करणार नाहीत आणि हाकललं नाही, तरी तिरीमिरीनं हाच घर सोडून बाहेर पडेल. मग कोण उभं करील याला दारात ? कुठ जाईल हा ?

आणि एकाएकी माझ्या मनाचे सारे बांध कोसळले. मी अवीचे हात हातात घेतले आणि वेड्यासारखा रडत सुटलो.

¤

साला आपल्याला एकदम भयकर ऑकवर्ड वाटलं

भाईकाकाच्या वयाचा मनुष्य आणि तो बोलता बोलता ओक्साबोक्सी रडायला लागला, म्हणजे भलतीच पंचाईत होते. बरं, मुद्दा तसा काही फार मनाला लागण्या-सारखा नव्हता. साधा नोकरीचा तर प्रश्न ! मिळेल आज नाही तर उद्या !

अर्थात भाईकाकांचंही तस बरोबरच ! चार दिवसावर ऑपरेशन !—आणि तेही कठीण, गुतागुतीचं ! भीती वाटणं स्वाभा-विक आहे ! वरवर माणूस कितीही शांत दिसला तरी ज्याला त्याला जिवाच भय हे आहेच ! मरणाच्या कल्पनेनं पुष्कळ लोक सैरभैर होतात. मग काका असे विचित्र वागायला लागले यात नवल नव्हतं.

मी काकांची समजूत घातली. म्हटलं, 'काका, तुम्ही या दुखण्यातून शंभर टक्के बरे होणार—घाबरण्याचं कारणच नाही. ऑपरेशन किचकट असलं तरी डॉक्टर्सही तसेच हुषार आहेत, काही काळजी करू नका !'

काकांची समजूत पटावी म्हणून मी काय तोंडाला येईल ते बोलत होतो; पण काकाच्या तोडून हूं नाही की चू नाही. ते नुसते आढ्याकडे एकटक पाहात स्वस्थ पडून होते. मी त्याची मान उशीवर सारखी केली आणि बाहेर पडलो. न जाणो, माझ्या तिथं असण्यानंच त्यांना एकसारखे उमाळे यायचे!

शुक्रवारी ठरल्याप्रमाणे ऑपरेशन झालं. मी काकांची समजूत घातली खरी; पण ऑपरेशन पार पडेपर्यंत मनात नुसती धाक-धूक होत होती. खरोखरच जर काकांचं काही बरंवाईट झालं, तर माझं काय होईल हा विचार एकसारखा मनात येत होता. खरं तर असला अमंगळ आणि त्यातूनही स्वार्थाचा विचार मनात आणूच नये. पण मन म्हणजे काय, सरळ पायवाट सोडून नेमकं काट्या-कुट्यात अडमडणारं जनावर !

त्यातून गुरुवारी रात्री डॉक्टर मेहता आले होते ते साठ्यांना सांगत असताना मी ऐकलं. अॅनास्थेशिया द्यायला त्यांना इतक्या ट्रीटमेंट-नतरही काळजी वाटत होती. म्हणाले, आधी भूल देताना त्रास, त्याहून परत शुद्धीवर आणताना अधिकच त्रास ! ताराचं आणि नळ्याच जाळं होईल पेशटच्या भोवती !

वाईट म्हणजे हे सगळ त्यांनी काकानाही सांगितलं. म्हणाले, मुद्दाम सागतो, नाही तर शुद्धीवर याल, आणि या तारा—नळ्या बघून पुन्हा बेशुद्ध पडाल ! काकानी यावर नुसतं मंद स्मित केलं.

प्रत्यक्ष ऑपरेशन मात्र मला वाटलं त्याहून किती तरी सोपं गेलं. ऑपरेशनमधून काका जागे झाले ते अगदी ताजेतवाने, टवटवीत ! जसे काही कधीच आजारी नसावेत असे ! त्याचा सगळा आजार जादूसारखा पळून गेलेला दिसत होता.

त्याना जाग आली तीदेखील कसलाही कृत्रिम उपाय न करता. डॉक्टराची भीती अगदीच खोटी ठरली ते हसत हसत डॉक्टर कोठीवालाना म्हणालेसुद्धा—'काय समजायचा


दीपावली अभीष्ट चिंतन

दादर ( पूर्व ) भागात राहण्याची उत्तम सोय !

**श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस**

हिंदू कॉलनी, १ ली गल्ली, दादर, मुंबई—४०० ०१४

☆ टेलिफोन : ४४०२७८ ☆

याचा अर्थ ? मी सगळी जय्यत तयारी ठेवली होती. पण तुमच्या पेशंटला कशाचीच गरज पडली नाही. आय अॅम अमेझ्ड् असला पेशंट मी अजून पाहिलेला नाही माझ्या लाइफ-टाइममधे !'

त्यावर गडगडाट करून डॉक्टर कोठीवाला हसले आणि म्हणाले, 'बाबा रे, मिरॅकल्स विल् ऑलवेज् हॅपन. चमत्काराचं युग अजून संपलेलं नाही.'

पण त्याहूनही मोठा चमत्कार मला लगेच पाहायला मिळाला. काका ऑपरेशनच्या सध्याकाळीच अथरुणात उठून बसले. 'नको नको' म्हणत असताना मला म्हणाले, 'छोड दो ! माझी काळजी पुष्कळ केलीत. आता या क्षणापासून तू स्वत:ची काळजी करायचीस. मलादेखील त्याच उद्योगाला लागलं पाहिजे.'

'तुम्हाला ?' मी आश्चर्यानं विचारलं. 'आजच तर तुमचं ऑपरेशन झाल. अजून पधरा-वीस दिवस तरी तुम्ही नुसती रेस्ट घ्यायला हवी !'

त्यावर काका मंद हसले. म्हणाले- 'नाही बाबा, आता अजिबात वेळ नाही रेस्ट घ्यायला. आधीच फार उशीर झालाय !' मला त्यांच्या बोलण्याचा अर्थ कळला नाही. पण मी वाद घातला नाही. मला वाटल, त्याच्या डोक्यावर अजूनही गुंगीचा परिणाम असेल !

काही का असेना, काकाचं ऑपरेशन यशस्वी झालं, याचाच मला खूप खूप आनद झाला आहे !

□

त्या दिवशी मनाला किती आवर घातला, पण अगदी अचानक रडू कोसळलंच !

अवी खुळचासारखा माझी समजूत घाला-यला लागला.

त्याची पहिली दोन-चार वाक्यं मी ऐकली असतील नसतील-

एवढ्यात कुणी तरी खोलीत आलं.

ते आल्याची मला अगदी स्पष्ट जाणीव झाली. अगदी हाडा-मासाचं माणूस यावं तशी.

पण ते जे कुणी होतं ते हाडा-मासाचं नव्हतं प्रकाशरूपसुद्धा नव्हतं. किंबहुना ते संपूर्णपणे निराकारच होत म्हटलं तरी चालेल आणि तरीही मला चाहूल मात्र अगदी नीट लागली.

तो म्हणाला - 'हे काय ? रडतोस ? माझ्याकडे यायला रडतोस ? तुला यावंसं नाही का वाटत माझ्याकडे ?'

पुन्हा तोच प्रेमळ स्वर. तोच आर्जवीपणा. कुठल्याही नात्यापलीकडची माया. लहानमोठे-पणाच्या सगळ्या हिशोबांपलीकडचं आर्जव.

अर्थातच हा शब्द मला एकट्यालाच ऐकू येत होता. अवीच्या कानावर काहीच पडत नसणार हे उघड होतं.

मी म्हटलं, 'मी तयार आहे. मला खूप आवडेल तिथं यायला. इथं काय आहे ? गडबड-गोधळ-गर्दी ! मला तिथं यायचंय्. मला शांती हवीय !'

हे शब्ददेखील मी प्रत्यक्ष तोडानं बोलत नव्हतो. आमच्यात जणू एक मानसिक संवा-दच सुरू झाला होता.

'मग डोळ्यात पाणी का ?'

'कस सांगू ? हा माझा पुतण्या मला पोटच्या पोराहून अधिक आहे. त्यालाही माझ्याशिवाय दुसरं कुणी नाही हा अजून मार्गाला लागला नाही- केवळ स्वत चा विचार केला की यावंस वाटत; पण याला वाऱ्यावर सोडून द्यायच्या कल्पनेनं काळीज गलबलतं. दोन दिवसांत याचं काही नीट लागणं शक्य नाही. त्यातून मी इथ हॉस्पि-टलमधे !'

क्षणमात्र शातता पसरली. तरीही तो अजून गेला नव्हता. होता, तिथंच होता. मला जाणवत होत.

'ठीक आहे,' त्याचा शब्द माझ्या मना-वर उमटला. 'एवढ्यात येऊ नकोस. तो मार्गाला लागला की, मग ये. इथली वेळ कधी मागून बदलता येत नाही; पण तू स्वत:-साठी काही मागितलं नाहीस. दुसऱ्याच्या विचारानं अडला आहेस तुझी मुदत वाढवली आहे, तुझा पुतण्या मार्गी लागेपर्यंत.'

करुणा-अथांग करुणा-दया-वात्सल्य ! मला पुन्हा तोच अनुभव आला. शांत शात वाटल. निरभ्र, खोल निळ्या आभाळासारखं गाढ वाटलं.

त्याच मन:स्थितीत मी ऑपरेशन-थिएटर-मध्ये गेलो. आज मरणाची भीती नव्हती. किंबहुना आज नाही, कधीच नव्हती ! माझ्या मरणाची सूत्रं मी एका परमतत्त्वा-कडे सोपवली होती- आता मी कशाला त्याची विवंचना करू ? त्याला जे योग्य वाटेल ते तो करील. मरणानंतरही तोच माझे बोट धरून मला वाट दाखवणार आहे... मग भीतीला, दु:खाला जागा आहेच कुठं ?

ऑपरेशननंतर मी शुद्धीवर आलो तेव्हा मला क्षणभर दु:ख झालं. काही तरी राहून गेल्यासारखं वाटलं. मी त्या महाद्वाराशी जाऊन आलो होतो; पण आज प्रवेश नाका-रला गेला होता. मला न घेताच जहाज मार्गस्थ झालं होतं. यासाठी थोडी हुरहूर वाटली. खत वाटली.

पण मग समोर आनदानं फुललेले चेहरे आले. डॉक्टराचे ! - त्याची बुद्धिमत्ता, त्याचे श्रम कारणी लागले होते आणि अवी- गेले दोन-चार दिवस भ्यालेल्या कोकरासारखे दिसणारे त्याचे डोळे आज प्रथमच आनंदानं चमकत होते.

याच- याच कोकरासाठी मी परत आलो होतो !

डॉक्टर साठे विचारीत होते- 'काय कस वाटतं ?'

मी नुसता हसलो.

'काही लक्षात येतंय् का ?' मला बोलत करण्यासाठी त्यानी विचारलं, 'कुठं आहात तुम्ही ?'

मला त्या दिवशीचा प्रवास आठवला.

'रिकव्हरी रूममध्ये.' मी म्हणालो. 'माझी कॉट दारापासून उजव्या कोपऱ्यात टोकाची आहे.'

माझं वर्णन अचूक असणार याची मला खात्री होती; पण साठ्याना त्याचं विशेष काही वाटलं नसावं. माझ्या डोक्यावर गुंगीचा परिणाम अजूनही आहे, म्हणून मी असं काही तरी बोलतो असाच त्यांचा समज झाला.

पण नंतर मात्र अवी म्हणाला, 'काका, तुम्ही पूर्वी कधी पाहिली होती ही खोली ? आणि कॉट कुठं असणार हे तुम्हाला काय माहीत ?'

त्या सध्याकाळपासूनच मी अवीला मार्गी लावण्याचा विचार करायला लागलो.

आता मला वाया दवडायला मुळीच वेळ नव्हता.

इतके दिवस मी अवीच्या बाबतीत अधिक धडपड केली असती, तर आज हे असं टांगून राहावं लागलं नसतं.

पण पूर्वी झाल ते झाल. आता परिस्थिती वेगळी आहे. आता मी बाधलेला आहे. प्रत्यक्ष वचन दिलं नसल म्हणून काय झाल ?

त्यानं दिलेल्या वचनाची जबाबदारी माझ्यावर आहेच !

नाही – आता वाया घालवायला एक दिवस, एक प्रहरदेखील नाही !

आणि तशी जरूरही नाही. मला एकाच दिवसात विलक्षण हुशारी वाटायला लागली आहे. मी आजारी होतो हेच मुळी विसरून गेलो आहे. एकाच दिवसात ! गेल्या कित्येक वर्षांत वाटला नाही एवढा उत्साह मला वाटतो आहे !

आता कशासाठी जगायच, हे मला ठाऊक आहे.

तेव्हा प्रयत्नांची पराकाष्ठा करून हेतू पार पाडला पाहिजे-- !

--कमीत कमी मुदतीत !

¤

भाईकाकाना ऑपरेशननंतर खणखणीत बरं वाटायला लागलं, याविषयी डॉक्टर्सचं दुमत नव्हतं. पण म्हणून ते चक्क दुसऱ्याच दिवशी हॉस्पिटलमधून बाहेर पडतील, असं कुणाला वाटलं नव्हतं.

खरं तर हा चमत्कारच होता. एरवी ऑपरेशनंतर 'आठ दिवसानी जातो' म्हटलं तरी त्याना वेडयातच काढल गेलं असतं; पण भाईकाकांना जसा काही एक नवीनच आत्मविश्वास आला होता. वागण्यात एक नवीनच बळ आलं होतं. त्या बळावरच ते चक्क दुसऱ्या दिवशी सकाळी वॉर्डमधून उठून प्रमुख डॉक्टरना भेटले आणि म्हणाले, 'आय मस्ट गो होम. आय मस्ट गो [अॅट वन्स.'

डॉक्टर पाहातच राहिला. ऑपरेशनच्या दुसऱ्या दिवशी वॉर्डमधून उठून आपल्या ऑफिसमधे स्वत:च्या पायांनी चालत आलेला पेशंट तो पहिल्यादाच पाहात होता. त्यातून त्याच्या सांगण्याला आत्मविश्वासाची अशी काही धार होती की, त्यातली निकड डॉक्टरला लगेच जाणवली.

पण तरीदेखील त्याला हॉस्पिटलच्या नियमाकडे अगदीच डोळेझाक करणं शक्य नव्हतं. त्यानं जाऊ द्यायची परवानगी नाकारली. पण काका कुणाचं काही ऐकून घ्यायच्या परिस्थितीत नव्हते त्यांनी आपला एकच धोशा लावला होता, 'मला गेलंच पाहिजे. आय मस्ट गो, अॅट वन्स.'

डॉ. कोठीवाला, डॉ. मेहता, डॉ. साठे-- सगळ्याची मतं घेतली गेली. सगळ्यांनी कसून विरोध केला; पण भाईकाका त्यांना पुरून उरले. 'मला काही होणार नाही. उलट इथ राहिलो तर मी खचून जाईन. मला जायलाच हवं. माझं काम अडून राहिलं आहे,' असं त्यानी अगदी निर्धारानं सांगितलं.

मग अनेक चेकप्स झाले, अनेक अटी घातल्या गेल्या, अनेक पथ्य पाळण्याची वचनं घेतली गेली आणि भाईकाका हॉस्पिटलमधून टॅक्सी करून निघाले. टॅक्सी तशीच घेऊन आले ते तडक आमच्याच घरी ! वरदेखील न येता खालून ओरडले, 'अवीला पाठवा.' मी त्यांना बघून भलताच चकित कसे तरी


ग्रंथप्रेमी लोकांची मक्का म्हणजेच

## 'फिनिक्स' लायब्ररी !

### ☆ आमची काही खास वैशिष्टये ☆

- पुस्तकाच्या पहिल्या पानावर निरनिराळ्या वृत्तपत्रातील झटकन् वाचून लक्षात राहण्यासारख्या व मनोवेधक बातम्या चिकटवितो.
- पुस्तकासंबंधीची दुर्मिळ माहिती, फोटो, परीक्षणे पुस्तकात चिकटविली जातात. त्यामुळे पुस्तकासंबंधीची बोनस माहिती वाचकास मिळते.
- जास्त मागणी असलेल्या पुस्तकांच्या ७/८ प्रती ठेवतो त्यामुळे सभासदाना पुस्तके लवकर लवकर मिळतात.
- वाचकांच्या माहितीसाठी नवीन आलेल्या पुस्तकाची यादी निरनिराळ्या साप्ताहिकातून दर आठवड्याला छापली जाते.
- वाचकांनी सूचित केलेली पुस्तके आणतो.
- निवडक साहित्यिक मूल्ये असलेल्या इंग्रजी व मराठी पुस्तकाचा प्रचड स्टॉक !
- इतर वाचनालयांप्रमाणे पुस्तक किती दिवस ठेवावे अशी मुदत नसते.
- नॉन-मेंबर्सना डेली बेसीसवर पुस्तके वाचावयास मिळतात.
- पुण्यातील सर्व साहित्यिकाची आवडती लायब्ररी--

'फिनिक्स' लायब्ररी !



**दीपावली शुभेच्छा**

दीपोत्सव म्हणजे सुख-समृद्धीचे प्रतीक !

गोमंतकाच्या जीवनात ही समृद्धी प्रत्यक्षात उतरावी म्हणून

आजपर्यंत केलेल्या कामगिरीचा आलेख आम्ही ह्या मंगलप्रसंगी साभिमान सादर करीत आहोत.

- ❋ कसेल त्याची जमीन कायदा.
- ❋ २१ हजार मुंडकारांना राहत्या घरांची मालकी.
- ❋ २१ आरोग्यकेंद्रे, ३१ ग्रामीण दवाखाने व ६३ उप-आरोग्यकेंद्रांची स्थापना.
- ❋ प्रत्येक गावी शाळा व वैद्यकीय सवलती.
- ❋ साक्षरतेचे प्रमाण ४८ टक्के.
- ❋ उद्योगक्षेत्रात विविधता.
- ❋ १५०० हून अधिक लघुउद्योग.
- ❋ विद्युतीकरणाचे लक्ष १०० टक्के गाठण्यासाठी तयारी.
- ❋ ११०० कि. मी. लांबीचे पक्के रस्ते.
- ❋ दरडोई उत्पन्नात सुमारे रु. १७०० पर्यंत वाढ.

ग्रामोन्नती, उत्पादनवाढ आणि ज्ञानवृद्धी या त्रयीची कास धरून आर्थिक व सामाजिक पुनर्निर्माणाच्या दिशेने झेप घेण्याचा निर्धार गोवा, दमण व दीवची जनता या आनंदोत्सवात व्यक्त करीत आहे.

माहिती आणि जनसंपर्क संचालनालयातर्फे प्रकाशित.

## गोवा, दमण व दीव सरकार

घाईघाईनं बाहेरचे कपडे चढवून खाली गेलो. काका म्हणाले, 'चल बरोबर.' मी आत शिरलो. टॅक्सी चालू झाली.

काका कुठे नेताहेत हेच मला कळत नव्हतं.

थोड्याच वेळात त्याचा उलगडा झाला.

काका मला घेऊन त्यांच्या एका मित्राकडे गेले. हट्टंगडी नावाच्या. तो नुकताच घरी येत होता. बँकेमधे तो चांगल्या अधिकारावर होता.

काकांनी माझ्याविषयी सांगितलं. बँकेची रिक्रूटमेंट व्हायला अवकाश होता. काका म्हणाले, 'याला तर तावडतोब नोकरी हवी!' शिवाय माझे वयही इथे आड आलं. हट्टंगडी चांगलं वागले; पण आम्हाला त्यांचा काही उपयोग होण्यासारखा नव्हता.

आम्ही काकांच्या घरी आलो. किती तरी दिवसांनी मी इथं येत होतो. काकांनी स्वत: चहा केला. मी त्यांचे स्लीपर्स त्यांच्या खुर्चीसमोर ठेवले आणि चहाचा कप हातात घेऊन त्यांच्या पुढ्यात बसलो. विचारलं—

'काका, एवढी घाई काय माझ्या नोकरीची? तुम्हाला थोडं बरं तर वाटू दे!'

'मला बरंच वाटतंय.' काका माझ्यावर डाफरले. 'आणि घाई नाही कशी? घाई आहेच. तुला माहीत नाही—मला किती अडकल्यासारखं झालंय् ते. तुझं सगळं एकदा नीट लागलं की मग सुटलो!'

'तुम्ही अजून चिक्कार जगणार आहात काका, त्याशिवाय का या ऑपरेशनमधून—'

'गप्प बस!' माझ्या तोंडावर हात ठेवीत काका म्हणाले, 'ज्या गोष्टीत आपल्याला काही समजत नाही, त्यांच्याविषयी बोलू नये!'

मग आमचं दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत माझ्या नोकरीसाठी धडपडणं सुरू झालं. जाहिराती बघ, अर्ज टाक, याला भेट, त्याला भेट! काय वाट्टेल ते करून माझा प्रश्न तडीला लावायचाच, असं काकांनी ठरवलं होतं. या घाईचं कारण त्यांचं त्यांनाच माहीत! मला मात्र चिंता वाटत होती की, या दगदगीनं काका परत आजारी पडणार! कमीत कमी त्यांचा दमा तरी चाळवणार! पण आश्चर्य म्हणजे यापैकी काहीच झालं नाही. काका उलट रोजच्या रोज अधिकाधिक उत्साही वाटायला लागले.

माझ्याबरोबर दिवसभर धावपळ करीत असतानाच काकांनी आणखी एक उद्योग चालवला होता. आपल्या एका सॉलिसिटर मित्राच्या मदतीनं ते आजवर जमा केलेल्या निरनिराळ्या ठिकाणचा पैसा सोडवून घ्यायला लागले होते. त्यासाठी त्यांनी शेअर्स विकले, गुंतवणुकी परत घेतल्या. फिक्स्ड् डिपॉझिट रिसीट्सही मोडल्या. मला याचा सुगावा लागल्यानंतर मी त्यांना एके दिवशी विचारलं, 'काका, हे काय चालवलंय् तुम्ही?' त्यांचं नेहमीचं उत्तर—'तुला कळणार नाही.'

पण थोड्याच दिवसांत मला सुगावा लागला. काका मला म्हणाले, 'हे बघ अवी, तुझं वय आणि शिक्षण लक्षात घेता तुला चांगलीशी नोकरी तावडतोब मिळेल असं वाटत नाही आणि आज-काल या असल्या फालतू नोकऱ्यांमध्ये काय दम आहे? त्यापेक्षा तू स्वत:चा बिझनेस सुरू कर.'

मी तीन फूट उडालो! बिझिनेस सुरू करावा असं कधी कधी मलाही वाटत असे. पण कसला करणार? आणि भांडवलाचं काय?

दोन्हीची व्यवस्था काकांनी करून ठेवली होती. 'माझ्या मित्राचा मुलगा मेटॅलर्जी शिकून आलाय. त्याला स्वत:चा स्पेअर पार्टस्चा धंदा काढायचाय. आज-काल फार मार्केट पण आहे या धंद्याला; पैसे घालील असा पार्टनर हवाय त्याला. मेहनत करायची तयारी असली तर मी साठ हजार देतो तुला धंदा सुरू करण्यापुरते. पुढे मात्र तुमचं तुम्ही बघा!'

माझ्या तोंडून शब्द फुटेना. हे कोण बोलतंय? माझे काका? मानलेले काका? मला घरातून हाकलायला निघालेल्या माझ्या प्रत्यक्ष बापाचे लांबचे भाऊ? की त्यांच्या तोंडून प्रत्यक्ष परमेश्वर बोलतोय?

'तुम्ही निर्धास्त राहा काका! मला जर बिझिनेस सुरू करता आला तर जिवाचं पाणी करीन! रात्रं-दिवस खपेन पण तो वाढविल्याशिवाय राहाणार नाही!' मी म्हणालो.




# किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड

रजि. ऑफिस: लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ, खडकी, पुणे ४११ ००३.

अ) कंपनीची नोंदणी तारीख: २६ जुन १९४६.

ब) **व्यवसाय:** ३ ते ४४० अश्वशक्तीच्या इंटर्नल कम्बश्चन इंजिनांची व त्याप्रमाणे थिनवॉल्ड बायमेटल बेअरिंग्ज व बुशेस् यांची निर्मिती आणि विक्री.

उपकंपन्या: १) शिवाजी वर्क्स लिमिटेड, शिवशाही, जि. सोलापूर. व्यवसाय: कास्टिंग्जचे उत्पादन व विक्री.

२) किर्लोस्कर किसान इक्विपमेंट लिमिटेड, कोथरुड, पुणे ४११ ०२९. व्यवसाय: पेट्रोल इंजिनांचे उत्पादन व विक्री.

शाखा: १) कोऑल सेल्स अँन्ड सर्व्हिस, कोथरुड, पुणे ४११ ०२९.

२) किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड, १७५-१७७ सुरी वोंगसे रोड, बँकॉक, (थायलंड)

३) किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड, द्वारा के. ए. वी. प्रोजेक्टस् प्रायव्हेट लिमिटेड, २६ अल्बनी स्ट्रीट, क्रोज नेस्ट, एन्. एस्. डब्ल्यु. २०६६ (ऑस्ट्रेलिया).

## मुदत ठेवीसाठी आवाहन आणि स्वीकृति

### ठेवी स्वीकारीत आहोत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षे | १ | २ | ३ | ५ | १० |
| सर्वसाधारण ठेवीसाठी [illegible] व्याजाचा दर द.सा.द.शे. | १०½ | ११ | १२½ | १३½ | १४½ |

### गुंतवणूक करणाऱ्यांसाठी नवीन योजना

| | अ | ब | क |
|---|---|---|---|
| मुदत वर्षे | २ | ३ | ५ |
| ठेवीची रक्कम | रु. ८००/- | रु. ७००/- | रु. ५७५/- |
| परत केली जाणारी रक्कम | रु. १०००/- | रु. १०००/- | रु. १०००/- |
| सरळ व्याजाचा दर द.सा.द.शे. (अंदाजे) | १२ टक्के | १४ टक्के | १५ टक्के |

ठेवीच्या तारखेपासून दर सहा महिन्यांनी व्याज दिले जाते.

क) **कंपनीचे व्यवस्थापन:** संचालक मंडळाच्या नियंत्रण व मार्गदर्शनानुसार आणि आधिपत्याखाली श्री. शं. ल. किर्लोस्कर हे, अध्यक्ष व कार्यकारी संचालक या नात्याने कंपनीचे व्यवस्थापन करतात.

ड) **संचालक मंडळ:**

- **श्री. शं. ल. किर्लोस्कर,** अध्यक्ष व कार्यकारी संचालक, 'लकाकी' शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६ (उद्योगपती)
- **श्री. चं. शं. किर्लोस्कर,** उपाध्यक्ष, 'लकाकी कम्पौंड' शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६, (उद्योगपती)
- **श्री. श्री. बा. खेर,** अलका, १४ वा रस्ता, खार, मुंबई ४०० ०५२ (अॅडव्होकेट)
- **श्री. वि. निंबकर,** दि अॅमरिड, १५ वा रस्ता, खार, मुंबई ४०० ०५२ (उद्योगपती)
- **डॉ. रा. ज. राठी,** मे. सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड, १६२ वेलस्ली रोड, पुणे ४११ ००१ (उद्योगपती)
- **श्री. प्र. गो. पवार,** ७८ एरंडवणा, कमला नेहरु उद्यानाजवळ, पुणे ४११ ००४ (व्यापार)
- **श्री. के. भा. राव,** (आय्. अेफ्. सी. नियुक्त) १९ सुयोजना सहकारी गृहरचना संस्था, कोरेगांव पार्क, पुणे ४११ ००१ (सेवानिवृत्त मध्यवर्ती सरकारी अधिकारी)
- **श्री. वि. ना. दात्ये,** ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० (व्यापार)
- **श्री. अप्पा भ. पंत,** पतनिवास ८९३/५ भांडारकर इन्स्टिट्यूट रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ (निवृत्त लेखक)
- **श्री. हे. म. कोठारी** "सी व्ह्यू" ५७, वरळी सी फेस, मुंबई ४०० ०२५ (शेअर आणि फायनान्स ब्रोकर)
- **श्री. ज. ना. गुर्जर** १०-११ मेन रोड क्रमांक ३, जयमहाल एक्स्टेन्शन, बंगलोर ५६० ०४६ (बिझिनेस एक्झीक्युटिव्ह)

ई) **जाहिरात प्रसृत होण्यापूर्वीच्या सलग तीन आर्थिक वर्षांतील नफ्याचा तपशील.**

| ३० जून रोजी संपणारे वर्ष | करपूर्व नफा | करपश्चात् नफा |
|---|---|---|
| ३०-६-१९७४ | रु. २१,२२५,१७१ | रु. ८,८१४,९६६ |
| ३०-६-१९७५ | रु. २५,२७२,७९२ | रु. ८,५२१,५३० |
| ३०-६-१९७६ | रु. ३७,२६९,२२० | रु. १४,८६६,७०० |

फ)

| लाभांश: | | ३०-६-१९७४ | ३०-६-१९७५ | ३०-६-१९७६ |
|---|---|---|---|---|
| अ) इक्विटी कॅपिटल | — | ७ टक्के | ६.५ टक्के | १२ टक्के |
| ब) रिडिमेबल क्युम्युलेटिव्ह पार्टिसिपेटिंग प्रेफरन्स कॅपिटल | — | ८ टक्के | ८ टक्के | ८ टक्के |
| क) रिडिमेबल क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स कॅपिटल | — | ९.५ टक्के | ९.५ टक्के | ९.५ टक्के |

ग) **३० जून १९७६ रोजी संपलेल्या वर्षाचा आढावा:-**

| | | |
|---|---|---|
| १) वसूल भाग भांडवल | — | रु. ४६,२६२,५०० |
| २) मुक्त राखीव निधी | — | रु. ५८,६८७,७१९* |
| ३) ठेवी | रु. २१,८३०,८४९ | |
| भागधारकांकडून कर्जे | रु. ९,०६४,५०० | रु. ३०,८९५,३४९ |
| ४) तारणावरील कर्जे | | |
| दीर्घ मुदतीची | रु. २२,७२६,३३६ | |
| अल्प मुदतीची | रु. ८२,७६५,२९९ | रु. १०५,४९१,६३५ |
| ५) तोट्याची एकत्रित रक्कम (असल्यास) | | नाही. |

* या रकमेपैकी रु. १७,२५०,००० एवढी रक्कम दि. २७-१२-१९७६ रोजी ३:७ या प्रमाणात बोनस शेअर्स वाटप करण्यासाठी भाग भांडवलामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

ए) ठेवींद्वारा स्वीकारलेल्या रकमेचा विनीयोग कंपनीच्या नित्य व्यवहारासाठी केला जाईल. आपल्या मर्जीनुसार ठेवींचा स्वीकार करण्याचे स्थगित करणे आणि त्यासंबंधीच्या शर्तींमध्ये बदल किंवा सुधारणा घडवून आणणे या विषयीचे सर्वाधिकार कंपनीने स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत.

ठेवीस्वीकृतिसंबंधीच्या अटी आणि तरतुदी अर्जाच्या नमुन्यामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यांत आल्या आहेत. यापैकी अेका तरतुदीनुसार, कंपनीला असलेली पैशाची आवश्यकता आणि बाजारातील पत पुरवठ्याची स्थिती, यांचा सारासार विचार करून, एकाच पावतीअन्वये रु. ५०,०००/- अथवा अधिक रक्कम विशेष व्याज दराने ठेव म्हणून स्वीकारण्याचा अधिकार, कंपनीला प्रदान करण्यांत आला आहे. दिनांक २३ ऑगस्ट १९७७ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये ह्या जाहिरातीचा इंग्रजी मसुदा संचालक मंडळाने संमत केला असून संचालक मंडळाचे हुकुमानुसार व संचालक मंडळाचे नांवे ही जाहिरात अधिकृतपणे प्रसृत करण्यात येत आहे. या जाहिरातीची एक प्रति-लिपी (इंग्रजी भाषेतील), संचालक मंडळातील प्रत्येक व्यक्तीच्या स्वाक्षरीसह, रजिस्ट्रार ऑफ कंपनीज् (महाराष्ट्र राज्य) यांच्याकडे दिनांक ८ सप्टेंबर १९७७ व दिनांक १९ऑक्टोबर १९७७ रोजी सादर करण्यात आली आहे.

अधिक तपशील आणि अर्जाचा नमुना यासाठी, कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसशी कृपया पत्रव्यवहार करावा. अर्जाचे नमुने खाली निर्देश केलेल्या पत्त्यावरसुद्धा मिळू शकतील.

**मुदत ठेव योजनेसंबंधीचे आर्थिक सल्लागार:-**

**मे. डी. एस्. पी. फायनान्शियल कन्सल्टंटस् लिमिटेड**

६४ स्टॉक एक्स्चेंज बिल्डींग, ३ रा मजला, अपोलो स्ट्रीट, मुंबई ४०० ०२३. फोन नंबर: २७२६६०—२७२४०४

२) **मुदत ठेव योजनेचे व्यवस्थापक:—**

**जे. एम्. फायनान्शियल अँन्ड इन्व्हेस्टमेंट कन्सल्टन्सी सर्व्हिसेस् प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई.**

- ११२ जॉलीमेकर चेंबर्स नं. २, नरीमन पॉइन्ट, मुंबई ४०० ०२१. फोन नंबर: २१४१५१—२१८००४.
- ५ अ, हमाम स्ट्रीट, स्टॉक एक्स्चेंज बिल्डींग, तळमजला, ऑफिस नं. २१, फोर्ट, मुंबई ४०० ०२३. फोन नंबर: २७०५२२.
- पुणे: एफ्-११, शांतिकुंज, पहिला मजला, ४ साधु वासवानी रोड, जी.पी.ओ. समोर, पुणे ४११ ००१. फोन नंबर: २७४५५
- कलकत्ता: १६ इंडिया एक्स्चेंज प्लेस, कलकत्ता ७०० ००१. फोन नंबर: २२७६४२—२२२२४२.
- अहमदाबाद: मनसुखलाल भाईलाल बिल्डींग, मढुरत पोल, मानेक चौक, अहमदाबाद ३८० ००१. फोन नंबर: ३६१३०.

(३) **कंपनीचे मुंबई येथील कार्यालय**

एक्स्पोर्ट शो रुम, न्यु इंडिया सेंटर, १७-ए कूपरेज रोड, मुंबई ४०० ०२३. फोन नंबर: २३०९३१.

(१९५६ च्या कंपनी कायद्यामधील कलम ५८ अ आणि ५८ ब मधील तरतुदीनुसार तसेच १९७५ च्या कंपनीविषयक (ठेवी स्वीकृतीसंबंधीच्या) नियम क्रमांक ४ प्रमाणे ही जाहिरात आहे.).

PRATIBHA-7771

**ठेवीदारांनी ठेवीचा अर्ज मागविताना "माणूस" मध्ये जाहिरात वाचल्याचा उल्लेख करावा.**

'शाब्बास बेटा ! मला खात्री आहे. तू मेहनती आहेस. डोक्यानंही चागला आहेस. शाळेतल्या पुस्तकांशी तुझं जमलं नाही एवढंच; पण त्यानं काही बिघडत नाही. आयुष्याचं पुस्तक वाचता आल्याशी कारण !' बोलता बोलता काका एकदम गहिवरले. 'खरंच धंदा वाढवशील अवी ? श्रम करायला मागं-पुढ पाहणार नाहीस?' माझा हात दोन्ही हातांमधे पकडून ते म्हणाले-'वघ, मरणान्या माणसाला दिलेलं वचन आहे हे ! ते कधी खोटं पाडायचं नसतं !'

माझ्या डोळ्यात पाणी आलं. 'असं काय बोलताय काका ? तुम्हाला अजून पुष्कळ वर्षं-खरंच काका, पैसा मला देऊन टाकलात तर तुम्हाला म्हातारपणी-'

पण काका काही ऐकून घेण्याच्या परिस्थितीत नव्हते. 'वचन दिलंयस मला. वचन दिलयस.' ते पुन्हा पुन्हा पुटपुटत होते.

दुसऱ्याच दिवशी काका मला त्यांच्या मित्राच्या मुलाकडे घेऊन गेले. जयपुरिया त्याचं नाव तरुण होता. स्वभावानं चांगला वाटला. त्याच्याशी बोलणी झाली आणि पार्टनरशिपचे कागदपत्र तयार करण्याविषयी सॉलिसिटरला सांगूनच आम्ही घरी आलो.

मला वाटलं, आता तरी काका थोडी विश्रांती घेतील; पण नाही. मला घरी थांबायला सांगून उलट तेच कुठेसे उन्हात चालते झाले.

संध्याकाळी ते परत आले ते बाहेरूनच माझ्या नावानं आरोळ्या फोडत. खिशातून एक फोटो काढून मला दाखवीत म्हणाले-'कशी आहे ?'

फोटोतली मुलगी चांगलीच देखणी होती. मी विचारलं, 'कोण आहे ?'

'तुझं लग्न ठरलंय हिच्याशी.' काका दम दिल्यासारखे म्हणाले. 'मुलगी ग्रॅज्युएट आहे केमिकल प्रॉडक्ट्समधे नोकरीला आहे. लहानपणापासून ओळखतो मी हिला. वागायला चांगली आहे.'

ग्रॅज्युएट मुलगी ! नोकरी करणारी ! देखणी ! तिनं मला कसं पसंत केलं असेल ? माझ्याविषयी काकानी तिला काय सांगितल असेल कोण जाणे ! बहुत करून त्यांनी तिला पदवीधरापेक्षा धदेवाले चांगले असं काही तरी-

'हे बघ, देण्या-घेण्याचं सगळं मी ठरवून आलोय. त्याविषयी तू काही बोलायचं नाहीस. तू फक्त मुलगी पसत आहे की नाही एवढंच सागायचं ! तुझ्या मनाविरुद्ध मला काही करायचं नाही ! म्हणून तुला पाहण्यासाठी मी संध्याकाळी तिला बोलावलंय !'

'संध्याकाळी ? आज संध्याकाळी ?' मी किंचाळलो.

'हो. आजच. मला घाई आहे सांगितलं ना तुला ?'

'नाही; पण काका-हे जरा जास्तच-' माझं डोकं गरगर फिरतंयसं वाटत होतं. मी जागा होतो की स्वप्नात ?

उषा आली तेव्हा संध्याकाळ गडद झाली होती.

आमची ओळख करून देऊन काका चहाच्या तयारीला लागले.

आम्ही बाल्कनीत उभे राहिलो. बाहेरच्या काळोखात एकेक दिवा लागत जाताना पाहात काय बोलावं हे दोघांपैकी कुणालाच सुचत नव्हतं. नुसती एकमेकांची घडयाळाच्या काट्यासारखी टिकटिकणारी मनंच एकमेकांना ऐकू येत राहिली...

मागं काकांची चाहूल लागली म्हणून आम्ही वळून पाहिलं.

काकांनी हसत हसत तिला विचारलं-'कसा काय वाटला आमचा हा मवाली ?'

ती नुसती लाजून हसली.

'सगळे म्हणायचे, हा वाया गेलाय.' काका म्हणाले, 'मला मात्र तो चागला कामाचा माणूस वाटतो. अग, पाहायला गेलं तर असा चांगला मुलगा दिसणार नाही या दिवसात ! तुला अनुभव येईलच म्हणा !'

मी यावर काही तरी बोलणार होतो; पण काकानी मला गप्प केलं.

'आजवर मी याला सांभाळलं, बेटी !' ते तिला म्हणाले, 'आता तूच त्याला पदरात घे. सांभाळ. आता मी नसणार. माझ्यामागे तूच त्याचं सारं काही. माझी उणीव त्याला भासू देऊ नकोस.'

ती खाली पाहात होती, पण तिच्याही पापण्या ओलावल्या असणार !

'थाव. मी आलोच.' असं म्हणून काका घरात गेले.

आम्हा दोघाना यावर काहीच बोलण्यासारखं नव्हत. जड मनानं आम्ही बसून राहिलो.

मग तिलाच काही तरी सुचलं. 'काका चहा करताहेत. मी घेऊन येते.' ती म्हणाली आणि चहा आणायला आत गेली.

काकाना चहा फार आवडतो ! स्वत: चहा करायला तर फारच आवडतं. उषाला आता बहुधा चहा कसा करावा याचे धडे ऐकायला मिळणार ! अनोळखी मुलगी घरात येऊन चहाचे धडे घेतेय-किती गंमतीदार दृश्य ! घरातलं माणूस बनून काम करायची ही तिची पहिलीच वेळ ! पाहायलाच हवं काय करते ते !

-तिच्या पाठोपाठ मी घरात गेलो.

पण ती नुसतीच स्तब्ध उभी होती.

समोरच्या ट्रेमधे चहाचे दोनच कप भरलेले होते.

आणि भाईकाका खुर्चीवर बसले होते. खुर्चीच्या पाठीला टेकून.

कसल्या तरी गंभीर विचारात गढल्यासारखे.

त्यांनी स्वत साठी तिसरा कप भरलाच नव्हता.

-ते या लोकात नव्हते.

मला सांगून गेले, 'थांब-मी आलोच !'

आणि गेले ते गेलेच !

पण असं तरी कस म्हणावं ?

कदाचित त्याचे ते शब्द माझ्यासाठी नसतीलच दुसऱ्याच कुणाला तरी उद्देशून ते म्हणाले असतील-'थाव. मी आलोच !' *

---

[ 'क्लिनिकली डेड' असा डॉक्टरांचा लेखी शेरा मारून आल्यावर योगायोगाने, काही गूढ-अगम्य कारणाने मृत्यूच्या जवड्यातून परतलेल्या शंभरएक लोकाच्या मुलाखतींवर आधारित डॉ. रेमंड ए. मुडी यांचे 'Life After Life' हे पुस्तक अमेरिकेत सध्या फार गाजत आहे. वरील कथेसारखी एक सत्यघटना त्यात आढळते.... ]

# परलोकाचे अवलोकन

## रत्नाकर मतकरी

मरणं प्रकृति. शरीरिणाम् ।

मरण ही एक स्वाभाविक गोष्ट आहे. कुणाची ? ज्याना शरीर आहे त्यांची. शरीर असल्यानंतर त्याचा त्याग करणे अटळ आहे, अपरिहार्य आहे आणि मरण म्हणजे तरी दुसरे काय ? शरीराचा त्याग करणे. मरण म्हणजे नष्ट होणे नव्हे नाश पावणे नव्हे. आत्म्यासकट शरीराचा विनाश नव्हे. केवळ शरीराचा त्याग. जुनी वस्त्रे फेडून टाकल्यागत 'वासासि जीर्णानि यथा विहाय–' म्हणूनच मरण ही शरीरधारकांची स्वाभाविक प्रवृत्ती. त्यांची प्रकृती.

अर्थात हे सारे तत्त्वज्ञान आपण केवळ शब्दरूपाने जाणतो. त्याच्यामागचा संपूर्ण आशय समजून न घेता, त्यावर खोल विचार न करता. म्हणूनच मरण म्हणजे केवळ शरीरत्याग, हे मान्य करूनही नाशाच्या जाणिवेने आपण व्याकुळ होतो. शरीराशिवाय अस्तित्व असू शकेल हेच आपल्याला मान्य होत नाही. ( कारण तत्त्वज्ञानामध्येही आपण नकळत त्याचे शब्द– म्हणजे केवळ शरीरच पाहातो. अर्थ हा आत्मा– तो एखाद्यालाच जाणवतो.)

मरणाने शरीर नष्ट होते हे तर दिसतेच; पण केवळ शरीर नष्ट झाले म्हणजे माणूस नष्ट होतो का ? हाच तर अजूनपर्यंत पूर्णपणे न सुटलेला प्रश्न आहे. मरण म्हणजे खरोखर आहे काय ?

कुणी म्हणतात, की मरण म्हणजे काळनिद्रा. दुसरे तिसरे काही नाही. झोप गाढ झोप. ज्या झोपेत स्वप्ने नाहीत अशी शांत शांत झोप. त्यामुळे मरणाला काय घाबरायचे ? पण असे म्हटल्याने माणसाचे समाधान होत नाही याचे कारण उघड आहे एरवी शात झोप लागली, तर त्या झोपेतून जागा झालेला माणूस अधिक उत्साही होतो. अधिक प्रसन्न असतो. पण काळझोपेमधून जागेच होता येत नसेल, तर फायदा काय ? मरणाला मग केवळ 'झोप' म्हणायचे कशाला ? कारण शरीराला विश्राती मिळणे, मेंदूला विश्राती मिळणे आणि मनुष्य अधिक कार्यप्रवण होणे हे झोपेचे प्रमुख कार्यच इथे संभवत नाही.

काहीजण म्हणतात, की मृत्यू म्हणजे विस्मृती. मरणानंतर सगळेच पुसले जाते; पण असे म्हटल्यानेही मरणाचे स्वरूप काही कमी भयावह होत नाही कारण विस्मृती केवळ वाईट प्रसंगांचीच असती, तर आनद होतो. पण त्याबरोबर चागले प्रसग, कर्तबगारीची जाणीव, गुणाचा अभिमान, हे सारेच विस्मृतीत जाऊन कसे चालेल ? म्हणजे पुन्हा काही तरी गमावल्याची, हरवल्याची जाणीव ही आलीच.

तात्पर्य, मृत्यूचे स्वरूप हे या दोन्हीपैकी काहीही म्हटले तरी माणसाला मृत्यूला तोड देणे अवघडच वाटणार. कारण, यासारख्या कल्पनामुळे आपली निश्चित समजूत अशी होते की, मृत्यू म्हणजे केवळ काळोख ! एका प्रचंड अंधाराच्या दरीत आपण मृत्यूनतर फेकले जाणार ! हा अंधार कुणाला झोपेतला अधार वाटेल, तर कुणाला विस्मृतीचा; पण जोपर्यंत मरण म्हणजे अंधाराची पोकळी अशी नकारात्मक कल्पना रूढ असेल, तोवर मरणाचे भय कायम राहील हे खरे

वर सागितल्या त्या त्यातल्या त्यात बुद्धिनिष्ठ कल्पना. बुद्धिनिष्ठ म्हणजे बुद्धिवंतानी जोपासलेल्या, या अर्थाने. त्याशिवाय सर्वसामान्य जनतेत रूढ असलेल्या कविकल्पना खूप. पुराणिकांनी आणि कीर्तनकारांनी करून दिलेली समजूत अशी की, पृथ्वीच्या वर स्वर्ग आणि खाली पाताळ अशी दोन सदने आहेत. पृथ्वीवरील प्राणी मृत्यूनंतर दोहोपैकी एकात कुठे तरी जातो. तो पुण्यवान असेल तर स्वर्गात आणि पापी असेल तर नरकात अर्थात प्रत्येक प्राणिमात्राच्या पापपुण्याचा जमाखर्च ठेवून त्याची योग्य त्या ठिकाणी रवानगी करणे हे ओघानेच आले. त्या कामासाठी 'चित्रगुप्त' या व्यक्तीची योजना झाली. पुण्यवान मनुष्य स्वर्गात जाऊन अमृत पीत, अप्सरांच्या सहवासात चैन करतो आणि पापी मनुष्य नरकात ( त्या नरकामधेही, तुरुगात असतात त्याप्रमाणे लायकीनुसार– किंबहुना नालायकीनुसार अनेक वर्ग ! ) जाऊन क्लेश भोगतो. अर्थात पाप कशाला म्हणायचे आणि पुण्य कशाला म्हणायचे याची यादी पुराणिक– कीर्तनकारानी काढून दिलेलीच. त्यानुसार कसे वागायचे ते ठरवून ज्याने त्याने मरणानंतरच्या सुखदुःखाची सोय करून ठेवावी.

सर्वसामान्य भोळ्याभाबड्या जनतेमधे प्रसृत असलेली परलोकाविषयीची ही कल्पना आज आपल्याला हास्यास्पद वाटते ! पण तरीही ती एकदम झिडकारता येणार नाही. कारण एक तर ती फार प्राचीन काळापासून चालत आली आहे आणि दुसरे म्हणजे ती जगातल्या सगळ्या धर्मामधून सागितलेली आहे. कुठे अप्सराऐवजी हूर किंवा पऱ्या असतील, तर कुठे चित्रगुप्ताऐवजी सेंट पीटर असेल; परतु परलोकाचे अस्तित्व, त्याचा मनुष्याच्या पृथ्वीवरील आचरणाशी संबंध, नंतर आनद वा दुःख मिळणे आणि पाप-पुण्याचा जाब विचारणारी कोणी एक दिव्य व्यक्ती हजर असणे या कल्पना सर्वत्र समान आहेत. जेव्हा काही ठराविक कल्पना काळाला पुरून उरतात, आणि देशा-देशामधील अतरानेही वेगळ्या होत नाहीत, तेव्हा त्या जशाच्या तशा जरी स्वीकारता आल्या नाहीत, तरी त्याच्यात मुळात काही तथ्य असतेच.

देशोदेशी आणि अनादिकाळापासून लोकप्रिय असलेल्या या समजुतींमधील काही वरवरचा भाग आपण सोडून देऊ. उदाहरणार्थ, व्यवहारात माणसाने नुसते चांगलेच नव्हे, तर रूढीला धरून वागावे ही एक सामाजिक गरज— व्यक्तीच्या पाप-पुण्याच्या संदर्भात नव्हे, तर समाजातील सर्व घटकांना सुखाने एकत्र नांदता यावे म्हणून. या गरजेपोटी केवळ नियमांचे पालन जे करणार नाहीत, त्यांना काही जरब असावी म्हणून परलोकात मिळणाऱ्या शासनाच्या कल्पना निघाल्या असे आपण म्हणू आणि त्यातील अतिशयोक्तीचा भाग सोडून देऊ. किंबहुना धर्माचे निराकरण स्वतःच्या सोयीने करणाऱ्यांनी रचलेले भोरूड म्हणून या प्रकारचा सर्वच तपशील सोडून देऊ. तरी देखील परलोकाचे अस्तित्व आणि इहलोकातील मनुष्यप्राण्याच्या आचरणाचा त्याच्याशी असलेला संबंध यासंबंधी काही मूलभूत कल्पना करता येतेच. किंबहुना असेही म्हणता येईल की, आज हास्यास्पद वाटणाऱ्या भाकडकथांमागे काही एक शास्त्रीय सत्य निश्चित होते. प्राचीन काळी त्याचा अभ्यासही झालेला होता; परंतु नंतरच्या काळात ज्या त्या भाष्यकारांनी आपापल्या कुवतीप्रमाणे त्या सत्याचा अर्थ अधिकाधिक ढोबळ केला आणि त्याची शास्त्रशुद्धता हरवली. ( इथे ' शास्त्र ' या शब्दाचा अर्थ केवळ आज आपल्याला माहीत असलेले विज्ञान एवढाच मर्यादित नाही. ) परलोकाची कल्पना त्यामुळे बुद्धिवंतांनी नाकारली आणि दुसरे टोक गाठून मृत्यूनंतर काहीही नाही, असा नकारात्मक पवित्रा घेतला. विज्ञानाची आपल्याला जी काही मर्यादित ओळख आहे, तिला अनुसरून ही दुसरी कल्पना आपण चटकन स्वीकारलीही. परंतु इथेच न थांबता या विषयाचा अधिक सांगोपांग अभ्यास व्हायला हवा. खरोखरच परलोक ही पुराणात सांगितल्याप्रमाणे एक चित्रविचित्र सृष्टी आहे, की आज बुद्धिमंत समजतात त्याप्रमाणे तो अस्तित्वातच नसून मृत्यूनंतर केवळ अंधारच आहे ? अजून तरी हे कोडे उलगडलेले नाही. पण तोवर अमुक एकाच मताचा आग्रह धरणे हेही संयुक्तिक नाही.

या दृष्टीने मी दोन विचारवंतांकडे धाव घेतली. पैकी एकाचे लिखाण मिळाले आणि दुसऱ्याची प्रत्यक्ष मुलाखत. या दोघांच्या विचारांमध्ये भडकपणाचा अभाव आणि तर्काचा वापर आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या परलोकाविषयीच्या कल्पनांमध्ये कुठे तरी साम्यही आढळले. मग लक्षात आले की आपल्या पारंपरिक कल्पनेच्या गाभ्याशीही यांच्या विचारांचे साम्य आहे. आपल्या रूढ कल्पनांचा पुनर्विचार करण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचेही आहे. त्यातून काही निष्कर्ष निश्चित काढता येतात. पण काढलेच पाहिजेत असे नाही, काढण्याची घाईही नाही आणि हेच अंतिम सत्य असे मानण्याची सक्तीही नाही. जो तो स्वतःचे निष्कर्ष काढायला अर्थातच मोकळा आहे.

यांपैकी, डॉक्टर रेमंड ए. मूडी हे अमेरिकन तत्त्वज्ञ. त्यांनी स्वतः तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आणि तत्त्वज्ञान हा विषय शिकविलादेखील. त्यानंतर त्यांनी आपला मूळचा वैद्यक विषयाचा अभ्यास चालू ठेवला. हेतू हा की, वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय तत्त्वज्ञान ( फिलॉसॉफी ऑफ मेडिसिन ) शिकवता यावे. या काळात त्यांनी


दीपावली व नवीन वर्ष आमच्या ग्राहकांना व हितचिंतकांना सुखसमृद्धीचे जावो !



मरणोत्तर अस्तित्वावर गंभीर संशोधन केले. या विषयात प्रत्यक्ष अनुभव मिळणे अशक्य आणि तरीही त्यानी तो मिळविला हे विशेष ! कधी कधी आजारपणात, अपघातात अथवा शस्त्रक्रिये-सारख्या उपचारांत काही क्षण माणसाचा श्वासोच्छ्वास थांबतो, हृदयक्रिया बंद पडते आणि जसा काही किंचित्काल तो मृतवत होतो. काही क्षणानी मात्र तो पुन्हा पूर्ववत जिवत होऊन हालचाल करू लागतो. अशी उदाहरणे आपल्या माहितीत फार नसली, तरी जगात बरीच आहेत. डॉक्टर मूडीनी अशा शेकडो व्यक्तीना त्याचे अनुभव विचारून घेतले. त्यातले बरेच अनुभव जुळले; त्यामुळे आपल्याला निश्चित काही अनुमान काढता येईल अशी त्यांना आशा वाटू लागली. सगळ्याचे अनुभव जरी सारखेच नसले, तरी त्याच्यात समान घटक बरेच होते. त्यावरून डॉ. मूडीनी आपली 'थिअरी' तयार केली आणि त्यावर आधारून 'लाइफ आफ्टर लाइफ' हे पुस्तक लिहिले.

मृत्यूचा अनुभव साधारण कसा असतो, याचे डॉ. मूडी यानी केलेले वर्णन असे :

'पेशंट मरणाच्या दारात. त्याच्या वेदना कळसाला (पोचतात आणि अचानक त्याला जाणवते की डॉक्टर सांगताहेत, 'खलास! सारं सपल ! आता इलाज करण्यात काही अर्थ नाही !' त्याला कुठून तरी एक विचित्र ध्वनी ऐकू येऊ लागतो. गुंजारवासारखा आणि आपण एका लांबलचक काळोख्या बोगद्यातून वेगाने जात आहोत, असे त्याच्या लक्षात येते. एकाएकी आपल्या शरीराच्या बाहेर पडल्याचे त्याला जाणवते. आपण स्वतःच्याच शरीराकडे दुरून त्रयस्था-सारखे पाहात आहोत असे त्याच्या लक्षात येते. त्याच्या भावना उचंबळून येतात.

'थोडया वेळाने तो स्वत.ला सावरतो. हळूहळू या वेगळया अव-स्थेशी जमवून घेऊ लागतो. आपल्याला अजूनही एक 'देह' आहे; पण तो आधीच्या सशरीर देहापेक्षा वेगळा आहे असे त्याच्या ध्यानात येते. एवढयात आणखी काही तरी घडू लागते. पूर्वी दिवंगत झालेल्या इष्टमित्राचे आत्मे भोवती जमा होऊ लागलेले आणि एक अतिशय प्रेमळ, दयार्द्र अशी दिव्य व्यक्ती—कदाचित व्यक्ती नव्हेच, नुसताच दैदीप्यमान प्रकाश त्याच्यासमोर अवतरतो. बिनशब्दाच्या भाषेत ही दिव्याकृती त्याच्या कर्तृत्वाची चौकशी करते आणि मग सुरू होतो तो त्याच्या पूर्वायुष्याचा चित्रपट. निमिषार्धात सारे आयुष्य त्याच्या नजरेसमोरून जाते. एवढयात त्याला जाणवते की, इहलोकी परतणे भाग आहे. आता परत जाणे त्याच्या जिवावर येते कारण एव्हाना त्याला परलोकीचे वातावरण आवडू लागलेले असते. एक प्रकारची शांती, प्रेम आणि आनंद याचा त्याला अनुभव येत असतो.

'पण स्वत.च्या मनाविरुद्ध इहलोकी परतणे त्याला भागच पडते. शुद्धीवर आल्यानंतर तो घडलेला प्रकार इतरांना सांगण्याचा प्रयत्न करतो; पण हे कठीण जाते. कारण आलेला अनुभव शब्दापलीकडचा असतो. शिवाय ऐकणारा त्याला खुळयात काढतो. भिडेस्तव तो बोलायचा बंद होतो. तरीही आलेल्या अनुभवाने तो आतून-बाहेरून


**Siddho Mal Paper Conversion Co.,**

**A house for Quality Flexible Packaging Items.**

611, Kailash Building, 26, Kasturba Gandhi Marg,
NEW DELHI – 110001 (India)

Phones : 46333 & 40953 • Grams : SIMASO • Telex : ND 3331

**Manufacturers and exporters of**
**Quality Flexible Packaging Items**

Specialising in :

**Sophisticated Coatings & Laminations.**

Gravure Printing on :

- **Cellophane** • **Aluminium** • **Foils**
- **Polyethylene** • **Paper & Boards**

Waxed Wrappers to meet all requirements.

Finished Packaging Materials to suit all packing machines

बदलून जातो. विशेषत: 'मरणाच्या बाबतीतली त्याची मते–ती पूर्वीची राहाणे अशक्यच असते.'

डॉक्टर मूडीनी परलोकप्रवेशाचे केलेले हे वर्णन वाचताना एकदम चमत्कृतिपूर्ण वाटेल–कल्पनाविलासाने भरलेले वाटेल; पण ते वर्षानुवर्षांच्या सशोधनावर–अनेक मुलाखतीवर आधारलेले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. या मुलाखती विविध स्तरातल्या, विविध धंद्यातल्या व्यक्तींच्या आहेत. ट्रकला झालेल्या अपघातामधल्या ट्रक-ड्रायव्हरपासून ते प्रसववेदनांना तोंड देणाऱ्या स्त्रीपर्यंत साऱ्यांचे अनुभव यांत आहेत. दुसरे हेही लक्षात ठेवले पाहिजे की, सगळ्याना अगदी एकसारखाच अनुभव आलेला नाही. किंबहुना प्रत्येकाचा अनुभव हा अगदी वेगळा आहे; परंतु त्यातील ज्या गोष्टी ठळकपणे पुन्हा पुन्हा आढळतात, त्या एकत्र करून वरील हकीकत तयार केलेली आहे.

डॉक्टर मूडीची ही हकीकत आपल्या पारंपारिक कल्पनेबरोबर जुळवून पाहिली असता त्या दोहोंतील साम्य लगेच लक्षात येते. शरीर-विहीन आत्म्याचा प्रवास, त्याला इष्टमित्र भेटणे, दिव्याकृती (म्हणजे साक्षात परमेश्वर म्हणा किंवा चित्रगुप्त), तिने दाखविलेला पूर्वायुष्याचा चित्रपट आणि अंतिम शांती किंवा आनंद या साऱ्या गोष्टी आपल्याकडच्या पारंपारिक कल्पनाशी मिळत्या-जुळत्या आहेत. मृत्यूनतर प्राणी परमेश्वराकडे जातो आणि परमेश्वराचे स्वरूप आनंदमय आहे, या आपल्या संस्कृतीतील कल्पनाच इथे परत आढळतात.

या संदर्भात ज्यांच्याशी मी चर्चा केली ते गृहस्थ श्री. आपटे. (हे त्यांचे खरे नाव नाही; पण त्यांना प्रसिद्धी नको आहे आणि ती दिली जाणार नाही असे मी त्यांना वचन दिले आहे.)

गेल्या वर्षी विवेक रायकरच्या ल्युकेमियाच्या हकीकतीच्या संदर्भात मी त्याची भेट घेतली होती. गेली चौदा–पधरा वर्षे हे गृहस्थ अध्यात्मसाधना करीत आहेत; पण अत्यंत विनयशील स्वभावामुळे ते 'अजून या अथाग समुद्राच्या काठावर मी पाऊलभर पाण्यातच आहे,' असे म्हणत असतात. चमत्कार करून दाखवणाऱ्या बुवांविषयी त्यांचे म्हणणे एवढेच की, 'हे अध्यात्म नव्हे, ही सिद्धी. अशा सिद्धी खेड्या-पाड्यातल्या अनेकांकडे आहेत. पण म्हणून काही त्यांना कुणी ज्ञानी पुरुष म्हणत नाही. सिद्धी वेगळी आणि अध्यात्म वेगळे, हे लक्षात न घेता आपली जनता चमत्कारावरून नमस्कार करीत असते. जनतेचे एक राहू द्या; पण साधु-संत म्हणवणाऱ्यांनी या विषयात आपले सामर्थ्य समाजकारणी न लावता ते चमत्कार करण्यात वाया दवडावे याचा त्यांना खेद होतो.

अध्यात्माशी आपट्यांची तोडओळख झाली, ती काहीशी अचानक. त्यांच्या मृत पत्नीनेच त्याना हा रस्ता दाखवला. तिच्या आदेशावरून ते जिथे प्लँचेट केले जाते, अशा एका ठिकाणी पोचले. तिथे मिळालेल्या आदेशानुसार त्यानी अध्यात्मसाधना करायला सुरुवात केली. त्यांना मार्गदर्शन मिळाले ते एका देहहीन शक्तीचे. या शक्तीच्या सागण्यावरून त्यांनी स्वत.चा तुफान चालत असलेला लक्षावधी रुपये किंमतीचा कार्टिंग एजटचा धंदा एकाएकी सोडून दिला. त्यानतर हरिद्वार, हृषीकेश, उत्तर काशी, गगोत्री अशा नानाविध ठिकाणी, मठात किंवा झोपडी बांधून वास्तव्य करीत करीत त्यांनी साधना केली. आज अलिबागजवळ एका गावी समुद्रकिनाऱ्यावरच त्यांचा बंगला आहे. (बगल्याच्या एका बाजूला अथाग सागराचे उफाळते जीवन आणि दुसऱ्या बाजूला मृत्यूचे महाद्वार–स्मशान आहे.)

गेली सुमारे पंधरा वर्षे अध्यात्मसाधना करूनही आपटे वरवर अगदी सामान्य माणसासारखे राहतात. स्वत.च्या साधनेचे दुसऱ्यावर दडपण येऊ देत नाहीत. दुसऱ्यानी अमुकच रीतीने राहावे, असा आग्रह धरीत नाहीत. व्यवहारासाठी आवश्यक त्या गोष्टी स्वत.च्या स्वत च करतात. भरपूर वाचन करतात. मनन करतात. चर्चा करतात. त्यांचे एकूण व्यक्तिमत्त्व लक्षात घेतले की, ही व्यक्ती कल्पनाविलासात रमणारी असेल, असे वाटत नाही. त्यामुळेच परलोकाविषयीचे त्यांचे विचार निव्वळ कविकल्पना या सदरात मोडण्यासारखे नाहीत.

या विषयावर आम्ही अनेकदा चर्चा केली. काही भाग त्यांनी लिहूनही काढला. ही चर्चाच मी मुलाखतीच्या स्वरूपात पुढे ठेवीत आहे :

: 'परलोक' या गोष्टीवर आपला विश्वास आहे काय ?

: आहे. वेद–उपनिषदे ज्यानी आपल्याला दिली ते द्रष्टे ऋषी, महर्षी, व्यास, भगवद्गीता सांगणारे भगवान श्रीकृष्ण, जगद्गुरू श्रीशंकराचार्य किंवा योगेश्वर श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्यासारख्या थोर आत्मज्ञानी संतपुरुषानी परलोकाचे अस्तित्व सांगितलेले आहे.

: पण मृत्यूनतर प्राण्याला अस्तित्व कसे शक्य आहे ?

: आपल्या वेदान्तदर्शनाप्रमाणे आपले शरीर पाच कोषाचे बनलेले आहे. पृथ्वी–आप–तेज–वायू व आकाश या पंचमहाभूताचा बनलेला (१) अन्नमय कोश किंवा बाहेर दिसणारे शरीर, प्राण व कर्मेन्द्रिये यांचा (२) प्राणमय कोष, मन व ज्ञानेन्द्रिये याचा इच्छाशक्तिप्रधान असा, (३) मनोमय कोष, बुद्धी व ज्ञानेन्द्रिये मिळून, (४) विज्ञानमय कोष आणि ईश्वराचे कारण–शरीर माया व जीवाचे कारण–शरीर अविद्या मिळून, (५) आनंदमय कोष.

आपण ज्याला 'मृत्यू' असे म्हणतो, त्या घटनेच्या वेळी अन्नमय कोषाचा त्याग करून जीवात्मा सूक्ष्म देह धारण करतो. ('सूक्ष्म' याचा अर्थ 'लहान' किंवा 'मायन्यूट' नव्हे.) या सूक्ष्म देहाच्या पहिल्या तीन कोषांनी बनलेल्या देहाला Astral body–सूक्ष्म शरीर व 'आनदमय कोषा'ला Causal body–कारण–शरीर किंवा लिंगशरीर असे म्हणतात. परलोकातील देहात चार कोष असतात व आपल्या इहलोकीच्या देहात एक अन्नमय कोष जास्त असतो, एवढाच फरक आता परलोकी जाताना शरीर अथवा अन्नमय कोष मागे ठेवून मनुष्य जात असल्यामुळे त्याला खाणे, पिणे वा मैथुन यासारख्या शरीराला आवश्यक असलेल्या भौतिक गोष्टींची गरज भासत नाही. त्यामुळे त्या परलोकी नाहीत; परंतु इहलोकात या गोष्टींची, गरजेहूनही अधिक अशी अतिरिक्त सवय लागली असेल, तर मात्र ती एक मानसिक गरज बनते आणि ती न भागल्यामुळे प्राणी कष्टी होतो. (याच लोकी ऐहिक गोष्टींची आसक्ती कमी करण्याचा आग्रह साधु-संत धरतात तो यासाठीच)

: ही चार कोषानी युक्त अशी शरीरे आपल्याला दिसत का नाहीत ?

: सूक्ष्मदेह ज्या परमाणूचा बनलेला असतो, त्या परमाणूचे

चलनवलन (Vibrations) फार जास्त प्रमाणात असते. आपली दृष्टी काही एका मर्यादेतील Vibrations च पकडू शकते. दृष्टीच्या टप्प्याबाहेर गेल्यामुळें परलोकातील वस्तू पाहणे आपल्याला अशक्य होते.

: हे जरा अधिक सोपे करून सागाल का ?

: हो. असे पाहा, की आपल्या दृष्टीला Infra Red Ultra Violet एवढाच प्रकाशपट्टा पाहता येतो. त्यापलीकडे आपल्याला दिसत नाही म्हणून आपण त्याला अंधार असे म्हणतो. नाही तर शास्त्रज्ञाच्या मते अधार असा नाहीच. सर्वत्र प्रकाशच आहे; पण या प्रकाशाचा फक्त एक लहान पट्टा (band) आपण बघू शकतो. एक्स-रेज्, गामा-रेज् आपल्याला कुठे दिसतात ? आपली ऐकण्याची शक्तीसुद्धा अशीच मर्यादित आहे. तेव्हा आपण ज्यांना 'मृत' समजतो ती सर्व माणसे केवळ शरीरविहीन पण जिवतच असतात. आपण त्याना पाहू शकत नाही किंवा त्याचे बोलणे ऐकू शकत नाही, एवढेच. म्हणजे ती अदृश्य नाहीत, तर आपण आधळे-बहिरे आहोत, त्यामुळेच आपण एक तर दु खी असतो किंवा काल्पनिक भीतीने घाबरलेलो असतो.

: आम्ही ऐकले आहे की, जन्मपत्रिकेतील गणावर हे अवलबून असते. असे म्हणतात की, ज्याचा मनुष्यगण किंवा राक्षसगण असतो, त्यांना परलोकातील माणसे दिसण्याचा अधिक सभव असतो. ज्यांचा देवगण असतो, त्याना सभव कमी.

: बरोबर. म्हणजे वेगळ्या शब्दात, काही व्यक्तीना ही नैसर्गिक शक्ती असते आणि काहीना नसते. काहीच्या दृष्टीचा किंवा ऐकण्याचा टप्पा हा निसर्गतः अधिक असतो, एवढाच याचा अर्थ

. पण 'परलोक' या कल्पनेला शास्त्रीय आधार काय आहे ?

. आपल्याला जे विज्ञान माहीत आहे, त्याच्या आधारे अजून परलोकाचे अस्तित्व सिद्ध झालेले नाही हे खरे; परंतु याचा अर्थ एवढाच होतो की, विज्ञानाला अजून पुष्कळ प्रगती करायची आहे. गेल्या शतकात विमान-प्रवास किंवा आकाशवाणी–दूरचित्रवाणी या गोष्टी अतिरजित वाटल्या होत्या. आता आपण चंद्र-मंगळाच्या सफरीवर जाण्याच्या गोष्टी करीत आहोत आपल्या दृष्टीच्या टप्प्यात न येणारे प्रकाशकिरण पकडणाऱ्या लेन्सिस उद्या निघाल्या आणि आपल्या ऐकण्याच्या मर्यादेपलीकडील आवाज टेप करता येऊ लागला की, परलोकातील हालचाली सहज पाहता-ऐकता येतील. आज या विषयावर इतर देशातून चाललेले संशोधन लक्षात घेता येत्या पन्नासेक वर्षांत हे सहज शक्यही होईलसे वाटते.

: बरे. पण हा देह सुटल्यावर आपण नेमके असतो कुठे ?

: हे पाहा, आपण आयुष्यभर ज्या ज्या बऱ्या-वाईट गोष्टी करतो त्या सगळयांचे आपल्या मनावर फार सूक्ष्म संस्कार उमटलेले असतात. आता स्थूल देह सुटला की, हे पूर्वसस्कार जागृत होतात आणि आपण इहलोकी जन्म घेतल्यापासून ते देह सुटेपर्यंत केलेल्या सर्व बऱ्या-वाईट घटना डोळयासमोर उभ्या राहतात.

: म्हणजे इहलोकीच्या आचरणाचा मनावरील संस्कारामुळे परलोकाशी सबध जुळतो.

: आता तुमच्या-आमच्यासारखी माणसे–ज्यांनी दुष्टपणाची–वाईट कृती फारशी कधी केलेली नाही किंवा फार उत्तम कार्यही


कॉन्टिनेन्टलची नवी प्रकाशने — मिळवून वाचा वाचायला सांगा

आषाढातील एक दिवस ( नाटक ) मोहन राकेश
मराठी अनुवाद : विश्वनाथ राजपाठक
बिकट वाट वहिवाट : (नाटक) व्यकटेश माडगूळकर
घरोघरी हीच बोंब : ( नाटक ) वसंत सबनीस
बेघर : ( कादंबरी ) शांता निसळ
पद्मा राजे : ( कादंबरी ) तारा शास्त्री
एकवचनी एकबाणी ( कादंबरी )
काही प्रेमकथा : वा. पु. दामले
खलील जिब्रान (जीवन व साहित्य) : श्रीपाद जोशी
सामर्थ्ययोगी रामदास ( प्रबंध ) : प्रभाकर पुजारी
भारताचा शोध : पं. नेहरू, अनुवाद : साने गुरुजी
धर्माचे तत्त्वज्ञान : ज. वा. जोशी
पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा इतिहास (खंड तिसरा) : जी. एन्. जोशी

अभिजात
अभिरुची
जोपासण्यासाठी

कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
विजयानगर कॉलनी, पुणे ३०.

ज्यांच्या हातून घडलेले नाही; आपण बरे आपले काम बरे अशा वृत्तीने वागणारी आपल्यासारखी सामान्य संसारी माणसे—त्यांना अर्थातच परलोकीही फार मोठे दुःख अथवा सुख मिळण्याचा संभव नाही. पण दुष्ट-गुन्हेगारी वृत्तीच्या समाजकंटक व्यक्ती असतील, त्यांना त्यांच्यावरच्या संस्काराप्रमाणे पुढे टोचणी लागेल—दुःख होईल, याच परलोकातल्या नरकयातना !

: इहलोकी चांगले वागावे, म्हणजे पुण्यसंचय होऊन परलोकी सुख लाभते असे म्हणतात, त्याचे हे रहस्य तर ! म्हणजे अखेर आपल्या वागण्याचे आपल्याच मनावर होणारे संस्कार हेच आपले पाप किंवा पुण्य म्हणायचे !

: अगदी बरोबर !

: हातून घडलेल्या पापाचे चित्र मनावर उमटते ही कल्पना सर्वमान्य आहे. ऑस्कर वाइल्डच्या ' पिक्चर ऑफ डोरियन ग्रे 'मध्ये नाही का डोरियन ग्रेचा चेहरा जसाच्या तसा राहतो—पण त्याने केलेल्या गुन्ह्यांनी त्याचे चित्र—म्हणजेच त्याचे अंतर्मन मात्र ओळखण्यापलीकडे बिघडून जाते ! यालाच म्हणायचे की, त्याच्या पापाचा संचय होतो !

पण काय हो आपटे, समजा, एखाद्याने बिलकूल खंत न बाळगता पाप केले तर ? तर त्याच्या मनावर कसलाच संस्कार होणार नाही. अर्थात परलोकीदेखील त्याला दुःख होण्याचा संभव नाही !

: मनावर बिलकुल परिणाम न होता पाप करणे शक्य होत नाही. शक्य झाले तर ते पाप नाही. तो समाजविरोधी गुन्हा असेल, किंवा अन्य काही. ती चांगली वागणूक नसेल, पण जर ती कुणावर अन्यायकारक नसली तर ते पाप नाही. अशा गुन्ह्याची कुणाला खंत वाटेल, कुणाला नाही.

: उदाहरणार्थ—


: उदाहरणार्थ, वेश्यागमन. ही मोठीशी चांगली सवय नव्हे, परंतु त्याची खंत नसणे शक्य आहे. त्यामुळे ही वाईट सवय असली तरी ते पाप नव्हे. पण व्यभिचाराची गोष्ट तशी नाही. ते आपल्या पत्नीचा हक्क हिरावून घेणे आहे, म्हणूनच पाप आहे. तेव्हा व्यभिचारामधे एक अपराधाची खंत ही राहणारच !

: म्हणजे दुष्कृत्ये करणारा हा परलोकी दुःख भोगतो—

: शारीरिक अर्थाने नव्हे. कारण त्याने शरीराचा त्यागच केलेला असतो. पण त्याचे पूर्वसंस्कार जागे झाल्यामुळे मानसिक पीडनाला सुरुवात होते. इतकेच नाही, तर पृथ्वीवरचा चोर जसा पोलिसाला घाबरून राहील तसा तिथेही दुराचाऱ्यांवर सात्त्विक आत्म्यांचा एक प्रकारचा दबाव येईल. अर्थात प्रत्यक्षात काही कुणी कुणाचा छळ करणार नाही. पण आपला छळ होत आहे, हे वाटण्याची मानसिक अवस्था मात्र चालू राहील. मात्र ही मानसिक अवस्था इतकी खरीखुरी वाटणारी असते, की नरकयातनांविषयी आपण करून घेतलेल्या कल्पना मानसिक पातळीवर प्रत्यक्षात येतात.

: मग, अप्सरांबरोबर क्रीडा करीत अमृत पीत राहण्याची कल्पना देखील मानसिक पातळीवरचीच का ?

: अर्थातच. भोगविलासी माणसांची पृथ्वीवरील सुखाची अंतिम कल्पना मदिरा आणि मदिराक्षी ही असते. अर्थात हे आत्मे मनावरचे हेच संस्कार घेऊन परलोकी जातात आणि मानसिक पातळीवर हेच



स्वर्गसुख म्हणून उपभोगू लागतात. अर्थात सुख तरी तेच आणि तसेच किती दिवस आवडणार ? त्यामुळे नंतर नंतर या जीवाची सुखाची कल्पना अधिकाधिक प्रगल्भ होत जाते. काहींची ती आधीच असते. उदाहरणार्थ, संतपुरुष हे ऐहिक सुखाची आसक्ती न ठेवता परम आनंद शोधण्याचा प्रयत्न याच लोकी करतानाही आपण पाहतो.

: आता थोडा वेगळा प्रश्न. ज्याला आपण पिशाच्चलीला म्हणतो, तो काय प्रकार आहे ?

: मघा सांगितलेल्या दुष्ट, गुन्हेगार प्रवृत्तीच्या आत्म्यांपैकी काही अधिकच निर्ढावलेले असतात. ते या जगातील माणसाच्या दुबळ्या मनोवृत्तीचा फायदा घेऊन त्याना छळतात. त्याच भूतचेष्टा किंवा पिशाच्चलीला. ज्यांची मने शुद्ध आहेत किंवा ज्यांचे आचरण पवित्र आहे त्यांना आत्मबळ असते. त्यामुळे अशांना ही पिशाच्च त्रास देऊ शकत नाहीत. मनाच्या शुद्धीचे हे महत्त्व जाणूनच मनःशुद्धीसाठी पूजाअर्चा, नामस्मरण हे सांगितलेले आहे. भूत दिसल्यावर 'राम राम' म्हणणे ही प्रथा यातूनच आली

: 'ब्लॅक मॅजिक,' चेटूक यात हेच जीव माणसाना मदत करतात का ?

: अर्थातच. इहलोकातील बदमाषानी आपली आसुरी महत्त्वाकांक्षा साधण्यासाठी परलोकातील गुंडांची मदत घेणे– असा हा प्रकार आहे. पण यात भले कुणाचेच होत नाही. चेटूक करणाऱ्या इथल्या मंडळीचा पापसंचय तर होतोच, पण परलोकीच्या आत्म्यांनाही शुद्धीकरणाला अधिक वेळ लागतो.

: हे थोडेसे विषयांतर झाले. पुन्हा आपण आपल्या मूळ विषयाकडे येऊ. परलोकाचे वातावरण कसे असते ?

: परलोकात प्रत्येकजण स्वतःच स्वतःच्या करणीने सुखी किंवा दुःखी होत असतो, म्हणजे आपणच आपले चित्रगुप्त ! 'you have to sit for Judgment on yourself' असे म्हणता येईल. बहुतेकजण पहिले काही दिवस–महिने किंवा वर्षे तिकडील वातावरणाचा सराव होईपर्यंत थोडेफार दुःखी असतात. कारण इहलोकीच्या गणगोताचा विरह आणि इथल्या सुखाच्या आठवणी अजूनही रेंगाळत असतात पण नंतर तेच जग खरे आणि मनाने सुख भोगावे कसे या दोन्ही गोष्टी कळल्यानंतर, मग अधिक बरे वाटत असावे.

'इंग्लंड – अमेरिकेत अनेक Psychical Research Societies आहेत. त्यांच्या मते परलोकात एक ते सात लोक आहेत. ही कल्पनादेखील आपल्या गायत्रीमंत्रातील भूः भुवः स्वः इत्यादी सप्तलोकांच्या वर्णनाशी जुळणारी आहे. संशोधकाच्या मते पहिला लोक आपल्या पृथ्वीशी अगदी निगडीत आहे. तिथे अगदी तामस लोक असतात. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या लोकात तामस – राजस प्रवृत्तीची माणसे असतात पाचव्या लोकात सामान्य संसारी माणसे असतात, थोडी फार सात्त्विक प्रवृत्तीची. सहाव्यात अधिक सात्त्विक आणि सातव्यात पुण्यवान. अर्थात हे लोक किंवा वसतिस्थानेसुद्धा प्रत्येकाला त्याच्या मनाच्या स्थितीप्रमाणे मिळतात. दुसरे कुणी देत नसते. गीतेच्या चौदाव्या अध्यायात सांगितले आहे– 'ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था. मध्ये तिष्ठन्ति राजसाः । जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥' या गीतावचनाशी परदेशी संशोधनाचे किती साम्य आहे पाहा !

डॉक्टर मूडीचे 'लाइफ आफ्टर-लाइफ' पुस्तक आपण वाचलेच असेल. मृतवत माणसांना आलेले अनुभव त्यात दिलेले आहेत. त्याविषयी काय मत आहे ?

: मला त्यासंबंधी अगदी जवळचा अनुभव आहे. माझी पत्नी ल्युकेमियाने आजारी होती. ट्रीटमेंटसाठी तिला बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ठेवली होती. पण ती थोड्याच वेळाची सोबतीण होती. एके रात्री तिचा जीव अगदी घाबराघुबरा झाला. धावपळ करून आम्ही तिला ऑक्सिजन दिला. ती शांत झोपली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी डॉक्टर शहाकडे तिच्या सबंधात काय करता येईल, हे विचारायला गेलो. परत आलो तेव्हा ती शुद्धीवर आलेली होती. मला म्हणाली, 'शहांकडे गेला होतात ना ?' मी चकित होऊन विचारले, 'तुला कसे कळले ?' ती म्हणाली, 'मी तिथेच होते.!' मला आश्चर्य वाटले. ती वातात बरळत असावी असेही वाटले.

तिने माझा गैरसमज दूर केला. 'काल मला ऑक्सिजन दिला, त्या वेळी मला एकदम असा त्रास झाला की आपण आपल्या शरीरापासून विलग झालो.' ती म्हणाली 'मला माझे शरीर बिछान्यावर पडलेले दिसत होते. त्यानंतर मी घरी जाऊन मुलांना भेटून आले. मला कोणी तरी एक सतपुरुष वाटेल अशी विलक्षण तेजस्वी व्यक्ती भेटली. म्हणाली–'सर्वांचा निरोप घे, उद्या रात्री नऊ वाजता तू हे जग सोडणार आहेस. घाबरू नकोस ! पृथ्वीवरच्यापेक्षा तू इथे अधिक समाधानात राहाशील !' मी म्हटले, 'मला भीती वाटत नाही. पण माझ्यामागे माझ्या पतीचे काय होईल याची काळजी वाटते!' 'त्याची काळजी नको !' तो सतपुरुष म्हणाला, 'मी त्याना मार्गदर्शन करीन !'

पत्नीने हे सारे इतके स्पष्ट शब्दात सांगितले की, त्यावर अविश्वास दाखविणे शक्यच नव्हते. मी नातेवाइकांना गोळा केले, रात्री बरोबर नऊ वाजता ती उठून बसली तिने सर्वांना हात जोडले आणि शांतपणे या जगाचा निरोप घेतला ! 'इथे अधिक समाधान मिळेल, इथे सारे अधिक चांगले आहे !' या तिच्या तोंडून ऐकलेल्या परलोकाच्या वर्णनावर माझा तंतोतंत विश्वास बसतो. विशेषतः माझी पत्नी इतकी सत्प्रवृत्त होती की, परलोकात ती विलक्षण सुखासमाधानात असेल याविषयी मला तिळमात्र शंका नाही !

मृत्यूनंतर कधी त्या आपल्याला दिसल्या होत्या का ?

: एकदा अगदी स्पष्ट दिसली होती. माझ्या पलीकडेच बसली होती. अंगावर नेहमीची साधी रंगीत साडी. पण ती अशी अचानक

टेलिफोन नं. : ३५८६१३

दीपावली शुभचिंतन !

**माधवाश्रम**

**प्रायव्हेट लिमिटेड**

**गिरगावात राहण्याची उत्तम सोय**

**गिरगाव, मुंबई–४**



दिवाळी
आणि
'पैसाच पैसा'
सामायिक बक्षीस
रु. ५,००,०००
एकूण पाच मालिका
प्रत्येक मालिकेत पहिले बक्षीस
रु १,००,०००
आणि ३३.३१० हून अधिक अन्य बक्षिसे.
सर्व मालिका मिळून बक्षिसांची एकूण रक्कम
२३ लाख रुपयाहून अधिक.
तिकिट मूल्य फक्त १ रु
सोडत दिनांक १५.११.७७
महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क
महासंचालनालयातर्फे प्रकाशित

दिसल्यामुळे मी दचकलो. दचकल्यामुळे कदाचित आमच्यातील कंपनामधे व्यत्यय आला असावा; कारण ती लगेच दिसेनाशी झाली. तिला पाहाण्याची माझी मानसिक तयारी असती, तर कदाचित तिला घेता आलेला आकार (Materialization) थोडा अधिक वेळ टिकला असता, असे वाटते. नंतर एक-दोन वेळा ती पुसटशी दिसली. पण एकूण तिला मानवी आकार घेणे कठीण जात असावे.

: एक जरा गंमतीदार प्रश्न. परवा एका साप्ताहिकाने 'भुताचा फोटो' छापला होता. तो खरा की खोटा ?

: मी तो पाहिला नाही. पण भुताचा फोटो म्हणजे काय ? आपण सर्वजण भुतेच आहोत –"We all are beings." आपण या जगातील माणसे–स्थूल देह सुटला म्हणजे सूक्ष्म देहाने दुसऱ्या जगात जात असतो. या सूक्ष्म देहाची कपने पकडणाऱ्या लेन्सेस मिळाल्या तर फोटो घेणे काय अशक्य आहे ? अर्थात जी पुण्यवान माणसे परलोकात अधिक उच्च वातावरणात असतील त्यांच्यासाठी आणखी वेगळया लेन्सेस लागतील. Infra Red Camera ने परलोकातील सामान्य माणसाचे फोटो घेणे शक्य होईलसे वाटत.

: एक अगदी मूलभूत प्रश्न विचारतो. मरण म्हणजे काय ?

: मरण म्हणजे जन्म. कर्माप्रमाणे परलोकात ठराविक काळ वास्तव्य करून जीवात्मा या जगात येतो. या वेळी त्याच्या पूर्वीच्या आठवणी, पूर्वीचे रंगरूप बदलून गेलेले असते. एका परीने हेच त्याचे पूर्वायुष्याचे मरण. रूढ अर्थाने येणारे मरण हे खरे मरण नसून तो केवळ अन्नमय देहाचा त्याग होय. त्यामुळे आयुष्य संपलेले नसून ते पुढे चालूच असते. श्री. राजगोपालाचारी भगवद्गीतेवरील टीकेत म्हणतात :

'At death, that is, when the soul departs from one such body, it takes with him a load of character or Gunas as developed by the activities so far gone through. This makes the start for the next body ( in the other world ). The Soul carries the Gunas in subtle form in its passage from one life to another, as the wind takes with it the fragrance from the bowers through which it passes

As Death is only disintegration of body and not of the Soul, the law of cause and effect, so far as the Soul is concerned, continues to operate beyond death. The death of the body does not operate as a bankruptcy court. The old account is carried over.'

: मग पुनर्जन्म कधी मिळतो ?

: इकडील आसक्ती जास्त असली तर लौकर पुनर्जन्म येतो. इथे सगळे दुःखच आहे याची जाणीव असली, तर या दुःखातून कसे सुटता येईल आणि पुन्हा जन्म घेणे कसे टाळता येईल याचा प्रयत्न प्राणी तिथे करीत असतो.

: जन्म घेताना जीव आई–बापाच्या माध्यमातून घेत असतो. अर्थात तो आनुवंशिक स्वभावधर्म घेत असणार !

. उलट आहे. जीवात्मा आई–बापांचा रूपरंग घेत नसून आपल्या पूर्वीच्या रूपरंगाला योग्य असे आई–बाप शोधून काढीत असतो. तो आपल्या कर्मानुसार आपले स्थान शोधून काढीत असतो. आई–बाप निमित्तमात्र असतात. पुन्हा एकदा, श्री. राजगोपालाचारी म्हणतात :

" When a Son is born to parents he appears to inherit their physical and mental characteristics, but in reality what he inherits is his own preveious life's accumulation, by reasons of which, he is embodied as son to such parents. The Soul has no father or mother, but is self existent. Any soul may be lodged in any body in which it has earned the fitness to function. "

'पुण्यवते उदरी येवोनि धन्य केले' अशा प्रकारची वाक्यरचना आपण ऐकतो, त्यामागे हीच भावना आहे. जन्म आणि मरण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

: परलोक नेमका कुठे आहे हे सागता येईल का ?

: नाही. परलोकातील मंडळीनाही पृथ्वी नेमकी कुठे आहे हे सागता येणार नाही. कारण, आपला लोक काय किंवा परलोक काय, दोन्ही मानसिक पातळीवरच आहेत. आपल्याला आपला लोक खरोखर अस्तित्वात आहे हे जाणवते. पण परलोकातील मंडळींना तो दिसू शकत नाही. त्याना त्याचे जग खरेखुरे वाटते. एरवी परलोक हा आपल्या जगाला धरूनच आहे, असे समजले पाहिजे. त्याला भौगोलिक अस्तित्व दाखवता येणार नाही.

: म्हणजे असे म्हणता येईल की, एकाच वेळी अनेक आकाशवाणी केंद्रे चालू असतात, पण त्यांतील एकाच विशिष्ट केंद्राचा कार्यक्रम


नूतन वर्ष व ही दीपावली आपणांस सुखसमृद्धीची जावो !

इथे बहरला सहकाराचा वृक्ष

## श्री वारणा सहकारी साखर कारखाना लिमिटेड

वारणानगर, तहसील पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर (महाराष्ट्र)

| तार | फोन नं. |
|---|---|
| वारणासाकर : वारणानगर | वारणानगर ३३ व २२ |

वीस वर्षांपूर्वी येथील उघडया माळावर आम्ही सहकाराची ज्योत प्रज्वलित केली. आज ती ज्योतच सहकारमय झाली. सहकारी दूधप्रकल्प, सहकारी बँक, सहकारी कोंबडी संघ, सहकारी ग्राहक भांडार, लिज्जत पापड केंद्र, आणि वारणा बाल वाद्यवृंद आणि या दीपावलीच्या शुभमुहूर्तावर आम्ही "महात्मा गांधी मेडिकल ट्रस्ट"ची घोषणा करीत आहोत.

| नंदकुमार नाईक | नि. वि. घोरपडे | वि. आ तथा तात्यासाहेब कोरे |
|---|---|---|
| कार्यकारी संचालक | व्हा. चेअरमन | चेअरमन |

ऐकाय चा झाल्यास तो ठराविक बँडवरच आपल्याला ऐकता येतो किंवा एकाच टेपवर एकाच वेळी, एकाच जागी वेगवेगळे संगीत असू शकते. पण तो विशिष्ट चॅनल चालू असताना मात्र ते ठराविक संगीत तेवढं ऐकू येते. दुसऱ्या संगीताची नाव-निशाणी नसते. तशा एकाच वेळी या दोन्ही सृष्टी अस्तित्वात आहेत आणि आपला फक्त हा एकच चॅनल चालू आहे !

: बरोबर ! 'Psychical Research Societies'ने वेगवेगळ्या माध्यमांकडून जमविलेल्या माहितीनुसार सारे काही इथे आहे, तसेच तिथेही आहे. किंबहुना ती सृष्टी या सृष्टीचेच प्रतिरूप आहे.

: परदेशात ज्याच्या अंगात संचार होतो, असे खात्रीलायक माध्यम बरेच आहेत असे सांगतात. आपल्या देशात असे कोणी आहेत का ?

: माझ्या माहितीत विश्वसनीय माध्यमं फारसे नाहीत. बऱ्याच वेळा माध्यम जाणूनबुजून लबाडी करीत नसतो. पण त्याच्या अंतर्मनांतल्या सुप्त इच्छा-आकांक्षा तो नकळत परलोकातील आत्म्याच्या म्हणून सांगत असतो.

: कुणाकुणाच्या अंगात देव किंवा देवी येते हा काय प्रकार आहे?

: हे देव किंवा देवी म्हणवून घेणारे परलोकातील आत्मेच किंवा तुमच्या भाषेत भुते असतात. काही त्या त्या गावातील पूर्वी मृत झालेली सत्प्रवृत्त माणसे असतात व ती गावातील लोकांना मदत करावी, त्यांना नीतीने वागायला लावावे, त्याना व्यसनमुक्त करावे इत्यादी सदिच्छांनी प्रेरित होऊन संचार करतात. पण त्याची शक्ती फार मर्यादित असते.

*: प्लँचेट करणे धोक्याचे आहे काय ?*

: शक्यतो करू नये हे बरे. प्लँचेट हे थोतांड आहे असा त्याचा अर्थ नाही. पण त्यावर कुणी तरी दुसराच तोतया आत्मा येण्याचा संभव असतो. अनेक दुष्ट प्रवृत्तीची टारगट माणसे तुमच्या-आमच्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन दुसऱ्याच कुणाच्या तरी नावाने येण्याची शक्यता असते. अशा फसवेगिरीच्या आहारी जाणे, म्हणजे लहान मुलाने आगीशी खेळावे, त्यातलाच हा प्रकार आहे शिवाय प्लँचेट करायचे कशाला ? आपण काही इथे चिरजीव नाही. योग्य वेळी आपली परलोकातील आप्तेष्टांशी गाठ पडणारच ! '

प्लँचेटवर येणाऱ्या परलोकातील आत्म्यांना आपण दिसतो. आपल्याला मात्र ते दिसत नाहीत, किंवा त्यांचे बोलणे ऐकू येत नाही. अशा अंध, असहाय अवस्थेत आपण त्यांच्यावर विश्वास टाकला, आणि दुष्ट आत्म्यांकडून फसले गेलो तर काय करावे ? प्लँचेट चालवून अनेकांना दुहेरी व्यक्तिमत्त्व –(split personality) तयार झालेले आहे. *तेव्हा प्लँचेट शक्यतो करू नये करायचेच तर परलोका*-तील एखाद्या अधिकारी व्यक्तीचे किंवा शक्तीचे म्हणा, संरक्षण असलेल्या जागी करावे

· अशी एखादी जागा आपल्याला माहीत आहे का ?

: हो, मुंबईमध्ये गिरगावात सेंट्रल सिनेमाजवळ खटाव बिल्डिंग-मध्ये श्रीमती ऋषी म्हणून एक वयस्कर महिला आहेत. त्यांच्या इथले प्लँचेट विश्वासार्ह आहे.

'परंतु मला स्वत ला प्लँचेटची आवश्यकता वाटत नाही. परलोक आहे असा विश्वास ठेवून ज्याने त्याने घरीच आपल्या दिवंगत आप्तेष्टांची रोज आठवण केली तरी पुरे, असे माझे मत.

¤

एका विचारवंत साधकाने परलोकाविषयी मांडलेले हे विचार खरोखरच मननीय आहेत. विशेषतः त्यात सांगितलेला, इहलोकातील आचरणाचा परलोकाशी असलेला संबंध, आज अंतर्मनाविषयी जे संशोधन चालू आहे, त्या संदर्भात महत्त्वाचा वाटतो. शिवाय या सगळ्याला एक तार्किक संगती आहेच.

अशा प्रकारचे विचार पूर्वी आपल्याकडे ठामपणे रूढ असावेत, त्याविषयी निश्चित अभ्यासही केला गेलेला असावा; परंतु हे विचार *जनसामान्यासाठी सोपे होत होत इतके ढोबळ झाले की, त्यांच्यातील* तर्कसंगती हरवून केवळ कविकल्पना उरल्या. आजही आपण नीति-नियम आणि पाप-पुण्याच्या कल्पना इतक्या शाब्दिक केल्या आहेत की त्यामागचा खरा अर्थ आपल्याला जाणवत नाही. मग त्यावर अंधश्रद्धेने विश्वास टाकणे किंवा आपण बुद्धिनिष्ठ आहोत हे दाखवण्यासाठी त्यावर तुटून पडणे व सगळेच नाकारणे, हे दोनच पर्याय शिल्लक राहातात माझ्या मते, खरी बुद्धिनिष्ठा ही अश्रद्धेत नसून समतोल बुद्धीने विचार करण्यात आहे त्यासाठी मनाची दारे आपण इतकी उघडी ठेवली पाहिजेत की, केवळ अजूनपर्यंत माहित असलेल्या सीमित विज्ञानापलीकडेही काही शास्त्र असू शकेल, हे मान्य करता यावे. संस्कृतीच्या प्रवासात आपण मधेच कुठे तरी हरवून बसलेल्या आपल्या प्राचीन ज्ञानाचे पुनरुज्जीवन यासाठी आवश्यक आहे. *जे आपल्याला पूर्वी ठाऊक होते, ते मधल्या काळात आपण विसरलो.* आज परदेशात मात्र तेच ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न होत आहे. या दृष्टीने डॉक्टर मूडीचे पुस्तक मला महत्त्वाचे वाटले शिवाय त्याच पुस्तकात त्यानी आपल्याला आलेल्या अनुभवाशी मिळतेजुळते असे अनेक दाखले जगभरच्या धर्मग्रंथामधून दिलेले आहेत. हे सारे ज्ञान आपण केवळ भारूड म्हणून तसेच सोडून देणार की पारलौकि-कावरील नसेल पण ज्ञानावरील निष्ठेने तरी ते पारखून घेणार, हा बुद्धिनिष्ठापुढील प्रश्न आहे. 'परलोक' ही कल्पना इहलोकाशीच संबंधित आहे. आचरणाची शुद्धता ही नैतिक मूल्याशी निगडीत आहे आणि पाप-पुण्याचा प्रश्न हा सामाजिक नीतीशी जखडलेला आहे. तेव्हा परलोक आणि तत्संबंधी कल्पना वाऱ्यावर सोडून देणे विचारवंत समाजाला कितपत परवडेल ? ●


नाताळ सुटीनिमित्त

२४ डिसेंबर ते १ जानेवारी

दोन स्वतंत्र सहली

१. म्हैसूर-बेंगलोर-उटी सहल

२. श्रीशैल्य-हैद्राबाद-हंपी-विजापूर सहल

गुरुनाथ ट्रॅव्हल्स

३ बुधवार पेठ, विठ्ठलमंदिर,

विश्रामबागवाड्यानजीक, पुणे २.

# खणंग

दाजिबाला जमनानं मथवला म्हणून सगळं जमलं. नुसतं सणंग चांगलं असूनही जमलं नसतं. श्रीमंतांशी प्रसंग आला आहे. चार पैसे जास्त खर्च व्हायचेच !'..........

वि. ग. कानिटकर

कऱ्हाडहून आलेल्या मुतालिकांच्या यादीवर दाजीबांनी पुन्हा एकदा नजर फिरविली. मुतालिकांनी आर्जव केला होता—

' मी पाहिजे तर श्रीमंतांस एक अंगवस्त्र ठेवून देतो. त्याचा खर्च मुलीला ऋतु प्राप्त होईपर्यंत मी करीन; पण श्रीमंतांचे दुसरे लग्न करू नका ! माझे पदर पसरून मागणे आहे. मी आदितवारी सातारला येतो आहे. दुसरे दिवशी उदयीकच आपले भेटीस येतो. '

दाजीबांनी यादी-पत्र समोरच्या डेस्कावर टाकले आणि ते दिवाणखान्याच्या खिडकी-पाशी आले. वाड्यासमोरच्या पारावरच्या बलभीमाला कुणी भाविक प्रदक्षिणा घालीत होता. पारावर छत्र धरलेल्या पिंपळाच्या वृक्षावर सकाळचे ऊन पसरले होते. कोवळी तकतकीत पिंपळपाने तांबडा-पिवळसर रंगाने न्हाऊन निघाली होती. वाड्याच्या खालच्या अंगणात अन्नपूर्णेचा आवाज दणदणत होता. बाजारमास्तराची नेहमीप्रमाणे काही तरी हजेरी चालू असावी. दूरवर दिसणाऱ्या यादो गोपाळ पेठेतली दुकाने अजून उघडलेली नव्हती आणि त्यामुळे वाड्यावरून अजून म्हणण्यासारखी वर्दळ माजलेली नव्हती. जसजसा दिवस वर येईल तसतसा साताऱ्या-तला हा पटवर्धनांचा वाडा नेहमीप्रमाणे गजबजू लागणार हे ठरलेले होते. आज सकाळीसकाळीच प्रथम मुतालिकांशी गाठ होती.

खिडकीपासून दूर होत दाजीबांनी फेऱ्या मारायला सुरुवात केली. मुतालिकांचा आर्जव पुन्हापुन्हा वाचून त्यांचा सूक्ष्म अहंकार सुखावला होता.

हाच तो नारायण मुतालिक, ज्याने श्रीमंतांच्या पहिल्या लग्नाची बाजी मारली होती ! वस्तुतः श्रीमंत जेव्हा दत्तकविधान होऊन श्रीमंत झाले नव्हते तेव्हा हा मुतालिक काय करीत होता ? केवढा डाव खेळावा लागला—किती राजकारणं झुंजावी लागली—

चहूकडून वळणे बांघली तेव्हा परशुराम- महाराजांनी दत्तक घ्यायचे मान्य केले. नाही तर ज्याला त्याला महाराज गुरकावीत होते, 'कुठले तरी कारटे मांडीवर घ्यायचे. उद्या त्याने अब्रू घालवली की शंख करायचा. हे राज्य आता बुडाले !'

परशुरामपंत म्हणजे कसला कैफी माणूस ! तर्कटी आणि प्रसगी अनर्थकारी सुद्धा ! ऋतू प्राप्त होण्यापूर्वीच एका पहाटे, पहिल्या कुटुंबाचा हात धरला. सात-आठ वर्षांची ती पोर ओरडली. सासुबाईंना हाका मारू लागली. महाराज गरजले–'पुन्हा जन्मात तुझा हात धरणार नाही !' नाहीच धरला ! स्त्रियांचा शौक काही कमी नव्हता. दासी विकत घेतल्या. राधाबाई, जिजाबाई, शिच्या आज तैनात खाताहेत ! ताई तेलीण होती; पण कुटुंबाला ? जन्मात स्पर्श नाही ! बाया ठेवल्या पण पुण्याच्या रावबाजीसारखी परस्त्रियांवर नजर टाकली नाही. चार चौघात सांगायचे–'आम्ही कितीही उपस्त्रिया ठेवल्या तरी परस्त्री मातेसमान !' बापू गोखल्याशी लढताना उजव्या हाताची चार बोटे तुटली. नुसता अंगठा राहिला, तर डाव्या हाताने फरसाने तो स्वतः तोडला तिळाच्या तेलात हाताचे थोटूक धरून तळून काढले; पण हूं की चू नाही !

परशुराममहाराजाच्या असख्य आठवणी दाजीबाच्या मनात गर्दी करीत होत्या. रावबाजीनं अटकेत टाकल्यापासून कोकण- स्थावर महाराजाचा विशेष राग ! कोकणस्थ प्राणघातक म्हणायचे. मात्र आपण कोकणस्थ असून एकदा जीव जडला तो जडला. लोक आश्चर्य करीत ! हा दाजीबा पटवर्धन महाराजाच्या इतका जवळ कसा ? देशपाडे, कुलकर्णी महाराजाचे कान फुंकण्याचा प्रयत्न करीत नव्हते असं नाही. महाराजाना सांगायचे–, पटवर्धनांवर विश्वास टाकला आहात; पण साभाळा !' महाराजानी थोटा हात उगारीत सर्वांना गप्प केले होते. त्यांनी शोध लावला होता. 'ए 'कारांत आडनावाचे कोकणस्थ एकजात सगळे डेंबिस ! पेशवे, गोखले, फडके, भावे–सारे लबाड ! पटवर्धन चागला. नावात शेवटी एकार नाही ! महाराजांना पुरते जिंकले ते मात्र अन्नपूर्णेने. अन्नपूर्णेचे वीस वर्षांचे रूप आठवून दाजीबांच्या अंगावर रोमाच आले. दिवाण- खान्यात घालविलेल्या रात्री सुगंधित झाल्या. महाराज कधी लहर लागली तर वाड्यात शिरत. अन्नपूर्णेचा स्वयंपाक त्याचा आवडता. काय वाटेल तो पदार्थ करायला सांगत. अन्नपूर्णा कधी कमी पडली नाही. अन्नपूर्णे- वरची महाराजाची मेहेरबानी कधी कधी दाजिबाना अस्वस्थ करी, पण महाराजच एकदा म्हणाले–

'दाजिबा, अन्नपूर्णा आम्हाला वहिणी- सारखी. या दिवाळीत आम्ही तिच्याकडून ओवाळून घेणार !'

मग प्रत्येक भाऊबीजेला महाराज येत राहिले अन्नपूर्णा त्याना ओवाळीत असे. तबकात प्रत्येक वेळी सोन्याचा जिन्नस पडत होता.

असे सबंध असूनही महाराज दाद देत नव्हते. दाजिबा विनवीत–

'महाराज, प्रतिनिधीचं राज्य पुढ चालायला हवं. इंग्रजसाहेब राज्य खालसा करायला टपलेलाच आहे. आपण दत्तक घ्यावा !'

'आम्ही काय नपुसक आहोत ? स्वत च्या स्त्रीशी सबंध ठेवतो, तर एव्हाना दहा मुलं झाली असती. असती का नसती ? दत्तकाच्या गोष्टी काढू नका दाजिबा !'

'तस नव्हे महाराज. आपण लग्नाच्या स्त्रीशी सबंध ठेवला नाही, हे लोकांना माहीत आहे. आपल्या दृढनिश्चयाचं लोक कौतुकच करतात; पण राजा गादीवर असला तर चार आश्रिताची घर चालतात. त्याचा विचार करावा महाराजानी.'

'मी मेल्यावर–गादीवर लाथा घाला सगळ्या आश्रिताच्या !'

पुढे बोलण्यात अर्थच नसे. परशुराम- महाराज दाद देत नव्हते. दाजिबा हताश होत चालले होते आणि एका रात्री–

अंगावर लोळणारी जमना मारवाडीण दाजिबाना म्हणाली,–

'हे काम तुमच्याच्यांनी होणार नाही !-'

जमनाने डोळे मुरडले. दाजिबांच्या कानाशी तोड नेत जमना कुजबुजली–

'काम झालं तर बनाजी मगदुम करील !'

बनाजी मगदुम परशुराममहाराजांची ठेवलेली यवनबाई ! महाराज अलीकडे तिच्याकडे पडलेले असतात हे दाजिबाच्याही कानावर होते, पण तिच्याकरवी राजकारण साधण्याची कल्पना त्यांना आली नव्हती. घरच्या स्त्रीचा कटाळा आला तर विसाव्या- साठी, नव्या चवीसाठी, बाईकडे जावे हे शिरस्त्याला धरून होते. जमना परस्त्री होती. आपला तिच्याशी संबध होता. सोडा- वासा वाटे पण सुटला नव्हता. महाराजांना आपला हा सबध कळला तर महाराज गर्दनच छाटतील ! दाजिबांच्या पोटात गोळा उठला, जमना बनाजीबाईच्या ओळ- खीची दिसते आहे. कदाचित जमनाने आपला सबंध त्या मुसलमानिणीला सांगि- तला आणि तिने महाराजांच्या कानावर घातला तर सातान्यात राहाणे मुष्कील होईल. तसे शक्य नाही. जमना काय, कुठ- लीही स्त्री असला संबंध चारचौघीना कळेल अशा ठिकाणी सागत नाही. दाजीबा गड- बडीने म्हणाले,–

'जमना, तुझी बनाजीशी ओळख आहे ?'

'दुकानात येते ना मीठ–मिरची घ्यायला. मी दुकानात असली की बोलणं होतच ना !'

'मी तुझ्याकडे येतो हे तिला माहीत आहे–? '

'चारचौघात बोभाटा करायला मी वेडी का खुळी आहे ?'

दाजिबांनी मग जमनाला मसलत दिली.

'बनाजीची आणि माझी गाठ घालून दे !'

बनाजीचा निरोप आला. एका रात्री कुणाला काही कळणार नाही अशी खात्री करून दाजिबानी बनाजीची माडी गाठली वाड्या- तच तिला बोलवावी असं प्रथम त्याच्या मनात आलं, पण वाड्यावर बनाजी आली तर अन्नपूर्णेला कळणार पोरा–सोराच्या लक्षात येणार !

बनाजी नायकिणीच्या दोन खणी माडीत दाजिबांनी पाऊल टाकलं तेव्हा घरात फक्त तीच होती कावेचा रग लावलेल्या बैठकीच्या खोलीत कोपऱ्यात मोठा छपरी पलंग होता. त्याच्यावर मच्छरदाणी सोडलेली होती. पांढऱ्याशुभ्र पलगपोसावर दोन जाड तक्के एकीकडे टेकविलेले होते.

बैठकीवर दाजीबा बसल्यावर बनाजीनं पान–सुपारीचं लखलखीत पितळी तबक पुढं सारलं. एखाद्या खानदानी ब्राह्मणी स्त्रीसा- रखी डोक्यावरचा पदर सारखा करीत

बनाजी समोर अदबीनं बसली होती. लावण्य फारसं नव्हतं; पण तारुण्य अवयवांतून गजबजलेलं होतं आणि बनाजी व्यवहारचतुर आहे हे दाजिबांच्या तत्काळ लक्षात आलं.

दाजिबांनी पुढं केलेले पैसे तिनं सुरुवातीला घेतलेच नाहीत. नंतर दामदुपटीनं पदरात पडलेच! सांगितलेलं काम मात्र लगेच पत्करलं. 'महाराजांना सांगून पाहते. काम होईलच असं नाही. महाराजांची लहर असेल तसं होईल!' असं स्पष्टपणे तिनं सांगून टाकलं. मसलत झटकन संपली. बाहेर पडताना दाजीबा म्हणाले–

'तुमच्या हातून आश्रितांचं कल्याण झालं तर होईल. महाराजांची प्रवृत्ती आता बिघडत चालली आहे हे आपण जाणताच!'

बनाजीनं काम चोख केलं. महाराज तिच्या घरी वेळी–अवेळी पडून असतात ही गोष्ट सर्वत्र झाली होती. महाराज तिथे सागुती खातात असाही बभ्रा होता. दाजिबांना ती रात्र अजून आठवीत होती. भाद्रपदाचा महिना होता. सकाळी सातचा सुमार असावा. पावसा–पाण्यात गडप झालेलं फार दिवसांचं ऊन बाहेर पडलं होतं. ते असेच वाड्याच्या अंगणात देवपूजेसाठी फुलं काढीत होते तोच महाराजांचा हुजऱ्या संभू पाटील महाराजांचा निरोप घेऊन दिडीत आला–

'महाराजांनी बलिवलंय–'

'कुठं? वाड्यावर?'

'नाय – महाराज मगदुमबाईच्या माडीत आहेत. काल रात्री मुक्कामच होता...'

'निरोप कुणाचा आहे?'

'बाईंनी निरोप दिलाय. यादी सही-शिक्क्याला घेऊन या–'

दाजिबांनी इंग्रज सरकारला लिहायचं पत्र तयार ठेवलं होतं. सही-शिक्क्याचीच काय ती खोटी होती.

महाराज बनाजीच्या माडीत पलंगावर आडवे होते. अंगात मलमलीचा अंगरखा. गळ्यात मोत्यांची जाड माळ होती. कपाळावरचा वाळून गळत गेलेला गंधाचा अर्धचंद्र. नजर भ्रमिष्ट होती. रेशीमकाठी धोतर मांड्यांपर्यंत वर सरकलेले होते. आदल्या दिवशीची तार अजून पुरती उतरलेली नव्हती. खोलीत पाऊल पडताच महाराज ओरडले–

'प्यारन् कोण आलंय?'

प्यारन् दूर झाली. आपण पुढं झालो. मनात आलं, माणसाला घरी ओढ नसली की, नायकिणीची आर्जवं अमृतासारखी वाटावी ना? महाराजांनी आपल्याकडे पाहिलं. त्या जड नजरेत कैफाशिवाय कसलाही भाव नव्हता. डाव्या हातापुढं पांढऱ्या शुभ्र गलमिशांवरून फिरवीत महाराज एकदम खेकसले––

'तेरे मा की च्यूत! तुम्ही इथं येता? बनाजीचे कान तुम्ही फुंकले!'

दाजीबा सावध होते.

'नाही सरकार! मी इथं आज प्रथम येतोय. इथं आम्ही कसे येऊ?'

'मग मांडीवर पोर घ्या, पोर घ्या म्हणून प्यारनचा आग्रह का?'

'मला ठाऊक नाही महाराज –'

'बोलू नका जास्त. आम्ही दत्तक घेणार! प्यारनच्या मनासारखं झालं पाहिजे! इंग्रज सरकारला लिहायची यादी आणलीत?'


With
Best
Compliments
From :

**DSP FINANCIAL CONSULTANTS LTD.,**

**10, Stock Exchange Bldg.,**
**Apollo Street,**
**BOMBAY 400 023.**

महाराजानी बनाजीला खुणावल. तिनं अगाखाली हात घालून महाराजांना बसतं केलं. महाराजानी एक तक्क्या मांडीवर ओढला.

'आणा यादी !'

आपण सहीशिक्क्यासाठी यादी पुढं केली. डाव्या हातान सह्या करताना महाराज आपल्यावर ओरडत होते –

'याचा विचार नीट केलाय का? सांभाळा! भलतंसलत कारटं माडीवर देऊ नका!'

बनाजीनं काम फत्ते केल होतं एका यवनी स्त्रीनं जहागिरीवरचं गंडांतर टाळलं होतं. रीतीप्रमाणे सातारचे महाराजसरकार आणि इंग्रजसरकारची परवानगी आली. त्यात फारशी अडचण नव्हतीच. सातारच्या महाराज सरकाराना प्रतिनिधी पंचवीस रुपये मोजणार होते आणि इंग्रजसरकारला तीन हजाराचा नजराणा होणार होता. अधल्यामधल्या मंडळीना भरपूर चिरीमिरी पोचण्याचाच काय तो अवकाश होता

पतप्रतिनिधी दत्तक घेत आहेत ही बातमी चहूकडे पसरली आणि 'गोत्री' मडळीच्या तोंडाला सर्वत्र पाणी सुटले. हिवरे, किन्हई या बाजूस प्रतिनिधीच्या गोत्री मडळीची दाटी फार. तेथून माणसे सातान्याकडे येऊन मुक्काम टाकू लागली कुणाचा मुलगा, कुणाचा पुतण्या, कुणाचा भाचा, कुणाचा जावई सगळे राज्यप्राप्तीची स्वप्नं पाहू लागले. त्या आठवणीनी दाजिबाना आताही अंमळ हसू आल. आपण हा सगळा गोंधळ पाहात होतो. वाड्यात माणसाची झिम्मड उडत होती. प्रतिनिधीचा वारस आपल्याच वाड्यात वाढत होता. नगरकर राजवैद्यानी आणलेल्या पाठकीणबाईचा दूरचा नातेवाईक– अन्नाला महाग झालेला अण्णा आपल्याच घरात राहत होता. नगरकर वैद्यानी एका सायंकाळी अण्णाला आपणापुढे आणला. त्या वेळचं त्याच रूप दाजिबा आता पाहिल्यासारखं पाहात होते.

तेरा-चौदाच वय. हाड-पेरानं उफाड्याचा. गोरापान. भव्य कपाळ. सरळ नाक. रुंदशी हनुवटी आणि पाणीदार डोळे. कपाळावर लाल गधाचे विष्णुपद. आला तो घरातला झाला! आल्यापासून देवपूजेची भांडी घासणं, बागेतून बेलपत्रं आणणं, या समोरच्या बलभीमाची सकाळची पूजा, जेवतानाच पाटपाणी, अशी नाना काम त्यान अगावर घेतली. अन्नपूर्णानं या पोराला जीव लावला. शाळेचा वेळ काय तो अण्णा घराबाहेर असे. आपल्या नशिबात राजवैभव आहे याची अण्णाला काय कल्पना?

दाराशी पावलं वाजली म्हणून दाजिबांची तंद्री भग पावली. दारात कुणी अनोळखी माणूस उभा होता.

'कोण आहे?'

'मी मुतालिकांकडून आलोय. त्यांचा निरोप आणलाय!'

'काय आहे निरोप?'

'मुतालिक घटकाभरात येत आहेत. त्याची इच्छा आहे की, बोलणी होतील, तेव्हा अन्य तिथे कुणी नसाव. काय बोलायचं ते फक्त आपल्याशी –

दाजिबांना राग आला. हा मुतालिक काय आपल्याला मूर्ख समजतो! मुत्सद्देगिरीचे धडे या माणसाकडून आम्हाला शिकायचे नाहीत! दाजिबांनी चढया आवाजात म्हटलं –

'त्याना सांग, आम्ही इथे खोळंबलो आहोत. अर्धा तास झाला, वाट पाहत आहोत. माझा दिवाणखाना म्हणजे काय धर्मशाळा वाटली त्याना? इथे आमच्या परवानगीशिवाय कुणी बसू शकत नाही! त्याना सागा, बोलणं दोघातच होईल! पाचव्या कानाला कळणार नाही! पण लवकर यायला सांगा! आम्हाला दुसरी काम आहेत!'

दाजिबानी बैठकीची एक मोठी सुरकुती हातानं दूर करीत नक्याला पाठ लावली. अण्णाला महाराजांच्या मांडीवर दत्तक द्यायच्या राजकारणांत अन्नपूर्णेन लावलेला हातभार बिनतोड होता. अण्णा काही एकटाच दरबारी मडळीपुढं नव्हता. एक दानव्याचा मुलगा, एक सबनिसाचा असे आणखी दोघे तोडीस तोड होते; पण अण्णांच्या पायावर नागानं छाया धरल्याची गोष्ट एकाएकी चटकर्णी झाली, ती अन्नपूर्णेची कामगिरी!

एके दिवशी रात्री अन्नपूर्णा सांगू लागली, 'दुपारची गोष्ट. अण्णाला हाक मारते तो ओ नाही म्हटलं करतोय काय? दिवाणखान्यात नाही, माजघरात नाही, पडवीत नाही. म्हणून बाहेर बागेत आले तो हा आपला मुचकुंदाच्या झाडाखाली सावलीत गाढ झोपलेला. पायावर ऊन आलेल आणि पायावर सर्पानं सावली धरलेली! हा एवढा तळहाताएवढा फणा! नाग पहाताच माझी तर बाई बोबडी वळली! तोंडातून शब्द फुटेना की पुढं जाववेना. डोळे गच्च मिटून घेतले. पुन: उघडले तो नाग गेलेला. अण्णाला जोरात हाक मारली. म्हटलं, 'आधी घरात ये!'

सकाळी नगरकराची बायको, पाठकीणबाई, वाड्यातल्या मोलकरणी या सगळ्यानी ही अद्भुत कथा चटकर्णी केली. अण्णानं बाजी मारली होती बनाजीच्याकरवी ही कथा परशुराममहाराजाच्या कानावर जाताच अण्णाची निवड नक्कीच झाली! अन्नपूर्णेला बायका विचारीत –

'तुम्ही नीट नाग पाहिलात ना हो अन्नपूर्णाकाकू –'

'अहो पहाते कसला? डोळे गच्च झाकले. हिरवा होता का पिवळा होता ते देखील नीट दिसल नाही; पण फडा बरीक ही येवढी–'

'आणि सावली अण्णाच्या पायांवर!'

'अण्णाच्या पायावर!'

'अण्णाला दिसला का हो?'

'अहो, त्याला कसा दिसणार? तो गाढ झोपलेला, सागते ना!'

'कुठल्या बाजूला गेला?'

'अहो, काय विचारता? बोबडी वळली आणि डोळे मिटून घेतले. पुन उघडले तो काही नाग नव्हता! कुठ गेला कस बाई कळायचं?'

काही का असेना हिवन्याच्या कुलकर्ण्यांचा अण्णा श्रीनिवासराव प्रतिनिधी झाला! जो आपल्या घरी पाणी भरीत होता, देवपूजेची भांडी घाशीत होता तोच अण्णा आपला यजमान झाला आणि त्यानंतर जी काही काळ गाफिली आली, त्यात या नारायण मुतालिकान डाव साधला!

प्रतिनिधी पोरवयाचे होते याचा फायदा गुलामानं घेतला. थेट सातारच्या छत्रपतीकडून – महाराजाकडून दडपण आणलंन. छत्रपतीनी सुचवलं, नारायणराव मुतालिक

याची मुलगी करून घ्या! 'आपल्याला नाही म्हणता येईना! छत्रपतीच्या उपकाराचं ओझं शिरावर होतं. दत्तकाच्या राजकारणात छत्रपतीची मागणी अवाच्या सवा होती ती त्यांनी पचवीस हजाराच्या खाली आणली होती! हे उपकार विसरता येण्यासारखे नव्हते. या नारायण मुतालिकानं आपली पाच वर्षाची, अशक्त, रूपान अगदी साधारण आणि वर्णानं काळी असलेली पोर राजबिंड्या अण्णाच्या गळयात बांधली! परस्पर छत्रपतीकरवी परशुराम महाराजाकडे या मुतालिकान बोलण केल. त्या वेळी आपण काही बोलतो तर उगाच वाईटपणा आला असता!

कसले लग्न ते! पुण्याहवाचनाच्या वेळी महाराज बनाजीच्या माडीवर बेशुद्धीत. आपण बोलवायला गेलो तो शिव्याची लाखोली देत उठले व साफ 'येत नाही!' म्हणून सांगितल! हरभट येळीकरानं कशी तरी वेळ मारून नेली. लग्न झाल आणि वर्षभरात छत्रपती आणि छत्रपतीच्या पाठोपाठ महिन्याभरात परशुराममहाराजही गेले! तेव्हा हा मुतालिक एकदा भेटायला आला होता.

'दाजिबा, यजमानसाहेबांच्या विवाहानतर वर्षभरात महाराज गेले माझ्या मुलीकडे याचा दोष येणार!'

परपरागत खुळचा समजुतीनी मुतालिकाला नामोहरम करण्याची आपली इच्छा नव्हती. अन्नपूर्णेच्या तोडून प्रतिनिधीची सून पाढऱ्या पायाची ठरल्याचा नुसता उच्चार होताच आपण तिला बजावल होत–

'पुन. हे शब्द तोंडातून काढू नका! परशुराममहाराज सुटले. वेडाच्या लहरीत जगण्यापेक्षा गेले, हेच चांगल झाल या दृष्टीन हे लग्न भाग्याचं समजा!'

म्हणूनच मुतालिकाला आपण सांगितल–

'तुमच्या लेकीचा काय दोष? परशुराममहाराजाची व्यसनं आणि बाहेरख्यालीपणाचा अतिरेक यामुळं मृत्यू घडला. लग्न झाल तेव्हा ते बेशुद्धीत होते, त्यातून ते कधी धड शुद्धीवर आलेच नव्हते. मगदुम नायकिणीशिवाय ते अखेरच्या दिवसांत कुणाला ओळखीतही नव्हते! तुम्ही निश्चित रहा!'

मुतालिक गहिवरले. जाताना म्हणाले होते–

'दाजिबा, आता तुम्हीच आम्हाला संभाळून घ्यायच. यजमानसाहेब आता गादीवर आले तरी ते तुमच्या अर्ध्या वचनात राहाणार! आम्ही त्याचे सासरे; पण आमचे तितके वजन नाही गादी त्याना तुमच्यामुळं मिळाली!'

'आमच्यामुळ नाही, श्रीयमाईची इच्छा होती तसं घडलं. आम्ही केवळ निमित्तमात्र!'

यानतर मुतालिक निश्चित झाले. त्याना वाटलं की, हा दाजिबा मागलं सगळ विसरला आहे. आता आपला मार्ग अगदी मोकळा आहे; पण त्यान या दाजिबाला ओळखलं नाही. राज्यपद जवळ आणून देणारा असेल तर आम्ही वाड्यात साप देखील प्रेमानं सांभाळतो!

पावलं वाजली. मुतालिक दारात आले होते. डोक्यावरचा जरीकाठी पाढरा फेटा त्यानी हातानं सारखा केला आणि रेशमी उपरणं हातावर धरून ते नमस्कार करीत होते. दाजीबा उठून उभे राहिले आणि मुतालिकाच्या हाताला धरून त्याना बैठकीवर आणल. मग त्यांनी जोरात हाक मारली–

'कारभारी—'

कारभारी दारात आला.

'आम्ही दोघे वर मसलतीत आहोत तोपर्यंत कुणाला वर सोडू नका वा इकडे फिरकू देऊ नका!'

पहिले काही क्षण चमत्कारिक दडपणात गेले. काय बोलावं, कसं बोलावं याचा संभ्रम मुतालिकांना पडला होता. मान खाली घालून ते स्वस्थ बसले होते.

दाजिबानी सुरुवात केली–

'मुद्दाम का आला?'

'का आलो, हे आपल्या लक्षात आलं असेलच. यजमानसाहेबाच्या दुसऱ्या लग्नाच कऱ्हाडला कानावर आलं माझी यादी आपल्याला मिळाली ना? त्यात मी यासंबंधी स्पष्ट लिहिल होतंच.'

'यादी मिळाली–'

दाजिबांनी समोरच्या। डेस्कावरचं त्याच पत्र हाती घेतल आणि त्यावर नजर फिरवीत म्हटल–

'अशा गोष्टी तुम्ही पत्रातून लिहायला नको होत्या. श्रीमत यजमानसाहेबाना अगवस्त्र ठेवण्याची आपली भाषा आम्ही अत्यंत गैर समजतो.'

दाजिबाचा किंचित रागाचा सूर पाहून मुतालिक हबकले; पण अवसान गोळा करीत त्यानी म्हटलं–

'एखादी गोष्ट चोरून केली म्हणजे गैर नसते आणि उघड उघड केली म्हणजे मात्र


**दीपावली शुभचिंतन**

हिमशिखरावर गेल्यावरही आठवण यावी

अशा सर्वोत्कृष्ट आईस्क्रीमचे

* प्रमुख केंद्र *

# कावरे कोल्ड्रिंक्स

**लक्ष्मीरोड, गणपती चौक, पुणे २.**

शाखा.– टिळकरोड, पुणे ३०     फोन ४५७६४

गैर वाटते! स्वत.च्या मुलीला सवत यायला घातली असताना मी गप्प राहावं काय? आपण यजमानसाहेबाच्या दुसऱ्या लग्नाचा विचार सुरू केला, म्हणून असं लिहावं लागल! दुसऱ्या विवाहाची निकड काय?'

'तुम्ही यजमानसाहेबांना आपली मुलगी देताना मला विचारलं होतंत? काही साधक-बाधक विचार केला होतात? पाचव्या वर्षी तिला यजमानसाहेबांच्या गळघात बांधलीत.'

'काही लबाडी तर नाही केली? माझी मुलगी लग्नाची होती. परशुराममहाराजांनी मुलगी पसंत केली. लग्न झालं.'

'परशुराममहाराजानी!'

दाजीबा तुच्छतेने हसले—

'परशुराममहाराज त्या वेळी शुद्धीवर तरी होते का? तुम्ही सातारकराकरवी दडपण आणलत. दत्तविधानात सातारकरांचे जे उपकार होते त्याचा तुम्ही गैरफायदा घेतलात.'

'शपथेवर सागतो, यातलं मला काही माहित नाही. या राजकारणात तुम्ही प्रथम-पासून होता. कसं घडलं, काय घडलं तुम्हाला माहीत! इतराना ते कसं कळणार? मी फक्त माझ्या मुलीसाठी खटपट केली—'

'दाखवता तितके तुम्ही भोळे नाही! झालं ते झालं. त्याच्यावर वादंग नको! तुमच्या मुलीचे आज वय काय?'

'तिला सातवं चालू आहे—'

'ती अशक्त आहे. तिला ऋतू प्राप्त व्हायला अजून दहा वर्षं लागतील. आज यजमानाच वय सत्तावीस वर्षांचं आहे. त्यांनी वयाच्या सत्तावीस वर्षापर्यंत असंच राहावं?'

'इतकी वर्षं कशाला लागताहेत? फार-फार तर चार-पाच वर्षं थाबावं लागेल!—'

'काही तरी बोलू नका! नगरकर वैद्यानी छातीवर हात मारून सागितल आहे की, तुमच्या मुलीला ऋतू प्राप्त व्हायला कमीत कमी दहा वर्षं लागतील म्हणून! दहा वर्षांत काही भलतंसलतं घडलं तर तुमच्या मुलीलाही मुलं होणार नाहीत हे लक्षात घ्या!'

'जावयाचं वागणं काटेकोर आहे. तुम्हीच नेहमी सांगता की, सकाळी स्नान-सध्या, व्यायाम, नंतर कचेरी, शास्त्राचं वाचन, घोडयाचे फेर, असं यजमानसाहेबांचं वर्तन आदर्श आहे. गैरवागणुकीचे प्रकार अथवा व्यसनाना सवडच नाही!'

'यात खोट वा पदरचं काही नाही; पण यजमानसाहेबांच्या पदरच्या मडळीत काही आम्ही एकटेच नाही! मगदुम नायकीण आपल्याबरोबर एक नवी मुलगी घेऊन यजमानसाहेबांना भेटायला आलेली आम्ही स्वत: पकडली. त्या दोघीना मी वाडा बंद केला! पण अशा गोष्टी वाडयाचे दरवाजे बंद करून टाळता येत नाहीत! मागल्या कारकिर्दीत काय झाल, हे तुम्हाला माहीत आहे आणि तरी तुम्ही अंगवस्त्राची भाषा काढावी?'

मुतालिक काही काळ खाली मान घालून बसले. अंगवस्त्र ठेवण्याची भाषा काढली म्हणून या दाजीबाना एवढं सतापायला काय झालं हे त्यांना कळेना. दाजीबाचं अंगवस्त्र काय लपून आहे? यांनी राजरोस जमनाला ठेवली आहे. तिचा नवरा भिकूमल यांच्या-कडून पैसा घेऊन गाव सोडून गेला. दाजीबाचा हा त्रागा कदाचित डाव म्हणून असेल! मुतालिकांनी येताना तीही तयारी केलेली होती.

त्यानी अगातील बारावदीचे बद मोकळे केले आतील बडीच्या खिशात हात घालून त्यांनी एक जडशी थैली बाहेर काढली. दाजीबांची नजर दुसरीकडे होती. त्याना मुतालिक काय करीत आहेत याचा प्रथम अदाज आला आही

हातातले पैसे दाजीबापुढे सारीत मुतालिक म्हणाले—

'दाजीबा, माफ करा! यजमानसाहेबांच्या पहिल्या लग्नाच्या वेळी आम्ही तुम्हाला विश्वासात घ्यायला हवं होत; पण आमची चूक झाली या अपराधाची शिक्षा माझ्या मुलीला करू नका—'

दाजीबा एकटक मुतालिकाकडे पाहात होते. त्याच्या चेहऱ्यावरच्या शिरा ताठ झाल्या होत्या. डोळयातून निखारे फुलत होते. ते एकदम कडाडले—

'हे काय? पैसे चारून हे काम साधेल असे वाटण्याइतके आम्ही नीच आहोत, असं वाटत तुम्हाला? एक वार हे धाडस केलंत, पुन्हा असं काही कराल तर इत:पर इथं येऊ नका अस सांगण्याचा प्रसग येईल! आम्हाला विकत घेण्याचा तुमचा इरादा होता! मला विकत घेणारा अजून जन्माला यायचा आहे हे लक्षात ठेवा! यजमान-साहेबाच्या व्यवहारात आम्ही द्रव्याची लालसा ठेवतो अस तुम्हास वाटल तरी कसं?'

मुतालिकांनी पैसे माग घेत झटकन दाजीबांचे पाय धरले.

'आम्ही चुकलो दाजीबा. मुलीच्या हिताच्या विचारानं आमच तारतम्य सुटलं, असं वाटल्यास समजा. आमच्या घराण्याचा काही विचार करा! यजमानसाहेबांचं हे दुसर लग्न—'

'होणार! विचार पक्का झाला आहे. मी पुन्हा सांगतो, यजमानसाहेबांच्या दुसऱ्या संबधामुळं तुमच्या मुलीचही हितच होणार आहे. तरुणपण अनावर होऊ शकतं आणि अशा अवस्थेत यजमानसाहेबांकडून तुमच्या मुलीच्या बाबतीत काही अनाचार अवेळी घडला, तर त्याची जबाबदारी कुणावर? होत आहे हे चांगलं समजा! यथावकाश यजमानसाहेबाचा तुमच्या मुलीशीही ससार सुरू होईल. काही झालं तरी थोरल्या राणी-साहेब हा मान तुमच्या मुलीचाच राहणार आहे—'

मुतालिक हादरले होते. द्रव्यप्रयोग फसल्यानंतर देणाऱ्याच्या मनावर पसरणारी ओशाळगत त्यांना असह्य होत होती. द्रव्य लाथाडण्याची सधी त्यांनीच दाजीबाना दिली आणि दाजीबानी पूर्वी त्यांच्या झालेल्या उपेक्षेचा सूड पुरेपूर घेतला हे त्यांच्या आत लक्षात आले.

'आपल्या मर्जीस येईल तसे करा!'

इतकेच बोलून मुतालिक उठले. डोळयात जमा झालेली आसवं पुशीत दीनवाण्या चेहऱ्यानं बैठकीबाहेर पडणाऱ्या मुतालिकाच्या पाठोपाठ दाजिबा निरोप द्यायला उठले. जिना उतरणाऱ्या मुतालिकाना म्हणाले—

'यजमानसाहेब खाली आपल्या कोठीत असतील; त्यांना भेटून जायला हरकत नाही! विवाहाचं पक्क झालं की यादी येईल. अनमान करू नका!' □

दुकानाची फळी उघडून बराच वेळ झाला होता. दिवस चांगला तापायला लागल्यानं दुकानाच्या पायरीवरची उन्हं आत सरकली होती. सकाळीच न्हालेली जमना दुकानाच्या

आतल्या अंगाला केस वाळण्यासाठी मोकळे टाकून बसली होती. भिकूमल तिला सोडून गेल्यापासून दुकानचा व्यवहार तिच्यावर पडला होता. पाठमोऱ्या बसलेल्या जमनाचे रस्त्याकडे लक्ष नव्हतं. भिकूमल तिचा नवरा होता; पण पांढऱ्या दाढीच्या खुंटानं माखलेला त्याचा चेहरा, ढोपरापर्यंत वर आलेलं मळकट धोतर आणि तेलकट डागांनी कळकट झालेली डोक्यावरची पिवळी टापशी या त्याच्या दर्शनाचा कसलाही ठसा तिला डोळ्यांसमोर नकोसा होत होता. भिकूमलाशी लग्न होऊन ती दहा वर्षांपूर्वी गल्ल्यावर आली तेव्हा आपल्या नशिबात एखादा देखणा पुरुष येईल असे तिच्या गावीही नव्हते; पण भिकूमलने एके दिवशी दाजिबांना पानसुपारीसाठी माडीवर आणले. भिकुमलच्या दुप्पट उंचीचे, गौरवर्णाचे दाजिबा पाहताच जमना त्यांच्याकडे दरवाजाआडून बघतच राहिली. अंगात स्वच्छ बाराबंदी, डोक्यावर तांबडी पगडी, कानात मोत्याची भिकबाळी आणि मोत्याच्या पाण्याशी स्पर्धा करणारे किंचित घारे, पाणीदार डोळे. दाराच्या चौकटीआडून स्वतःच्या देहावर खिळलेले जमनाचे डोळे दाजिबांनी क्षणात हेरले. एकीकडे भिकुमलशी दुकानच्या व्यवहाराचे बोलताना त्यांनी धीटपणे त्या डोळ्यांशी हितगुज सुरू केले. ती पहिली डोळाभेट. त्यानंतर भिकूमल घरी असला–नसला तरी दाजिबांची दुकानाकडे फेरी होऊ लागली. कधी देवदर्शनाला आलो होतो म्हणून, सहज वळलो म्हणून ते येत, तर कधी अन्नपूर्णेचा तगादा होता म्हणून सामानाची यादी घेऊन ते येत. एका सायंकाळी ते आले तेव्हा भिकूमल माल आणण्यासाठी परगावी गेला होता. त्या दिवशी जमनानं दाजिबांची पहिली सेवा केली. आता तर काय भिकूमले तिला सोडून गेला होता. दाजिबांनी त्याला दुसऱ्या लग्नासाठी नगद पैसे आणि परगावी दुकानासाठी मोठी रक्कम देताच तो निघून गेला. हाताबाहेर गेलेली बायको म्हणजे डोईसुटला केस. सातान्यात वेअब्रूनं जगण्यापेक्षा त्यानं गाव सोडले. आता जमना एकटी होती. शिवाय परशुराममहाराज वर्षभरापूर्वी गेल्यानंतर दाजिबांना धाकच उरला नव्हता आणि दाजिबा राजरोस आठवड्यातून दोन–तीन रात्री तिच्या माडीवर येत होते.

दुकानावरून भवानी पेठेतला रस्ता वळत होता. त्यामुळे दुकानापासून वीस–पंचवीस पावलांवर उभे असलेले धरणीधर भटजी आणि मामा फडणीस जमनाला दिसत नव्हते. पण त्यांना मात्र जमना दिसत होती. धरणीधर भटजी मामा फडणिसांना सांगत होते–

‘इथे सगळी मेख आहे बघा! या मारवाडणीला वश केलेत तर काम सोळा आणे होईल. तुम्ही जरा आधी का इथं पोचला नाहीत?’

मामा फडणीस हळू आवाजात सांगू लागले–

‘अहो, आधी येणार कसा? आता आलो हेच आमचे नशीब! वडुजचा एक माणूस आमच्या भूषणगडला सहजी आला. त्यानं यजमानसाहेबांच्या दुसऱ्या लग्नाचा विचार माझ्या घरी काढला. म्हणाला, ‘कूळ चांगलं हवं आणि मुख्य म्हणजे मुलीचं वय चांगलं १२–१३ असून सणंग चांगलं हवं! पैशावर भिस्त नाही.’ आमच्या फडणिसांच्या घरात एवढी वाढलेली मुलगी कुठली असायला? पण माझ्या बहिणीची तिसरी मुलगी ठकू ध्यानात आली. ठकुबाईला घोडीवर घालून म्हटलं तडक निघावं–’

तंबाखूची चिमूट डाव्या हाताच्या तळव्यात बोटानं धरून धरणीधर भटानं डोळे बारीक करीत विचारलं–

‘ही केव्हाची गोष्ट?’ जणू तो यातून नक्की मार्ग काढणारच होता.

‘आठ दिवसांपूर्वीची! पण सांगतो काय, आबईचा नवरा–आमचा मेव्हणा नानासाहेब, ठकुबाईचं लग्न जुळवायला मेणराजुरीला गेलेला. तो येईपर्यंत वाट पाहावी न पाहावी याची भवति न भवति करण्यात चार दिवस गेले. म्हटलं, असं उपयोगी नाही. सरळ घोडीवर ठकुबाईला घातली आणि साताऱ्याचा मार्ग धरला! इथं येतो तो गावात कळलं की, यजमानसाहेबांच्या सावत्र मातेच्या नात्यातली कुणी मुलगी पक्की झाल्यासारखी आहे!’

डाव्या हाताच्या तळव्यात इतका वेळ बोटाने चोळलेल्या तंबाखूची चिमुट तोंडात सारीत धरणीधर भटानं म्हटलं–

‘गावोगावच्या मुली येताहेत. जो तो सांगतो, आमच्या मुलीचं पक्कं झाल्यासारखं आहे म्हणून! मघा तुम्ही म्हणाला, पैशाची भिस्त नाही! पण आपला माल कसाही असो, तो पुढं सारायचा म्हणजे पैसे लागणारच! त्याची सोय काय आहे?’

‘लगेच आहे असं नव्हे; पण मी नानासाहेबाला निरोप ठेवला आहे. लक्ष्मण नाईकाकडून सात-आठशे रुपये घेऊन तडक इकडे ये!’

‘लक्ष्मण नाईक म्हणजे पुसेसावळीचा?’

‘तोच! गरीबाला मध्यरात्री उभा राहणारा आहे!’

‘आहे! तो पैसे असलेला आणि मुख्य म्हणजे देणारा आहे. पैसे लागणार हे विसरू नका! अहो, माणसं कामं करतात; पण त्यांना आशा असतेच! आशा कुणाला सुटल्या? काय?’

मामा फडणिसांनी मान हलविली. खुणेनं विचारलं की, आता पुढं कसं करायचं? धरणीधर भटानं दुकानाच्या दिशेनं चालायला सुरुवातही केली. त्यानं मामांना म्हटलं–

‘तुम्ही माझ्याबरोबर या! काय बोलायचं ते मी बोलेन!’

दोघे दुकानापुढे आले. तेव्हा जमनानं झटकन वळून पाहिलं–

‘काय भटजी, आज सकाळीच काय काढलं?’

‘तुझ्याकडेच थोडं काम होतं. गूळपाणी देणार ना पाहुण्यांना?’




जमनानं मोकळे केस गाठीत बांधून पाठीवर टाकले आणि पदर डोक्यावर घेत ती उभी राहिली. म्हणाली,

'या वर या !–'

दोघे दुकानाच्या आतल्या अंगाला झाले. तिथे लहानशी गाद्दीची बैठक होती. टेकायला लोड होता. जमना लोडाशी झाली धरणीधर भटानं सूतोवाच केलं,–

'हे भूषणगडचे– फडणीस ! भाचीला घेऊन आलेत. यजमानसाहेबांसाठी ! मुलगी नजरेखालून घालायची आणि मग दाजीबांना सांगायचं––'

'अन्नपूर्णेला जर कळलं की मी मुलगी पाहिली तर घर डोक्यावर घेईल ती ! जहांबाजबाई ती ! भटजी, तुम्ही त्यांच्या घरी पोरीला नेऊन दाखवा ! मला यात पाडू नका !'

'अन्नपूर्णावहिनींना यातलं कोण काय सांगतेय ? अन्नपूर्णेकरवी काय करायचं ते आम्ही करतोच आहोत. नगरकर वैद्याकडे हे उतरले आहेत. नगरकराच्या कुटुंबाकडून प्रयत्न सुरू आहेत. त्याचा दाजिबाच्या कुटुंबाशी घरोबा आहे. मुलीची गोष्ट काढली आहे. अन्नपूर्णाबाईंना मुलगी नजरेखालून घालण्याची व्यवस्था एक-दोन दिवसांत आम्ही करतो आहोत; पण दाजिबावर त्यांच्या कुटुंबाचं मुळीच वजन नाही ही आतली गोष्ट ! जमनाबाई, तुम्ही सगळं जाणता ! उलट त्यांच्याकरवी आलेली गोष्ट म्हणूनदेखील दाजिबा ती उडवून लावतील ! पण तुमचं तसं नाही !'

जमना एकदम सुखावली. अन्नपूर्णेपेक्षा आपला दाजिबावर प्रभाव आहे ही गोष्ट धरणीधर भटापर्यंत पोचावी याचा तिला मोठाच आनंद झाला; पण मामा फडणीस का कोण या परक्या माणसापुढं त्यानं उघडपणे हे बोलावं हे तिला प्रशस्त वाटेना. ती कोड्यात पडल्यासारखी म्हणाली ––

*'पण आता माझी त्याची गाठ पडायला* हवी ! त्याच्या आधी मुलगी दाखवून ठेवा तुम्ही !'

धरणीधर भट ओठांच्या कोपऱ्यात हसू खेळवीत म्हणाला– 'हे बघ जमनाबाई, तुझी आणि दाजिबांची गाठ कुठं होईल, कधी होईल ते आम्ही विचारीत नाही. ते काम व्हायला हवं आणि ते केलंस तर तूच करणार !'

धरणीधर भटाच्या घरी सायंकाळी जमनानं यावं व तिथं मात्र फडणिसांनी ठकूला आणून दाखवावी असं पक्कं करून दोघांनी दुकानाबाहेर पाऊल टाकलं. फडणिसाचा निरोप घेताना धरणीधर भटानं सांगितलं – 'आता तुम्ही सरळ जा आणि दाजिबापाशी प्रस्ताव करा ! दोन्हीकडून आपण बार भरण्याची व्यवस्था केलेली आहे. बार उडालाच पाहिजे याची खात्री बाळगा ! अन्नपूर्णाबाईंना पाचशेची मोहनमाळ कबूल करून टाका, म्हणून मी नगरकर कुटुंबाला सांगून आलेलं आहे !' ◻

रात्र झाली. रस्ते अंधारात बुडाले. चालणारं माणूस ओळखू येईनासं झाले, तेव्हा दाजिबानी वाड्याबाहेर पाऊल टाकलं. सकाळपासून आज ते मस्त होते. दोन दिवसांपूर्वी भूषणगडचे फडणीस भेटायला आले होते. तेव्हा त्यांनी तिकडे फारसं लक्ष दिलं नव्हतं. फडणीस सांगून गेले होते–

'आम्ही भूषणगडचे फडणीस ! आमची बहीण नारोपंतास दिली आहे. तिची मुलगी दहा वर्षांची आहे केडगावकर देशपांड्यापैकीच ही मंडळी आहेत. रूप, कूळ, शील उत्तम आहे. आपण यजमान साहेबांनी करावा !'

दाजिबा त्यांना सांगत होते––

'मोठ्या मुली मिळत नाहीत. आम्ही गेले तीन महिने मुली पाहून त्यातल्या दोन पक्क्या केल्या त्यातली एक निवडू असे आम्ही सांगून चुकलो आहोत आणि आता तुम्ही उशिरानं येता आहात, शिवाय जो तो आपण आणलेली मुलगी रूपानं उत्तमच म्हणतो – पाहावं तो सगळा भ्रमनिरास !'

'पण आमचं सगळं उत्तम आहे –' फडणिसानी एकच घोषा लावला होता.

फडणिसांना त्यांनी दोन दिवसांपूर्वी निराश करून वाटेला लावलं, तो अन्नपूर्णेनं आज सकाळपासून घरात एकच टुमणं – सुरू केलं. तिनं म्हणे ती भूषणगडकराकडली मुलगी नगरकरीणबाईकडे जाऊन पाहिली. पूर्वी पाहिलेल्या दोनही मुली तूच पसंत *केल्या होत्यास ना ? असं रागावून विचारलं* तेव्हा वितंडवाद सुरू केलान. आपला आणि जमनाचा संबंध जडल्यापासून अन्नपूर्णा प्रसंगी टाकून बोलू लागली आहे.बोलण्यातला अफाटपणा दिवसेंदिवस वाढतोच आहे !

अखेर आपलाही तोल गेला. आपण चिडायला नको होतं. 'यजमानसाहेबाना मुलगी दाखवा. मुलगी त्यांनी पसंत केली तर आमचं काही म्हणणं नाही !' ही गोष्ट देखील *आपल्याला समजावणीच्या* सुरात सांगता आली असती, पण बायकोची लहानसहान कृती आणि बोलणं आपला संताप उफाळवतं, त्याला काय करायचं ?

विचाराच्या तंद्रीत दाजिबा जमनाच्या दुकानाच्या परसदारी पोचले. दारावर परिचित 'टकटक' होताच जमनानं दार उघडलं आणि पुन: कोयंडा सरकवला. सकाळपासून ओलसर राहिलेले केस तिने पुन. मोकळे सोडले होते. सायंकाळी ठकूताईला पाहून ती धरणीधर भटाच्या घरातून बाहेर पडली. तेव्हा धरणीधर भटजीनं फडणिसाकरवी तिच्या हातात शंभर रुपये बळे बळे दिले होते ठकूबाईचा विषय कधी निघतो याची आता जमना वाट पाहणार होती.

जमनाला जवळ ओढीत दाजीबा पलंगावर आडवे झाले. दिवसभराचा शीण आता ते विसरले होते. अन्नपूर्णेकडून होणारा पदोपदीचा पाणउतारा, वाड्यात चालणारं *यजमानसाहेबांच्या घराण्याचं* राजकारण, जमिनीची प्रकरणं आणि निवाडे या साऱ्या गोष्टींना इथं शिरकाव करायला मज्जाव होता. त्याचं इथलं बोलणं आणि वागणं यावर सातांऱ्यातील कुणीही शहाण्यानं विश्वास ठेवला नसता.

'यजमानसाहेबांची मुलगी पक्की झाली का ?'

दाजीबाच्या छातीवर विसावलेली जमना *त्यांच्या हातातल्या बोटातील अंगठीशी खेळत* त्यांना विचारीत होती. दाजिबाचा एक हात तिच्या पाठीवर फिरत होता आणि दुसऱ्या हातानं ते तिला कुरवाळीत होते

दाजिबाना जमनाचा प्रश्न समजण्यास थोडा वेळ लागला. कारण ती सहसा या गोष्टीत काही विचारीत नसे.

'दोन मुली निवडल्या आहेत. त्यातली एक पक्की होणार आहे.'

जमनान एकदम मान वर केली तेव्हा तिचे केस मोकळे दाजिबांच्या अंगा-तोंडावर

कोसळले. त्याच्या मऊसूत स्पर्शानं आणि वासान त्यांची तिच्या अंगावरची मिठी आणखी घट्ट झाली.

'भूषणगडाहून फडणीस म्हणून इथे आले आहेत, त्यांची मुलगी मी आज दुपारी पाहिली–'

'कुठं पाहिलीस ?'

'धरणीधर भटाकडे मी द्रोणपत्रावळी पोचवायला सहज गेले तो तिथे दिसली. मुलगी पडवीत छापापाणी खेळत होती !'

'तिचं काय ?'

'यजमानसाहेबाना सागून आली तर करून घ्या !'

दाजिबाच्या लक्षात आल की अन्नपूर्णा जिची तरफदारी करीत होती तीच ही मुलगी दिसते आहे त्याच्या मनात आल आणि जर खरोखरच मुलगी बरी निघाली तर अन्नपूर्णाही खूष होईल ! जमनाच्याही मनासारख होईल. ते विचारात पडले की काय करावं ? नवी मुलगी पसत झाली तर पसंत केलेल्या दोन मुलीच्या वडिलांना काय कळवायच ? त्याचं सणग पसत पडलेल्यात जमा आहे अस सगळीकडे झालेलं होतं.

'पाहायला काय हरकत आहे मुलीला ? घरात अन्नपूर्णाबाईंना पण आवडली तर करून घ्या यजमानसाहेबाना !'

'ज्याचा वाण त्याला आवडायला हवा'

'यजमानसाहेब काय तुमच्या बाहेर आहेत ? तुमच्या बाहेर इथं गावात आहे कोण ?' जमनानं डोळं मिचकावीत दाजिबांच्या गालावर बोटांनी नाजूक प्रहार केला ◻

ठकूताईला जमनानं नावाजली, अन्नपूर्णेनं सुरेख म्हटली. दाजिबानी पूर्वी दिलेला निर्णय फिरवून तिला नजरेखालून घातली आणि पसंत केली. सणग पक्कं झालं ! यजमानसाहेबाचा दुसरा शरीरसंबंध दोन दिवसांत जगजाहीर झाला !

इतकं होतं आहे तो ठकूबाईचे वडील नारोपंत सवनीस लक्ष्मण नाइकाकडून हजार रुपये कर्ज काढून सातारला दाखल झाले. नगरकर वैद्याच्या घरी मामा फडणीस त्याची वाट पाहात होते. एकाती गाठ पडताच मामानी विचारलं–

'किती पैसे आणलेत ?'

नारोपंत उत्साहाने म्हणाले–

'हजाराची सोय घेऊन आलोय !'

मामा फडणीस त्याना गभीरपणे म्हणाले–

'यानं काय होणार कात ! आतापर्यंत झालेल्या खर्चाची ही यादी पहा–'

मामानी पुढं केलेली यादी नारोपत वाचू लागले–

१. दाजिबा पटवर्धन–स्वत पैसे घेत नाही म्हणाले म्हणून त्याच्या कुटुबाकरिता मोहनमाळेचा घडाईसह खर्च रु. चारशे-ऐंशी.

२. धरणीधर भटजी–खटपटीचे रुपये दोनशे–


३. नगरकर वैद्य–ठकूताईला सुरू केलेल्या खुराकापोटी खर्च रुपये ऐंशी.

४. जमना मारवाडीण–दाजिबाजवळ शब्द टाकायचे रुपये शंभर

५. पटवर्धनाच्या वाड्यातील बचाई-कुपबीप–वरकड मदतीबद्दल रु. ३० एकूण आतापावेतोचा खर्च रु. ८९० रोख.

नारोपतानी यादी संपताच कपाळावर हात मारला ! हजार रुपये तर संपल्यासारखेच होते. मामा फडणिसानी त्याच्या पाठीवर हात ठेवीत म्हटलं–

'कर्ज काय उद्या फिटेल ! ठकूताई भाग्याची म्हणून हा योग आला बर ! दोन मुलीवर तिसरी होऊन ठकवलं म्हणून तिचं नाव ठकूबाई ठेवलंस; पण तिनंच तुला भाग्यकाल आणला आहे. ठकूला पाहाताच यजमानसाहेब म्हणाले–' सणंग तर चागलं आहे. मग काय 'श्री 'ची इच्छा असेल ते खर !' दाजिबाला जमनानं मथवला म्हणून सगळं जमलं. नुसत सणंग चांगलं असूनही जमलं नसतं ! श्रीमताशी प्रसंग आला आहे. चार पैसे जास्त खर्च व्हायचेच !'

लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य । वीस रुपये.

# एक सश्रद्ध! एक सूर्य!!

आम्ही ओसाड्यासारखे रहातो. तसं घर मोठं आहे. भाड्याच्याच, पण चांगल्या चार मोठ्या खोल्या आहेत; पण तरीही माणसंच कमी पडतात. अर्थात हा काही आमचा दोष नाही. मुळात आमच्या घरात मोजकी पोरंच जन्माला आली. तीही कधी तरी फार उशीरा. आधी तो आणि त्याच्यानंतर मी. वडील होते तोवर बरं होतं. मालकीची चाळ होती. जाहिरातदारांकडून जाहिराती लावलेल्या जागेची भाडी येत होती. घर कसं भरलेलं होतं; पण एकदा चाळ पुरात गेली ती गेलीच! वडलांनीही धसका खाल्ला. धंदा केला; पण बेताबेतानं. मनात तसेच दुबळे राहिले. हार्टनंच गेले. आता घर ओस पडलंय. फर्निचर पण एक एक करून आम्ही काढून टाकलं; पण त्या चांगल्या दिवसांच्या खुणा अजून मागे उरल्यायत. आमच्या स्वभावात. आम्ही दोघेही पार चिडके झालोयत. एकमेकांवरच चिडतो. ते जमलं नाही तर स्वतःवरच.

मी अश्रद्ध नाही, तोही नाही. अर्थात त्याच्याबाबतीत निश्चितच असं म्हणता येणार नाही. तसा तो चांगलाच श्रद्धा बाळगून आहे. रोज गीतेचा अध्याय वाचतो. म्हणजे मीच त्याला वाचून दाखवितो. तो एकाग्र होतो. ऐकत जातो. रोज तासभर त्याची पूजाच चालते. अंदाजानंच करतो. शिवाय दर मंगळवारी त्याला देवीचा पाठ वाचवून दाखवावा लागतो. हे सर्व ठीक आहे. तरीही त्याच्या ह्या श्रद्धा मी मानीत नाही, मला निश्चित माहित्येय की हे त्याचं ढोंग आहे; पण मी तसं त्याला दर्शवीत नाही. वडील होते तोवर त्याच्याशी भांडायचं तरी बळ होतं. आता तेही नाहीत. तसे ते गेले तेव्हा त्यांचं वय काय कमी नव्हतं. आईचं मात्र जरा वेगळंच झालं. ती जरा लौकरच गेली. अर्थात मेंदूतला रक्तस्राव काही हातात नसतो. तो अचानकच होतो. तिचं तेच झालं. चार-दोन तास डोकं दुखलं आणि ती गेली! ती गेल्यावर आम्ही चांगलेच उघड्यावर. म्हणजे जास्त करून तोच! घरात दुसरं तिसरं कोणी नाही. डोळे नसल्यानं त्याचंच अडतं. माझा तर काही प्रश्नच नाही.

मग त्यानं हे अध्यात्माचं धरलं. पूर्वी असलं काही त्याच्या गावीही नव्हतं. वडील गेले, आईही. हे सगळं ठीक होतं: पण जरा अतिच होत होतं. निदान मला तसं वाटतंय. त्याला सांगायची इच्छा नव्हती; पण सांगितलंच.

'मला विरोध करायचा नाहीयेय; पण मला हे काही पटत नाहीयेय.'

'हे म्हणजे?'

'हेच ते देवधर्म, इतर सर्व काही. मला वाटतं करायला हरकत नाही; पण जरा जास्तच होतंय.'

'पटत नसेल तर दे सोडून. माझं मी बघून घेईन!'

'ही भाषा बरी नव्हे!'

आणखी काही बोलण्यासारखं नव्हतं; पण तो म्हणाला,

'कुठे तरी श्रद्धा बांधायला हव्यात!'

'तू स्वतःलाच फसवतोयस!'

'मी प्रामाणिकपणे करतोय. कुठला तरी मार्ग शोधू पहातोय, तर तुला खोटंच वाटतंय!'

'मला नाही वाटत असला श्रद्धा बांधायचा तुझा पिंड आहे म्हणून.'

'मग कशासाठी चाललंय हे?'

'वेळ घालवायला असेल. शिवाय–'

'शिवाय काय?'

'शरीर विसरायलाही असेल.'

'तू क्रूर आहेस!'

'हे बघ! मला जे वाटतं तेच सांगितलं. मला नाही येत खोटं बोलता!'

मी मला वाटतं तेच अण्णाला सांगितलं. त्याचा हा बुरखा निश्चितच खोटा होता. धडपड निराळीच होती. मला निश्चितच वाटत होतं की, हा मनानं एवढा साधू नाही. तो विषय तसाच राहिला. मीही ताणत गेलो नाही. तो कॉलेजात होता तेव्हाची गोष्ट. एकदा सुजलेल्या डोळ्यांनी तो घरी आला. आईला वाटलं, डोळे सुजले असतील. वडलांना वाटलं कुठे तरी हाणामारी करून आलाय. वडलांचंच बरोबर होतं. कॉलेजात त्याचं अभ्यास सोडून सर्व काही चालायचं. पुढे पुढे डोळ्यांचं वाढतच गेलं. दिसायचंही कमी आलं. वडील घाबरले. त्याला मुंबईला घेऊन गेले. उपयोग नाही. मग युपीतलं सितापूर गाठलं. तिथे डोळ्यांच्या एका विख्यात हॉस्पिटलात त्याच्यावर दोन ऑपरेशनं केली. डोळे गेले ते गेलेच! सगळाच अंधार! तेव्हापास्नं तो घरीच होता. त्याचा स्वभावही जास्तच चिडखोर झालेला.

त्या दिवशी 'झिवॅगो' होता. त्याला मुद्दामच घेऊन गेलो. तो अंधारात निमूट बसून होता. डायलॉग ऐकत होता. मी मात्र बडबडत होतो. मधूनच पडद्यावरचे तपशील त्याला पुरवीतही होतो. बोलत नव्हता. विचारात असावा. येताना 'चार मिनार घेऊ' म्हणाला. तो उग्र वास मला आवडत नाही; पण त्याच्यासाठी ते ठीक असतं. त्यानं अडखळतच पेटवली. म्हणाला,

'काय भयंकर विध्वंस नाही! क्रूर लेकाचे!'

'क्रूर कसे काय?'

'का? आपल्याच लोकांचे भयंकर हाल करायचे, हे क्रौर्य नाही तर काय?'

'असा विध्वंस अटळच असतो!'

'अटळ?'

# अशोक प्रभाकर डांगे



'अटळच की ! अरे जेव्हा एक राज्य-व्यवस्था बदलून दुसरी आणायची तेव्हा हा विध्वंस, विनाश आवश्यकच ठरतो !'

'मला नाही पटत तुझं हे ! अरे, नवीन समाजव्यवस्था आणायचीय ना तुम्हाला, मग आणा ना काय ती ! पण मग घर, दार, माणसं सगळ्यांचा सर्रास नाश कशासाठी ?'

'इतिहास क्रूरच असतो बाबा !'

'इतिहास गेला खड्ड्यात ! करायच्यात काय ह्या क्रांत्या ? आपल्याला मुळीच गरज नाही त्यांची !'

एकंदर 'झिवॅगो'नं त्याला चांगलंच अस्वस्थ केलं होतं. मग मीही विचार केला. माझ्याच कल्पनेचा पाठपुरावा करणं शक्य नव्हतं. मला उगाच आठवल्या, त्यानं कॉलेजात केलेल्या मारामाऱ्या. पोरांची फोडलेली तोंडं आणि तीही कुठल्या फालतू पोरीवरून. फार बोंब झाली तर वडील जाऊन मिटवून देत; पण आता त्याचं काही खरं नव्हतं. मला उगाच वाटायला लागलं होतं, आताशा तो निवळलाय. एरवी त्यानं कुठल्याही क्रान्तीचा पुरस्कारच केला असता.

मी नेहमीप्रमाणे कामावरून आलो. काल रात्रीच त्याला अगाथा ख्रिस्तीची एक कादंबरी वाचून दाखविली होती. त्याला आवडलीही होती. उरलेली आज वाचायची होती. मला वाटलं तो रात्रीपर्यंत न थांबता आता संध्याकाळीच वाचायला सांगेल. माझं मलाच आश्चर्य वाटलं. घराला कुलूप होतं. वाटलं त्याचा कुणी मित्र आला असेल. गेला असेल घेऊन फिरायला. दुसऱ्याच्या आधाराशिवाय तो जाणं कठीणच. दार उघडलं. तेवढ्यात शेजारच्या काकू तक्रार करीत आल्या.

'तू नीट लक्ष ठेव बुवा !'

'का ? काय झालं ?

'तुझ्या भावाची लक्षणं बरी दिसत नाहीत !'

'विशेष काही ?'

'तसं विशेष काही नाही ! इतक्या वर्षांचा शेजार आहे आपला. तुमच्या घरातही कोणी नाही. मला वाटतं म्हणून सांगितलं.'

मला काहीच कळेना. त्याही काही स्पष्ट बोलेनात; पण अण्ण्याबद्दल काही तरी असावं. वागणूक काय, माणसं काय, शेजारी काय, माझा सगळाच घोळ. त्या गेल्या देखील. जास्त बोलायचं नसेल. मी आणखीनच वैतागलेला. तेवढ्यात तो आला. चाचपडतच त्यानं दार लावलं. मी म्हटलं आता गप्प बसून चालणार नाही.

'अण्ण्या, काय भानगड आहे ?'

'कसली भानगड ?'

'त्या शेजारच्या काकू तक्रार घेऊन आल्या होत्या.'

'काय म्हणत होत्या ?'

'नीटसं कळलं नाही, पण तुझ्या वागण्याचा उल्लेख केला त्यांनी.'

'माझा उल्लेख ? तो का म्हणून ?'

मग तो थांबला, खदखदून हसला काही तरी लक्षात आल्याच्या आविर्भावात म्हणाला,

'मॅडच आहेत ही लोकं !'

'का ? काय झालं ?'

'अरे, तो जोशी आहे ना आपला ...'

'तुझा नेहमीचा मित्र ! मग ?'

'त्याची ती बहीण ...'

'सुधी ?'

'हं, तीच ती !'

'तिचं काय ?'

'तिचं काय होणार आहे ? दुपारी येऊन गेली ती इथं. तोच घोळ दिसतोय !'

'इथं ?'

'हो इथं म्हणजे, आपल्याकडेच !'

'एकदाच आली होती की – ?'

'आली होती तशी दोन-तीनदा; पण काय फरक पडणार आहे त्यानं ?'

मग मीही आणखी विचारलं नाही. अर्थही नव्हता. मी अॅगाथाची कादबरी वाचायला काढली. त्यानं आवाजावरनच ओळखलं.

'वाचतोयस ?'

'तुला आवडलीय. संपवून टाकूयात. दुसरी आणता येईल !'

तो बोलला नाही. मूड नसावा. खिडकीत रेलून उभा राहिला. वरची फळी चाचपली. सिगारेट काढली. ओढीत उभा राहिला. बाहेर बघत होता. दूरच्या अंधारातच. मी पटकनच म्हणालो,

'वाचतोय !'

'वाच !'

समोरचा रस्ता वाहनानी भरून वाहात होता. गर्दीची वेळ होती. तो माझे शब्द अचूक पकडीत होता.

मधून मधून त्याला सितापूरची याद येते. आपल्या पहिल्या ऑपरेशननंतरचा एक क्षण तर त्याला नेहमीच सतावीत असतो. एके काळी त्याच्या अवघ्या आशाच्या केन्द्रस्थानी असलेल्या त्या क्षणाचं वर्णन तो नेहमीच रगवून करीत असतो. कालही त्याला तेच आठवलं. गीतेचा अध्याय वाचतावाचताच तो थांबला आणि अचानक मला म्हणाला,

'माझ्या ऑपरेशननंतरचा पधरावा दिवस बघ. डॉक्टर म्हणाले होते, 'सक्सेसफुल !' मी धाकधुकीतच होतो त्यानी माझ्या डोळ्यावरची पट्टी सोडली. मोठी खोली असावी. कॉटही बहुतेक एकच होती. मला त्यातलं काही दिसलं नाही. नुसता अंधार. आधी काळाशार मग तांबडा किंचित पिवळा. मग जरा किलकिलल बघ. मग कॉटसमोर उभी एक नर्स. अगदी सदेह दिसली बघ ! तिचा तो पाढरा ड्रेस गोरा चेहरा. बॉब. बस्स मी म्हटल जिंकली आता; पण असं म्हणतोय तेवढ्यात...तेवढ्यात काही तरी लखलखल. मग अंधारच अंधार. काळा ठिक्कर अंधार ! खूप धडपडलो. काहीच दिसेना. दहा-बारा वर्षं झाली असतील नाही याला ?'

शेवटचा प्रश्न मला होता. त्याच्या आयुष्यातला शेवटचा दृश्यक्षण होता तो, म्हणूनच महत्त्वाचा. तेव्हापास्न अजून त्याच्या वाट्याला आलेला तो अंधार संपलेला नाही.

जोश्याच्या पोरीबद्दल माझं मत बरं नव्हतं. तिला मी चागलाच ओळखीत होतो. रोज ती नव्या नव्या तरुणाबरोबर दिसायची. एकदा ओळख साधून तिन माझ्याशीही घसट करायचा प्रयत्न केला होता. तिची बोलता बोलता अंगसटी यायची पद्धतच बेकार होती. उद्योग नव्हता. त्यातनं दिसायला बरी. कोणीही चालायचा. मुळात मला माणसांचं वावड पोरीपास्नं चार हात दूरच. त्यामुळं तिचा अधिकच राग यायचा.

त्या दिवशी टेबलावर डबा सापडला. नवीनच होता. ओळखीचा वाटला नाही. वर चिठ्ठी होती. उघडून पाहिली तर आत छान थालपीठ ! मला आवडतं. क्षणभर वासान मोहदेखील पडला; पण मग चिठ्ठी वाचली. 'डब्यात ठेवलंय. खाऊन घे ! तुझ्या आवडीचच आहे !' वाचल्यावर उगाचच अस्वस्थ वाटलं. काय वाटलं, खाल्ले नाही. आल्यावर त्यानं डबा उचलून पाहिला. जड वाटला. म्हणाला,

'खाल्लं नाहीस ?'

'नाही'

'का ?'

'कोणी आणला होता डबा ?'

'कोणी का आणीना !'

'विचारलं.'

'सुधी आली होती घेऊन–खाणारेस का?'

'नाही !'

'का म्हणून जळतोयस माझ्यावर ?'

'जळायचा प्रश्नच नाही.'

'मग ?'

'तुझं वागणं आपल्याला पसत नाही.'

'तुलाही सशय आला ना ?'

'येणारच !'

'दोघेच उरलोयत जगात. एकमेकाला समजून घेऊन जगू. एक ऐकणारेयस ?'

'साग !'

'मी तिला बहीण मानतो !'

'खरं नाही वाटत !'

'काय करावं मी खरं वाटायला ?'

'काही करायला नको.'


'तू उगाचच काही तरी डोक्यात घेतोस.'

'हे बघ, अण्ण्या ! बहीण–बिहीण मला ठाऊक नाही. आपण चार-चौघात रहातोय. उगाच जास्त वाढवू नयेस हे बरं !'

'उगाच, दुसऱ्यांच्या नादानं काही तरी बरळतोस झालं !'

त्याचं बहीण–बिहीण प्रकरण ढोंग होतं. केव्हा तरी त्याला तोंडावर सांगायलाच हवं होतं आणि त्याच्या परिस्थितीकडे पाहून मी आजवर बोललो नव्हतो. वयही महत्त्वाचं होतच; पण आता त्याला स्पष्टच तसं सागून टाकलं, तर चांगलाच खवळला. चार दिवस बोलायचा देखील बद झाला. पाचव्या दिवशी मला न सागताच गायब झाला.

# उद्योगांच्या प्रगतीवाचून अपूर्ण ठरते क्रांती
# उद्योगांच्या प्रगतीवाचून नांदत नाही शांती



VISION 775

नवेनवे संशोधन करून हायको रसायनांच्या व्यवसायांत सतत गुणवत्तेची वाढ करीत आहे. जीवनांत समृद्धी आणि सौंदर्य निर्माण करण्यात हायकोच्या रसायनांचा मोठा वाटा आहे.

दिपावली शुभचिंतन

सर पी.सी. रे अॅवार्ड विजेते

**हायको**

**प्रॉडक्टस् प्रा. लि.**

मोगल लेन, माहिम, मुंबई ४०००१६

टेलि. नं. ४६७२९१, ४६६०५३.

अर्थात हे मला नवीन नव्हतं. पूर्वीही तो असाच कुठे कुठे गेला होता; पण चौकशी केली तर बरोबर त्याचा मित्र जोश्याही गेला होता. मी म्हटलं, कुठल्या तरी नव्या गुरूच्या शोधात गेले असतील तसा मी तितका अश्रद्ध नाही. एका सरकारी प्रयोग-शाळेत मी अधिकारी आहे. परवाच मी नोबेल पुरस्कार विजेत्यावरचं एक पुस्तक वाचल. ते शास्त्रज्ञ काही म्हणोत, मी विज्ञान मानतो तसंच अध्यात्मही. माझ्या दृष्टीनं अध्यात्मही एक अप्रगत शास्त्रच आहे. न जाणो, त्यातल्या प्रक्रियादेखील गणिती समी-करणांनी सोडवता येतील. मी स्वप्न पहातोय तो दिवस उगवायची माझ्या सगळ्या श्रद्धा त्या अशा स्वप्नातनंच जन्माला आल्यायत. अण्णाला हे पटत नाही. तो नुसत्या धार्मिक श्रद्धा बाळगतो. माझ्यासारखी त्याची विज्ञानाशी असलेली बांधिलकी मानत नाही. मग इथे त्याचा आधळेपणा आडवा येतो. सगळ्याचीच उत्तरं तो गुरुबाजीतन सोडवू इच्छितो.

आताही माझा अंदाज अचूक ठरला. गावाहून आल्या आल्याच त्यानं एक नव्याच गुरूचा फोटो बाहेर काढला आणि तो हवा तिथे लावून टाकला. मी काहीच विचारलं नाही. इच्छाच नव्हती. आपणहूनच म्हणाला,

'महाराजाकडे जाऊन आलो.'

'हं.!'

'जोश्याच्या माहितीतले आहेत '

'हो.'

'सुधीही आली होती बरोबर. जोश्याही होताच म्हणा.'

'छान.'

'एक चमत्कारच झाला.'

'काय ?'

'त्यांच्या घराचा जिना चढायला लागलो तसा तसा डोळ्यातला अधार विरघळत गेला बघ. किलकिल दिसल्यासारखं देखील वाटलं बघ.'

'खरंच ?'

'मग काय खोटं सागतोय ? साक्षात्कारी पुरुष आहे. म्हणाले, 'माझ्या सेवेत रहा. सहा महिन्यात खडखडीत दिसायला लागेल!' बोलावसं वाटल नाही. गप्पच राहिलो. बराच वेळ असातसाच गेला. मग म्हणाला,

'बोलत नाहीस ?'

आता परतस्पष्ट बोलायलाच हवं होतं. नाही तरी तो असा तसा रहाणारच होता.

'आणखी किती दिवस फसवीत रहाणार स्वत लाच ?'

तो बोलला नाही. माझं डिवचणं त्याला नक्कीच आवडल नसणार; पण तस काही तो बोलला नाही. तो गेल्यापास्नं मी बाहेरच जेवत होतो. आजचा दिवस तरी बाहेरच जेवणं भाग होतं. आम्ही बाहेर पडलो. त्याचा हात माझ्या हातात होता. फूटपाथ उतरताना हात दाबून त्याला खुणावल; पण तो धडखळलाच. मी सावरलं एरवी असं होत नाही. उडप्याकडे त्यानं हातानंच ताट चाचपल. वाटयाचा अंदाज घेतला मग अड-खळतच जेवायला लागला. तरी एकदा साराची वाटी उलटलीच ! तेवढी मी उचलून ठेवली. मग म्हणाला,

'पैसे लागतील '

'घरातले घे! '

त्याच्या खर्चासाठी तो नेहमीच पैसे घेत असे. मी कधी विचारतही नसे त्याला. आजचं जरा निराळ दिसतं.

'जास्त हवेयत !'

'किती ?'

'पाचशे लागतील !'

'एवढे ?'

'काही करून देच !'

'कोणाला ?'

'मित्राला लागतायत !'

'परत केव्हा देणार ?'

'दोन महिन्यात. प्रॉमिस दिलय त्यान. पहिल्या तारखेला नक्की परत करतो म्हणून !'

तसे यापूर्वीही त्यान माझ्याकडनं पैसे घेऊन कुणाकुणाला दिलेही होते. मुळातच त्याचा मित्र-परिवार मोठा त्यातन असे डोळे गमावल्यापासून सहानुभूतीनं का होईना माणसं त्याच्या अवतीभवती असायचीच. त्यातल कुणी ना कुणी नेहमीच अडचणीत असायचच. मला वाटलं तसंच काहीतरी असेल. अधिक विचार केला नाही दुसऱ्या-दिवशी त्याची सोय करून टाकली.

त्या पोरीचं प्रकरण सुरू झाल्यापासूनं माझं त्याच्यावरचं लक्षच उडाल होतं पूर्वी-सारखं आपलेपण वाटत नव्हतं. मी वाचनात गुतवून घेतलं. ब्रिटिश कॉन्सिल किंवा मिळेल त्या लायब्ररीतनं पुस्तकं आणून वाचू लागलो; पण ते माझ्यापुरतंच आमचं सामु-दायिक वाचन बद होतं. नंतरचा तात्त्विक वादविवाद पण. मी मित्रांतही जास्तच वेळ काढू लागलो. त्यालाही ते जाणवायला लागलं असावं. आमच्या जागेची प्रकरणही वाढत होती. चाळीचं प्रकरण कोर्टात अड-कल होतं. जाहिरात कपनीवाले पण वेळे-वर चेक सोडत नव्हते. कामं बरीच होती. त्याचा तर काहीच उपयोग नव्हता. सगळ व्यवहार मीच बघत होतो. अशाच कामा-साठी एकदा अर्धा दिवस रजा काढली. त्याला कल्पना नसावी. डेक्कनवरच भेटला. बरोबर सुधी होतीच त्याचा हात धरून. फिरायला बाहेर पडले असावेत. सुधीन मला पाहिलं असावं. मग तोड लपवलंन. मी सरळ रस्ता ओलांडला. घरी आलो. कामाला जावंस वाटेना. मग घरीच झोपलो तो माझ्या यायच्या वेळेआधी उगवला. मला पाहून दचकलाच ! सुधी त्याला बोलली नस-णार. म्हणाला,

'समोरच बसलो होतो, सुर्वेच्या दुकानात हाक तरी मारायचीस !'

पण त्याचे शब्द पोकळ होते मला अंधा-रात ठेवण्याचीच त्याची धडपड होती. कदा-चित् त्यालाही व्यर्थपणा जाणवला असावा

गेले आठ दिवस त्यानं ज्ञानेश्वरीचा पाठ कोणाकडून वाचून घेतला. मग दुसरं काहीच करीना. माझ्याशी बोलणही बंद होत. मीही कामाशिवाय त्याला काही सांगत नव्हतो; पण आठ दिवसच तो मूड टिकला. पुन्हा गाडी मार्गावर आली. त्या पोरीच प्रकरण आता वाढतच चाललं होतं. तो मला सांगत नव्हता, पण मोलकरीण, जेवणाची बाई, शेजारी-पाजारी, सगळ्यांकडून काही ना काही कळत होतच. मित्राच्याही तक्रारी वाढत होत्या. ती नुस्तीच येत असती, भेटत असती, बोलत असती-तर प्रश्न नव्हता. आता तो तिच्या गळ्यात गळा घालूनच बसलेला असे. काही मित्रानी तर त्याला तिच्या माडीवर लोळतानाही पाहिलं होतं. पण दुसऱ्यानं पाहिल्यावरही दूर न होण्या-इतका आता तो निर्ढावला होता. त्याच्या शब्दातही आता बेछूटपणा आला होता. त्याच्या उपासना-प्रार्थना चालूच होत्या. मला ह्या साऱ्याच काहीच आश्चर्य वाटत नव्हतं.

त्याच्या बाबतीत काहीच अशक्य नव्हतं. आता त्याला आवरायचा कसा आणि कोणी एवढाच प्रश्न होता. मगळवारी मी त्याला पोथी वाचून दाखवली. ते होताच तो म्हणाला,

'अरे, मागे मी तुझ्याकडनं पैसे घेतले होते !'

'हो.'

'ह्या एक तारखेला ते परत आणून देणार होतो.'

'तूच म्हणाला होतास तसं.'

'आता ते शक्य दिसत नाही.'

'माझ्याकडेही काही झाड नाही.'

'ते मलाही पटतंय; पण माझ्याही भावनाचा हा प्रश्न आहे.'

'तुझ्या भावना? समजलो नाही मी.'

'कधी तरी सांगायचच होत तुला. आज सांगतो. मी ते पैसे सुधीला दिलेयत !'

'काय ?'

मी क्षणभर दचकलो. हा धक्का अनपेक्षित होता. त्यानं सरळ सरळ मला फसवल्यासारखंच होतं.

'मला बोलला नाहीस ?'

'नाही बोललो. वाटलं तिचं नाव घेतल्यावर कदाचित तू द्यायचा नाहीस !'

'मला फसवलंस तर !'

'हे बघ, तशी काय ती वाईट नाहीयेय !'

'तुला नसेल !'

'अडचणीत होती ती. कोणी तरी नोकरी मिळवून देत होता तिला पैसे भरायला लागणार होते. तिची परिस्थिती तुला ठाऊक आहेच. मी दिले, झालं. काय चूक आहे त्यात ?'

'चुकलय ते आमचच !'

मी उपरोधानच त्याला म्हणालो. त्याला ते शब्द बोचले असावेत. म्हणाला,

'एवढा उपहास करायला नको होता आमचा !'

'त्या बयेला मी दमडाही दिला नसता !' मी उसळूनच म्हणालो.

'मी पै न् पै देईन तुझी, पण थोडं थांबायला हवय. फसवली गेलीय ती. अजून नोकरी मिळालीच नाहीयेय. काय करील बिचारी !'

'बिच्चारी राहू द्या बाजूला ! तिन दिलेन तर ठीक. नाही तर तू देऊन टाक ! ठरल्याप्रमाणे, ठरल्या वेळी !'

'मी जामीन आहे ना तिला. तू कशाला उगाच डोक्यात राख घालून घेतोयस तिच्यापायी ?'

'हे बघ, अजून आठवडा आहे. बाकी मी काही जाणत नाही !'

आमचा चांगलाच झगडा झाला. एक तर अस भाडण व्हायलाच नको होतं; पण माझा तोलच गेला होता. बहीण बहीण करीत करीत तो चागलाच बहकला होता. वर मला मोठमोठ्या गोष्टी शिकवीत होता. ढोंगबाजी चालली होती ती निराळीच. हा एक शरीरापायी वाहात गेला असेलही; पण त्या गाढवीला अक्कल असायला नको का ? प्रकरण चांगलच चरत चाललं त्याचे मित्र सुद्धा त्याची वागणूक पाहून वैतागले होते. त्याला टाळायला लागले होते. मलाही चार लोक रस्त्यात उगाचच टोकरत होते. आता फार झालं तो तर ऐकणार नव्हताच. मनात नव्हतं, पण एकदा सुधीला तिच्या घरातच गाठल. त्याच्यापास्नं दूर राहायचा सल्ला दिला, वर रागान काही-बाही बोललोही. म्हटलं, त्याचा नाद तरी सोडील. दोन दिवस असे तसेच गेले. तिसऱ्या दिवशी तो माझ्यावर पिसाळला. बहुधा सुधी बोलली असावी त्याला. त्याचा आवाज चढला होता.

'तू माझ्या या भानगडीत तोड खुपसू नकोस !'

'दम नकोय ! पण का ?'

'नको म्हणजे नको ! मी सांगतो म्हणून दूर रहा ! नाही तर—'

'नाही तर काय ?'

'नाही तर माझ्या इतका वाईट कुणी नाही !'

तो चागलाच चवताळलाच असावा. कॉलेजातले त्याचे दिवस टगेगिरी करण्यातच गेले. मला उगाच आठवण झाली त्याचा पिंड अजूनही तसाच होता. उगाचच वाटल. मला कुणाकडनं मारायलाही तो कमी करणार नाही. मी मनानं सावध झालो. आमच्यातलं बोलणं आता बद पडलं होत. त्याची साधनाही जोरात होती. एकीकडे पोरगी, दुसरीकडे दमदाटी, तिसरीकडे उपासना. त्याला सगळं जमत होतं, शोभतही होतं. तसा पैशाचा विषय एकदा त्यान काढला होता; पण तोही पधरा दिवसाची मुदत वाढवून घेण्यापुरताच. मी त्याला तशी परवानगी दिलीही होती. बऱ्याच दिवसात मी त्याला पिक्चरलाही चल म्हणालो नव्हतो. अलीकडे सुधीही येईनाशी झाल्याचं मला कळलं होत. कारण समजल नव्हतं मी त्याला मुदत होताच पैशाचं विचारल तर म्हणाला,

'ती साली देत नाहीयेय !'

'का ?'

'भेटतच नाही. शंभरदा जाऊन आलो. गायबच झालीय जणू कुठे !'

'कुठे ?'

'मावशीच्या गावाला गेलीय अस कळलं.'

'पैशाच काय ?'

'मी तिला गाठीन वसूल करीन !'

तो तिच्या शोधात दोन गाव फिरूनही आला. ती सापडली. गावातच होती; पण तिच्याकडनं घ्यायला पैसे तर हवेत ? तो मला सगळ्या रडकथा सांगायला लागला. तशी मला पैशाची नड नव्हतीच; पण त्याच्या प्रवृत्तीन मी चांगलाच डिवचला गेलो होतो. म्हणूनच मला तिच्याकडून नव्हे तर त्याच्याकडून पैसे हवे होते. विचार करूनच मी मी त्याला सुनावल.

'दोन मुदती झाल्या ! मला तिच्याशी मुळीच घेण नाहीयेय ! मला सध्याकाळच्या आत पैसे हवेत ! जमणार नसेल तर आज रात्रीच घराबाहेर हो !'

शेवटचा घाव वर्मी बसला. तो कोलमडलाच ! वास्तविक पैसे ते काय ! त्याला घराबाहेर काढायचं माझ्या मनातही नव्हतं; पण प्रश्न त्या पोरीचा होता. तिच्या पायी तो वाहात चालला होता. कुठं तरी त्याला अडवणं भाग होतं. ही धमकी त्याला चांगलीच लागू पडली. त्याला ठाऊक होत, मी म्हणालो तसा वागेनही ! माझा प्रश्न नव्हता. प्रश्न त्याचाच होता. बाहेरच्या जगात एकट वावरायला तो अगदीच असमर्थ होता. त्यानं दिवसभर धावपळ केली. मित्राना गाठलं, माझे पैसे उभे केले. तेवढ पाठबळ त्याच्याजवळ नक्कीच होतं. मला जाणवत राहिलं ते त्याचं केविलवाणेपण ! ते यापूर्वी मी तर कधीच पाहिलं नव्हत. मन उगाचच उदासल. मी नव्या अस्वस्थतेनं झपाटून गेलो.

तो सश्रद्ध नाही. निदान मी तरी तसं मानत नाही. माझ्या श्रद्धा माझ्याजवळ आहेत; पण त्याच्यासारख्या त्या नकली नाहीत. तो आपला बुरखा जपतोय हे आता निश्चितच सिद्ध झालय. त्यात त्याला समाधानही असेल. फसवणूक तर आहेच. माझा प्रश्न निराळाच आहे. त्याच्यासारख्याच्या भावनाही एवढ्या प्रबळ का ? माझ्याकडून मी प्रयत्न करतो; पण उत्तरच हाती लागत नाही, एवढच खरं. ●

# आम्ही आणि बदमाष काळ

मी काय करू शकतो ?
मी निदान एवढं करू शकतो.
मी सत्याग्रह करून
तुरुंगात जाऊ शकतो ....
असं ठरवून आणीबाणीला
प्रतिकार करणाऱ्या
संघामध्ये वाढलेल्या
समाजवादी परिवारात वावरलेल्या
एका युवकाचा
मनमोकळा आत्मशोध...

विनय हर्डीकर

: १ :

'**का**तरवेळ', 'कलती संध्याकाळ', 'करकरीत तिन्हीसांजा' वगैरे शब्द मराठी साप्ताहिकांनी त्याचा अर्थ कळेनासा व्हावा इतके वापरून टाकलेले आहेत. तरी पुन्हा पुन्हा ते वापरले जातातच. एका ठिकाणी न चाललेलं नाणं गुळगुळीत दिसत असलं की आपण ते दुसऱ्या ठिकाणी चालवतो. अनुभवाची साथ नसेल तर शब्दही गुळगुळीत होतात. एखादा अनुभव उत्कटपणे आला, त्यानं आतमध्ये कुठे तरी आग लागली – स्फोट झाला, तर ते शब्द पुन्हा जिवंत होतात. 'करकरीत संध्याकाळ' हे शब्द मी सुटलो त्या दिवशी माझ्या मनात जिवंत झाले. सुटल्याचा आनंद मुळीच झाला नव्हता. केवळ गैरसमजापोटी आपला दंड भरला गेला. सुटायला फक्त तीन दिवसांचा अवधी असताना भरला गेला, याची चीड अस्वस्थ करून टाकीत होती. जेलच्या दरवाजाच्या बाहेर आल्या–आल्या असं वाटलं की, पुन्हा एकदा घोषणा देऊन आतमध्ये जावं. पुन्हा काय होईल ती शिक्षा भोगावी; पण तरीही आधीच्या सुटकेचं शल्य शिल्लक राहिलंच असतं, हा विचार लगेच मनात आला. मला त्या क्षणी जाणवलं की, मी पुष्कळच बदलून बाहेर पडलो आहे. मनात येईल ते करून मोकळं व्हायचं ही स्टेज आता मी ओलांडलेली आहे, असे किती तरी बदल झालेले होते. प्रसंगा–प्रसंगानं ते पुढल्या वर्ष – दीड वर्षात ध्यानात आले.

हुकूमशाहीचा नाश करण्याच्या लढ्याचं पहिलं पाऊल म्हणून




दोन महिन्यांचा कागदोपत्री सश्रम कारावास भोगून तर झाला. बाहेर येऊन पाहतो तर काहीच बदललेलं नव्हतं. हजारो लोक तुरुंगात गेले आणि त्याचा जनतेच्या दिनक्रमावर लहानसा ओरखडासुद्धा उठला नाही. ' आलास सुटून ? बरं झालं '—एवढीच प्रतिक्रिया व्यक्त केली जात होती. अनेक भाव त्यातून व्यक्त होत आहेत असं वाटायचं. आणीबाणी आता वस्तुस्थिती झालेली होती. पुलिस स्टेट लोकांनी जवळजवळ पत्करल्यासारखंच होतं. महायुद्धावर काढलेले चित्रपट आपण नेहमी पाहतो. कुठल्याही युद्धात परागंदा होणारे लोक असतातच. काही कारण नसताना त्यांच्या झुंडीच्या झुंडी सगळं आयुष्य जिथे घालवलं ती गावं सोडून देशोधडीला लागतात. असे निर्वासितांचे लोंढे हाल-अपेष्टा सोशीत जाताना दाखविणं हे दिग्दर्शक मंडळींचं एक आवडतं तंत्र आहे. हेमिंग्वेच्या ' फेअरवेल टू आर्म्स 'वर काढलेल्या चित्रपटातला एक प्रसंग आठवतो. एका घोडागाडीच्या कडेला मांडीवर मूल घेऊन एक आई बसलेली आहे. ती स्वतः नुसती पेंगत नाही, खचलेली आहे, अर्धमेली झालेली आहे. तिची वेदना निस्तेज डोळयांतून अबोलपणे बोलकी झालेली आहे. कुठल्या तरी खड्ड्यातून घोडागाडी जाते आणि धक्का बसून मूल तिच्या हातातनं खाली पडतं. एक क्षणभरच तिच्या चेहऱ्यावर वेदना उमटते, आणि पुढल्याच क्षणाला तो चेहरा निर्विकार होतो. ते मूल उचलून घ्यावं असं तिला वाटत नाही. माणसं काय वाटेल ते सोडू शकतात. परिस्थितीच्या रेट्याखाली विसरू शकतात. निश्चय करून विसरतात. त्या आईनं आपलं मूल टाकून दिलं. दुःख तर तिला झालं असेलच; पण दुःखाच्याही पलीकडे एक बधीरपणा असतो युद्धामुळं सर्वस्व उद्ध्वस्त झालं की, येणारा हा बधीरपणा युरोपनं, रशियानं अनुभवलेला आहे. राग यायचा. आम्ही मात्र इतकं काही न अनुभवता, पण त्या चित्रपटातल्या आईप्रमाणेच आमचे मूलभूत हक्क सहज टाकून दिलेले होते. ठरवून विसरलेले होते. आपण तुरुंगात गेल्यामुळे काहीच घडलं नाही, याची खंत तर वाटत होतीच; त्याहीपेक्षा जास्त खंत आपल्या कारावासामुळे मूलभूत हक्कांची जाणीव जनतेला होईल, काही तरी चाड निर्माण होईल, सरकारला भिऊन का होईना, पण या श्रद्धा जोपासायला लोक शिकतील, ते झालं नाही याची ! कुणावरही चिडण्यात अर्थ नव्हता. ' तुमची हौस म्हणून तुरुंगात गेलात, आमचं ऐकलं नाहीत. आता कुणावर चिडता ? ' असं जर कुणी म्हटलं तर आम्ही काय सांगणार होतो ? ' तुमची हौस ', ' तुमची फॅड ', ' तुमची खुमखुमी ' हे शब्द मात्र धारदार शस्त्रासारखे कापत होते.

सुटलेल्या प्रत्येक सत्याग्रहीनं एकच ठरवलं असेल. पुन्हा पकडलं जायचं नाही. आवश्यक असेल, तर तुरुंगाला भ्यायचं काही कारण नाही. मात्र या सरकारच्या नैतिक मूल्यांवर अवलंबून राहून पुन्हा तुरुंगात जायचं नाही ! यशस्वी माघार घेण्याची वेळ आता आलेली होती. एक प्रयोग करून झाला आणि त्याचा तसा काहीच परिणाम झाला नाही. दुसरा प्रयोग करायचा झाला, तर तो अधिक काळजीपूर्वक करावा असं सगळ्यांचंच मत झालं. त्यामुळे कोणतीही योजना आखताना पहिला विचार या गोष्टीबद्दल अटक होऊ शकते का,

खटला होऊ शकतो का, असाच करावा लागत असे. त्यामुळे नतरच्या सर्व योजना अतिशय मवाळच आखण्यात आल्या. कोणत्याही तऱ्हेची यशाची पुसटशीही खात्री नसताना या संपूर्णपणे अनाकर्षक योजना राबविण अतिशय कटाळवाणं होतं. पत्रकं पोचवणं, 'कर्तव्य'सारख्या अनियतकालिकाचे अंक वाटणं, भारताच्या राष्ट्रपतीना अनेक नागरिकाच्या सह्या असलेलं, बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीला आव्हान देणारं पत्र पाठवण, तेवढ्याशा कागदाच्या चिटोऱ्यावर सह्या घेण्यासाठी लोकांशी वादविवाद करणं, एखाद्या छापखान्यावर पोलिसांचं लक्ष आहे, घरावर पोलिसाचा डोळा आहे असं कळलं की तिथला पुरावा रातोरात नष्ट करणं, इकडून तिकडे हलविणं, अशी ती कंठाळवाणी काम असायची. रात्री नऊ-दहा नंतर भूमिगत कार्यकर्त्यांना भेटायला जाणं, त्यांच्याकडून चार उत्साहाचे शब्द ऐकणं, स्थानबद्ध नेत्यांच्यासंबंधी खऱ्याखोट्या बातम्या ऐकणं, एवढच चालायचं येरवड्याप्रमाणेच बाहेरही येत्या पंधरा दिवसात, येत्या महिन्याभरात काही तरी वेगळं घडणार आणि सर्वजण बाहेर पडणार, तुरुगावर इतका खर्च करणं सरकारला परवडेनासं होणार, अशाच विषयांची चर्चा चालायची, व्हायचं काहीच नाही तेवढे काही दिवस गेले की, नतर परत पुढल्या अफवेची वाट पाहायची.

सगळ्यात अवघड काम म्हणजे आपण सत्याग्रह केला ते योग्यच केलं हे स्वत ला पटवून देणं. ज्यांनी सत्याग्रह केला नाही त्यांना पटवून देणं! आणि जे करून पस्तावले त्यांनाही पटवून देण. मित्रमंडळी तर सरळ सरळ असं म्हणायची – 'तुमच्या सत्याग्रहानं काही होणार नाही, हे आम्हाला माहीतच होतं!' पुढच्यास ठेच आणि मागचा शहाणा, या न्यायाचं हे फार धूर्त उदाहरण पाहून चीड यायची. काही होणार नाही हीसुद्धा एक शक्यता म्हणून आम्ही गृहीत धरलेलीच होती. राजकारण म्हणजे अंदाजांचा खेळ नसतो. सत्याग्रह केल्यावर काय होईल हे कळायला राजकारणात तरी सत्याग्रह करावाच लागतो. ज्यानी ठेच खाल्ली त्यांच्यावद्दल सहानुभूतीचा लवलेश न बाळगता त्याची कुचेष्टा करणं हा आत्मवंचनेचाच एक प्रकार होता. अशी आत्मवंचना करण्यात समाधान वाटतच कसं? हा प्रश्न मनात येऊन मी पुष्कळ वादविवाद करीत असे. सर्वसामान्य सत्याग्रहीला मात्र अशा प्रकारे वादविवाद करता आला नसेल. बऱ्याच वेळा त्याला थट्टेचा विषय व्हावं लागलं असेल. अनेक मित्र असे निघाले की, सत्याग्रहींची कुचेष्टा करू नका, असं त्यांना जरा रागानं सागावं लागलं. इकडे लोकाच्या नोकऱ्या धडाधड सुटत होत्या. ज्यांना पकडलं गेलं, त्यांच्या रजेचे तात्रिक प्रश्न होते तुरुगात असलेल्यांच्या पगाराच काय, त्याच्या कुटुंबियाचे व्यवस्थेच काय, हे प्रश्न जास्त महत्त्वाचे होते. अनेक तरुण मुलांची शाळा–कॉलेजाची वर्षं बुडाली. त्याच्या अभ्यासाचा मेळ पुन्हा बसविणं फार अवघड होतं. आम्ही तुरुंगातले मित्र एकमेकांना भेटून आपापलं मनोधैर्य कायम ठेवण्याची धडपड करीत होतो. सुरुवातीला नेहमीच हास्य-विनोद, दगामस्ती चालायची. उत्साह असायचा, हळूहळू बोलणं गंभीर विषयाकडे वळायच–अमक्याची नोकरी, तमक्याचा अभ्यास. अमुक स्थानबद्धाच्या घरी देण्यासाठी पैसे, त्यांच्या पत्नीसाठी नोकरी असे विषय निघाले की वातावरण गभीर व्हायच. अनिश्चित काळपर्यंत हे ताण संपणार नाहीत असं वाटून मन सुन्न होऊन जायचं.

जनतेला तरी दोष देण्यात काय अर्थ होता? स्थानबद्धाच्या कुटुबियांसाठी जे पैसे गोळा करावे लागत ते तर जनतेकडून येत होते. इतक्या विपरीत परिस्थितीतही नोकऱ्या मिळवून देण्यासाठी धडपडणारे काय सहानुभूतिशून्य थोडेच होते? आणीबाणी असताना किंवा ती शिथिल झाल्यावरही जो पैसा आला, साधनं आली, वाहनं आली तीही जनतेकडूनच आली. तरी कुठे तरी घोटाळा होता. हे सगळं लोकानी दिलं; पण पाठिंबा दिला नाही. प्रत्येक घरातून निदान एक माणूस तुरुंगात जायला हवा होता, तो गेला नाही. किती तरी लोक 'येतो, येतो' म्हणाले; पण आले नाहीत. मुख्य म्हणजे इतकं सगळं महाभारत घडल्यानंतरही जनतेची म्हणून काही ताकद असते, ती जनतेनं ओळखावी लागते. तिच्या जोरावर कोणतंही शासन पूर्णपणे निष्प्रभ करून टाकता येतं. निर्भयपणाला पर्याय नाही हे कोणाच्या लक्षातच येत नव्हतं. जणू काही दोन हिंदुस्थान एकाच देशात झाले होते. घराघरातला आणि रस्त्यांवरचा. घरातली पीडा बाहेर टाकण्याची आमची परंपरा. तेच आमच बाळकडू. बाहेरची पीडा घरात घ्यायला कुणी तयार नव्हतं. सुरक्षिततेची भूमिका घ्यायला कधीच शिकवावं लागत नाही. ती सहजप्रवृत्तीच असते. संकटाच्या प्रसगी तर पहिली प्रतिक्रिया सुरक्षित ठिकाणीच जाण्याची होणार हे उघड आहे; पण सुरक्षिततेला किती महत्त्व द्यायचं या प्रश्नाचं उत्तर, प्रत्येक समाज आपल्या पद्धतीनं आपल्या भाषेत देत असतो, हे लक्षात यायला फार वेळ लागला. याआधीसुद्धा स्वातंत्र्यासाठी प्रयत्न झालेले होते; पण जेव्हा जेव्हा तुरुंगाची भिती घालण्यात आली, तेव्हा तेव्हा फार मोठा जनसमुदाय त्या लढ्यातून कळत-नकळत बाजूलाच गेला. तुरुगाची भीती विलक्षण आहे. म्हैसाळचे श्री.मधुकर देवल यांनी एकदा एक गमतीदार अनुभव सागितला. देवलांनी म्हैसाळच्या हरिजनांसाठी केलेलं काम सर्वश्रुतच आहे. त्याच मोठ्या कामाचा एक भाग म्हणून ते तिथल्या हरिजन स्त्रियांशीही बोलत असत. त्यांच्या सभा घेत असत. काही तरी जागृती आणण्याची धडपड. एकदा त्यानी पाच-पन्नास बायका गोळा करून एक मोर्चा काढला आणि चावडीवर नेला. मोर्चा चावडीवर जाताच साहाजिकच एक–दोन पोलिस सामोरे आले. पोलिस सामोरे येणार ही खरं म्हणजे मोर्चा यशस्वी झाल्याची खूण. ते चिडले, ढकलाढकली, लाठीमार झाला तर चागलंच, पण निदान त्यानी सामोरं यावं अशी अपेक्षा असते. इकडे ते पोलिस आलेले पाहताच बायका चक्क रडायला लागल्या. आता आपल्याला पोराबाळातून उचलून 'झेलात' घालणार यापलीकडे दुसरं काहीही त्याना सुचलं नाही. त्यानी मला ही गोष्ट सांगितली तेव्हा मी खूप हसलो होतो. पुढे पुढे असं वाटायला लागलं की, त्या अशिक्षित, हरिजन बायांना हसण्याचं काहीच कारण नाही. सुशिक्षित घरातल्या, राजकारणाला न चटावलेल्या बायकासुद्धा पोलिस पकडणार असं जर कळलं तर तेच करतील. बायकांचं सोडून द्या. कित्येक बरोबरीचे मित्र असे निघाले की, 'आपणही सत्याग्रह केला असता तर बरं झालं असतं. यांच्याप्रमाणेच दोन–अडीच महिन्याच्या मोबदल्यात आपणही कायमचे निर्भय ठरलो असतो.' असं वाटून ते नंतर अस्वस्थ झाले. कायमचं निर्भय ठरण महत्त्वाचं नाही. आणि तस शभर टक्के निर्भय कुणीही असत नाही; पण भीतीवर

सुद्धा मात करण्याची एक वेळ असते. ती वेळ जर निघून गेली, तर हात हालवत बसण्यापलीकडे काहीही करता येत नाही. आणीबाणी लागू झाल्यामुळे एक प्रकारच्या भीतीवर मात करण्याची एक चांगली संधी आलेली होती. आमच्या पुष्कळ मित्रांनी ती दवडली.

## : २ :

पूर्वी केलं तसं कांम आता करून चालणार नव्हतं. संघाला काय किंवा कुणालाही, खूपच पुर्नविचार करणं फार निकडीचं होतं. संघाला जास्तच. कारण तीन पिढ्यांच्या सवयी त्यांना बदलायच्या होत्या. त्या दृष्टीनं एकीकडे विचार करताना दुसरीकडे स्वतःचीही नोकरी गेलेली होती, म्हणून माझा नोकरी मिळवण्याचा प्रयत्नही चालू होता. एखाद्या संस्थेत अर्ज करणं म्हणजे विलक्षण मानहानी असायची. त्यांच्या जाहिरातीप्रमाणे पदव्या वगैरे असल्या तरी तुरुंगवासाची पदवी सगळ्यात मोठी अभिमानाची होतीच. तीच अडचणीची वाटायची. आम्हाला नोकरी देणं म्हणजे काय एखादा बाँब घरात ठेवणं होतं ? थोडीशी जरी काळजी घेतली असती, तरीही पंतप्रधान काय किंवा त्यांचे हस्तक काय, संगिनी रोखून आमच्या शोधात येणार नव्हते. अतिशय सामान्य असेच आम्ही लोक होतो. फक्त आपल्या शब्दांची किंमत देऊन चुकलेलो होतो. अमुक कॉलेजात इंग्लिशसाठी माणूस हवा आहे असं कळताच तिथला आपला मित्र गाठायचा. त्याच्याकडून पहिला सल्ला असा मिळत असे–' तुझं राजकारण वगैरे बाजूला ठेव. त्याचा उल्लेखसुद्धा करू नकोस. ' आम्ही कुणाचं काय घोडं मारलं होतं ? त्या शिक्षणसंस्थेचं तर काहीच वाकडं केलेलं नव्हतं. तुरुंगात जाऊन आल्याबद्दल काही पगारवाढ मागितली नव्हती की सवलती मागितल्या नव्हत्या. पुन्हा आम्हाला सामावून घेतलं जावं, आमच्या वकुबाप्रमाणे आम्हाला काम मिळावं एवढंच आम्ही मागत होतो. तेही द्यायला लोक सहजासहजी तयार नव्हते. या बाबतीत जर वेगळे अनुभव आले असते, बहुसंख्येनं आले असते तर सत्याग्रहींना नोकऱ्या न मिळतासुद्धा पुष्कळ बरं वाटलं असतं. पुण्यातल्या काही संस्थांनी तर क्षुद्रपणाचं वर्तन केलं. ' संस्थांनी ' असंही म्हणता येणार नाही. त्यांच्यातल्या काही व्यक्तींनी केलं. पुणे विद्यापीठातल्या एका सरकारदरबारी ओळखपाळख असलेल्या गृहस्थांनी तर, जे पूर्वी संघाचे होते आणि म्हणून अप्रिय होते, अशा विद्यापीठातल्याच अधिकाऱ्यांना ' तुमचं नावसुद्धा कळवता येईल, ' इतक्या हलक्या पातळीवर धमक्या दिल्या. एका शाळेतल्या प्रमुखांनी आपल्याच शाळेतल्या एवढ्या शिक्षकांची चौकशी करावी, अशी यादी सरकारला पाठवली. एस्. पी. आणि एम. ई. एस्. या संस्था सरकार ताब्यात घेणार, एवढी सूचना मिळायचा अवकाश, की तिथले स्थानबद्ध, सत्याग्रही यांच्याबाबतीत ते आमच्या गावचेच नव्हेत अशी भूमिका घेण्यात आली. जे पत्रकारांनी केलं ते थोड्या अधिक प्रमाणात सगळ्यांनीच केलं. आणीबाणीने त्यांना वाकायला सांगितलं, आमच्या लोकांनी चक्क लोटांगण घातलं. धक्का देणाऱ्या गोष्टी घडल्या. या काळातली जर शल्यं मोजायची झाली तर २/४ नीतिशतकं लिहावी लागतील. लाचारी, बुद्धिभेद आणि भीती यांच्या कचाट्यातून फार थोडे लोक सुटले. कोल्हापूरचे आमदार कारखानीस कॉंग्रेस पक्षात गेले. स्वतःच्या वीस-एक वर्षांच्या स्वच्छ राजकीय जीवनाची अखेर त्यांनी आणीबाणीत कॉंग्रेस स्वीकारण्यात केली, तर सामान्य माणसांकडून दुसऱ्या कशाची अपेक्षा ठेवणार ? कारखानिसांनी पक्ष बदलला तो दिवस मी अतिशय विषण्ण मनःस्थितीत घालवला. काळच फिरला आहे की काय, असं वाटायला लागलं. चीड, संताप याच्यापलीकडे जाऊन सबंध समाजाबद्दल केवळ संतांनाच असू शकते अशी करुणा क्षणभर माझ्या मनात येऊन गेली.

> वाटे या जनांचे । थोर वा आश्चर्य ।
> न करिती विचार । का हिताचा ।
> कोण आहे दम । ऐसा यांचे पोटी ।

असा तुकारामांचा एक अभंग आहे. तुकोबांनी समाजाला शिव्या पुष्कळ घातल्या, तळतळाट केला; पण कधी कधी ते रागाच्या पलीकडे जातात. आश्तर्यानं, करुणेनं लोकांकडे पाहतात. याच अभंगाच्या शेवटी–

> तुका म्हणे का ही । भोगतिल खाणी ।
> का तो चक्रपाणि । विसरली ? ।

अशी विवंचना त्यांनी व्यक्त केली आहे. तशा विवंचनेत मी पडलो. ' तरुण भारत ', इंदिरा आणि संजय यांची स्तुतिस्तोत्रं गाऊ


दीपावली शुभेच्छा !

तार : मुद्रा, पुणे

फोन : ४४६३६
४४४२८

आतापर्यंत १५ वेळा
भारत सरकारकडून
श्रेष्ठता प्रमाणपत्रे
व
ताम्रपट
मिळालेली

**प्रकाश टाईप फौंड्री**

**२५०–२६७ नारायण पेठ, विजय चित्रमंदिराजवळ,**
**लक्ष्मी रोड, पुणे ४११.०३०**

लागला, त्यापेक्षा बंद का पडला नाही ? इकडे टिळक स्मारक मंदिर दिवसेंदिवस जास्तीत जास्त भव्य आकार घेत होतं. टिळकांनी आपल्या व्यवहारातच काय पण वैरात सुद्धा लोकशाही मार्ग कधी सोडला नाही. त्यांच्या स्मारकाचं उद्घाटन केवळ पंतप्रधानांच्या सवडीनुसार आज–उद्यावर ढकललं जात होतं. ही सगळी लक्षणं काळ फिरल्याचीच मला वाटली. तरीही,

बुडती हे जन । देखवेना डोळा ।

अशी भूमिका घेऊन चाललं नसतं. कसे का असेनात, भित्रे, अप्रामाणिक का असेनात, हे लोक जर जागे झाले तरच काही तरी होणार होतं. ‘शहाणे करावे जन ।’ या मार्गालाही शॉर्टकट् नव्हता, पर्याय नव्हता, पळवाटही नव्हती.

नवीन वाटा शोधण्याची धडपड मात्र सगळ्यांनी प्रामाणिकपणानं केली. खुलेपणानं वावरता येत नसे. रात्री-अपरात्रीसुद्धा नेहमीसारखं दिलखुलास हिंडणं जमत नसे. काही कारण नसताना संशयाला जागा निर्माण व्हायची. तरीही कौटुंबिक अडचणी, दुःखाचे प्रसंग, मध्येच एखाद्या कार्यकर्त्याला पोलिसांनी पकडणं यातून उत्साहानं मार्ग काढण्यासाठी प्रामाणिकपणाने धडपडणारे मित्र, कार्यकर्ते मिळाले म्हणूनच ते दिवस निभावून गेले. संघाचे कार्यकर्ते संपर्क ठेवण्याच्या बाबतीत हाताबाहेर गेलेले. या ना त्या निमित्ताने–कुणाचा वाढदिवस–कुणाची पुण्यतिथी, एखादी सहल, गणपतीत एकत्र आरत्या, एकत्र भोजनाचे कार्यक्रम असं करून ते एकमेकांच्या संपर्कात होते. सगळी वरिष्ठ मंडळी तुरुंगात गेल्यामुळे बहुधा सामान्य लोकच बाहेर राहिलेले होते. त्यांच्या कुवतीप्रमाणे काही तरी करून लोकांना गुंतवून ठेवीत होते. त्यांचं येणं-जाणं, वावरणं मोठं सेन्सेशनल् असायचं. वाटेल तेव्हा भेटायला जाता यायचं नाही. मोठ्यानं त्यांची नावं घ्यायची सोय नव्हती. टोपण नावं वापरली जात: त्यांची राहण्याची ठिकाणं सारखी बदलायची. जणू काही औरंगजेबाच्या तावडीतून सुटलेले दहा-पंधरा शिवाजी पुण्यात वावरत होते ! पोलीसखात्यानंही ती माणसं फारशी महत्त्वाची नव्हती म्हणूनच मागं ठेवली असावीत. एखाद-दुसरा अपवाद सोडला तर बहुतेक सगळे खपे शिपाईगडी होते. ते बाहेर होते ही आनंदाचीच गोष्ट; पण त्यांच्याच प्रभावामुळे नव्या विचारांचा शिरकाव सहजासहजी होत नव्हता. आरत्यांचे कार्यक्रम झाले; पण अभ्यास-मंडळं सुरू झाली नाहीत, याला दुसरं कोण जबाबदार होतं ? हस्ते-परहस्ते अभ्यासाच्या, पुस्तक वाचण्याच्या, सामाजिक प्रश्न, अर्थशास्त्र यांचा अभ्यास करण्याच्या अनेक योजना मी सुचवीत होतो. त्यांची कार्यवाही होत नव्हती. मला त्यांचा राग येत नसे. कारण ते सवयीचे गुलाम होते. त्यातूनही वेगळं काही तरी करायला हवं हे त्यांना पटत होतं, म्हणून आशेला जागा होती. पुन्हा पुन्हा त्यांनाच सांगणं भाग होतं. अशातूनच अनेक ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी काही प्रयत्न केले. उदाहरणार्थ–विद्यार्थी परिषदेतर्फे सामुदायिक विहिरींच्या पाहणीचा उपक्रम मे महिन्यात हाती घेण्यात आला. बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी त्यात भागही घेतला. पुढे मात्र अहवालापलीकडे काही निष्पन्न झालं नाही. हा कार्यक्रम सुचविण्यामागे मुलांनी खेड्यात जावं, विहिरींची


Put your hard earned savings to profitable use.
For sound investment advice regarding shares and Fixed Deposits with Companies etc.

*Contact :*

**J. M. FINANCIAL & INVESTMENT CONSULTANCY SERVICES PVT. LTD.**

**112, Jolly Maker Chambers No. 2, 11th Floor, Nariman Point, 225, Backbay Reclamation, BOMBAY 400 021**

**Administrative Office:**
5-A Hamam Street,
Stock Exchange Building,
Ground Floor, Office No. 21.
FORT, BOMBAY 400 023.

**Poona Office:**
F-11, Shanti Kunj,
1st Floor,
4, Sadhu Vaswani Peth,
POONA 411 001,

पाहणी करण्याच्या निमित्तानं त्या गावांशी त्यांचा संबंध यावा, गावकऱ्यांशी मैत्री व्हावी आणि त्यांनी त्या गावाचा कायापालट करण्याचं काम स्वतःहून स्वीकारावं–अशी बरीच लांब पल्ल्याची योजना होती. ती अमलात आलीच नाही. कार्यकर्ते गेले, फॉर्म भरून परत आले. कार्यालयाला माहिती देऊन पुढल्या आज्ञेची वाट पाहू लागले. म्हणजे मूळ हेतूचाच पराभव झाला. खूप उत्साहाने तरुण मुलं शेती, ग्रामविकास यातल्या तज्ज्ञांकडे जायची. शाखा, सांघिकं, संचलनं–एवढंच काय पण सत्कार, स्पर्धा, बक्षीस समारंभ, शिबिरे याही कार्यक्रमांवर पोलिसांचा डोळा असायचा. काही तरी करायचा उत्साह तर स्वस्थ बसू देत नव्हता. आपल्या संघटनेनं अर्थकारण, समाजकारण करावं म्हणून घसेफोड करून झालेली होती. मग काय करा ? त्यांचे बाहेर राहिलेले अधिकारी सांगायचे, 'मधुकर देवलांना भेटा, ते तुम्हाला प्रॉजेक्ट देतील.' जथा आपला देवलांकडे जायचा. देवलांकडे प्रॉजेक्टना तोटा नाही; पण कावळ्याच्या छत्रीसारखे प्रॉजेक्टस त्यांना नको असतात. पुन्हा ते पक्के संशयी. एखाद्यावर जबाबदारी टाकण्यापूर्वी सत्त्वपरीक्षा घेणारे. तरीही त्यांनी काही प्रॉजेक्टस् सांगितले. हजार रुपये लागतील, ते पंधरा दिवसांत गोळा करून आणतो म्हणून मुलं जी गडप झाली ती महिना-दोन महिन्यांनी आली. स्थानिक कार्यकर्त्यांनी काही तरी दुसरी कामं सांगितली असतील. असं एक-दोनदा झाल्यावर देवलही वैतागले आणि म्हणाले–'तुम्ही वेळ लावा; पण पक्का निश्चय करा. निश्चय करायला तुम्ही पाच वर्षे घेतलीत तरी माझी हरकत नाही. तुमच्या सुदैवानं हिंदुस्थानात इतकं दारिद्रय आहे को, पाच वर्षं उशीरा काम सुरू केलंत तरी तुमच्यापुढचं आव्हान तेवढंच मोठं राहील !' अशा उपहासवजा शब्दांत देवलांनी संघासमोरचा प्रश्न फार चांगला मांडला आहे. विहिरींच्या सर्व्हेचं काम तर चिखलाचे कुल्ले लावण्यासारखं होतं. चार पावलं चाललं की, गळून पडते ! पुन्हा चार पावलांनंतर दुसरे लावायचे की, काही तरी मूलभूत बदल करायचा, मग त्याला थोडा जास्त वेळ लागला तरी चालेल ? हा प्रश्न संघासमोर होता. बाहेर उरलेलं सामान्य नेतृत्व, प्रचंड माणूसबळाचं काय करावं हे कळत नाही म्हणून गोंधळलेलं. संस्कार करणं यापलीकडे काही समाजकार्य असतं, उत्पादक काम असतं हे नुसतं लक्षात आलेलं होतं. त्या मार्गाचं तंत्र माहीतच नव्हतं. नव्या वाटा शोधण्याच्या कामात उत्साह खूप दिसला. वाटा मात्र फारशा मळल्या नाहीत.

## : ३ :

असे गोंधळात पडलेले आम्ही एखादा वसा घेतल्यासारखे अधूनमधून येरवड्यात अडकलेल्या स्थानबद्धांना भेटायला जायचो. ती तासाभराची भेट हे सुद्धा एक कर्मकांडच होऊन बसलं होतं. ४।५ जणांनी जमायचं. तो अर्ज द्यायचा. आपली भेट घ्यायला मुकुंद तापकीर किंवा कुणी तरी तयार आहे याची खात्री करून घ्यायची. तुरुंगाच्या त्या गेटमधून आत जाता जाता एक क्षणभर जुन्या आठवणी काढायच्या. आतमध्ये जेलर आणि वॉर्डरसुद्धा ओळखीचे झालेले असायचे. 'सगळे तुमचे मावसभाऊ आहेत ना !' असं ते आपणहूनच विचारायचे. सगळं सवयीचं झालेलं होतं. एकमेकांच्या सवयींच्या, प्लॅन्सच्या, अभ्यासाच्या, नोकरीच्या, तब्बेतीच्या ठराविक चौकशा. क्वचित कधी काही बातम्यांची देवाण-घेवाण. एखादी चिठ्ठी आत देणं, आतली बाहेर आणणं. आधी जसं पत्र आलं असेल, त्याप्रमाणे खाण्याचे पदार्थ नेऊन देणं आणि सवयीच्या उत्साहानं स्थानबद्ध मित्राशी बोलणं. आम्ही आलो आहो हे कळलं की दहा-बारा जणं काही ना काही निमित्त काढून भेटीच्या तिथे येऊन जायचे. आमच्याशी दोन-दोन वाक्यं बोलून जायचे. सभोवतालचं दृश्यही सवयीचंच झालेलं. एखादं कुटुंब, वडील आत अडकलेले असतानाही त्यांच्यासमोर हसरा चेहरा ठेवणारी मुलं. वयस्कर स्थानबद्धांना भेटायला येणारी प्रौढ माणसं. वयस्क स्थानबद्धांची तर गंमतच होती. ते यात काय आणि बाहेर काय, त्यांना सगळं सारखंच असायचं. त्यांची घरची माणसंही त्यांना कर्तव्य म्हणूनच भेटायला आलेली आहेत असं वाटायचं. त्यातच कुठे तरी एखादी पस्तिशीची गृहिणी आपल्या स्थानबद्ध नवऱ्याच्या शेजारी बसलेली असायची. बाहेर ती काय सोसते आहे हे तिच्या कपड्यांवरून दिसायचं, तिच्या चेहऱ्यावर दिसायचं. डोळ्यांतून बाहेर यायचं. तो नवराही तिला काय सांगणार ? आजचा एक तासभर संपला की पंधरा दिवसांनी पुन्हा एक तासभर. पॅरोल मिळेल का ? घरचे कसे आहेत ? मुलाचा अभ्यास ?– वगैरे प्रश्न १०।१५ मिनिटांत संपून जायचे. समजा, नवऱ्यानं बायकोला विचारलं – 'तुझी प्रकृती कशी आहे ?' तर ती खरं थोडंच सांगणार होती ? आणि यजमानांची प्रकृती बिघडलेली दिसली तर आपल्या सासू-सासऱ्यांना तरी ती कोणत्या तोंडानं खरं सांगणार होती ? अनेक गृहिणींनी त्या २१ महिन्यांत भोगलेलं दुःख अशा एखाद्या स्त्रीला पाहून एक क्षणभर जाणवायचं. साधारण अर्धा तास संपला की आमचेही प्रश्न संपायचे. एक कंटाळवाणा डेड्लॉक निर्माण झालेला होता. प्रत्येक वेळी 'ही शेवटचीच भेट' असं एकमेकाला म्हणतच आम्ही बाहेर यायचो. आपले मित्र आणखी काही वर्षं तरी तुरुंगात राहणार ! कशाच्या निवडणुका आणि कसलं काय ! आणीबाणीनं सगळ्यांचं शंभर टक्के नुकसानच झालं असं थोडंच आहे ? शिस्त वाढली आहे. उत्पादन वाढलं आहे. सगळीकडे शांतता आहे.




कदाचित जगात आपली मान वर झाली सुद्धा असेल! अशी विधानं ऐकून घेण्यापर्यंत आमची वाटचाल झालेली होती. काही जणांची त्याच्याही पुढे झालेली होती. निवडणुका जाहीर होण्याच्या पंधरा दिवस अगोदर सुद्धा आता भारतात निवडणुका होण्याची अपेक्षाच धरू नका, असं म्हणणारे पुष्कळ मित्र आढळले.

स्वतःच्या लोकशाही निष्ठा तावूनसुलाखून निघाव्यात म्हणून सत्याग्रह केला. साधनशुचितेच्या मार्गानं निश्चयपूर्वक चार पावलं टाकली. पण सुटल्यानंतर त्या निष्ठाना धार कशी लावायची, असलेली धार कशी टिकवायची हे कळेनासं झालं कुठे तरी 'माणूस'-सारख्या एखाद्या दिवाळी अंकात 'R डॉक्युमेंट'सारखी कादबरी यायची. आन्तिगॉनसारख नाटक यायचं. 'सत्यकथे'च्या अंकात मिसाचा पाढाच कविता म्हणून छापलेला सापडायचा, 'साधने'-मधून दिवाळीच्या अंधारात आपण आपली ज्योत टिकवू या, प्रत्येकजण लहानशी ज्योत होऊ या, असं आवाहन केलेलं असायचं. तेवढ्यापुरतं फार बरं वाटायचं. आपण जे केलं ते योग्यच होतं आज ना उद्या त्याला फळं धरतील, पुन्हा एकदा आम्ही स्वतंत्र होऊ असं वाटायच. त्याच मनःस्थितीत मी चॅप्लिनचा 'द ग्रेट डिक्टेटर' हा चित्रपट पाहिला आणि नखशिखान्त उत्साहानं भरून गेलो. हुकूमशाही पद्धतीची इतकी दिलखुलास टिंगल क्वचितच केलेली सापडेल. ती टिंगल अभिरुचिसंपन्न तर होतीच; पण राजकीय विचारही ठासून भरलेली होती. सबंध पृथ्वीला एखाद्या फुग्यासारख झेलू पाहणाऱ्या हुकूमशहाच्या हातून तो गोल फुटतो, त्याचा सर्वनाश होतो. भारतातली हुकूमशाही हिटलरच्या तुलनेनं पुष्कळच सौम्य होती. संपूर्ण जगाशो तिचा संबंधही नव्हता. विश्वाच्या सर्वनाशाचा प्रश्न उद्भवतच नव्हता. तरीही आमच्या देशातल्या कित्येक कर्तबगार व्यक्तीच्या आयुष्याचा सत्यानाश झालाच असता. चॅप्लिनचा सिनेमा पाहून असं वाटलं – आणीबाणी शिथिल न होता ती अधिक बंधनकारक होऊ दे, म्हणजे तिचा चिमटा समाजातल्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचेल आणि त्यातूनच आणीबाणीचा निषेध करण्याची इच्छा उत्स्फूर्तपणे होईल! सरकार तसंच वागत होत. जो खड्डा विरोधी पक्षीयासाठी सरकार खणतं आहे, त्यात ते स्वतःच पडेल असं मी नेहमी म्हणत असे. कुठे तरी समतोल टिकून राहतोच. 'You can not fool all the people, for all the time.' हे काही नुसत सुभाषित नसत. तोही एक अनुभवच असतो. तो अनुभव सगळ्यांना येण्यासाठी काय करावं हा प्रश्न फार भेडसावणारा होता. 'जाहीरपणे तर सगळेच लोकशाहीचंच गुणगान करीत होते. पतप्रधानाच्या लोकशाही निष्ठेच्या डागोऱ्यामधून खरा लोकशाहीचा आवाज प्रत्येक व्यक्तीच्या मनात जागृत कसा करायचा? गांधी असं म्हणाले होते,– 'प्रत्येकानं आपल्या आतल्या आवाजाकडे लक्ष दिलं, तो आवाज ऐकला तरी लोकशाही उत्तम प्रकारे चालेल.' हा 'आतला' आवाज ऐकायला फार थोडे लोक तयार होते. कुजबूज चालू ठेवा 'Keep the gossip on' असं मी मित्राना म्हणत असे. कसली कुजबूज? खऱ्या जनतंत्राविषयीची कुजबूज ती जितकी जागी झाली असती, तितका आतला आवाज अधिकच स्पष्ट झाला असता. त्याचा प्रभाव वाढला असता. आमच्यातले बुद्धिजीवी, आमचे लाडके साहित्यिक, आमचे शिक्षक, पत्रकार याच्याकडे त्या दृष्टीनं खूप आशेनं पाहात होतो. हे सगळे लोक कसे वागले? जे काही वागले, ते तसं का वागले? या प्रश्नाचा विचार तेव्हाही केला, आताही तो करायला हवा आहे

## : ४ :

येरवड्याहून मी सुटलो तो सरळ मुंबईला गेलो घरी जाऊन आपण 'इनटॅक्ट' परत आलेले आहोत, हे आई-वडिलांना दाखविण्यासाठी. तुरुंगात जाताना अभ्यासाला विषय नव्हता. सुटलो तेव्हा तो मिळालेला होता. फार जिव्हाळ्याचा विषय. त्या वेळच्या परिस्थितीत प्रत्येक साहित्यिकाच्या दृष्टीनं अत्यत नाजुक, अडचणीचा विषय. मुंबईतल्या काही लेखकांशी आधीपासूनची मैत्री. काहीची ओळख. साहजिकच त्याच्याकडे जावंसं वाटलं. तेव्हा लक्षात आलं नाही, पेण आता असं जाणवतं आहे की, त्याच्याकडे जाणारा मी नेहमीचा नव्हतो. नेहमीच्या चर्चा बहुतेक एखाद्या पुस्तकाबद्दल असायच्या. पुस्तकही त्याचंच, किंवा दुसऱ्या कोणाच तरी! आताचा मी वेगळा होतो. काही तरी वेगळ केल्यावर जणू काही झालंच नाही, असं दाखवीत लहान मुलं मुद्दाम मोठ्या माणसासमोर जातात. काय झालं आहे ते लक्षात याव म्हणूनच तो आटापिटा असतो. लपवायचा प्रयत्न केल्यानं आपल्या कृतीला जास्त उठाव येईल ही खात्री असते. तशी भावना त्या भेटीत होतीच. त्याहीपेक्षा जास्त, ज्यांची पुस्तकच्या पुस्तकं आपल्याला पाठ आहेत, ज्याना आपण एखादं व्रत घेतल्यासारख आपल्या मित्रमंडळीपर्यंत पोचवलं आहे, स्वतःची ऐपत नसताना ज्याची पुस्तकं केवळ दुसऱ्याना वाचायला देण्यासाठी आपण विकत घेत असतो, त्याना भेटायच होतं. प्रश्न विचारायचे होते. उत्तरं पटली नाहीत तर वेळप्रसंगी भांडायचं होतं. वादविवाद करायचा होता

नेहमीप्रमाणेच श्री. जयवत दळवी यांना यूसिसमध्ये भेटायला गेलो. त्याच्या ऑफिसच्या खोलीत तासन्‌तास गप्पा मारलेल्या आठवत होत्या. कुणीही झाल तरी मार्च महिन्यात मी मोकळा कसा, शाळामास्तरला तर मार्च महिन्यात डोकं वर काढता येत नाही.' मग आताच मला रजा कशी? हा प्रश्न लगेच विचारीत असे. त्यांनीही तो विचारला. त्याना मनापासून आनंद झाला आणीबाणीला प्रकट विरोध त्यानी केलेला नव्हता. 'माणूस' मधल्या मुलाखतीत सुद्धा आपण फार लहान असतो, ताकदीनं कमी असतो, फार मोठं आव्हान उभं राहिलं तर ते स्वीकारूच,याची खात्री नसते, अशा अर्थाची कबुली त्यानी दिलेली होती. कुठल्याच प्रश्नावर पोटात एक आणि ओठात एक असं बोलायची त्याना सवय नाही. त्याचा तो स्वभावच नाही. अनेक वेळा निरनिराळ्या साहित्यिकावरून आम्ही भांडलेलो आहे, वाद घातलेले आहेत. दळवीच्या साहित्यावरही चिरफाड म्हणता येईल, अशा प्रकारे मी त्याच्याशी बोललो आहे. सत्याग्रहाला त्याचा काही 'तात्त्विक' वगैरे विरोध नाही, याचा आनंद तर झालाच; पण त्यांचं पुढल वाक्य जास्त समाधान देणारं होतं. ते म्हणाले, 'तुम्हाला बरं वाटेल असं काही तरी आता मी सागतो. या

वर्षी माझ्या नाटकाला मिळालेलं सरकारचं पारितोषिक मी परत केलेलं आहे. 'तसं तुम्ही पत्र लिहिलंत का ? आणीबाणी असल्यामुळं मी हे स्वीकारीन नाही, असा स्पष्ट उल्लेख केलात का ?' मी खात्री करून घेण्यासाठी विचारलं. त्यालाही त्यांचा होकार आला. प्रत्येकानं आपल्या पातळीवर लढायचं जमलं नाही तर निदान झुकायच नाही, लोटांगण घालायचं नाही, अशी त्यांची भूमिका होती. तिचा प्रभाव राजकीय परिस्थितीवर किती झाला कोण जाणे ! फारसा झालाच नसणार, परंतु त्यांच्या स्वतःच्या जीवनावर आणि मित्र-मंडळींच्या मनावर नक्कीच झाला असेल.

दळवी जर तोंडदेखलं बोलू शकत नसले, तर स्पष्टवक्तेपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या श्री. ना. पेंडशांसारख्या स्पष्ट बोलून अप्रिय झालेल्या लेखकाकडून मनमोकळेपणाशिवाय दुसरी कोणतीच अपेक्षा ठेवणं शक्य नव्हतं. तुरुंगात जाण्यापूर्वी काही महिने अगोदर मी त्यांचं 'लेखक आणि माणूस' वाचलं. आपल्या आवडत्या कादंबरी-काराचो जडणघडण प्रत्यक्ष घडताना पाहिल्यासारखं वाटलं. ते स्वतःवर बेहद्द खूप आहेत, असा भास त्या पुस्तकातून होतो. तो अनाठायी नाही अशाच त्यातल्या घटना आहेत. त्यांच्या सगळ्या लेखनाची बीजं त्यांच्या अनुभवात असतात आणि ते अनुभवही तितकेच उत्कट असतात. खरं म्हणजे सेन्सॉरशिप लागू झाल्यावर लेखकाची मनःस्थिती कशी झाली असेल, कुणी तरी आपला गळा दाबतो आहे, ऊर्मी मारून टाकतो आहे हा अनुभव त्याला कसा आला असेल या विषयावर त्यांनी कादंबरी लिहायला हवी होती ! आणि ते तर आणीबाणीला पाठिंबा देऊन मोकळे झाले. श्री. ना. पेंडसे, कुसुमाग्रज म्हणजे दोन प्रांतातले दादा ! 'विशाखा' लिहि-णाऱ्यांनी, 'रथचक्र' लिहिणाऱ्यांनी लेखनस्वातंत्र्याच्या बाजूनं उभं रहायचं नाही, गप्पही बसायचं नाही. टी. व्ही. वरच्या मुलाखतीत श्री. ना. पेंडशांनी आणीबाणीला पाठिंबा जाहीर करायचा, म्हणजे काळ फिरला नाही म्हणायचं तर काय म्हणायचं ? त्यांना भेटायला मी गेलो तो खूपच हिरमुसला होऊन गेलेलो होतो. इकडे श्री. ना. तर एका वेगळ्या समाधानात होते. कुठल्याही साहित्यिक वर्तुळात असे ते नसतात. गट करून राहण्याचा स्वभाव त्यांचा नाही. गट म्हटलं की एकाला पत्करणं आणि दुसऱ्याला टाकणं ओघानंच येतं. पेंडसे दोघांनाही टाकतात. एखादाच साहित्यिक मित्र त्यांना असतो. तेवढा त्यांना पुरतो. त्याचा एक थोडासा चमत्कारिक अभिमानही त्यांना आहे. साहित्य संमेलनाचं अध्यक्षपदही आपण फारसं महत्त्वाचं मानीत नाही, मानलं नाही—असं ते मोकळेपणानं सांगतात. बऱ्या-वाईटाचा मुद्दा नाही, ते तसेच आहेत. त्यामुळे ते म्हणाले—'इतर मुंबईतले साहित्यिक एकीकडे धड पाठिंबा देत नाहीत, दुसरीकडे धड विरोधही करीत नाहीत. खाजगीत विरोध केला तरी सरकार-दरबारी त्यांचा राबता असतो. कमिटयांवर वर्णी असते. असल्या लबाड्या करण्यापेक्षा मी माझी जी काही भूमिका आहे, ती प्रामाणिकपणानं मांडली. तिच्या परिणामाला मी तयार आहे !' त्यांचं म्हणणं बरोबरच होतं. पण मुंबईतल्या इतर साहित्यिकांपेक्षा शिरूभाऊ प्रामाणिक आहेत की नाहीत हा प्रश्नच कुठे उद्भवत होता ? कदाचित माणूस म्हणून ते प्रामाणिक ठरलेही असतील; पण लेखनस्वातंत्र्याची गळचेपी त्यांना सहन कशी झाली ? तिचं समर्थन त्यांनी कसं केलं ? हे प्रश्न माझ्यापुढे नाचू लागले. तेही आपणहून म्हणाले—'स्वतःच्या मताकरिता तुम्ही तुरुंगात जाण्याचं धैर्य दाखविलं आहे. तुम्हाला माझ्या भूमिकेवर बोलण्याचा हक्क निश्चितच आहे, असं मी मानतो.' म्हणून मी त्यांना तसं विचारलं. त्यांनी जी कारणं दिली ती नेहमीचीच अराजकाची धास्ती, लोकसभेत होणाऱ्या मारा-माऱ्या, रेल्वेसारख्या आवश्यक सेवेचा संप, याद्वारे उद्योगधंदे सुद्धा बंद पाडण्याइतकी गुर्मी इत्यादी. ही कारणं तर खरीच होती; पण लोक-शाही सरकारनं त्यांना तोंड देणं हीच त्या सरकारची, त्या लोकशाहीची परीक्षा असते. लोकशाही मार्गानं उत्तीर्ण व्हायची असते, असा साधा विचार तुम्हाला का सुचला नाही ? असं विचारल्यावर त्यांना मला काही फारसं पटणारं उत्तर दिल्याचं आठवत नाही. हुकूम-शाहीच्या प्रथमावस्थेत कुठल्याही समाजात शिस्त, सुव्यवस्था आणि उत्पादन वाढलेलं दिसतं. भारतात किती वाढलं होतं कुणास ठाऊक ! वाढल्याचं सांगत तरी होते. विसाव्या शतकातल्या निरनिराळ्या हुकूमशाही राजवटींचं वरवर निरीक्षण केलं तरी पुढे ती उत्पादनवाढ टिकली नाही, शिस्तीपेक्षा असंतोष जास्त निर्माण झाला हे कळतं. पण सरकारनं बजावून सांगितलेल्या आकडेवारीत पेंडसे फसले होते. 'माझा भाऊ उद्योग चालवतो. त्यानंसुद्धा कामगारांच्यात जास्त शिस्त आली आहे असं सांगितलं.' ते म्हणाले. 'भितीपोटी आलेली शिस्त टिकेल का ? दहशतीच्या वातावरणातला उत्साह नॉर्मल म्हणता येईल का ?' या प्रश्नांना उत्तरं देणं त्यांनाही जमलं नाही. कुणालाच जमत नसे. त्या वेळचा प्रचार १०० टक्के खरा धरला असता तरीही आणीबाणीचं समर्थन करता आलं नसतं. सरकार सांगत होतं, तसे भाव कमी झाले असते तर महागाईबरोबर अर्थ-व्यवस्थाच कोसळली असती. तरीही भले—भले त्या प्रचाराला फसले. श्री. नां. चा शेवटचा मुद्दा नेहमीचाच मुंबईकराचा होता. कोणत्याही महानगरात दोन जगांचं युद्ध चालू असतं. श्रीमंतांचं, बंगल्यांचं, अलिशान मोटरगाड्यांचं, फाइव्ह स्टार हॉटेल्सचं, ज्या जगात गुन्हेगारी सुद्धा विलासी असते, असं जग— आणि दुसरं झोपडपट्ट्यांचं, दारिद्र्याचं, रोगराईचं, व्यसनांचं आणि गरजेपोटी गुन्हेगारी निर्माण होणारं जग, त्यांचा लढाही सूक्ष्मपणे चालू असतो आणि ह्या लढ्यात सापडलेला मध्यमवर्गीय स्वतःला दोन्हीकडून धोका आहे असं मानतो. असुरक्षिततेच्या भीतीपोटी स्वतःला, स्वतःच्या कोषात, एक, दोन,


फोन : **सरदारगृह** ३१४३३७

**राहण्याची व भोजनाची उत्तम सोय**

हीरकमहोत्सवानिमित्त विविध सुखसोयी

अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह

**सरदारगृह प्रा. लि.**

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**मंगलकार्ये व मेजवानीसाठी उत्तम व्यवस्था**

तीनं खोल्यांच्या घरात जास्तच कोंडून घेतो आणि मग शिरुभाऊंच्या-सारखे लोक म्हणतात–'अहो, काय सागायचं, सकाळी बाहेर पडलेला मनुष्य संध्याकाळी घरी येईल की नाही इतकी अवस्था होती. आता कस निर्धास्त वाटतं !' त्याच सुमारास कुठे तरी राजनसारखी प्रकरणं घडत असतील, घडू शकतील हा विचारही त्यांना शिवू नये ? मी भयकर चिडलो. तुमच्या घरातला एखादा मनुष्य परत येईल की नाही याची चिंता तुम्हाला वाटत होती. ती मिटली म्हणून एवढा आनंद ? त्याची एवढी किंमत ? त्या आनंदाच्या भरात ७०–८० हजार कार्यकर्ते तुरुगात अडकलेले आहेत, त्यांची तुम्हाला आठवण-सुद्धा होऊ नये ? त्याचं काय होईल, त्यांच्या कुटुबाचं काय होईल हा विचार सुद्धा जर मनात येत नसेल, तर आम्ही किती दुष्ट होतो ! आणि तो मनात येऊनही जर आणीबाणीचं समर्थन आम्ही केलं असेल तर आमच्यासारखे दुर्दैवी आम्हीच होतो. People get the government they deserve अस म्हणतात, ते आम्ही खरं करीत होतो. त्या दिवशी श्री. ना. पेंडशांशी बोलताना हे आर्ग्युमेंट् मी पहिल्यादा केल. त्या दिवशी ते परिणामकारक ठरलं. पुढेही अनेक चर्चांमध्ये वापरावं लागलं. सामान्य जनतेच्या तथाकथित सुरक्षितते-साठी कार्यकर्ते आणि नेतेमडळीचे प्राण जर ओलीस ठेवावे लागत असतील तर जनताही तितकीच असुरक्षित होती, हतबल होती. सकाळी गेलेला माणूस संध्याकाळी आला नाही तर आता दादफिर्याद सुद्धा करता येणार नाही, याचा विसर माणूस म्हणून, लेखक म्हणून पड-तोच कसा ? माझ डोकं भणभणून गेलं. आणखी किती जणांना हे पटवून द्यावं लागणार, अस वाटून हताश झालो. पुढे निवडणुका जाहीर झाल्यावर पेंडशांनी जनता पक्षाला पाठिंबा दिला. आर्थिक मदत दिली, हे कळल्यावर माझा आवडता कादंबरीकार परत एकदा मला सापडला अस वाटलं.

जयवंत दळवीना जर राज्य सरकारचं पारितोषिक मिळालं, तर डॉ. रा. भा. पाटणकर याना साहित्य अकादमीचं बक्षीस मिळालं. बक्षीस मोठं. मानही मोठा. डॉ. पाटणकराइतकी कमी पुस्तकं लिहून हे पारितोषिक मिळवणारे लेखक फार थोडे असतील. चटकन् विचार केला तर श्री. द. न. गोखले यांचं नाव डोळ्यापुढे येतं. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळणं म्हणजे त्या लेखकाच्या करियरचा एक महत्त्वाचा क्षण. त्याच्यात बरंच राजकारण असतं असं म्हणतात; पण सौंदर्यशास्त्रावरच्या ग्रंथाला पुरस्कार मिळणं याच्यात राजकारण असेलच असं काही वाटत नाही. त्यांचं दुर्दैव, की नेमक आणीबाणीत त्याना ते पारितोषिक जाहीर करण्यात आल. आता पाटणकरानी काय करावं ? इकडे दुर्गाबाई तर सरकारवर कडाडून हल्ले करीत होत्या. समित्याचे राजीनामे द्यावेत असं म्हणत होत्या. सरकारी पारितोषिकं स्वीकारायला तर त्यांचा सक्त विरोध होता. त्यांचही म्हणण वाजवी होतं. स्वत:चा बावनकशीपणा या निमित्तानं मराठी लेखकानी सिद्ध करावा म्हणून ती बाई तळमळत होती, अजूनही तळमळते आहे पाटणकर तर शांत, सौम्य असे मध्यममार्गी प्राध्या-पक. सार्वजनिक जीवनात, राजकारणात ते आणीबाणीपूर्वीही नव्हते, न ।रही नव्हते. पुन्हा त्याच लेखनाचं, अभ्यासाचं क्षेत्र इतक अ-राज-कीय आहे की, सेन्सॉरशिपचा धुमाकूळ तिथे कधी सुरूच झाला नसता! सौंदर्यशास्त्रातलं जर राजकारणी मडळीना आणि पोलीस-सेन्सॉरला कळायला लागलं तर देशात अराजक माजेल, असं तुरुंगात जायच्या महिनाभर आधी पुण्याला पाटणकरांच्याच पुस्तकावर एक परिसंवाद झाला, तो ऐकून मला वाटलं होतं ! तेव्हा खरंच एका प्रकारे अ-राजकीय असंच त्याच जीवन आणि तसंच लेखन. ते काही सर-कारचा निषेध करून पारितोषिक परत करीनात आणि दुर्गाबाईंचं समाधान होईना. दुर्गाबाईंनी त्यांच्यावर जाहीर नाही तरी मित्रमंड-ळीत टीका केली असावी. पाटणकर फार खिन्न झालेले होते. आपल्यावर कोणी टीका केली तर काही माणसाना राग येण्याऐवजी दु:खच जास्त होतं. ते त्यातलेच आहेत. मी त्याच्याकडे गेलो होतो, तो त्यांनी माझे गाईड व्हावं म्हणून. माझाच गाइडन्स त्यांनी मागितला. त्या वेळी त्याच्या सर्व मित्रांना ते बहुधा तोच प्रश्न विचारीत होते, 'मी जर पारितोषिक परत केलं नाही, तर माझं काय चुकलं ? लेखनस्वातंत्र्याच्या विरुद्ध मी गेलो असा त्याचा अर्थ कसा निघू शकतो ?' पाटणकरांची केस भलतीच गुतागुंतीची होती. काहीही झालं असतं तरी आरोप–प्रत्यारोप, 'मुद्दा तुम्हालाच कळला नाही,' अशा भानगडीत त्यांना पडायचं नव्हत. पण माझ मत मात्र त्यांना हवं होतं. पेंडशाप्रमाणेच तेही माझ्या तुरुंगवासामुळं माझ्या मताला जरा जास्तच महत्त्व देत आहेत, अस मला वाटलं. 'हे पारितोषिक स्वीकारायचं हा निर्णय तुम्ही कसा घेतलात ते मला सांगा, म्हणजे मला काही तरी बोलता येईल.' मी त्यांना म्हणालो. भलत्याच मोठ्या माणसांच्या वर्तनाची परीक्षा करायला बसल्याचं ओझ मला अधिकच बावचळून टाकीत होत. त्यांचं असं म्हणण पडलं की, साहित्य अकादमी ही एक अ–राजकीय अशी संस्था आहे. राजकीय कारणानी पारितोषिकं दिली जात नाहीत. साहित्य-अकादमीच्या सदस्यांची नाव वाचली. शिफारस समितीची नावं वाचली तरीही तिचं गैरराजकीय स्वरूप सिद्ध होईल. आणीबाणी आणि सेन्सॉरशिप यांचा संबध मुख्यत: राजकारण आणि राजकीय ध्वनी असलेल्या वाङ्‌मयाशी होता. त्याच्या ग्रंथाशी तो नव्हता. त्याच्या म्हणण्यात पुष्कळच तथ्य आहे असं मला वाटल. तरीही दुर्गाबाई आणि कराडच्या साहित्यसंमेलनातला त्यांचा रोल पुष्कळच प्रभाव पाडून गेलेला होता. मला काही चूक–बरोबर ठरवता येईना. लेखनस्वातंत्र्याची सरसकट गळचेपी झाली असं मानलं तरी सौदर्यशास्त्रीय लेखनाला निसटून जाण्याइतकी फट होती, हेही खरंच. मी त्यांना म्हणालो – 'तुमची स्वत:ची खात्री आहे ना अकादमीच्या अ–राजकीय स्वरूपाबद्दल ? तुमच्या सदसद्विवेक बुद्धीला ते पटलेल आहे ना ?' पाटणकर 'हो' म्हणाले. तस असेल तर I must respect your conscience. कारण तोच लोकशाही मार्ग असतो.' असं म्हणून मी चेंडू पुन्हा त्यांच्या कोर्टात मारला. नतर आम्ही तो विषयही बदलला. मी स्वत. 'नरो वा कुंजरो वा' अशी भूमिका घेतली हे मला जाणवत होतं. पण त्याच्या प्रश्नावर कसा विचार करावा याबद्दल गोंधळच जास्त होता. एकीकडे झालेल्या सगळ्या गोष्टी पाहूनसुद्धा पाटणकर एखादी सर-कारी समिती पूर्णपणे अ–राजकीय आहे असं मनापासून मानतातच कसं हा प्रश्न आणि दुसरीकडे एखाद्या लेखकाची जर खात्री असेल की, त्याच्या वाङ्‌मयाच्या गौरवात कोणतंही राजकारण नाही, तर त्याला लोकशाही मार्गानं कसं पटवून द्याव, असा दुसरा आपल्यावरही जबाबदारी टाकणारा प्रश्न. अजूनही या दोन्ही प्रश्नाची उत्तर मला सापडलेली नाहीत.

'स्वेदगंगा' लिहिणारे, 'नवयुवकांनो, संघटनेचो तलवार करी घ्या रे' अशी थोडीशी चमत्कारिक वाटणाऱ्या रूपकानं सुरू होणारी कविता सुद्धा सामाजिक जाणिवेच्या भरात लिहिणारे विंदा करंदीकर—त्यांच्याकडेही गेलो. करंदीकर म्हणजे एके काळचं दैवत. केशवसुत, कुसुमाग्रज, मर्ढेकर, अनिल, बाबा आमटे यांच्यानंतर नाव घ्यायचं तर करंदीकरांचं. 'ती जनता अमर आहे' म्हणजे मराठीतली सामाजिक विद्रोहाची एकमेव कविता, असं कित्येक वर्षं सगळ्यांना सांगत आलेलो. करंदीकरांचा माझा परिचय नव्हता. 'लेखक आणि माणूस' लिहिताना श्री. ना. पेंडसे यांनी करंदीकरांच्यातला माणूसही व्यवस्थित उलगडून दाखवला आहे. त्यातून आणि त्यांच्या कवितांमधूनच मी त्यांना थोडं-फार ओळखलेलं होतं. 'राजा लिअर' वाचून मात्र मी खूपच प्रभावित झालो. शेक्सपिअरच्या कलाकृतींचा, विशेषतः लिअरचा जिवंत अनुभव घेतल्यावर हे मराठीत यावं अशी तळमळ लागते, स्वानुभवानंच ती समजू शकते. करंदीकरांचा 'राजा लिअर' शेक्सपीअरच्याच तोलानं, वजनानं मराठीत उतरला आहे. प्रस्तावना, संहिता, टीपा, परिशिष्ट शेक्सपीअरच्या Arden, Cambridge, Wanwick वगैरे आवृत्त्यांइतकीच वजनदार आहेत, भारदस्त आहेत. 'लिअर' हे आपल्यातलं एक नातं आहे, समान सूत्र आहे असं मी त्यांना लिहिलं होतं!

करंदीकरांना आणीबाणीत कसं वाटत असेल? आपण सत्याग्रह केला म्हणून त्यांना आनंद तर नक्कीच होईल. त्यांच्याशी बोलायलाही फार मजा येईल असा विचार करीत बांद्रा रेल्वे स्टेशनपासून भर दुपारच्या उन्हात दीड-दोन मैल डांबरी रस्ता तुडवून 'साहित्य सहवास' मध्ये पोचलो. ५ जिने चढून करंदीकरांपर्यंत पोचलो. आपल्या आवडत्या क्रांतिकारक कवीला भेटायला पुरेशी जहाल पार्श्वभूमी तयार झालेली होती. मानसिक पुण्याला, शारीरिक मुंबईला. दार उघडणारे विंदासुद्धा शस्त्रंच घेऊन बसलेले होते. घरगुती शस्त्रं. खिळे, मोळे, हातोडी, करवत वगैरे. मला भेटून अर्थातच त्यांना बरं वाटलं. 'इकडे कसं काय?' वगैरे प्रश्नांना मीही उत्तरं दिली. नेहमीचीच. पण थोडी जास्त उत्कटतेनं दिली. क्रांतिकारक कवीशी बोलत होतो ना! एकीकडे ते त्यांचं काम करीत होते. दुसरीकडे स्वतःबद्दल बोलत होते. त्यांच्यावरच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या कशा संपलेल्या होत्या; मुलं-मुली कशी मार्गी लागलेली होती, कोण, कुठे, काय करीत होतं, वगैरे माहिती त्यांनी पुरवली. आवडत्या माणसाची कौटुंबिक माहिती मिळवायला मला नेहमीच आवडतं. दळवींना जेव्हा मी प्रथम तीन-चार पत्र लिहिली, वारवार घरच्या मंडळींस नमस्कार असं लिहूनही घरची मंडळी कोण ते कळेना तेव्हा मीच एकदा कुटुंबियांची माहिती कळवा असं लिहिलं आणि त्यांनीही मिष्कीलपणानं आयटेम् आणि संख्या व नाव असं कोष्टकच बनवून पाठवलं. म्हणजे बायको,—एक सौ. उमा दळवी—असं. ती गंमत आठवत होती. तरीही विंदानी दुसरं काही तरी बोलावं असं वाटून गेलं. तुरुंगातून सुटलेला मनुष्य भेटल्यावर सगळ्या कामातून मी कसा मोकळा झालो आहे हेच मला माझा क्रांतिकारक लेखक सांगत होता. १।२ वेळा काही राजकारणावर बोलणं झालं, पण ते तेवढ्यापुरतंच. पुन्हा आपली गाडी 'ही मुलीची खोली-दुसऱ्या मुलाची खोली.' याच्यावरच यायची. आत्मीयतेनंच ती माहिती ते मला सांगत होते; पण ५ व्या मजल्यावर राहून धक्का बसावा इतके ते वस्तुस्थितीपासून दूर गेले आहेत—उंच 'पोचले' आहेत की काय, अशी शंका येऊ लागली. कवी आणि माणूस याच्यात कुठे तरी फट पडली. पुण्याला आल्यावर आमच्या दोघांच्याही कॉमन् मित्राशी मी याविषयी बोललो. एकजण मला म्हणाले—'त्याच्यात काय आश्चर्य वाटायचंय्? कम्पार्टमेंट्स करून जगणं हा मराठी लेखकांचा, इन्टेलेक्चुअल्सचा जन्मसिद्ध हक्क आहे.' विंदा आणि इतर कवी खरोखरच असे सोयीचे कंपार्टमेंट्स करून जगत होते की काय? त्याचा त्यांना कोणता फायदा झाला? अशी काय अलौकिक सुरक्षितता त्यांच्या वाट्याला आली?

कराडचं साहित्य संमेलन पत्रकमय करून टाकणारे कित्येक सत्याग्रही तुरुंगात भेटलेले होते. सातारा जिल्ह्यातल्या स्थानबद्धांकडून दुर्गाबाईंनी यशवंतरावांवर कशी व्यवस्थित मात केली, आणीबाणीला पाठिंबा देणारा ठराव संमेलनात आणू पाहणाऱ्या यशवंतरावांना 'तुम्ही स्वागताध्यक्ष असाल, तर मी अध्यक्ष आहे!' असा निरोप त्यांनी कसा पाठवला, तो ठराव तर येऊ दिला नाहीच, पण उलटपक्षी यशवंतरावांनाच जयप्रकाशजीच्यासाठी झालेल्या सदिच्छा—प्रार्थनेत सहभागी होण्यास भाग पाडलं, इत्यादी त्यांच्या पराक्रमाच्या कथा पुन्हा पुन्हा ऐकायला मिळत. मराठी साहित्यिकांना पुष्कळच अभिमान वाटावा असा तो क्षण, दुर्गाबाईंमुळे आला. त्याची अशी इच्छा होती की साहित्यिकांनी, म्हणजे कै. खांडेकर, पु ल. देशपांडे, रणजित देसाई यांच्यासारख्यांनी त्यांना मिळालेले पद्मश्री वगैरे सन्मान परत करावेत. चव्हाण तिथे असताना त्या घोषणा आणीबाणीच्या निषेधार्थ कराव्यात. फार चांगली कल्पना आणि पुरेशी अहिंसक. साहित्यिक मंडळींना लागते तशी प्रतीकात्मक. खरं म्हणजे सगळ्या साहित्यिकांनी एकमुखानं घोषणा देऊन सेन्सॉरशिपचा धिक्कार केला असता, तर यशवंतराव काय करणार होते? सगळ्यांना एकदम तुरुंगात ठेवणार होते? तिथे गोळा झालेल्या ७।८ हजार माणसांना एकदम तुरुंगात टाकून कराडला ठेवणार तरी कुठे होते? वि. म दांडेकरांनी त्याची रेवडी पुण्याला उडवली, तेव्हा जळफळण्यापलीकडे त्यांनी काय केलं? पण यातून कदाचित वाङ्मयीन मंचावर राजकारण आणल्याचा आरोप काही साहित्यिकांनीच केला असता. सन्मान परत केले असते तरी पुष्कळ झालं असतं; पण


उत्कर्ष व प्रगती
हीच आमच्यावरील विश्वासाची पावती!

**एन्. व्ही. गोखले**

सर्व तऱ्हेच्या टोप्या, छत्र्या, रेनकोट, सुती व गरम होजियरी,
तयार कपडे व मच्छरदाण्यांचे व्यापारी.
**प्रार्थनासमाजाजवळ, गिरगाव, मुंबई—४**
यांचे दुकानीच जाणे श्रेयस्कर!

ते सगळं बारगळलं का बारगळलं ? तिथे सतत हजर असलेल्या काही मित्रानी त्याची हकीकत सांगितली. असा काही तरी बेत शिजलेला आहे याची कुणकूण यशवंतरावांना लागली असावी. तेही पट्टीचे राजकारणी ! साहित्यिकांना हाताळण्यात कौतुकास्पद यश मिळवलेले. कै. खांडेकर जसे व्यासपीठाकडे यायला लागले, तसे ते त्यांच्याकडे गेले. नेहमीप्रमाणे प्रेमाच प्रदर्शन करते झाले आणि काय झाल कुणाला ठाऊक ! भाऊसाहेबाचाच निश्चय बारगळला. ८० च्या आसपास आलेल्या खांडेकराना परिणामांची भीती वाटली असेल, असं काही संभवत नाही. साहेबाच्या गोड बोलण्याला बहुतेक ते फसले, भुलले. त्यांनी काही सन्मान परत केला नाही. ते न करू देत इतरांनी का केला नाही ? त्याच्यात काही अग्रक्रमाचा मुद्दा थोडाच होता ? श्री. पु. ल. देशपांडे, रणजित देसाई–सगळे स्वस्थ बसले. त्यांच्यापैकी कुणी जर धोका पत्करला असता, तर खांडेकरांना पुन्हा स्फुरण सुद्धा आल असत. खांडेकरानी काही केलं नाही, पण तुम्ही का गप्प बसलात ? असं त्याना विचारल्यावर ते म्हणाले – 'आता कोण छापणार ? ' नाही तरी काय छापून येत होतं ? तुरुगात गेलेल्यांची नाव काय, पण बातमीसुद्धा कधी आली नाही. तिथे काही हजार लोक साक्ष असताना केलेली गोष्ट 'छापली जाणार नाही' याची खंत वाटावी, यासारख दुर्दैव नाही. पु. ल. ना काय कमी प्रसिद्धी मिळाली आहे, की त्यानी प्रसिद्धीच महत्त्वाची मानावी ? केवळ व्यक्तिगत प्रसिद्धीसाठी ते तसं म्हणाले नाहीत. मराठी लेखकांचा निषेध जनतेपर्यंत पोचू शकणारच नाही, तो वाया जाईल म्हणून म्हणाले, असं एक क्षणभर गृहीत धरलं तरीसुद्धा प्रश्न सुटत नाही. कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनात काही हजाराचा जनसमुदाय उपस्थित होता. त्यात वाचकाचे प्रतिनिधी होते, साहित्यिक–पत्रकार होते आणि यशवंतराव चव्हाण तिथे असल्यामुळं निवडक राजकीय कार्यकर्ते असणारच ! अशा काही हजार लोकाच्यापुढं जर हा निषेध झाला असता तर ही 'वार्ताच कौतुकवती' आपोआप पसरली असतीच, गावोगाव गेली असती. याचा विचार न करता केवळ छापील प्रसिद्धी मिळणार नाही म्हणून अशी सोन्यासारखी संधी आपल्या हातानं वाया घालवावी ! तर तो विषय तिथेच संपला. समेलनाच 'साहित्य–रूप' कायम राहिलं, अभग राहिलं. पुढं निवडणुकाच्या वेळी पु ल. नी अक्षरशः आपलं शरीर झिजविलं. महाराष्ट्रभर प्रचंड सभा त्यांच्या एकट्याच्या झाल्या. पु. लं. ची सभा झाली म्हणून दाजीबा देसाई निवडून आले – अस कोल्हापूरचे लोक अजूनही सांगतात. 'माझ्या आयुष्यातला अत्यंत अपमानास्पद काळ' अस ते आणीबाणीच्या १९ महिन्यांचं वर्णन करीत असा कोणता अपमान त्यांचा झाला ? कोणत्या अपमानाचा धोका त्यानी पत्करला? जेव्हा मान पणाला लावला जातो, तेव्हा एक तर अपमान होतो, किंवा बहुमान होतो ! जर स्वाभिमान कसोटीला लावलाच नाही, तर कशाला अपमान होईल ? निर्बंध शिथिल झाल्यावर स्वाभिमान दाखविल्यामुळे, जर पु लं. ना इतकी लोकप्रियता मिळाली, तर निर्बंध असताना किती मिळाली असती ? छापण्याचाच मुद्दा जर असेल, तर आजच्या दसपट छापलं गेलं असतं. वेळेचं महत्त्व फार असतं. वेळ चुकली आणि आमचे बहुसंख्य साहित्यिक 'असू लाडके देवाचे' असे जे होते, ते एका झटक्यात 'मी गण-मात्रा जुळणारा' इतके खाली येऊन बसले.

समीक्षकाचीही दाणादाण. बुद्धिवताचीही दाणादाण. त्यातून आरोप – प्रत्यारोप, शब्दच्छल–यांची तर किती उदाहरणं सागावीत ? विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्याविभागात श्री. प्रभाकर पाध्ये यांनी बोलावं अशी त्याना विनंती करण्यात आली. पुण्यातले काही इतर संस्थाचे लोक तर म्हणतात, 'परिणामांविषयी साशंकता वाटते,' म्हणून पाध्यांनी अनेक ठिकाणी बोलण्याचं टाळलंच. तरीही वृत्तपत्रविद्येच्या मुलांच्या समोर त्यानी भाषण केलं. पाध्ये तर मराठी, इग्रजी–आणि कोण जाणे दुसऱ्या किती भाषाचे केवळ शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत ! अभ्यास, वाचन दांडगं. तर्कही तितकाच धारदार, मांडणी आवेशपूर्ण. कधी उत्कट, कधी उपरोधिक. काही थोडा काळ त्यांनीही लेखकाची बांधिलकीच त्याच्या लिहिण्यापेक्षा महत्त्वाची मानणाराच्यात घालविलेला, नंतर त्यांना कडाडून विरोध केलेला – 'आतडी आवळणारा स्टॅलिनविरोध' असे सार्थ शब्द त्यानी वापरलेले आहेत. निर्भयपणान त्यानी पत्रकारिता केलेली आणि सपादकीय कारकीर्दीचा तशाच निर्भयपणानं स्वमतासाठी राजीनामाही दिलेला. महाराष्ट्रात फार थोडचा व्यक्ती अखिल भारतीय व त्याहून थोडचा व्यक्ती आतरराष्ट्रीय पातळीवर वावरताना सापडतात – पाध्ये त्यांच्यापैकी प्रमुख. राजकारणी माणसं झटपट राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय होतात–स्वत.च्या गावाला दुरावतात. पाध्ये साहित्य–सस्कृती–विचारस्वातंत्र्य यांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय झाले–आणि तरीही त्यांच्या कोकणाशी एक अभंग, अतूट असं जिव्हाळ्याचं नातंही त्यांनी कायम ठेवलं. तर ते त्या विद्यार्थ्यांसमोर म्हणाले की, 'मला संजय गांधी आवडतो. कारण He is a patriot and a man of convictions.' ऐकणाऱ्यांच्यात आमचे काही सत्याग्रही मित्र बसलेलेच होते. त्यानी विचारलं की, आपण संजयला पेट्रिअट म्हणता ते कशाच्या आधारावर ? आपण त्याची स्तुती का करीत आहात ?' ती पोरं बिचारी सरळमार्गी. पाध्यानी त्याना दुसरा गुगली बॉल टाकला की, 'पेट्रिअट म्हटलं म्हणजे स्तुती थोडीच होते ? A patriot can be a scoundrel also' अतिरेकी बोलण्याची त्यांची सवयच आहे. पुण्याच्या साहित्यिकांच्या सभेत सुद्धा 'हे इंदिरा गांधीनी पाप केलेलं आहे' असं टोकाचं ते बोललेलेच होते. त्यानतरच्या एका समारभात 'She is a wicked woman' असही ते म्हणाले अस ऐकतो. तसंच ते तिथंही बोलले. आपण बोलता बोलता संजय गांधीला बदमाश म्हटलं, हे लक्षात आल्यावर मात्र पाध्ये म्हणाले–'याचा अर्थ काही सजय गाधी बदमाश आहे हे मला सुचवायचं नाही.' म्हणजे त्यानी विषय उकरून काढला, पण भूमिका घेतली नाही. कारण नसताना आवेशपूर्णता दाखविली आणि कारण नसतानाच सुरक्षिततावादी भूमिका घेतली. त्यांना काय म्हणायचं होतं, हे अजून भिजत घोंगडंच आहे. मुलं म्हणतात, 'त्यांना सजयची स्तुती करायची होती. पण आम्ही त्यांना रोखल्यामुळ त्यानी शब्द फिरवले.' आणि पाध्ये म्हणतात–'माझ्या शब्दांचा अर्थच मुलांना कळला नाही.' ही घरसोड कशासाठी ? हा वैचारिक गोंधळ कशासाठी ? संजयच नाव त्यांनी घ्यावंच कशाला, आणि घेतलंच तर स्पष्ट भूमिका का घेऊ नये ? ती जर त्यांनी घेतली असती तर.........

## : ५ :




ठीक आहे. बरेचसे साहित्यिक घाबरले आणि दुर्गाबाईंनी निर्भयपणा दाखविला. त्याच्याबद्दल तरी उत्तरोत्तर कोणत्या प्रकारची भावना व्यक्त झाली? अजूनही दुर्गाबाईंनी जे काही केलं त्याची पावती निरलसपणान सर्व साहित्यिकानी एकमुखानं दिलेली नाही. जयवत दळवीनी 'ठणठणपाळा' करवी 'अबे, करुणा विस्तारी'– अशी त्याची आळवणी केली आहे. ती करताना 'सोडून द्या आपले साहित्यिक चुकले म्हणून त्यांना तुम्ही किती रागावणार? किती जणाना दुखवणार?' असाच सूर आहे. मराठी साहित्यिकाचं समर्थन त्यानी केलेल नाही. त्यांच्या निष्क्रियतेवर पाघरूण घालण्याचा प्रयत्न केलेला नाही. आपल्या निर्भयपणामुळे दुर्गाबाईंच नाव अक्षरश. महाराष्ट्राच्या खेडोपाड्यात जाऊन पोहोचलं. ते भाग्य फार थोड्या मराठी साहित्यिकाना लाभतं–आमचे 'ग्रामीण' लेखकसुद्धा शहरातच जास्त लोकप्रिय होतात नाटकातून वगैरे लोककलाचा नव्या दृष्टीनं वापर करणं ही आजची फॅशनच आहे, चांगली आहे; पण त्या लोककलांची परीक्षा जानपद करीत नाहीत, मूठभर शहरी प्रेक्षक आणि चिमूटभर समीक्षक करतात. सामाजिकतेची कसोटी लावली तर बरेचसे लेखक अल्पमतात जातील. सरसकट ती कसोटी लावणही वाङ्मयाच्या फारस हिताचं होणार नाही. दुर्गाबाईंना ही प्रसिद्धी मिळाली, प्रतिसाद मिळाला तो त्याचं वाङ्मय वाचून मिळालेला नाही, हे तर उघडच आहे त्याच्याजवळ ना प्रभावी व्यक्तित्व, ना घणाघाती वक्तृत्व. काळ्या-सावळ्या किरकोळ, मध्यम दुर्गाताई भाषण मुळी करीतच नाहीत. त्या open thinking श्रोत्याच्या समोर करतात. त्याच्या निष्ठा त्यानी निर्भयपणे जोपासल्या, कसोटीला स्वतः उतरल्या आणि लोक वेडावून त्यांच्या मागे गेले. आपल्यात अशी कुणी तरी निघाली म्हणून आम्ही आनंदी व्हावं की त्यातही फाटे फोडावेत? धुळ्याला गो. नी. दाडेकराचं फार प्रभावी भाषण झाल, 'आप्पा, खूप मजा आली' अस मी नतर त्याना म्हणालो आप्पा म्हणाले, 'अरे किती झाल तरी ती दुर्गाबाई म्हणजे पंडिती वळणाचो बाई!' मी तो विषय बंद केला इतका व्यथित झालो. 'आम्ही कीर्तनकार, समाज आम्ही बघितलाय, समाजाची नाडी आम्हालाच ठाऊक आहे' हे त्यातले ध्वनी स्पष्ट जाणवत होते. ग्रामीण समाजाला आप्पा जास्त ओळखतात हेही सर्वमान्य आहे; पण मनात कुठे तरी दुर्गाबाईंशी अनावर अशी स्पर्धा चालू होती का? थोडासा हेवा वाटत होता का? कशासाठी अशी स्पर्धा? की न घाबरण हा दुर्गा भागवत याचा अपराध होता?

श्री प्रभाकर पाध्ये यानी याही विषयात भाष्य केल आहे त्याचं म्हणण अस की दुर्गाबाई तुरुंगात गेल्या त्या नागरिक म्हणून, लेखिका म्हणून गेल्या नाहीत! हे वाक्य दिसत तेवढं सोपं नाही, फार मोठी आत्मवंचना त्यात ध्वनित झालेली आहे. नागरिक ही कल्पना व्यापक की लेखक ही *कल्पना व्यापक? याचा निर्णय सहज* कसा करता येईल? एक कृती लेखक म्हणून, दुसरी नागरिक म्हणून, तिसरी पत्रकार म्हणून, चौथी समीक्षक म्हणून करणं शक्य आहे का? वादाच्या दृष्टीनं अस म्हणणं फार सोयिस्कर असत. समोरचा माणूस चक्रावून जातो. तरीही व्यक्तित्वाचा काही भाग भित्रा आणि काही भाग निर्भय असतो, वेगवेगळ्या परिस्थितीत तो वेगवेगळा वागतो असं मानायचं का? त्याच विश्लेषण करायच असेल तर मानसशास्त्राच्या जगतात जाव लागेल आणि त्यातूनही नक्की काही सिद्ध होण्यापेक्षा–'सांगता येत नाही, मनुष्यस्वभाव अतिशय गुतागुतीचा आहे' असच सिद्ध होण्याची जास्त शक्यता आहे मुद्दा तो नाही–मनुष्यस्वभाव गुतागुतीचा आहे आणि राहणार; पण ठराविक परिस्थितीमध्ये होणाऱ्या प्रतिक्रियाच गणितही माडाव लागेल. आणीबाणीत दुर्गाताई लेखिका म्हणून उरल्याच नव्हत्या अस मानायचं की लेखिका म्हणून इतर लेखकापेक्षा त्या वेगळ्या वागल्या हे मान्य करायच? समजा त्या नागरिक म्हणून तुरुगात गेल्या– इतर लेखक काय नागरिक नव्हते? नागरिक म्हणून त्याची कर्तव्यं नव्हती? ती त्यानी पार पाडायला नको होती? ती. पाध्ये असही म्हणतील की, दुर्गाबाई निर्भयतेमुळ श्रेष्ठ साहित्यिक आहेत अस ठरत नाही, ते ठीकच आहे. समाजातल्या रूढ कल्पनाच्या कसोटीवर भित्रे, अनीतिमान ठरणारे अनेक श्रेष्ठ लेखक आपण पाहिले आहेत, वाचलेलेही आहेत. त्याच वाङ्मय समजावून घेतलेलं आहे; पण हे सगळ सोडून काही विधान केलं की दुर्गाबाईसुद्धा रागावतात, त्याही आपली तलवार उपसतात. वादात मूळ मुद्दा दूर राहतो.

श्री. प्रभाकर पाध्ये यांच्यासारख्याना एक रास्त भीती वाटत असण्याची शक्यता आहे. परिवर्तनाच्या काळात आपल्या लेखकानी स्वत ला बाजूला काढू नये, क्रांतीच्या प्रक्रियेत सामील व्हाव असं म्हणताना दुर्गाबाई लेखकाना जीवनवादाच्या वेठीला बांधीत आहेत, कलाकाराच स्वातत्र्य धोक्यात आणीत आहेत अस त्याना वाटत असावं! तसं करण्यातला धोका इतर राष्ट्राच्या इतिहासामधून सिद्ध झालेला आहे, तो दुर्गाबाईंना माहीत नसेल का? त्याहीपेक्षा दोन महायुद्धामधल्या काळात समाजाभिमुखता मुळीच न राहिल्यामुळे मराठी साहित्य किती नि सत्त्व झालं, कसं तोच–तो

पणाच्या दुष्टचक्रात अडकून राहिलं, हे काय आपण पाहिलेलं नाही? मराठी साहित्यिकाला समाजात चाललेल्या प्रक्रियापासून दूर राहून वाङ्मयनिर्मिती करू देण्यातला धोका आपण एका काय, दोन पिढ्यासाठी पत्करला. आता त्यानं आपलं निर्मितिस्वातंत्र्य अबाधित ठेवून समाजाभिमुख व्हावं असं का म्हणायचं नाही? 'साहित्यिकानं काही करू नये, फक्त चांगलं लिहावं.' असं पाध्ये माझ्याजवळ एकदा म्हणाले. हे चागुलपण कसं ठरवायच? समाजापासून फटकून निघणाऱ्याकडून चांगलं साहित्य निर्माण होत नाही, हाही आपला अनुभव आहे, साहित्यिकाच्या बाधिलकीचा सामाजिक प्रश्न बाधिलकी वाईट, मुक्तता चांगली असा काळचा-पाढऱ्या शब्दांमधून सुटणार नाही. *राजकारण वाईट, अ–राजकीय कामच चांगलं, अस आता जस* म्हणता येणार नाही, तसच साहित्याच्याही बाबतीत होतं आहे आणि आता सगळे निर्बंध दूर झाल्यावर तर तुरुंगवास 'ऐषारामी' असल्याची खात्री होती म्हणूनच दुर्गाबाई तुरुगात गेल्या. तेव्हा आता त्यानी फार शौर्याची भाषा करू नये असं बोलल गेलं त्यावर काय लिहिणं शक्य आहे? योग्य आहे? इतकी अधम कोटी काग्रिटकर वगैरेनी गाठायलाच हवी होती का? सध्या तरी त्यांच्याबद्दल काहीच लिहू नये, आपणच शात राहावं झालं.

भीती ही सहजप्रेरणा असते, निर्भयता शिकायची असते. एखादा वळणावळणाचा मार्ग असावा आणि प्रत्येक पुढच्या वळणावर काही तरी संकट दबा धरून बसलेलं असावं तशी भीती आपल्या आयुष्यात असते. बेसावध क्षणी ती झडप घालते म्हणून बेसावध राहून चालत नाही – धीर खचू देऊन भागत नाही. तुम्हाला पहिल्यांदा पोलिसांचं बोलावणं येतं. मग ते संपादक, लेखक, मुद्रक, प्रकाशक कोणत्याही कारणान येवो – तेव्हा ती भीती लगेच डोळ्यासमोर उभी ठाकते – परिस्थितीचा दबाव जितका मोठा असेल, तितकं तिचं रूप अधिकच भेडसावणारं असतं. 'माणूस'चे संपादक म्हणून जेव्हा समज *मिळाली, 'साधने'च्या संपादकाना जेव्हा जामीन मागण्यात आला,* तेव्हा हीच भीती माजगावकर, थत्ते याना वाटलेली होती – ते साहजिक आहे, मानवी आहे. श्री. माजगावकर यांनी तर माझ्याकडे तसं कबूलच केलं. श्री. यदुनाथ थत्ते यांच्यामागे एक ट्रस्ट, एक राजकीय पक्ष, अनेक उद्योगी समाजकार्यकर्ते याचं भक्कम पाठबळ होतं. अगदी महाराष्ट्र शासनातसुद्धा साधनेविषयी, साधनापरिवाराविषयी सहानुभूती असणारे मंत्री, प्रेम असणारे आहेत, होते. त्याचा उपयोग 'साधने'ला निश्चितच झाला असणार. पण श्री. ग. माजगावकर, अनंतराव भालेराव यांच्यासारखे पत्रकार भीतीच्या दडपणातून कशाच्या जोरावर बाहेर आले, ते त्यानाच विचारलं पाहिजे. आपुलकीनं ऐकून घेतलं पाहिजे. सगळ्यात उत्तम म्हणजे या एकोणीस महिन्यांच्या काळात ज्यांनी लहानात लहान स्वरूपात निर्भयता दाखविली, त्यांच्या सर्व प्रयत्नांचं एक रेकॉर्डच तयार केलं पाहिजे, ते वाचल गेलं पाहिजे. श्री. यदुनाथ थत्ते यांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी साधना आणि शासन यांच्या लढाईचा वृत्तात सागितला, जनतेनं तो आनंदानं ऐकला. हे सगळं फार महत्त्वाचं आहे. 'माणूस'नं आणीबाणीच्या काळात जे कार्य करून दाखवलं, निर्भयतेचा संदेश या न *त्या प्रकारे, अनेक विचार करू शकणारापर्यंत पोहोचविला त्याच्या* मुळाशी एक वेगळ्या प्रकारचा प्रामाणिकपणा होता. तोच प्रामाणिकपणा *'प्रथम भीती वाटली; परतु हा घाव झेलायचा असं नतर ठरल.'* या कबुलीतून दिसतो. पुण्याच्या विश्वकर्मा मुद्रणालयातही असंच घडल. मला वाटत, 'साधना' बंद झाल्यावर 'कर्तव्य' म्हणून जे अनियतकालिक निघत होतं त्याचा काही कंपोज किंवा नानासाहेब गोऱ्याच काही तरी आक्षेपार्ह लिखाण कपोज केलेल्या अवस्थेत त्याच्याकडे सापडलं. त्या परिस्थितीत विश्वकर्माचे श्री. राजाभाऊ माटे आणि त्याच कुटुंब अक्षरश. आदर्श पद्धतीन वागलं. पधरा-वीस दिवसापूर्वीच घरात दुर्घटना घडलेली कर्तासवरता जावई काळानं ओढून नेलेला. मानसिक आघात जबरदस्त, त्यातून सावरायच्या आत छापखान्यावर पोलिसाची धाड आली. मजकूर जप्त करण्यात आला. तो आठवडा *म्हणजे एक अतिशय धोक्याचं वळण होत. भीतीच श्वापद झेप* घेण्याच्या तयारीत होत, त्याची चाहूल पावलोपावली लागत होती. पण माटे मडळी डगमगली नाहीत, आल्या प्रसगाला सामोरी गेली. पाठ न फिरवता, पाय रोवून उभी राहिली. प्रेसपाठोपाठ पोलिसाची नजर घराकडे वळणार हे उघड होतं. म्हणून त्याच्याकडली पत्रकं वगैरे हलवावी असं मी सुचविताच माटे फार रागावले. 'जे काही आहे ते त्यांना येऊन पाहू देत. मी कोणत्याही परिणामाला तयार आहे!' त्याना समजावून द्यावं लागलं की, सर्व प्रकारच्या दुष्परिणामांची तयारी ठेवूनसुद्धा उगीचच पोलिसाच्या हातात सापडण काही धोरणीपणाचं होणार नाही. माटे काही राजकारणी नव्हते, वाटेल त्या प्रसंगाची चाक उलटी फिरवू शकणारे धनिकही नव्हते. मग कुठून येत हे धैर्य? तो काही क्षणिक अभिनिवेश नसतो, जवळ येणारी भीती आधी ओळखावी लागते, समजून घ्यावी लागते भ्यायलेल्या अवस्थेतच तिच्यावर मात करण्याची तयारी करावी लागते आपण असे घाबरलो नसतो तर निश्चितच अधिक मोठं काही तरी झालं असतं, व्हायला हव होत, अशी प्रामाणिक कबुली श्री. विद्याधर पुडलिक यानी दिली. साहित्यिक भित्रा आहे की *निर्भय आहे, यापेक्षा तो प्रामाणिक आहे, याचं महत्त्व मला मोठं* वाटतं.

## : ६ :

१९३०–४० *या काळात इग्लडमधल्या लेखकावरसुद्धा अशा प्रका*रची जबाबदारी येऊन पडली होती. सेन्सॉरशिपचा मुद्दा त्यात नव्हता; परंतु आपल्या देशात चाललेल्या सामाजिक परिवर्तनात लेखक काय करणार, हा सवाल होताच. नुकतीच झालेली रशियन राज्यक्रांती आणि रशियातून येणाऱ्या चांगल्या कलाकृती यांच्यामुळे फॅसिझम, भाडवलशाही यांच्या धिक्काराची प्रचड लाट इग्लंडमध्ये उसळली होती. बुद्धिजीवी आणि साहित्यिक मोठ्या प्रमाणावर त्या लाटेला जबाबदार होते. त्यातच आताच्या परिस्थितीत ज्या कुणाला चांगला लेखक व्हायचं असेल त्यानं पुरोगामी क्रांतिकारक पक्षाकडे म्हणजेच क्रांतिदूत मानलेल्या कामगाराकडे जावं असे माठाड विचार माडले गेलेच तो काळ समजण्याच्या दृष्टीनं तेही महत्त्वाचे आहेत. स्पेनमध्ये यादवी युद्ध सुरू झाल्यावर ती आपल्या निष्ठाची परीक्षा आहे

असं इंग्रज लेखकांनी का मानलं ? अनेकांनी तिथं प्राणार्पण का केलं ? ज्यांना तो रौद्ररस मानवणारा नव्हता ते कुणी पत्रकार झाले. ऑडेन-सारखा एखादा स्ट्रेचर बेअरर झाला. हेमिंग्वे, मला वाटतं, ड्रायव्हर झाला. ऑर्वेल ज्या भागात गेला तिथे घनघोर लढाया झाल्या नाहीतच–युद्धाचा कंटाळवाणेपणाच फक्त अनुभवता आला. पण ऑर्वेल तिथं गेला, राहिला. यादवी युद्धाची धुमश्चक्री प्रत्यक्ष न पाहताच यादवी युद्धाच्या जखमांनी व्याकुळ झालेला स्पॅनिश समाज त्याला गवसला. इंग्लंडमध्ये राहून जर तो वर्तमानपत्रांच्या आधारानं स्पेनवर लिहीत राहिला असता तर Homage To Catalonia हे त्याचं पुस्तक इतकं जिवंत झालंच नसतं. असं जिवंत वाङ्मय आमच्याकडे २० ते ३० सालात झालेल्या चळवळी, ४२ चा लढा, ४७ चा विदारक अनुभव, ६२, ६५, ७१ ची युद्धं यांच्यावर निर्माण झालं नाही आणि या नुकत्याच संपलेल्या परि-वर्तनाच्या काळात लेखकांनी जी भूमिका घेतली ती काही फारशी आशादायक वाटत नाही. स्पॅनिश युद्धात ज्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला ते प्रामाणिक आणि न घेतला ते अप्रामाणिक, असंही मला म्हणायचं नाही. 'तू स्पेनमध्ये का जात नाहीस ?' अशा प्रश्नाला 'Rather afraid' असं उत्तर देणारा इशरवुडही तितकाच प्रामाणिक होता आणि युद्धमान परिस्थितीत जीवनाचा तोल हरवून बसलेल्या मध्यमवर्गाचं चित्र त्याला गवसलं ते त्यामुळंच. सामाजिक-राजकीय परिस्थितीत स्वतःला वगळून टाकण्यापेक्षा स्वतःची भूमिका नीट ठरविता येणं आणि जमल्यास प्रत्यक्ष अथवा साहित्यातून ती भूमिका realise करणं साहित्याच्या आरोग्याच्या दृष्टीनं फार मोलाचं आहे. आपली निर्मितिक्षमता लेखकानं जपायची असते, गर्भासारखी जपायची असते ती याच संदर्भात. लेखक म्हणून स्वातंत्र्य टिकविणं महत्त्वाचं आहे हा दुसरा मुद्दा.

मराठी साहित्यिकांचा, बुद्धिजीवींचा, पत्रकारांचा विचार करताना मला कॉनराडच्या लॉर्ड जिमची आठवण होते. लॉर्ड जिमची शोकांतिका आम्ही समजून घेण्यासारखी आहे. जिम एक खलाशी. स्वतःबद्दल त्याच्या अतिशय बढाईच्या कल्पना असतात. अनेक डाकूंशी सामना करून एखाद्या सुंदर स्त्रीला सोडविणं–अशाच प्रकारच्या. त्याचं ट्रेनिंग संपतं आणि तो आपल्या करिअरची सुरुवात एका जहाजावर कप्तानाच्या अनेक दुय्यम अधिकाऱ्यांपैकी एक म्हणून करतो. जुनाट, मोडकळीला आलेलं जहाज, ते शेकडो मुसल-मान यात्रेकरू घेऊन मक्केला चाललेलं असतं. त्या जहाजाचा कप्तान आणि त्याचे साथी मात्र–जिम सोडून–शीर-सलामत तर पगडी पचास, अशा रोखठोक वृत्तीचे असतात आणि खरोखरच जहाज प्रचंड वादळात सापडतं–तळघरातल्या फळ्या निसटायला लागतात. जहाजाचे अधिकारी पळ काढण्याची तयारी करतात–त्यात त्यांना काही लाज-लज्जा, भीड-भाड नसतेच. जिमच्या inflated ego ची आता परीक्षा असते. इकडे ते यात्रेकरू गुडघे टेकून प्रार्थना करीत असतात तर लाइफ बोट सोडून आपला जीव वाचविण्यासाठी अधिकारी दुसरीकडे धडपडत असतात. एकीकडे प्राण वाचविण्या-साठी श्रद्धेचा बळी–दुसरीकडे श्रद्धाच प्राण वाचवील असा ठाम विश्वास ! आता जिमनं काय करायचं ? त्यानं लाइफ बोटमध्ये उडी टाकायची का खलाशी म्हणून त्याचं जे कर्तव्य आहे ते निष्ठेनं




पार पाडायचं ? म्हणजेच स्वतः सगळ्यात शेवटी बुडायचं; पण जहाज सोडायचं नाही ! हळूहळू पण ठामपणानं जिमचा तोल लाइफ बोटकडे झुकायला लागतो. त्याचे सहकारी त्याला हाका घालीत असतात–त्या हाका आणि उडी घ्यायची की नाही ह्याचा निर्णय, ह्याच्यामध्ये तीन-चार प्रकरणं लिहून कॉनराडनं वाचकाच्या सहनशक्तीचा खरोखर अंत पाहिला आहे. जिमनं दुसऱ्या कुणाला सांगितलेली आपली गोष्ट तो दुसरा कुणी तरी इतरांना सांगत आहे असं गुंतागुंतीचं कथनतंत्र कॉनराड वापरतो. तो त्याचा हातखंडाच आहे. गुहेन् गुहा उघडल्यासारख्या त्याच्या कथा असतात. गोष्ट ऐकणारा जिमला विचारतो, 'Then did you jump ?' जिमचं उत्तर मात्र फारच महत्त्वाचं आहे. 'I think, I must have' असं जिम म्हणतो. एखादी गोष्ट हातून घडली–बरी-वाईट घडली तरी त्या माणसाच्या व्यक्तित्त्वाचा सगळा भाग त्यात समाविष्ट असतो असं थोडंच आहे ? तेव्हा जिमची ती उडी वास्तवतेत खरी असली तरी जिम आयुष्यभर भित्राच ठरवावा, इतकं महत्त्व तिला देता येणार नाही गेल्या दोन वर्षांत मराठी साहित्यिकांनी दोन उड्या घेतल्या. पहिली उडी अर्थातच लाइफ बोटमध्ये घेतलेली–आणीबाणी लागू होताच घेतलेली–भित्रेपणाची. दुसरी उडी कोणती ? निवडणुका जाहीर झाल्यानंतरची–सगळे निर्बंध उठल्यानंतरचीही ! या दोन्ही उड्या खऱ्या-खोट्या पडताळून पाहिल्या पाहिजेत. विचारस्वातंत्र्य, आविष्कारस्वातंत्र्य यांच्या जहाजावर आमचे लेखक खरोखरच चढले आहेत का ? की,. 'They think they must have jumped ?' याचाही विचार केला पाहिजे. दोन्ही उड्या तपासून घेतल्या पाहिजेत. नाही तर आता जो कोणी निवडणुकीच्या

पृष्ठ १३५ वर



# भेटी लागी जीवा...

रंगा मराठे

महाबळेश्वरचा एस्. टी. स्टँड. मे महिन्यातील शेवटच्या आठवड्यातील शनिवार. दुपार पश्चिमेकडे झुकली आहे. कोकण, मुंबई, पुणे, सातारा, वाई, महाडला जाणाऱ्या-येणाऱ्या एस्. टी. गाड्यांची, उतारूंची झुम्मड उडाली आहे. त्या गर्दीतच स्ट्रॉबेरी, रॉजबेरी, शेंदरी गाजरं विकणाऱ्यांची धावपळ चालू आहे.

बराच वेळ वाट पाहून तो अंग सैलावून एका बाकावर बसला आहे. आता त्या बाकावर बसण्याचाही त्याला कंटाळा आला आहे. तो एक भली मोठी जांभई देतो. इतक्यात घाईघाईनं येऊन एक मुलगी त्याच्या उजव्या हाताला काटकोनाशी असलेल्या बाकावर बसते. तिच्या एका हातात पिशवी, दुसऱ्या हातात बॅग आहे. बॅग पायांशी, पिशवी मांडीवर ठेवते.

एस्. टी. स्टँडवरच्या त्या ठराविक दृश्यानं त्याची दृष्टी थंडावली आहे. संवेदना बधीर झाल्या आहेत. त्याची नजर तिच्याकडे वळते. ती मुलगी गोरीपान, ठाशीव बांध्याची, गोबरे गाल, टपोरे डोळे, लाल किनारीचं पांढरंशुभ्र पातळ, त्याला मॅचिंग ब्लाऊज, पायात शोभून दिसणाऱ्या उंची चपला. त्याची नजर उगीचच चाळा म्हणून तिच्यावर स्थिरावते. ती भांबावलेली आहे, भेदरली आहे. निवाऱ्याची जागा शोधणाऱ्या चिमणीसारखी तिची नजर साऱ्या स्टँडभर भिरभिरते आहे.

आभाळात ढग जमा झाले आहेत. ढगांकडे बघावं की तिच्याकडं, असा संभ्रम त्याच्या मनात निर्माण होतो. मग त्याची नजर पुन्हा तिच्याकडे वळते आणि स्थिरावते. त्याच वेळी ती पण त्याच्याकडे बघते. आपल्याकडे कुणी तरी बघते आहे, या जाणिवेनं ती अधिक अस्वस्थ होते. त्या मनःस्थितीत तिची दृष्टी

त्याच्याकडे वळते अस बरेचदा होत हातातल्या रुमालान उगीचच डोळे पुसते. मग त्याच्याकडे बघत म्हणते,

'मी काही पळून चालले नाही.'

ती आपल्याशी बोलेल अशी त्याला सुतराम् कल्पना नसते. तो एकदम दचकतो, बावरतो. स्वत.ला किंचित् सावरत म्हणतो,

. अस का ?

मी काय म्हणाले ?

: काय ?

मी काही पळून चालले नाही

: (थडपणाने)–बरं.

जरा वेळ स्तब्धता तो उगीचच इकडे तिकडे पहातो. पुन्हा नजर तिच्याकडे वळते कपाळावरच कुकू वाजवीपेक्षा मोठ आहे. किंचित पसरट नाक, त्यात लकाकणारी सोनेरी चमकी. भावदर्शी टपोरे डोळे. समोरच्या आकाशाच्या तुकड्यात जमा झालेल्या ढगाच प्रतिबिंब त्यात पडलं आहे की काय कुणास ठाऊक ? तिनं नुसत बघितल, तर डोळेच आपल्याशी बोलताहेत अस वाटतं. इतका वेळ अगदीच कटाळवाणा गेला. आता हे काही तरी इटरेस्टिंग प्रकरण.

ती त्याच्याकडे चिडून बघत म्हणते,

. मला ताप आलाय.

: असं का ?

सांगितलं ना, की मला ताप आलाय.

: माझ डोक पण दुखतय.

थाबेल जरा वेळानं

तो ज्या बाकावर बसला आहे तिथून अगदी समोर एस्. टी गाड्याची वर्दळ त्याला दिसते आहे. उजव्या हाताला असलेल्या आडव्या बाकावरच तिच अस्तित्व त्याला जाणवत आहे. तिच्यासमोर एस्. टी. च चौकशी, बुकिंग ऑफिस, डाव्या हाताला तो, उजव्या हाताला एस् टी. ची वर्दळ कदाचित तिलाही त्याच रिकामटेकडं अस्तित्व जाणवत असाव.

ती त्याच्याकडे किंचित पाठ करून एस्. टी. गाड्यात चढणाऱ्या–उतरणाऱ्या उतारूकडे पहात आहे मधूनच अस्वस्थपणे पायाशी असलेली बॅग, हातातली पिशवी चाचपते. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो पहात आहे तिचे केस तोकडे पण जाड आहेत. बाद्‌याात डौल आहे. तिची अस्वस्थता त्यालाही जाणवते. रुमालाशी चाळा करताना ती पुटपुटते,

अजून कसा आला नाही ? कमाल आहे

कुठली तरी एस्. टी. धडधडत स्टॅंडला लागते. ती धडधडतच जणू काही ती टिपून घेते आणि झटकन् उभी रहाते. बरेचसे उतारू गाडीतून उतरतात ती उत्सुकतेन पहाते. निराश होऊन पुन्हा खाली बसते. ओठावरून जीभ फिरवीत डाव्या हाताला वळून बघते. तिची त्याची पुन्हा दृष्टभेट होते. आपले टपोरे डोळे त्याच्याकडे रोखत म्हणते,

माझा भाऊ आला होता, मला पोचवायला.

अस का ?

खरच आला होता

असेल.

तिचा चेहरा लालबुद झाला आहे. गोबरे गाल अधिकच गोबरे दिसत आहेत. नजर सैरावैरा फिरते आहे. कुणाला तरी शोधते आहे. हव असलेल माणूस नजरेला सापडत नाही. ती स्वत.शीच पुटपुटत, नतर मोठ्याचा त्याच्याकडे बघत म्हणते,

: कमाल आहे.

. ह ऽ,

: मी म्हणते, कमाल आहे.

कुणाची ?

: त्याची.

हा हा, म्हणजे तुमच्या भावाची.

भावाची नाही हो त्याची.

हा हा ऽ, म्हणजे त्याची.

. तुम्हाला काय माहिती आहे त्याची ?

मला कुणाचीच काही माहिती नाही. तुमची नाही, त्याची पण नाही.

वेळ निघून चालला आहे मावळत्या सूर्याचा प्रकाश लाल मातीत रेंगाळला आहे. प्रवाश्याची वर्दळ थोडी कमी झाली आहे. स्टॅंडवर फिरायला आलेली मडळी मुक्कामावर परतत आहेत. समोरच्या आकाशाच्या तुकड्यात मघाशी रेंगाळणारे ढग घाईघाईन पुढे सरकत आहेत. बहुधा हनीमूनला आलेली दोन-तीन जोडपी फेरफटका मारून स्टॅंडवर उगीचच रेंगाळत आहेत.

तो जाभई देत उठतो. पुण्याहून आलेली एक एस्. टी. घरघरत स्टॅंडला लागते. तो लगबगीन उठतो. उतरणाऱ्या उतारूकडे बारीक नजरेनं पहातो. निराश होऊन पुन्हा बाकावर बसतो व स्वत शीच, पण मोठ्याचा म्हणतो,

ह ऽ ऽ यूसलेस. काय बेकार आहे

काय म्हणालात ?

तुम्हाला नाही हो.

मग ?

मी त्याना म्हणालो.

त्याना म्हणजे ?

माझा एक मित्र व त्याची बहीण येणार आहेत. त्याची वाट पहातोय मी

त्यांची का तिची ?

तिची ?

तिची म्हणजे, मित्राच्या बहिणीची.

तुम्हाला काय करायचंय ?

(शातपणे) म्हणजे, तुम्हीसुद्धा कुणाची तरी वाट पहाताय.

पुन्हा एक एस्. टी. धापा टाकत स्टॅंडला लागते आणि एक भलामोठा उसासा सोडते. त्या उसाशान दचकून ती उभी रहाते. रुमालान तोड पुसते. पदर सारखा करते. एकमेकाना ढकलत उतारू बसमधून ओघळतात. तो स्वस्थपणे पाय पसरून समोर बघत आहे. निराश होऊन निर्जीव बाहुलीसारखी ती पुन्हा बाकावर बसते

समोरच्या रिकाम्या एस. टी कडे पहात तो निर्विकारपणे म्हणतो.

तुम्हाला ताप आलाय ना ?

. आता बराय.

डोकं दुखतय तुमच. चहा पिऊ या वाटल्यास अॅस्प्रो पण घ्या.

तुम्ही अॅस्प्रोचे विक्रेते आहात वाटत ?.

. मी विक्रेता आहे. आय् मीन, सेल्समन् पण अॅस्प्रोचा नाही.

डोक दुखायचं थाबलय माझ

. अरेच्या ! आश्चर्य आहे. खर म्हणजे जास्त दुखायला हव. तापही मला वाटतं, थोडा वाढला असेल

(चिडून) का ?

नाही म्हणजे, तो अजून आला नाही म्हणून.

: तो ?

म्हणजे ज्याची तुम्ही वाट पाहताय तो.

( शातपणे डोळे मिटून ) मी आशाच सोडली आहे.

कसली ?

( रागाने ) तुम्हाला काय करायच्या आहेत नसत्या पचायती ?

: मला काय करायचय म्हणा !

तो डोळे मिटून घेतो. पाय ताणून स्वस्थ बसतो. तिचे डोळे अधिक गर्द होतात. त्यात आर्तता आहे, असहाय्यता आहे. त्याचा स्वस्थपणा, थंडपणा तिला सहन होत नाही. ती किंचित पुढे वाकून म्हणते,

: ... जरा ऐकाल का ?

( डोळे मिटलेलेच. )

. प्लीज्.

( डोळे उघडतो. )

: माझा मित्र आहे तो ... आमचं एकमेकांवर प्रेम आहे ... आय् मीन-- आम्ही लग्न करायचं ठरवलय. इथं.

: लग्न ? ... आणि इथं-- ?

: घाबरायला काय झालं-- ?

: मी कशाला घाबरेन ?-- पण--

: पण काय ?

: जरा आश्चर्य वाटतं !

: म्हणजे खोट वाटतं म्हणा की !

: छे, छे-- तसं नाही ! पण यापूर्वीच तुमच लग्न व्हायला हवं होतं !

: म्हणजे ?

: म्हणजे तुम्ही तशा दिसायला बऱ्या आहात !

( रागावून ) तुम्हाला काय करायचंय त्याच्याशी ?

: निराश होऊ नका ... वाट पाहा थोडी ... येईल तो अजून ... कदाचित टॅक्सीनंही निघाला असेल ...

: संदेश देऊ नका ! मला समजतय.

: समजत नाही म्हणून तर समजावून सांगतोय.

: मला काही सागायची जरूर नाही !

उठून उभा राहतो. जांभई देतो. तिच्याकडे बघत.

: बराय ! बसा वाट बघत ...

. अहो-- तुम्ही निघालात कुठे ? जरा बसा ना. तुमच्या मित्राची बहीण -- जिची तुम्ही वाट पाहताय -- ती पण येईल इतक्यात -- कदाचित टॅक्सीन पण येईल.

संदेश देऊ नका ! मला कुणाचीही वाट पाहयची नाही. या नुसत्या वाट पाहण्याला काहीच अर्थ नसतो.

खरं आहे ! -- पण बसा, निदान थोडा वेळ सोबतीला !

तो नाइलाजाने पण कुतूहलाने तिच्याकडे बघतो. तिचे डोळे अधिक बोलके झाले आहेत. समोरच्या आभाळातील ढगावर मावळत्या सूर्याचा रक्तिमा पसरला आहे. त्याच प्रतिबिंब तिच्या गालांवर पडलं आहे की काय कुणास ठाऊक ! स्टॅन्डवरचे निस्तेज दिवे सूर्यानं गुलाल उधळल्यामुळे उजळल्यासारखे वाटतात. तो पुन्हा बाकावर बसतो. ती मांडीवरची पिशवी शेजारी ठेवते व त्याच्या भावावलेल्या चेहऱ्याकडे पाहत म्हणते,

मघाशी मी तुम्हाला म्हटल ना ..

काय ?

की मी पळून आले नाही.

हो !

. पण मी पळूनच आले आहे घरातून.

( दचकून ) काय, पळून आलात ?

हो ! तो पण येणार आहे. आम्ही इथं राहायचं ठरवलंय-- थोडे दिवस -- अगदी नवरा--बायकोसारखं.

म्हणजे मघाशी तुम्ही चक्क खोटं बोललात तर--

माफ करा !

गरज नाही त्याची.

कशाची ?


# M/s. SARA PRODUCTS AND NOTERDAM INDUSTRIES

*Manufacturers of Textile Processing Chemical, Printing and Sizing gums.*

WISH

YOU ALL

Happy Diwali and Prosperous New Year

**SARA PRODUCTS,**

Shri Niketan, Shivsagar Estate,
Dr. A. B. Road, Worli, Bombay-18.

Phone : Off. 377211 ● Res. 563110



सर्वेत्र सुखिनः सन्तु ।
सर्वे सन्तु निरामयः ।
सर्वे भद्राणी पश्यन्तु ।
मा कश्चीत् दुःख माप्नुयात् ।।

☆ ☆ ☆

**Happy Diwali and Prosperous New Year to You All from**

# A WELL WISHER

: माफी मागण्याची. मी सगळ्या गोष्टी खऱ्याच धरून चालतो. हे आत्ताचंच पहा ना!

: काय ?

: मी जिची वाट पाहतोय ती—

: तिचं काय ?

: ती नक्की येईल असं मी गृहीत धरून चाललोय.

: बरोबर आहे ते !

: कसलं बरोबर? ज्यांच्या भेटीची आपल्याला आस लागते ती माणसं कधी येतच नाहीत.

: तरी सुद्धा आपण त्यांची वेड्यासारखी वाट पाहतो.

: तो निसर्गाचा नियमच आहे. आपण ज्याची वाट पाहत राहतो ती दुसऱ्या कुणाची तरी वाट पाहत असतील.

: तुम्ही म्हणता ते कदाचित खरंही असेल; तरी सुद्धा—

: काय ?

: वाट बघतोच आहोत आपण. मी वाट बघते आहे. तुम्ही पण...

: दुसरा इलाजच नव्हता म्हणून इथं येऊन बसलो आहे. तुम्ही बोललात म्हणून मी बोललो. खरं तर तुमचा—माझा काय संबंध ?

: ते खरं आहे; पण आपण दोघं कुणाची तरी वाट पाहत आहोत—

: म्हणून काय झालं ?

: म्हणून आपला संबंध.

: मुंबईला बसच्या क्यूमध्ये तासन् तास माणसं एकमेकांशेजारी खेटून उभी असतात; पण त्यांचा कुठे काय संबंध असतो ?

: अं हं ऽ, ते वाट पाहणं आणि हे वाट पाहणं अगदी निराळं.

इतक्यात आणखी एक एस्. टी. धापा टाकीत स्टँडला लागते. तिचा चेहरा पुन्हा कावराबावरा झाला आहे. ती रुमालाने तोंड पुसते. एस्. टी. इतकीच तिला पण धाप लागली आहे. त्या धडधडीचे, स्पंदनाचे पडसाद तिच्यावर येऊन आदळतात. ती कासावीस होते, पदर सारखा करीत उभी राहते. एकटक नजरेनं सारे उतारू न्याहाळते. सारे उतारू निघून जातात. वाट पाहण्याची तिची सारी शक्ती संपुष्टात आल्यासारखी वाटते. ती जडपणे निर्जीव देहानं पुन्हा खाली बसते. त्याला तिची ती अवस्था पाहून वाईट वाटतं.

: मला खरंच तुमची कीव येते.

: माझी कीव करायचं काही कारण नाही. तुम्ही जा इथून !

तो तसाच बसून राहतो. ती खाली मान घालून बसली आहे. ती एक अस्पष्ट हुंदका देते. मग स्वतःलाच सावरते. रुमालाने डोळे पुसते. तिला उगाच दुखावलं असं त्याला वाटू लागतं.

: सॉरी, उगाच दुखावलं मी तुम्हाला... माफ करा.

(काहीच बोलत नाही.)

: असं वाटतं की...तुम्ही जिवाचे प्राण करून ज्याची वाट पाहत आहात—तो यायलाच हवा...दुसरं कुणी आलं नाही तरी चालेल.

: (स्वतःशीच पुटपुटते)... खरंच त्यानं यायला हवं होतं...

: असं म्हणणार होतो की...

: काय ?

: की जगाच्या अंतापर्यंत त्याची वाट पाहत थांबेन—तुमच्याबरोबर...पण

: पण काय ?

: पण ते खरं नाही ..शब्द फसवे असतात, माणसं फसवी असतात आणि ही वाट पाहणंही फसवं. पण असं म्हणावंसं वाटतं की, कितीही वेळ लागला तरी मी तुमची सोबत करीन.

ती वर मान करते आणि हसते. अचानक एखादं फूल फुलावं तसं त्याला वाटतं. एस्. टी. स्टँडवरची वर्दळ आता खूपच कमी


डोळ्यांचा थकवा
घालविण्यासाठी




'जाई काजळ' वापरा.

'जाई काजळ' जागरण, प्रखर ऊन, गरम वारे यांपासून डोळ्यांना होणारा त्रास दूर करते.
डोळ्यांची आग होणे आणि डोळ्यांतून पाणी गळणे यांवर प्रभावी अंजन-'जाई काजळ'
'जाई काजळ' रोज सकाळी स्नानानंतर व रात्री झोपण्यापूर्वी डोळ्यांत घालणे हितकर.
'जाई काजळ' डोळे थंड, निरोगी, सतेज ठेऊन दृष्टी स्वच्छ करिते.
'जाई काजळ' लहानापासून थोरांपर्यंत सारखेच उपयुक्त !
सॅन्टोमिक्स आणि ओवामिनचे निर्माते,
वेस्टर्न इंडिया केमिकल कंपनी.
मुंबई ४०००६६



UH 743

झाली आहे, तिचे डोळे अधिक बोलके झाले आहेत. अंधारात वीज चमकावी आणि सारं काही उजळून निघावं तसा तो एस्. टी. स्टॅंड उजळून निघाल्यासारखं त्याला वाटतं. ती काही बोलली नाही तरी चालेल; तिनं असंच नि:स्तब्ध बसावं...अगदी जगाच्या अंतापर्यंत. पण अचानक ती बोलू लागते.

: माझी सावत्र आई मला फार त्रास देते. बाबांचा तिच्यापुढं काही इलाज चालत नाही.

(अगदी नि:स्तब्ध.)

: आमचं दोघांचं बऱ्याच दिवसांपासून ठरलंय.

: काय ?

: कुणाला न सांगता घरातून निघून इथं यायचं. कारण–बाबांना आमचं हे प्रकरण पसंत नाही.

: का ?

: माझ्या बाबांच्या माझ्याबद्दल फार मोठ्या अपेक्षा आहेत. मी ग्रॅज्युएट आहे. मला चांगली नोकरी आहे. खूप शिकलेल्या एका श्रीमंत तरुणाशी त्यांनी माझं लग्न ठरवलंय.

: तुम्हाला तुमच्या बाबांनी ठरविलेला मुलगा पसंत नाही ?

: मला काहीच कळत नाही–पण हा आधी भेटला. आमचं एकमेकांवर प्रेम आहे. आम्ही लग्न करायचं ठरवलंय.

: तर मग त्यानं यायलाच हवं.

: येईल अजूनसुद्धा. तो मुंबईहून इथं येणार आहे. मी बेळगावहून पुण्याला आले. तिथून इथे आले. बाहेर खूप वेळ वाट पाहिली त्याची. मग इथे येऊन बसले आणि तुमची गाठ पडली.

: गाठ कुठे पडली ? तुम्हीच बोलायला सुरुवात केलीत.

: मला सारं असह्य झालं होतं. कुणाशी तरी बोलावंसं वाटत होतं.

: तुमचा भाऊ आला होता ना पोचवायला ? त्याला थांबवून ठेवायचं.

: ते सारं खोटं.

: छान !

: तुमच्या मित्राची बहीण येणार हे तरी खरं का ?

: मला आता काही कळेनासं झालं आहे. खरं काय आणि खोटं काय ?... ज्याची तुम्ही जीव तोडून वाट पहात होता तो तुमचा मित्र, माझी मैत्रीण– सारं काही खोटं...

(हसत)... मग खरं तरी काय आहे ?

: फक्त दोनच गोष्टी खऱ्या आहेत.

: एक तुम्ही, दुसरा मी.

(सुन्न होऊन त्याच्याकडे बघते.)

'खरं सांगू तुम्हाला ?'

: काय ?

: माझ्या मित्राच्या बहिणीची वाट पहायचं मी केव्हाच बंद केलंय.

: कारण ?

: कारण ती भेटली मला.

: कुठे ?... कधी ?...

: इथंच... या बाकावर बसली आहे माझ्यासमोर.

(त्याच्याकडं आश्चर्यानं बघते.)

: आणखी एक सांगतो. मला उगाचंच वाटू लागलं आहे.

: काय ?

: तुम्ही ज्याची वाट पहाताय तो कदाचित मीही असू शकेन.

(खाली मान घालते.)

: (सभोवती पहात)... आता एस्. टी. च्या गाड्या निघून गेल्या आहेत. यायच्याही बंद झाल्या आहेत. तुम्हाला कळलं नाही– पण मघाशी पावसाची एक जोरदार सर येऊन गेली... सारं कसं अगदी शांत झालंय. लाल मातीचा सुगंध सगळीकडे दरवळलाय...

: (आजूबाजूला बघत)– अय्या– खरंच की !

: चला आता. मी तुमच्या राहाण्याची सोय करतो... स्टॅंडवरच्या चौकशी ऑफिसात आपण पत्ता देऊन ठेवू .. तुमचा अन् माझा. उद्या आपण पुन्हा इथे येऊन वाट पाहू या... अगदी जगाच्या अंतापर्यंत... काय ?

(हसते.)


तो तिची बॅग घेऊन उभा राहतो. पिशवी घेऊन ती पण उभी राहते आणि त्याच्या मागोमाग जाऊ लागणार इतक्यात...

उशीर झालेली, धुळीनं माखलेली एक एस्. टी. बस धडधड करीत, धापा टाकीत, डोळे मिचकावत स्टॅन्डला लागते. 'त्या धडधडीच्या स्पंदनाच्या संवेदना तिच्या अंतर्मनात पोचतात... तो नक्की या बसने आला असेल... म्हणेल... किती वाट पहायला लागली तुला ?... काय करू ? माझा अगदी नाइलाज झाला...

ती मटकन पुन्हा बाकावर बसते आणि अवाक् होऊन हातातली बॅग सावरीत तो एस्. टी. बसकडं पहात राहतो. ●

# सिंदिया

**आमची जहाजे साती समुद्रात संचार करून पांचही खंडातील लोकांना माल पोहचता करतात. आमच्या सुरक्षित, विश्वसनीय व कार्यक्षम सेवेचा लाभ घ्या व आपला माल वाहतुकीसाठी आमच्या हवाली करा.**



**किनारी वाहतुक**
भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बंगलादेश व ब्रह्मदेश

**महासागरी वाहतुक**
इंग्लंड, युरोप खंडातील देश, रशिया, पोलंड, ए.आर.ई., अमेरिका (यू.एस.ए.), पूर्व कॅनडा, ग्रेट लेक्स, पॅसिफिक पोर्टस, कॅरिबिअन पोर्टस पश्चिमी आशिया (गल्फ), लाल समुद्र, स्ट्रेटस् पोर्टस, भूमध्य समुद्रातील बंदरे व पूर्व आणि पश्चिम आफ्रिका.

**दि सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लिमिटेड**
सिंदिया हाऊस, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
फोन: २६८१६१ • टेलेक्स: ०११-२२०५
१५ पार्क स्ट्रीट, कलकत्ता-७०० ०१६
फोन: २४३४५६ • टेलेक्स: ०२१-७३०५

**सिंदिया वर्कशॉप लि.**
(जहाज दुरुस्त करणारे, मरीन इंजिनियर्स, भारतांत हॅच कव्हर्सच्या उत्पादनासाठी मॅक्ग्रेगॉर लायसन्सी)
पेटंट स्लीप, माझगांव, मुंबई ४०० ०१०
फोन: ३९२१५१
पी-२ टारटोला रोड, कलकत्ता-७०० ०२४
फोन: ४५३१४४

AS-72

# उध्वस्त

अनिल किणीकर

त्याला अटक झाली तेव्हा तो क्षणभर भांबावला, गोंधळला; परंतु क्षणभरच. नंतर लगेच त्याने स्वतःला सावरले, तेव्हा जाणवले की आयुष्यातलं एक ‘ थ्रिल् ’ आपल्याला अनुभवायला मिळणार आहे.
तो मोहरला...
वाड्याच्या कंपाउंडपर्यंत आप्तेष्ट आले.
आजूबाजूच्या दोन–चार घरांतून सुसंस्कृत लोकांनी जास्तीत जास्त सावधानतेने डोकावून पाहिले...
पोलीस व्हॅनमधे त्याला ढकलला,
तिरमिरत जाऊन तो सीटवर वसला...
आप्तेष्ट दिसेनासे होईपर्यंत तो संमिश्र भावनांनी बघतच राहिला ...

¤

भानावर आला तेव्हा त्याने आजूबाजूला पाहिले...
पोलीस व्हॅनमध्ये माणसांना अक्षरशः कोंबले होते.
तशाही गर्दीत त्याला तीन-चार ओळखीचे चेहरे दिसले...
त्याला समाधान वाटलं...
वाटलं, आपण केलं ते योग्यच होतं...

¤

तो मोहरला...
फार फार दिवसांचं त्याचं स्वप्न आज साकार होत होतं...त्याला नेहमी वाटे : आपण देशासाठी काही केलं पाह्यजे ...‘ राष्ट्र तुमच्यासाठी काय करीत आहे ह्याचा विचार न करता तुम्ही राष्ट्रासाठी काय करीत आहात याचा विचार करा ! ’ इति अब्राहम लिंकन. ‘ शाईने का लिहिला जाई राष्ट्राचा इतिहास ’ इति सावरकर, अशा प्रकारच्या वाक्यांचा आणि थोर थोर राष्ट्रपुरुषांच्या देशप्रेमाच्या उदाहरणांचा संस्कार त्याला स्वस्थ बसू देत नव्हता...
कोवळ्या तरुण वयात राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी आहुती देणारे मदनलाल, राजगुरू, भगतसिंग, चाफेकरबंधू, बाबूगेनू इत्यादी व्यक्तिमत्त्वं त्याला सतावीत होती...
तशाचत त्याने डॉ. झिवागो सिनेमा नुकताच पाह्यला होता... अन् त्यातील पत्रकं वाटणाऱ्या क्रांतिकारकाची भूमिका त्याला फारच आवडली होती...

¤

रात्रीच्या रात्री चर्चा करून जागवल्या...आत्ताचा लढा हा परकीयांबरोबर नव्हे तर आपल्याच लोकांबरोबर आहे, हे कुठं तरी टोचत होतं म्हणून तो अस्वस्थ होई. बीवाय् आणि मोहन त्याला म्हणत होते : आपण निरीक्षण करू. कुठल्याही प्रकारे सक्रीय भाग नको. म्हणजे आपण जे काही सैद्धान्तिक

चिंतन केलं आहे, त्या अनुषंगानं काही निर्णयाप्रत येता येईल काय, ह्याची प्रचीती येईल ... किंबहुना इतक्या अपुऱ्या तत्त्वज्ञानावर प्रत्यक्ष कृतीची ही वेळच नव्हे, इत्यादि युक्तिवाद त्याला पटत नव्हते. मतभेद होते तरी बीवाय् आणि मोहन–दोघांनी शक्य ते सहकार्य देण्याचे ठरविले; परंतु त्याने भावनेच्या आहारी जाऊ नये हेही त्यांनी स्पष्टपणे सांगून भूमिका मांडली ... ◘

सामान्य माणूस जेव्हा पेटून उठतो, जागृत होतो तेव्हाच क्रांति साकार होऊ शकते ...

रविवारी मार्केटमध्ये जंगी जत्रा भरते...

ही संधि चांगली आहे ...

शनिवारी सकाळीच त्याने बीवाय् आणि मोहन यांना गाठले आणि सायक्लोस्टाइल्ड पत्रकं वाटण्याचा प्लॅन सांगितला. सर्वांनाच तो मंजूर झाला. तेव्हा ती एक शुभ घटनाच त्याला वाटली.

पत्रकाचा मजकूर तो उत्साहाने सांगू लागला ...

'मित्रांनो !

स्वातंत्र्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. कारण स्वातंत्र्याची प्रेरणा हाच मानवी जीवनाचा गाभा आहे. स्वातंत्र्याच्या प्रेरणेचा संबंध मानवाच्या जीवनार्थ चाललेल्या कलहाशी जाऊन पोहोचतो. जीवशास्त्रीय गरजा भागविण्याच्या धडपडीत मानवाने निसर्गावर जो विजय मिळविला त्याचे कारण म्हणजे ही स्वातंत्र्यप्रेरणाच होय. आधुनिक समाजात मनुष्याला स्वतंत्र व्हावयाचे असेल तर आर्थिक स्वास्थ्य व सुरक्षितता एवढेच पुरेसे नाही तर मानसिकदृष्ट्याही तो निर्भय झाला पाहिजे ... प्रत्येकाला आपापल्या कुवतीप्रमाणे चांगले–वाईट सांगण्याचा हक्क



असला पाहिजे ... खलिल जिब्रान म्हणतो—
Pity the nation whose sages are dumb with years and whose strong men are yet in the cradle.

बीवाय् आणि मोहन त्याच्यावर जाम खुष झाले. योजना एकमताने मंजूर झाली. त्याने स्टेन्सिल लिहून काढली. ताबडतोब त्याने बीवाय् आणि मोहनला कॉलेजात नेले, ऑफिसातील शिपायाला चहा-मिसळ खाऊ घातले आणि हजार-बाराशे पत्रके सायक्लोस्टाईल्ड करून घेतली.

समाधानाचा सुस्कारा टाकून तिघेही बीवाय्च्या रूमवर परत आले.

□

'हे इथपर्यंत ठीक झाल, आता वाटण्याच काय ?' मोहन.

'अर्थातच तिघांनीही ते काम करायचं,' तो.

'सॉरी, मी त्यात सहभागी होऊ शकत नाही.' बीवाय्.

'पण का ? योजना मान्य केलीत ती प्रत्यक्ष कार्यवाहीसकटच ना ?' तो.

'हो, पण आम्ही बापाच्या स्कॉलरशिपवर जगणारे— काही एक नैतिक जबाबदारी असायलाच—' बीवाय्.

'आणि माझही विचारशील तर पत्रकं वाटण्याला नकारच आहे त्याच प्रमुख कारण म्हणजे घरातला सर्वांत मोठा मीच आहे. माझ्यावर सर्वांचेच भवितव्य अवलबून आहे. परीक्षा झाल्यावर लगेच मला नोकरी मिळणार आहे .. तेव्हा हा धोका—' मोहन.

'बस्स्ऽ बस्ऽऽ भेकड आहात... जबाबदारी, नोकरी असली फालतू कारणं सांगून मूर्खपणा नका करू... मला काय कारणं नाहीत ? जाऊ द्यात— मी माझ्या एकट्याच्या जबाबदारीवर करीन सगळे ..' तो.

त्याचा राग अनावर झाला... भयंकर संतापून तो पत्रकं घेऊन ताडकन् उठला आणि घरी चालू लागला...

बीवाय् आणि मोहनने सुटकेचे निश्वास टाकले.

□

रविवारची सकाळ.

आज तो पहाटे चारलाच उठला. सर्व झटपट आवरले आणि लपवलेल्या पत्रकाचा पुडका घेऊन तो बाहेर पडला.

बाहेर पडला तेव्हा घरातले कोणीच अजून उठले नव्हते रविवारचे रविवारपण सर्वांना सुखावत होते...

□

निधड्या छातीने, ताठ मानेने, मोठ्या रुबाबदारपणे तो रस्त्यावरून चालत होता.

आज त्याला एक नवीनच जन्म जाणवत होता ..

शहर हळूहळू जागे होऊ लागले...

पोलीस, गुप्त पोलीस त्याच्या बुबुळातून मेंदूपर्यंत शिरू लागले. तो बावरला; पण क्षणभरच.

आता तो चौकात आला होता.

ओळखीचे चेहरे दिसू लागले तसा तो उत्साहित झाला त्याला धीर आला.

सुरुवात तर करायला हरकत नाही, असे वाटून त्याने पुडक्यात हात घातला...

आई-बाप, भाऊ-बहीण अन् त्याबरोबरच इतिहासातले क्रांतिवीर-हुतात्मा इत्यादी सर्व मेंदूत चमक मारून गेले...


## New Reshma Dyeing (Pvt.) Ltd.

*(Experts in Textile Printing and Processors of Synthetic fabrics)*

*WISHES*

All Its Patrons And Esteemed Customers

**Happy Diwali and Prosperous New Year.**

# New Reshma Dyeing (Pvt.) Ltd.

**Plot No. D-2, M. I. D. C., P. O. Turbhe,**
**New Bombay, Dist. Thane.**

**Phone : 566 Washi Exchange 159.**

मनाचा हिय्या केला अन् त्याने पत्रकं वाटायला सुरुवात केली...

एक-दोन-तीन-चार-शंभर, एक–दोन... आज सकाळी–सकाळीच त्याला बाजारात बघून ओळखीचे चेहरे विचारपूस करू लागले... पत्रकं हाती पडताच कुतूहलाने वाचू लागले..

काहींनी दोन-चार वाक्यं वाचली,

काहीजण संपूर्ण पत्रक वाचत होते...

सर्वांची प्रतिक्रिया एकच होती. कोणी पाहत नाही असे पाहून पत्रक टाकून देणे, दुर्लक्ष करणे, ओळखीचे अनोळखीपणात रूपांतर करणे... काही मात्र वाचून झटकन् खिशात (अगतिकतेने) कोंबत होते...

माणसा-माणसांचे चेहरे तो न्याहाळीत होता.

माणसा-माणसांची तो कुतूहलाने ओळख करून घेत होता.

१८–२० वयाच्या दोन-तीन मुली हातात पत्रकं घेऊन आपल्याकडे पाहत आहेत हे जाणवताच त्याला एक निराळाच अनुभव आला...

चालता चालताच तो आठ-दहा जणांच्या घोळक्यात आला... हातातलं पुडकं हलकं होऊ लागलं होतं.

घोळक्यातल्या दोघा-तिघांनी त्याला बाजूला खेचला, त्याचा खांदा दुखावला. चौथा आला अन त्याच्या हातातील पुडके ओढू लागला...प्रयत्नांची पराकाष्ठा केली; पण पुडके हातातून सुटले...तेवढ्यात एकाने गचांडी धरली, त्याला जाणवलं की आता थेट पोलीस चौकी...

जमाव पांगू लागला ... पोलीस व्हॅन दिसताच सैरावैरा पळू लागला ... काही सेकंदातच रस्त्यावरील पत्रकांचा कचरा झाला...त्याला ते पाहवेना...तो ओरडण्याचा प्रयत्न करू लागला. Raise Your Voice...

◻

नाव, वय, पत्ता, शिक्षण वगैरे सरकारी चौकशी व्हॅनमध्येच सुरू झाली.

त्याला चेव चढला : उत्तरे देऊ लागला.

नाव–तो अमुकपंत तरमगकर.

वय–कळण्याइतपत.

पत्ता–स्वातंत्र्यप्रेमी देशात कुठेही.

शिक्षण–एक्स. वाय्. झेड. (ऑनर्स)

पोलीस अधिकारी चाट पडला. हसत हसतच त्याचा हात मुरगळला तेव्हा ब्रह्मांड आठवलं...ढुंगणावर फाटलेल्या चड्डीतला भाऊ आठवला, लग्नाची वाट पाहणारी मोठी बहीण आठवली, भावासारखे प्रेम करणारे बीवाय् आणि मोहन हे मित्र आठवले आणि तो भानावर आला...

आवश्यक ती माहिती त्याने व्यवस्थितपणे सांगितली. पोलीस अधिकारी सिगरेट ओढीत मिष्किलपणे हसू लागला...

अर्ध्या चड्डीतले बावळट हवालदार पूर्ण चड्डीतल्या साहेबाला वेंधळपणाने साथ देऊ लागले...व्हॅनमधील इतर ओळखीचे चेहरे गप्प झाले होते.

◻

घर केव्हा आलं ते त्याच्या लक्षातच आले नाही. पोलीस व्हॅन थांबताच जागरूक नागरिक कुतूहलाने पाहू लागले...दार उघडून व्हॅनबाहेर आला तेव्हा त्याला किळस आली, त्यातूनच संतापाची लाट


*With Best Compliments From :*

# DEMPO STEAMSHIPS LIMITED

**BULK CARGO CARRIERS AROUND THE WORLD**

Formed a decade ago, Dempo Setamships Limited acquired their first Bulk Carrier, M. V. JAGAT NETA in 1965. In this short span of time, the strength of the Dempo Fleet has gone up to seven Bulk Carriers. Ever since the formation of the Company, the "JAGAT" vessels are at the service of the Nation, earning and saving valuable for exchange for the Motherland.

**Registered Office :**
Dempo House,
Campal, Panjim,
Goa.

Grams : "DEMPO"
Tel. : 3421/5

**Administrative Office :**
Regent Chambers,
208, Backbay Reclamation,
Nariman Point,
Bombay-400 021.

Grams : 'JAGATCAR'
Tel. : 296513 (8 Lines)
Telex : 011-2522
011-3954

आली आणि त्या लाटेतच त्याने जागरूक नागरिकांवर मशिन-गनचा थाड्ऽ थाड्ऽऽ थाड्ऽऽऽ मारा सुरू केला...सारे बिचारे किडा-मुंग्यांसारखे पटापट विखरून पडले. रस्त्यावर पडलेल्या पत्रकांसारखे ! तेवढ्यात बीवाय् आणि मोहन कोपऱ्यावरून येताना दिसले–त्याच्या डोक्यात तिडीक आली–

भेकड लेकाचे, भेकड...

घरात शिरताच आई-बापाचे रडवेले चेहरे दिसले–त्याने स्वतःचीच निर्भत्सना केली ... भाऊ – वहिणीचा लाचार चेहरा पाह्यला–त्याच्या पोटात गलबलून आलं ...

पेलाभर पाणी प्यायला आणि तडक गाडीत जाऊन बसला...

गाडीच्या खिडकीतून पाह्यले तेव्हा आप्तेष्टातील बीवाय् आणि मोहन खाली मान घालून उभे होते...

गाडी वळणावर पोहचेपर्यंत सर्व चित्रातल्यासारखे अस्तित्वहीन वाटू लागले.

ब्रह्मांडाची पोकळी त्याला असह्य होऊ लागली...

◘

तुरुंग. वॉर्ड क्र. शून्य. मोठ्या आवेशाने तो वॉर्डच्या दारात आला. दगडी भिंती आणि गजांचे दार पाह्यले.

पुन्हा एकदा तो मोहरला...

Raise Your Voice...एवढेच तो पुन्हा एकदा ओरडला...वॉर्डमधल्या पाच-सहा जणांनी त्याला ओढून घेतला–हाफ चड्डीतल्या हवालदाराचा दस्त्याचा फटका वाचला...

◘

एव्हाना संध्याकाळ झाली होती.

वॉर्डमधील ८-१० जणांनी आपापली ओळख करून दिली. निरनिराळ्या भागांतून आलेले; परंतु एका समान ध्येयाने प्रेरित होऊन एकत्र आलेले ते सर्वजण पाहून त्यालाही धन्य धन्य वाटले.

त्यात काही स्थानिक पुढारी होते. एका प्रसिद्ध व्यक्तीचा प्रत्यक्ष सहवास घडणार म्हणून त्याला आधार वाटला.

थोड्याच वेळात दोन–चार जणांचे गट झाले अन् आपापल्या उद्योगाला लागले.




एक गट रमी खेळू लागला, एक गट हिंदी सिनेमावर फालतू गप्पा मारू लागला. त्यातलाच एक स्थानिक पुढारी आपण किती जणांना झोपविले ते आवेशाने सांगत होता...

कोणी त्याच्याकडे लक्ष देईना.

मग तो स्वतःहूनच त्या नामपरिचित प्रसिद्ध व्यक्तीजवळ गेला आणि बोलू लागला ... 'ह्यापुढचा आपला कार्यक्रम काय राहणार आहे ? म्हणजे असं की, ध्येय तर अजून दूरच आहे आणि अशाच गतीने वाटचाल केली तर निश्चितच वर्षभरात यश मिळेल. मला वाटते, आपण आमचे नेतृत्व करून मार्गदर्शन करावे, आपल्या स्वातंत्र्य-चळवळीतील अनुभवांचा लाभ आम्हाला द्यावा... सूर्यकिरणांना वहिर्गोल भिंगातून एकत्र आणले तर कागद जळू शकतो– आपण आपले भगीरथ प्रयत्न समान ध्येयाने केंद्रीभूत करून सारा देश पेटवून देऊ, जागृत करू...'

पुढारी शांतपणे उठला आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवीत त्याला विचारलं, 'नाव काय म्हणालास तुझं ?'

'तसं मला नेहमीसारखं नाव नाही– सगळे मला 'तो' म्हणतात. तुम्हीही तेच म्हणा...' खांद्यावरचा भारदस्त हात त्याला आशीर्वादासारखा वाटला.

'चांगलं नाव आहे– तर मिस्टर तो, फार लहान आहेस अजून तू. तुझं पुस्तकी ज्ञान फारच चांगलं आहे; पण तितकंच ते धोकादायकही आहे. त्याचा असा प्रत्यक्षात वापर करायचा नसतो, केलास म्हणून असा फसलास बघ– आणि–'

'तुम्ही मला असे निरुत्साही करू नका होऽऽ फार मोठं स्वप्न घेऊन मी वावरतोय– प्लीऽज–' तो काकुळतीने म्हणू लागला ...

'अरे, स्वप्न म्हणजे काय ? अल्पावधीचा भासमय खेळ ! तो संपायला वेळ नाही लागत आणि संपला की भ्रमनिरास होतो... माणसांनी स्वप्नं बाळगूच नयेत, बाळगली तरी ती स्वप्नं म्हणूनच जपावीत – आता उदाहरणार्थ, उच्च शिक्षणाचं स्वप्न, चांगली पत्नी मिळण्याचं स्वप्न किंवा अशी किती तरी यादी वाढविता येईल बघ... त्यांचा भ्रमनिरास व्हायला वेळ लागत नाही... आणि तो झाला की सर्व आयुष्य उजाड-वैराण बनते... आता काही जण आपल्याच स्वप्नात राहतात, स्वतःच्याच कोषात राहतात आणि ती वेडी ठरतात ... तर मुद्द्याचं

म्हणजे मिस्टर तो, तू विचारस्वातंत्र्य, आविष्कारस्वातंत्र्य असं जर काही डोक्यात ठेवून राजकारणात उतरणार असशील तर ती फारच घोडचूक ठरेल... आता आजूबाजूला पहा–' पुढारी थाबला.

माहित असूनही मोठ्या धीराने तो आजूबाजूला पाहू लागला... प्रचंड कोलाहल माजल्यासारखं त्याला वाटू लागल– फार फार गोंधळून गेला तो... त्यातूनही सावरून तो म्हणू लागला, 'आपण त्यांनाही अशा गोष्टीपासून परावृत्त करू आणि एकत्रितपणे प्रयत्न सुरू करू–

'थाब. थांब. पुन्हा असा स्वप्नात जाऊ नकोस. वय आहे तुझं; पण वयाचा असा उतावीळपणे वापर करू नकोस. वयाचा वापर करायचा असतो तो सत्तेसाठी, त्यागासाठी नव्हे–' खांद्यावरचा हात काढून घेत पुढारी सागू लागला, 'तर मिस्टर 'तो' माझ्याबद्दलही तुझे गैरसमज आहेत, ते काढून टाक. आतापर्यंत फक्त नावानेच ओळखत होतास मला, उद्यापासून प्रत्यक्ष परिचय कळू लागेल तेव्हा माझ्या बोलण्याचा अर्थ कळेल. किती दिवस फसवू शकतो मी? जाऊ दे झालं! तुझ्या पहिल्याच दिवशी नको ते बोललो असो – चल जेवायला...'

अधारून आल होत.

आपण कशासाठी आलो? कोणासाठी आलो? (त्याला प्रश्न सतावू लागले...) हे इथ काय पहातोय? काय ऐकतोय?... ( – – – )

अन्नावरची वासनाच उडाली त्याची...

एका स्वप्नातच काही तरी तो जेवला. डोक फार शिणल होतं. अग टेकताक्षणीच त्याला झोप आली अन् पुन्हा एकदा स्वप्नाच्या काळोखातील प्रवास सुरू झाला...

¤

बीवाय् आणि मोहन चौकशी करायला घरी जात आहेत.

घरातल्या माणसाना त्या दोघाचा फार मोठा आधार आहे बीवाय्‌ची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, म्हणून वेळ आलीच तर काही मदत करतील याची खात्री आहे. तरीही 'अविचारी कृत्या'मुळे संपूर्ण घरच उदास झालं आहे अस त्याला वाटतंय... आणि आप्तेष्टांचाही घराकडे पाहण्याचा दृष्टिकोनं बदलला आहे आता ते सारेजण अलिप्त होऊ पहात आहेत. सवध कळलाच तर आपल्यालाही त्रास होईल असा सूज्ञ विचार करून ते ओळखही टाळू लागले आहेत लांबूनच विचारपूस चाल आहे.

किती काळ लोटला, त्याचं त्याला भानच राहिल नाही...

¤

तो झटकन् स्वत तून बाजूला झाला...

घराच्या आसपास फिरू लागला. तिथे काहीच कळेना म्हणून तो बीवाय्‌च्या खोलीवर जाण्याचा विचार करू लागला... तेवढ्यात कोपऱ्यावरून त्याला भाऊ–बहीण येताना दिसले. तो थबकला; थोडासा बाजूला सरकला.

त्या दोघाचे संवाद त्याला ऐकू येऊ लागले.

'ताई, दादा कधी येणार? मला फार भूक लागलीय. काल नुसता ब्रेड तर खाल्ला आपण...'

'दादा उद्या नक्की येणार आहे. येताना तो खूप पैसे आणील आणि मग आपण खूप चैन करू...'

'पण बीवाय् आज पैसे देणार होता ना? किती तरी दिवस तो असच म्हणतोय. मला तर त्याच्या खोलीवर रोज रोज जायचा कंटाळा आला बघ...मोहनही आपल्याकडे येत नाही हल्ली...'

मनातून तो चरकलाय...काय ऐकतोय, त्याच्या नक्की लक्षात येईना. तडक तो बीवाय्‌च्या खोलीवर गेला. पाहतो तो दाराला कुलूप. खिडकी उघडी दिसली म्हणून आत डोकावून पाह्यलं तो बीवाय्‌च्या टेबलावर रिकामी झालेली व्हिस्कीची बाटली अन् दोन रिकामे ग्लास दिसले आजूबाजूला सिग्रेटची थोटक...

माझ्या घरात द्यायला बीवाय्‌कडे पैसे नाहीत–बीवाय्–मोहन–तो आम्ही जीवश्चकंठश्च मित्र. एका विचाराचे, एका ध्येयाचे त्यामुळेच एकमेकावर पूर्णपणे. अवलंबून असलेले त्रिकूट.

मन घट्ट केल आणि त्यानं काढता पाय घेतला...

¤

घराची वाताहत.

ध्येयाचं क्षितिज अस्वस्थ

मैत्रीच विश्व उद्ध्वस्त.

आपण मुळापासूनच उखडले जात आहोत असं त्याला जाणवलं आणि त्याच्यातील तो पुन्हा त्याच्यात येऊन राहू लागला...

पहाट झाली तेव्हा कितवी पहाट ते त्यालाच उमगेना.

विचारांचा असह्य ताण...कधी तरी सैल केलाच पाहिजे, नाही तर–

¤

वॉर्ड क्र. शून्य.

सर्व काही व्यवस्थित. रमी, हिंदी सिनेमा, पुढाऱ्याचा अनुभवी, रुबाबदार शब्दांचा सल्ला.

फक्त तो तळमळतोय.

दररोजची वर्तमानपत्रं येताहेत. तो ती वाचत आहे देशात सर्वत्र सामसूम आहे.

– देश प्रगतीच्या दिशेने घोडदौड करीत आहे

–देश अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयपूर्ण होत आहे.

– देशात सर्व व्यवहार वेळेवर होत आहेत.

– देशातील व्यवहार ज्याला वेळेवर जमत नसेल त्याला शासन होत आहे

– देशात बलात्कार चालूच आहेत

–देशातील बलात्कारांचे प्रमाण वाढल्याचे सरकारी प्रवक्ता सांगत आहे.

– देशातील वैचारिक बलात्कारापासून बचाव होण्यासाठी सरकारने अभिनव प्रकारच्या गोळ्या मोफत वाटायला सुरुवात केली आहे

– देशातील लोक अशा प्रकारच्या गोळ्या खाऊन मेंदूची प्रसवशक्ती वद करून घेत आहेत.

– देश प्रगतीच्या दिशेने दौड आणि फक्त दौडच करीत आहे.

(अतिम विजय हा आता दृष्टिक्षेपात आला आहे ब्रेव्हो ऽ ब्रेव्हो, और थोडा, और ऽ ऽ बक्–अप् ऽ बक्–अप् ऽऽ)

¤

आपण असे किती दिवस स्वप्नात आहोत? तो खडबडून जागा झाला स्वप्नातून जागा होतोय तरी हा अधार का छळतोय?

कोणी तरी त्याच्या डोळ्यावर बॅटरीचा प्रकाश मारीत आहे.

आता त्याला बॅटरीचाही प्रकाश असह्य होत आहे.

¤

आणखी एके दिवशी वर्तमानपत्रात हेडलाईनमध्यें बातमी झळकली.

मिस्टर तो याची आत्महत्या. वैचारिक बलात्कारापासून बचाव करण्यासाठी घेतलेल्या अभिनव गोळीचा अचानक स्फोट–

– देशातील सरकारने चौकशीचा आदेश दिला आहे!



# गँग

## रवींद्र पिंगे

सेवादलाकडे पाठ फिरवून पकडलेली माझी नेव्हीतली सोन्यासारखी नोकरी मी आपखुषीने सोडली, असं जे मी सरसकट सर्वांना सांगत असतो ते सर्वस्वी खरं नाही. नेव्हीतल्या नोकऱ्या छान असायच्या. इतरांना शनिवारी अर्धा दिवस सुटी असे. रविवारी सबंध दिवस. नेव्हीचा एक पाय पुढे होतो. बुधवारीही नेव्हीत अर्धाच दिवस नोकरी असे. अर्धा दिवस सुटी. हेतू : कमांडर लोकांना बुटांना, बकलांना पॉलीश लावायला भरपूर वेळ मिळावा. खरेदी करायला मिळावी. कारण नेव्हीवाले सदा न कदा सफरीवर असायचे. शिवाय नेव्हीत पगारही पाच-दहा रुपयांनी चढा असे आणि कॅन्टीन-मधल्या वस्तू कमालीच्या पडत्या भावात मिळत. उदा. कॅडबरीचा बार अवघ्या तीन आण्यांना मिळायचा आणि कोकोचा मोठा उभा डबा दहा आण्यांना. पाच आण्यात मासळी–भाताचा ढीग मिळायचा. तो रग्गड व्हायचा. अशी ती नामी नोकरी. ती मिळावी म्हणून मंडळी नवस बोलायची. वशिले लावायची. मग अशी नवलाख नोकरी मी आपखुषीने कशी सोडणार ? शिवाय कुणा-लाही फुलं न बांधता ती मला मिळालेली होती. राऊत नावाचा दुधासारखे सफेद कपडे घालणारा माझा मित्र होता. त्यानेच माझा अर्ज खरडला आणि नेव्हीत हाती नेऊन दिला. नंतर मी इंटरचा शेवटचा पेपर एलफिन्स्टन कॉलेजात लिहित बसलो होतो, तिथे तो उगवला. मी पेपर टाकून चहासाठी बाहेर पडणार इतक्यात तो म्हणाला, 'चल, नोकरीला लाग.' मी म्हटलं, 'कुठल्या ?' तर म्हणाला, 'नेव्हीतल्या. नोकरी तयार आहे. अजून दीड वाजायचाय, ते दीड वाजेपर्यंत माणसं घेतात. तू चल.' मी गेलो. नाही म्हणायचं कारणच नव्हतं. इंटरव्ह्यू-बिटरव्ह्यू कुणीही घेतला नाही. मी कामावर रुजू झालो. पटावर सही केली.

युद्ध संपल्यानंतरचे दिवस असल्यामुळे नेव्हीत शुद्ध आनंद होता. काम म्हणून कसं ते कुणालाच नसे. रुपयातला पंधरा आणे स्टाफ बिगर मराठी होता. बहुसंख्य केरळी होते. त्यांच्याशी बोलायचं म्हणजे इंग्रजीत. ते लफडं नको म्हणून आम्ही मराठी मंडळी आपल्याआपल्यातच असू. गोडबोले, विद्वांस, गुप्ते, वडके, देवधर, वगैरे. तीच आमची गँग. आमचं छान चाललं होतं.

जुन्या चर्चगेट स्टेशनाबाहेर नेव्हीचा एक अजस्र बोडका ट्रक उभा असायचा. आम्ही लोकलवाले त्यात चढायचे. सगळे आले की, ट्रक चित्याच्या वेगाने कुलाब्याच्या दांडीकडे निघायचा. स्टँड सिनेमाच्या पलीकडे. माण-सांनी फिरकायची तेव्हा रीतच नसायची. गर्द झाडी. वडाच्या पारंब्या. हिरवीगार मैदानं आणि मिलिटरीच्या बराकी, असं कुलाब्याचं रूप होतं. पाहावं तिथून दोन हातांवर समुद्रपाणी दिसे. पाखरं सलगी करीत. पटावर सही ठोकली की, आमची गँग खडकावर बसायला बाहेर पडे.

पायापाशी फेसाळणाऱ्या स्वच्छ सागर-लाटा. बसायला तुळतुळीत खडक. डोक्यावर प्रसन्न ऊन्हं आणि चौफेर उदंड निश्चिती. असे माझे गँगमधले दिवस फार छान चालले होते.


एक दिवस वडक्याने मला एकटयाला गाठला. कॅन्टिनमध्ये नेऊन ग्लासभर चहा पाजला. वर एका पैशाची 'पासिंग शो' सिगरेट दिली नि म्हणाला,

'पिंगे, तुला हल्ली काय मिळतं ?'

'साडेब्याऐंशी रुपये.' मी छाती फुगवून सांगितलं.

'तुला सांगतो, तुला शंभर मिळण्याचा चान्स जमून आलाय; पण तू जरा धाडस दाखवलं पाहिजेस.'

दरमहा शंभर रुपये म्हटल्यानंतर माझ्या डोक्यात वाफ–वाफ झाली हे नाकारण्यात अर्थ नाही. पदवीधरांना रेशनिंगमध्ये पासष्ट मिळत. बँकेत साठ. रेल्वेत साडेबावन्न. पोष्टात पन्नास. तेही मोठ्या मुष्किलीनं. त्यामानाने मला इंटरवाल्याला शंभर म्हणजे साक्षात चंद्राच्या दिशेनं उड्डाण होतं. मी नाही म्हणणारच नव्हतो. क्षणात मला माझ्या घरचा परिसर आठवला. बाबांची पाच मैलांवरची शाळा. आम्ही सात भावंडं. सगळी शिकणारी आणि महागाईनं तर अंत पाहिलेला. सहा आणे शेरवालं दूध चक्क दहा आणे शेरावर गेलेलं आणि दोन आण्याची राईसप्लेट सरसकट चार आणे झालेली. सगळीकडे भाव भडकलेले. फक्त पारश्यांची ट्रॅम कंपनी तेवढी सत्त्वाला जागलेली होती. त्यांचा 'कुठेही जा–एक



आणा ' दर जागच्या जागी होता. बाकी सगळीकडे लोक शंख करीत होते. लंचसाठी घरचा पोळी–भाजीचा डबा न्यायची पद्धत सुरू होत होती. इराण्याकडचा 'पावणा चहा, अर्धा ब्रुनमस्का ' जवळजवळ नामशेष झाला होता.

'शंभर रुपये? कसं काय शक्य आहे बुवा?' मी विचारलं.

'तेच तुला सांगतो. ऑडिटरची एक जागा सँक्शन झालीय. पगार शंभर. मेननसाहेब तुझ्यावर डॅम खूष आहे. तुलाच ती मिळेल!'

'मेनन माझ्यावर कशाला खूष असेल?' मी आश्चर्याने विचारलं.

'तुझं अक्षर!'

हे ऐकल्यानंतर मीच माझ्यावर खूष झालो. त्या काळात माझं अक्षर खरंच लप्फेदार होतं!

'पण तू जरा धाडस कर. तू त्रागा कर मेननजवळ नि प्रमोशन मिळणार नसेल तर मी राजीनामा देतो म्हण. मग तो विरघळेल नि आपोआप तुला प्रमोशन मिळेल!'

मला पटलं. वडके खरा शक्कलबाज! मी पांढरा स्वच्छ कागद घेतला नि त्याच्यावर माझा राजीनामा लप्फेदार अक्षरांत लिहून काढला. तो कागद घेऊन वडके मेननकडे गेला. वेळ संध्याकाळची होती.

दोन मिनिटांत मेननकडून मला वर्दी आली. मी छाती पुढे काढून गेलो. मेननसाहेब म्हणाले,

'सो यू आर रिझायनिंग? ऑल राइट. आज संध्याकाळपासून तुला मी सेवामुक्त केलाय. आमच्या सर्वांच्या शुभेच्छा. यू मे गो!'

माझ्या पायाखालची भूमी दुभंगली तर बरं, अशी वेळ आली. मी धावाधाव केली. वडके कुठेच दिसेना. सगळचा बराकी धुंडाळल्या. पुन्हा पुन्हा धुंडाळल्या. वडके नाही तो नाहीच! बरं, इतरांना कुणाला मध्यस्थी करायला घालीन म्हटलं तर जो तो आपापला पोळी–भाजीचा डबा घेऊन परतीचा ट्रक पकडायच्या तयारीत!

संध्याकाळी ठीक पाच वाजता माझ्या नेव्हीतल्या नोकरीची अशी अवसानघातकी समाप्ती झाली.

नंतर अवघ्या दोन दिवसांनी मला दिव्य ज्ञानप्राप्ती झाली की माझ्या रिकाम्या झालेल्या जागेवर वडकेने आपल्या धाकटचा भावाला लावून घेतला!

मीही विचार केला, असले दीडदमडीचे गळेकापू भिडू जिथे आहेत त्या गँगमध्ये राहण्यात काय अर्थ आहे? थू: त्यांच्यावर!

नंतरचे माझे दिवस कसोटीचे गेले. पोस्टात सॉर्टर्स घ्यायचे आहेत म्हणून कळलं. जी. पी. ओ. त गेलो. तिकडे नन्ना.! फक्त एका खिडकीत वा. रा. ढवळे तेवढे ओझरते दिसले!

भाइंदरच्या पुलाखाली मिठागरांमध्ये जकात–कारकून घ्यायचेत म्हणून कळलं. तिकडे सकाळी आठपासून संध्याकाळी पाचपर्यंत उन्हात तळप–तळप तळपलो. पाणीही न पिता; पण इंटरव्ह्यू घेणारा सर्कल इन्स्पेक्टरच उगवला नाही! दुसऱ्या दिवशी परत नेटाने गेलो. पुन्हा तोच प्रकार! शेवटी भाइंदरच्या मिठागरांना सुक्या गळचाने नमस्कार केला आणि पाठ वळविली.

त्या काळात अमेरिकेहून तांबडा मिलो यायचा. खंडोवारी. सर्वजण झक मारत त्याच्याच चपात्या खात. मिलोचे ते अमेरिकन डोंगर ठेवायचे कुठे? म्हणून बोरिवलीच्या परिसरात सिमेंटचे घुमट बांधायच घाटत होतं. तिकडे कुठे चान्स मिळतो काय ते पाहायला म्हणून लोकल पकडली. ती गोरेगावच्या जंगलात अडकून पडली. पुढेही जाईना की मागेही हटेना. एक तास गेला. दोन तास गेले. चार तास गेले. गाडीचं गोरेगाव एके गोरेगाव चालू होतं. शेवटी वैतागलो. उडी मारून उतरलो. गोरेगावचं जंगल तुडवून काढलं. सगळीकडे घाण नि गोठे. उग्र दर्प. शेवटी निर्णय घेतला की ज्या नोकरीच्या नमनालाच इतका अपशकून ती नोकरी आपल्याला काय यश देणार हे दिसतच आहे.

तोही नाद सोडला.

आठ दिवस नोकरीसाठी नुसते हेलपाटे मारण्यात गेले. खिशात पैसा नाही अशी स्थिती. मी निर्णय घेतला, घरात जास्त वेळ ठरायचं नाही; आपलं ओझं दुसऱ्यावर नको, निदान पुढे-मागे तशी भावना व्हायला नको. सकाळी आघोळीपुरत घरी यायचं. चहा झाल्यावर बाहेर बाहेर राहयचं. शक्यतोवर जेवण बाहेर काढायचं.

पण कसं?

ह्या मोक्यावर मला रेडकर भेटला. म्हणाला,

'डरू नकोस! आपली गँग आहे. इतके आहेत, त्यात तू. बाबुलाल चिक्कार श्रीमंत आहे. तो आपल्या खिमा–पावाचा खर्च करतो. आपल्याला त्याचं बॉदरेशन नाही. आपण आपलं गँगमध्ये एकमेकांना सांभाळून राहायचं!'

'पण गँगमध्ये राहून काय करायचं?' मी विचारलं.

'तूं अगोदर यायला तर लाग. मग पाहू काय करायचं ते.'

मला खुमखुमी आली. म्हटलं हे छान आहे. गँगबरोबर राहायचं. बाबुलालच्या पैशांची खिमा–रोटी खायची. काम नाही. हजेरीपट नाही. काही नाही. आणि आपलं ओझं घरच्यांवर पडतंय ही रुखरुखही नाही. म्हणजे अवघा आनंदी आनंद की.

गँग चौपाटीच्या बँडस्टँडवर जमे. मी गेलो तेव्हा सर्वजण आलेले होते. त्रिलोकेकर होता. प्रभ्या होता. रेडकर तर होताच. शिवाय जॉनी होता. सनीही होता आणि काळू होता. माझी कुणीही कुणाला ओळख करून दिली नाही. मी आपोआप त्यांचा झालो. ते मला माझे वाटले. सर्वांनी नॅरो बॉटम पॅन्टी घातलेल्या होत्या. शर्ट बाहेर सोडले होते. त्या वेळची ती फॅशन होती. पावलापाशी आवळत गेलेल्या चिंचोळ्या पँटी आणि आत न खोचून घेता पुढे बाहेर सोडलेले लांब हाताचे शर्टस्. पायात पठाणी सँडल्स. डोळ्यावर रेबानचा हिरवा गॉगल. इतक्या भाडवलावर हिरो होता येई. निदान आम्हाला तसं वाटे.

रेडकर म्हणाला, 'चला, आपण राउंड मारू या.'

'म्हणजे काय करू या?' मी विचारलं.

'राउड म्हणजे रात्रीची चक्कर. इथून बाबुलनाथाच्या पायथ्यावरून केंप कॉर्नरकडे जायचं तिकडून वळून गवालिया टँकवरून नाना चौकात उतरायच. तिथून केनेडी ब्रिज. मग ऑपेरा हाउस. ऑपेरा हाउसच्या आयलडमध्ये चहा मारायचा नि मग मध्यरात्री घरोघर परतायचं!'

'एवढा मोठा राऊंड रोजच्या रोज मारायचा?'

'अरे यार, तू आमच्याबरोबर येऊन तर बघ. मग घरी जायची गोष्ट काढणार नाहीस!' रेडकर म्हणाला.

रेडकरची बत्तिशी खरी ठरली. त्या काळी मलबारहिलचा पायथाही अगदी शात असे. कडेवरच्या हिरवळीचा सुगंध रस्त्यावर येई. मोटारी क्वचित कधी येत. एरवी शुकशुकाट असे.

गँगमधले सगळे जवान होते. त्रिलोकेकरचं माधवबागेत घर होत. घरी वडील, सावत्र आई आणि ढबूस बहीण होती. वडिलांना पेन्शन होती. तेवढ्यात त्रिलोकेकर कुटुबाचं भागे. बहीण बसल्या बसल्या शिवणकाम करी. महिन्याचे दहा–बारा रुपये मिळवी. तिच्या वेणी–फणीचा खच त्यामुळे परस्परच भागे. त्रिलोकेकर साहजिकच चिंतामुक्त होता. मला एकदा म्हणाला होता, 'माझ्या बापाजवळ रगड पैसा आहे; पण बाहेर काढीत नाही. मला बॅरिस्टर करायची ॲम्बिशन होती त्याची, ती काय पैसा असल्याशिवाय?'

त्रिलोकेकरने पाचवीत फ्रेंचला घाबरून शाळा सोडलेली होती.

खुद्द रेडकरला मॅट्रिकचा फॉर्म मिळालेला नव्हता. तो केळेवाडीतल्या गोखले हेडमास्तराना बोल लावी. सांगे, 'त्यांच्या नव्या कोऱ्या डगल्यावर साली कुणी तरी शाई उडवली. त्यांनी माझ्यावरच डूक धरला. फॉर्म नाही म्हणजे नाहीच दिला! पक्का कोब्रा रे तो!'

बॉयलर रिपेअर करण्याच्या एका वर्कशॉपमध्ये रेडकर अर्धा वेळ काम करी. सकाळी नऊ ते दुपारी दीड. पगार तीस रुपये. त्यात त्याची खानावळ आनंदाने सुटून वर चैनीसाठी दहा रुपये उरत.

काळू काळाकुट्ट होता. त्याच नाव वेगळं असणं शक्य आहे. रंगावरून तो मद्रासी वाटे. होता पंजाबी ख्रिश्चन. सिनेमात एक्स्ट्राचं काम मिळवायसाठी तो जलंधरहून आला होता. सिनेमाची तिकिटं ब्लॅकमध्ये विकून तो पोट भरे. डोअरकीपर्सच्या आश्रयाने थिएटरमध्येच राही. दिसायला मात्र तो तरतरीत होता आणि त्याचे केस दोन वीत लाव होते.

सनी बहिणीच्या घरी राही. बहीण *डान्सिग स्कूलमध्ये बॉल डान्सर होती.* ती वीतभर उंचीचे ठोकळ्यासारखे बूट घाली आणि कसरत केल्यासारखी लुटूलुटू चाले. एकदा मी तिला कुलाब्याला ऑस्ट्रेलियन सोल्जरच्या हातात हात घालून चालताना पाहिलेली होती. पण तसं स्पष्टपणे बोलून दाखवायची माझी प्राज्ञा नव्हती. कारण सनीच्या खिशात नेहेमी घाव असायचा. घाव म्हणजे सुरा.

प्रभ्या आणि जॉनीत काही अर्थच नव्हता. ती पाप्याची पितरं होती. प्रभ्याचे डोळे पिवळे होते. जॉनीच्या गालाचे द्रोण दिसत होते.

हे सगळे होते आणि बाबुलालही होता. बाबुलाल निदान मला तरी शिंपी वाटला तसा तो नव्हता हा भाग वेगळा. वयाने चाळीस असेल नसेल. किडकिडीत. तलम पारदर्शक धोतर. बाह्यांचा स्वच्छ गजिफ्रॉक. त्यावर मलमलचं मुडीछाट खमीस. डोक्यावर गांधी टोपी. गळ्यात सोन्याची चेन. खमीसाला लाल धाग्यात गुफलेली सोन्याची बटणं.

हातात सोन्याची अंगठी. मी पुन्हा पुन्हा विचारी, 'अहो, तुम्ही करता काय?' ठरलेलं असे, 'बिझिनेस.'

बिझिनेस असो वा नसो, बाबुलालची चलती होती यात शंका नाही. कारण कधी तो आमच्या सगळ्या गँगला भेळ खिलवी. कधी 'किंग'कडला 'अर्धा खिमा स्लाईस' आम्हा सगळ्यांना स्वतःच्या पैशाने घाली. वेळेला तीन तीन रुपये बिल झालेलं मी पाहिलेलं आहे; पण बाबुलालने कधी पाय मागे घेतला नाही. आम्ही पोटभर खावं-प्यावं ही त्याची खरीखुरी इच्छा असे. एकदा त्याने दोन व्हिक्टोरिया केल्या नि आम्हाला महालक्ष्मीला नेऊन उडदाच्या डाळीची बोरासारखी वाटोळी भजी खायला घातली. मला वाटतं, त्याने त्या रात्रीत आमच्यासाठी दहा तरी रुपये उडविले असले पाहिजेत. एकदा तर त्याने कमालच केली. त्रिलोकेकरांच्या माधवबागेतल्या घरी त्याने आम्हाला कोंबडी-वडे खायला घातले. सर्व खर्च बाबुलालने हौसेने केला. ते दिवस नवरात्रानंतरचे होते. रात्री स्वच्छ, निरव असत. बाबुलाल म्हणाला, 'दिवाळीची आधली रात्र आपण त्रिलोकेकरांकडे चंगळ करून काढू; तुम्ही रात्र जागवायच्या तयारीने जमा. मी सगळा खर्च करीन.'

आम्ही गेलो. म्हातारे त्रिलोकेकर पानाचा खलबत्ता पुढ्यात घेऊन बसलेले होते. आम्हाला पाहाताच हसून म्हणाले, 'तुम्ही आजकालचे छोकरे कसलं लाइफ एन्जॉय करता कर्माचं! आम्ही नवरात्रापासून दिवाळीपर्यंत झोपलेलो नाही. रोज रात्री पार्ट्या, कुल्फ्या; पण आता सगळंच बदललं. कोंबडीचं कौतुक करावं लागतंय. आमच्या वेळी आठवड्यातून दोनदा तरी भरली कोंबडी असेच. आम्ही लाइफ खूप एन्जॉय केलं, तुम्हाला कल्पना येणार नाही. माधवबागेपासून चिरेबाजारापर्यंत प्रत्येक घर आमचं परभांचं होतं. ही मुंबई आमची हाय!'

मुंबईचे मालक असलेल्या परभू त्रिलोकेकरांच्या माडीवर आम्ही गँगवाल्यांनी मनसोक्त कोंबडी हाणली.

आमच्या गँगवर बाबुलालचा कंट्रोल होता. कारण आमचा वरकड खर्च तोच करी. कालूला विडीकाडी लागे. बाबुलाल पाच पाच रुपये त्याला देई. सनीला बियरची हुक्की येई पैसे बाबुलाल मोजी. रेडकरचे आजोबा आरवलीला कोकणात होते. सणासुदीला त्यांना पाच रुपयांची मनिऑर्डर लागे. बॉयलरवाला थोडेच ते पैसे देणार होता? बाबुलाल आपखुषीने रेडकरची नड भागवी. अशा परोपकारी बाबुलालवर गँगवाले का लट्टू नसतील? व्यक्तिशः मला त्याची दिडकीही लागत नसे. पण मला लॅमिंग्टन रोडवरला खिमा फार आवडे. त्यात वेलदोडे असत, त्यामुळे स्वाद मस्त खुले. हे सर्व खरे; पण द्रव्य कुठून आणायचं? अशा वेळी मी बाबुलालच्या वाटेकडे डोळे लावी. तो नवसाला हमखास पावे. न मागता खिमापाव देई!

असे आम्ही एकमेकांना धरून होतो. रात्रीच्या वेळी रस्त्यात नुसतं निरुद्देश भटकणं हे आमचं काम. आम्ही आतूनच अस्तरासारखे एकमेकांना जोडले गेलो. लहानसहान गरजा उद्भवत. त्या आम्ही एक-





स्वावलंबनाचा मंत्र...संशोधनाचे तंत्र...आत्मविश्वासाची साथ. या सर्वांतून हवी उत्पादनवाढ... प्रगतीच्या वाटेवर प्रत्येकाचेच पाऊल पुढे पडायला हवे...जिद्दीने...सतत!

दर्जेदार इंजिनांचे उत्पादन करीत असतानाच, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आम्ही शिक्षण, आरोग्य, समाज-प्रबोधन इत्यादि क्षेत्रांतील विविध उपक्रमांनाहि सक्रिय साहाय्य करतो.

दारिद्र्याचा अंधार नष्ट व्हावा, सुखाचा प्रकाश सर्वत्र फैलावा, यासाठी ह्या दीपावलिनिमित्त आमच्या शुभकामना.

Kirloskar

किर्लोस्कर
ऑईल इंजिन्स लिमिटेड
१३ लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ
खडकी, पुणे ४११ ००३

® Registered User — Kirloskar Oil Engines Ltd. Poona-411 003.

Pratibha 7766/Mar

मेकाच्या कलाने भागवीत असू. कुणाला कडक इस्त्रीचा शर्ट हवा असे. कालू आपल्या अंगावरचा शर्ट प्रभ्याला देई आणि प्रभ्याच काही रेशनिंग कार्डाचं काम निघालं तर जॉनी लायनीत उभं राहून ते आनंदाने करून देई. असे आम्ही एकमेकांना धरून होतो.

मला सारखा एक प्रश्न सतावी, अरे, हा बाबुलाल कुणाचा कोण आणि आम्हाला खुषीत का ठेवतो ?

एक दिवस प्रभ्याने मला एकट्यालाच सांगितलं,

'साला बिट्वीन यू अँण्ड मी हं. त्रिलोकेकरांच्या बहिणीचं नि बाबुलालचं काही तरी आहे. त्याचा कपड्याचा बिझिनेस आहे नि ती त्याचे कपडे शिवून देते. तो ते झांजिबारला पाठवितो. अरे, शिवाय त्रिलोकेकरचं घर चाललय! पण हे बोलायचं नाही हं. नाही तर बाबुलाल सनीला सांगून तुझा काटा काढून टाकेल. सनी साला धाववाला आहे. तुला माहीत आहे नं, सनीवर मर्डर चार्ज होता. एका पठाणाला खतम् केलान; पण मॅजिस्ट्रेट त्याचा जातवाला निघाला. त्याने त्याला सोडविला तरी पण तो जेलमध्ये जाऊन आलायच. पोलीस स्टेशनवर फोटो आहे त्याचा!

गँगमध्ये मला बसलेला हा पहिला धक्का. तरीही गँगमध्ये मी होतोच; पण चिमूटभर भीतीही वाटायला लागली. न जाणो, पोलिसांनी राउंड अप् केलं तर? मग शाळेत बाबांची स्थिती काय होईल ?

एक दिवस रेडकर म्हणाला, 'साला, तकदीरशिवाय सगळं फुकट आहे रे. साली, मोठमोठ्यांची पोरं मोटारी घेऊन पोरीवर लायनी मारतात. कुठं काय जमतंय त्यांना. बापानी कमवायचं नि ह्यानी उडवायचं. तोच आपला कालू बघ. साला, ब्लॅकवाला माणूस. कोण आहे त्याला? काय आहे त्याच्याजवळ ? पण त्याच्यावरसुद्धा पारशीण भाळली!'

थक्क होऊन मी विचारलं, 'म्हणजे? खरं सांगतोस ?'

'खोटं वाटत असेल तर जॉनीला विचार. कालू साला सेंट्रलच्या बाहेर गॉगल लावून उभा असायचा. पारशाची ती पोरगी शाळेतून परतताना त्या रस्त्यानं जायची. बस्स. फक्त इतकाच संबंध. कालूला काहीही करावं लागलं नाही फक्त सेंट्रलपासून पाववाला स्ट्रीटपर्यंत फॉलो केला न् जमवलन. आहे की नाही ? तिच्या बापाला कळल्याबरोबर त्याने तिला नवसारीला बोर्डिंगात घातली. कालू चारसोबीस तो नवसारीला विदाउट टिकीट जाऊन तिला भेटून यायचा! बोल! ती पारशीण. हा ब्लॅकवाला. पजावी ख्रिश्चन; पण कुठं काय आड आलं ? नाही तर हे साले कॉलेजकुमार! बाप कमावतोय नि हे उडवतायत!'

कॉलेजकुमारांचं सोडा, आपणही नशीबवान नसल्याचं माझ्या लक्षात आलं. आतल्या आत खट्टावलो. विचारलं,

'हे लोक इतके जिगरबाज कसे रे?'

'जिगरबाज?' रेडकर म्हणाला, 'तुला पाहायचंय काय? तू म्हणशील त्या पोरीवर हे हात टाकू शकतात. त्यात त्यांना इंटरेस्ट नाही हे वेगळं; पण एरवी आपले गँगवाले काय वाट्टेल ते करतील. तू फक्त 'किंग'कडे खिमा-पाव द्यायचा नि वर एक बर्कले.'

'मला त्याचं एक डेमॉन्स्ट्रेशन बघायचंय!'

'ठीक आहे. सनीला सांगू या. तो तिथल्या तिथ तुला पराक्रम करून दाखवील. अरे, एवढा पोलीस स्टेशनवर फोटो लागलेला माणूस तो; पण कधी कुणाला डरलाय काय?'

रेडकरनं सनीला माझी मनिषा सांगितली. सनी मुक्त हसला नि म्हणाला, 'व्हॉट इज देअर? उद्या साडेसहाला कॅंप कॉर्नरजवळ जमू या. विई विल मेक फन.'

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सहा वाजता रेडकर, सनी आणि मी असे तिघेजण कॅंप कॉर्नरजवळ उभे राहिलो. मी हातात काळीज घेऊन.

सध्याकाळ झालेली होती. काळोख चागलाच उतरला होता. मलबार हिलच्या पायथ्याचा तो भाग जवळजवळ निर्मनुष्य होता.

समोरून एक शांत दिसणारी शाळकरी मुलगी आली. सनी सावध झाला. तिच्या काहीच लक्षात आलं नाही. ती जवळ आल्याबरोबर सनी तिला म्हणाला,

'हॅलो, डोट यू रेकगनाईज मी?'

ती क्षणभर गोंधळून उभी राहिली. भानावर येण्याची तिला संधी न देताच सनीने क्षणात तिचा भर रस्त्यात मुका घेतला.

आम्ही धूम पळालो. तिच्या शिव्या मला चागल्याच ऐकू आल्या. रेडकर म्हणाला, 'त्या शिव्या नव्हत्या रे. काही तरीच तुझं.'

सनी, रेडकर आणि मी नाना चौकाला वळसा घालून लॅमिंग्टन रोडवरल्या 'किंग'मध्ये स्थिरावलो. दोन प्लेट खिमा-पाव मागवले आणि तिघात वाटून खाल्लं. त्या दोघाना बर्कले दिल्या. खुषी केली.

त्यानतर गँगवर मी कधीच गेलो नाही. त्यांनीही हा का येत नाही, अशी चौकशी केली नाही. आमचे प्रवास समातर नव्हते.

माझी गँग सुटली.

योगायोगाने त्याच्याच आगे–मागे नगरपालिकेच्या निवडणुका उपटल्या. याद्याचं काम मारे जोरात सुरू झालं. मी म्युनिसिपाल्टीत चिकटलो. यातायात न करता. सुखेनैव.

नोकरी मिळाल्यामुळे माझं घर मला पुन्हा एकदा परत मिळालं. फावल्या वेळात मी बी. ए. चा अभ्यास सुरू केला. अर्थशास्त्रावरची पुस्तकं उघडली.

योगायोगाने त्याच्याच आगे–मागे मी लिहायलाही प्रारंभ केला आणि ते चक्क छापूनही यायला लागलं.

इथून माझ्या डोक्यात गॅस जायला सुरुवात झाली. वाटू लागलं, अरे, आपण स्वत:ला लेखक म्हणवतो आणि लेखकमंडळीत ऊठबस करीत नाही हा काय प्रकार आहे? अशाने मागं पडू नं.

केळेवाडीतल्या तेव्हाच्या त्या छप्परवाल्या साहित्य संघाच्या गेटावर लेखकांची एक गँग असे. मी त्या गँगच्या आत–बाहेर करू लागलो. फार मजा यायची. त्या काळात आचार्य दादा धर्माधिकाऱ्यांची आणि आचार्य भागवतांची लेखक मंडळीत मोठी जबरदस्त वट होती. ते दिसायचे. ढेपाळलेले पार्श्वनाथ आळतेकर यायचे. हातभर केस वाढवलेला पाडगांवकर दिसायचा. त्या काळातसुद्धा पां. वा. गाडगीळ थकलेले, उतरलेले दिसायचे. वा. ल. भलतेच स्मार्ट दिसत आणि माधव मनोहराच्या तोंडातल्या चिरूटामुळे आणि हातातल्या लठ्ठ ग्रंथामुळे निदान मी तरी त्यांना मराठी वाङ्मयातले

विन्स्टन चर्चिलच समजत होतो ! त्यांच्याशी बोलायची प्राज्ञा नसे.

पुढे भीड चेपली. मी गँगमधलाच एक झालो. पहाटे उठून कॉलेज करायचं. दुपारी हाती असेल ती नोकरी करायची आणि संध्याकाळी साहित्य संघाच्या गेटावर गँगच्या अवती-भोवती झुलायचं हाच माझा नित्यधर्म झाला. मी सुखी होतो. अर्थात सगळ्या वेळेचा असा खुर्दा होत असल्यामुळं माझ्या लेखनाला टाळं बसलं. पण आपण लेखकांच्या गँगमध्ये आहोत ह्याचा अभिमान आणि आनंद उदंड होता. प्रभाकर पाध्यांनी गेटावर, 'काय पिंगे, कोकणातलं पत्रंबित्रं आलवतं काय ? परवा नानासाहेब गोऱ्यांनी आठवण काढली-वती तुमची.' असं नुसतं म्हटलं तरी दोन घास जास्ती जात.

असे ते गँगमधले मलईदार दिवस.

आता वीस पंचवीस वर्षांचा काळ वाहून गेलेला आहे. माझ्या हातात एथिल मॅनिनचं 'स्टोरीज फ्रॉम माय लाइफ' आहे. तिनं लिहिलं आहे,

'अड्डा नाक्यावरच असतो असं नाही. तो कुठंही असू शकतो. अनेकदा तो घाबरलेल्या मनामध्येच असतो.'

अड्ड्यावर जाऊन ड्रिंक्स पिऊन अखेर काय मिळतं ? तिथे आपण एकमेकांना चांगलं म्हटलं आणि समोर नव्हते त्यांची ऐशीतैशी केली त्यामुळे काय साधलं ?

समजा, आज मी जर अड्ड्याला दांडी मारली असती तर घरी बसून निदान चार परिच्छेद तरी लिहिले असते. जे अड्ड्यावर आले नाहीत ते आपापल्या घरी बसून शांत-पणे लिहिताहेत. वावभर पुढे सरकताहेत. जे लिहितील तेच पुढे जातील. कुणी अंगूळभर, कुणी मैलभर; पण त्यांचे रथ सदाचे दौडत जातील हे निश्चित. त्यांच्या भरधाव रथाच्या धुरोळ्यात गुरफटलेले आम्ही अड्डेवाले, कुणाला दिसू तरी काय ? आमचं काय होईल ? अखेर अड्ड्यांचं काय होतं ?'

ह्या समेपाशी मी थांबलो आहे. पुस्तक मिटून बाहेर पाहिलं. संध्याकाळ उतरत आहे.

एथिल मॅनिनच्या विचारधारेच्या संदर्भात मी माझ्याच कमाईच्या हिशेबाला बसलो आहे. दुसऱ्याचे संदर्भ आपल्या आयुष्यात गैरलागू ठरतात, हे काय मला कळत नाही ? सारं काही ठीक कळतं. आणि हेही कळतं की अखेर हिशेबाला बसावंच लागतं. निःस्पृह उत्तराकडे निघतानाच प्रवास मात्र मन झाकोळणारा आहे. जो जो विचार करावा तो तो खिन्नच वाटत जातं. □




(Lamp · Courtesy Raja Kelkar Museum, Pune.)
Parkerson/SBL 7715



**आत्मचित्र : १८८६-८७**

'असं म्हणतात की, स्वतःला ओळखणं कठीण आहे...अगदी मान्य....
पण स्वतःचं स्वतः चित्र काढणं सुद्धा सोपं नाही......'

# काळे इजिप्त एक संत आणि व्हिन्सेंट

माधुरी पुरंदरे

लंडनच्या गुपिल्स आर्ट गॅलरीमध्ये नोकरी करणारा व्हिन्सेंट व्हॅन गॉग ( जन्म : १८५३ ) आपल्या घरमालकिणीच्या मुलीच्या–उर्सुलाच्या प्रेमात पडला. मूळच्या एकलकोंड्या, रुक्ष स्वभावाच्या व्हिन्सेंटच्या आयुष्यात उर्सुलानं स्वर्गच निर्माण केला होता. पण व्हिन्सेंटचं ते नशीबच नव्हतं. उर्सुलानं त्याला नकार दिला. ' लाल डोक्याचं माकड ' म्हणून त्याला हिणवल सुद्धा.

त्यानं गुपिल्स सोडली. वास्तविक ही त्याच्या काकांच्या मालकीची गॅलरी. तिच्या शाखा साऱ्या युरोपभर होत्या. काकांना मूलबाळ नसल्यानं व्हिन्सेंटच त्यांचा वारस व्हायचा हे उघडच होतं. पण त्याला मात्र त्यात रस नव्हता. तो लंडनपासून साधारण दीडशे किलो मीटर्स वरच्या रॅम्सगेट गावात शाळेत नोकरी करायला लागला. शनिवारी तो उर्सुलाला केवळ पहाण्याकरिता चालत लंडनला येत असे. त्याला अजूनही वेडी आशा होती की ती आपला स्वीकार करील. पण अखेर तिचं दुसऱ्या एका माणसाशी ठरल्याप्रमाणे लग्न झालंच.
व्हिन्सेंटनं इंग्लंड कायमचं सोडलं.

उर्सुलाच्या धक्क्यातून व्हिन्सेंट सावरला नाही. आपण नोकरी करावी, नियमित पैसे मिळवावेत, आपला संसार थाटावा ही इच्छा तेव्हा तरी त्याच्या मनातनं गेली. सर्वसामान्य माणसाचं आयुष्य आता त्याच्या वाट्याला कधीच येणार नव्हतं. तो धर्मगुरु होण्याकरिता ॲमस्टरडॅमला आला. रेव्ह. स्ट्राईकर हे त्याच्या मावशीचे यजमान. त्यांनी त्याच्या शिक्षणाची सोय केली. मेंडेस दा कोस्टा ह्या ज्यू शिक्षकाकडे त्यानं अभ्यासाला सुरुवात केली. याच काळात स्ट्राईकरच्या के नावाच्या विवाहित मुलीशी त्याची ओळख झाली.

अभ्यासात त्याचं लक्ष लागेना. त्याला प्रत्यक्ष काम करण्याची इच्छा होती, मेंडेस दा कोस्टानं त्याला सांगितलं, ' अखेर तू स्वत:ला व्यक्त करशील आणि ते व्यक्त करणंच तुझ्या आयुष्याला अर्थ देऊन जाईल. वर्षानंतर तो ॲमस्टरडॅम सोडून ब्रुसेल्सला इव्हॅन्जेलिस्ट होण्याकरिता गेला. त्या तीन महिन्यांच्या अभ्यासक्रमातही शिक्षकाशी न पटल्यान त्याची नेमणूक नाकारली गेली. तो हताश झाला; पण रेव्ह. पीटर्सन ह्या समजूतदार गृहस्थांच्या मदतीनं आणि सल्ल्यानं तो बेल्जिअममधल्या बोरीनाज ह्या कोळशाच्या खाणप्रदेशात कामाला निघाला.

## एक

गाडी दक्षिणेकडे आली तशी क्षितिजावर डोंगरांचा एकदम पुंजका दिसायला लागला. फ्लँडर्सचा एकसुरी, सपाट प्रदेश पाहून कंटाळलेल्या व्हिन्सेंटला ते दृश्य पाहून बरं वाटलं. तो त्याच्याकडे पाहत असतानाच त्याच्या लक्षात आलं की, ते डोंगर जरा वेगळे, विचित्र आहेत. प्रत्येक डोंगर अलगपणे एकेकटा उभा होता. जणू सपाट जमिनीवर तो एकाएकी उगवला होता.

'काळं इजिप्त...' तो स्वत:शीच त्या प्रचंड पिरॅमिड्सकडे पाहता पाहता पुटपुटला. शेजारी बसलेल्या माणसाकडे वळून त्यानं विचारलं, 'हे डोंगर तिथं कसे आले असतील ? तुम्हाला ठाऊक आहे ?'

'हो !' शेजाऱ्यानं उत्तर दिलं. 'कोळशाच्या खाणीतनं वर काढलेला कचरा आहे. तो तुम्हाला त्या डोंगरावर चढणारी छोटी गाडी दिसतेय ? जरा नीट पहा !'

खरोखरच एक गाडी तो डोंगर चढून वर गेली अन् तिनं एक काळा ढग सोडून दिला. 'हे असे डोंगर बनतात. गेली पन्नास वर्षं मी रोज ते इंचाइंचानं वाढत असलेले पाहातोय !'

वेसमेसला गाडी थांबली आणि व्हिन्सेंटनं बाहेर उडी मारली. गाव एका खोल दरीत वसलेलं होतं. सूर्य कावीळ झाल्यासारखा दिसत होता. सारं आकाश कोळशाच्या दाट धुरानं झाकोळलेलं होतं. वेसमेस टेकडीच्या कडेला लाल विटांच्या अस्वच्छ घराच्या दोन ओळीत उभं होतं.

व्हिन्सेंट टेकडी ओलांडून गेला. त्याला आश्चर्य वाटलं. गाव इतकं रिकामं कसं ? काळं कुत्रंही दिसत नव्हतं ! क्वचित उदास, कलाहीन चेहऱ्याची एखादी बाई एखाद्या दारात उभी दिसे.

छोटं वेसमेस हे खाण-कामगारांचं खेडं. सगळी घरं एकेरी विटांची. बेकरीवाल्या जाँ बातिस्त दनीसचं घर टेकडीच्या वरच्या भागात उभं होतं. दनीसनच रेव्ह. पीटर्सनना पत्र लिहून एका एव्हान्जेलिस्टची मागणी केली होती.

सौ. दनीसनं मनापासून व्हिन्सेंटचं स्वागत केलं. त्याच्या खोलीकडे जाण्याचा रस्ता बेकरीच्या स्वयंपाकघरातनं जात होता. ताजा ब्रेड भाजत असल्याचा खमंग वास येत होता. त्याची खोली अगदी लहानशी होती. रस्त्यावर त्याची एक खिडकी उघडत होती. छप्पर एका बाजूनं एकदम खाली उतरलं होतं. दनीसबाईंनी स्वत: ती खोली साफ केलेली होती. व्हिन्सेंटला खोली आवडली. त्याला इतका आनंद झाला होता की, स्वत:चं सामान काढायचही भान त्याला राहिलं नाही. दनीसबाईंना सांगून तो बाहेर पडला.

'जेवायला यायचं विसरू नका. आम्ही सध्याकाळी पाच वाजता जेवतो !' बाई म्हणाल्या. व्हिन्सेंटला बाई आवडल्या. एखाद्या गोष्टीच्या खोलात शिरून डोक्याला त्रास करून न घेता समजून घेण्याचा तिचा स्वभाव असावा असं त्याला वाटलं.

'लगेच येतो. जरा आजूबाजूला चक्कर मारून येतो !' तो म्हणाला, 'आज रात्री आमचे एक मित्र येणार आहेत, तुम्ही त्यांना भेटायला हवं. मार्कासला ते फोरमन आहेत ! तुम्हाला तुमच्या कामाबद्दल बरीच माहिती ते देऊ शकतील.'

बाहेर जोरात बर्फ पडत होतं. फिरता फिरता व्हिन्सेंटचं निरीक्षण चालू होतं. बागांना आणि शेतांना काटयांची कुंपणं घातली होती. खाणीच्या चिमणीतनं बाहेर पडणाऱ्या धुरानं ती काळीठिक्कर पडली होती. दनीसच्या घराच्या पूर्वेला एका घळीत बहुतेक सर्व खाण-कामगारांच्या झोपडया होत्या. दुसऱ्या बाजूला पसरलेली शेतं, कचऱ्याचे डोंगर आणि मार्कासच्या खाणीच्या चिमण्या होत्या. छोटया वेसमेसमधले बहुतेक कामगार तिथं जात. शेतातून दोन्ही बाजूना काटेरी झुडपं उगवलेला अन् वठलेल्या झाडाच्या मुळांनी व्यापलेला एक 'रस्ता' होता.

मार्कास ही बेल्जिअम खाण-विभागाच्या सात खाणींपैकी एक होती. सर्वांत जुनी अन् सर्वांत धोकादायक ! अनेक माणसं गिळल्याबद्दलची तिची ख्याती होती. उतरताना, चढताना, विषारी गॅसनं, स्फोट होऊन, पाणी शिरून किंवा बोगदे कोसळल्यानं. तिच्या तोंडापाशी दोन विटाच्या इमारती होत्या. कोळसा वर आणण्याकरिता आणि निवडून गाडया भरण्याकरिता लागणारी यंत्रसामग्री तिथं होती. एके काळी पिवळ्या रंगाची असलेली उंच धुराडी आजूबाजूच्या प्रदेशावर चोवीस तास काळा धूर ओकीत होती. मार्कासच्या भोवती गरीब कामगारांच्या झोपडया, काही मेलेली झाडं, धुराची काजळी, काटेरी झुडपं, उकिरडे, राखेचे ढीग, निरुपयोगी कोळशाचे ढीग आणि सर्वांत वर डोकं काढणाऱ्या काळ्या कचऱ्याच्या टेकडया ! एकूण दृश्य फारच आनददायक होतं. पहिल्या भेटीत सगळं अतिशय रुक्ष आणि उजाड वाटलं व्हिन्सेंटला. 'याला काळा प्रदेश म्हणतात ते खरंच आहे.' तो स्वत:शी पुटपुटला.

तो तिथं उभा होता. थोडयाच वेळात खाणीतनं कामगार बाहेर पडायला लागले. त्यांच्या अंगावर फाटके, चिंध्या झालेले काळे कपडे होते. बायकांचे कपडेही पुरुषासारखेच होते. धुराडयातनंच बाहेर पडलेत असं वाटाव इतके सगळे काळे होते. काळ्या चेहऱ्यातनं पांढरे डोळे विचित्र विरोधाभास निर्माण करीत होते. त्यांना 'काळतोंडे' म्हणत ते उगाच नव्हे. आठ-आठ तास जमिनीखालच्या अंधारात काम केल्यानंतर एकदम उजेडात आल्यानं त्यांच्या डोळ्यांना त्रास होत होता. ते धडपडत फाटकाच्या बाहेर येत होते. चाचपडत चालत, एकमेकाशी बोलत होते. सगळे बुटके, अरुंद खांद्याचे आणि हाडं वर आलेले लोक होते ते !

गाव इतकं रिकामं का दिसत होतं ते व्हिन्सेंटला आता कळलं. छोटं वेसमेस हे खरं वर दिसणारं गाव नव्हतंच. ते होतं जमिनीखाली सातशे मीटर्सवर असलेलं कामगार-शहर आणि जवळजवळ सारं गाव जागृतावस्थेतला बहुतेक काळ तिथं घालवीत होतं. *

## दोन

'जॅक व्हेर्ने हा एक हिंमतीचा माणूस आहे.' दनीसबाई रात्री जेवताना सांगत होती. 'स्वत:च्या हिंमतीवर नशीब काढणारा, पण तरीही तो कामगारांना विसरत नाही.'

'बढती मिळालेली बाकीची माणसंही कामगाराबरोबर नसतात का?' व्हिन्सेंटन विचारलं.

'नाही, व्हिन्सेंटसाहेब, तसं नसतं छोटया वेसमेसहून वेसमेसला गेल्याबरोबर त्यांचं सगळं वेगळंच होतं. पैशाकरिता ते मालकाची बाजू घेतात आणि हे विसरतात की, तेही एके काळी खाणीत राबत होते; पण जॅक मात्र प्रामाणिक आणि निष्ठावंत आहे. आमचे सप होतात तेव्हा कामगारांवर फक्त त्याचा ताबा असतो. त्याच्याखेरीज ते कुणाचही ऐकत नाहीत; पण बिचाऱ्याचं आयुष्य आता फारस उरलं नाहीय!'

'का, काय झालय् त्याला?' त्यानं विचारलं.

'नेहमीचच, फुप्फुसांचं दुखणं! खाली जाणाऱ्या प्रत्येक माणसामागं ते लागतच. तो हिवाळा सपलेला काही पाहीलसं वाटत नाही.'

जॅक व्हेर्ने येईपर्यंत थोडा उशीर झाला होता. तो बुटका, उतरलेल्या खांद्याचा आणि सगळ्या बोरीन्ससारखा, खोल गेलेल्या वेदनापूर्ण डोळयांचा माणूस होता. त्याच्या नाकातनं, कानातनं केस बाहेर डोकावत होते. डोक्याला टक्कल पडलं होतं. व्हिन्सेंट इव्हॅन्जेलिस्ट म्हणून आल्याचं कळल्यावर त्यानं एक सुस्कारा टाकला. 'साहेब, इतक्या लोकांनी आम्हाला मदत करायचा प्रयत्न केला; पण इथली स्थिती काही सुधारली नाही.'

'बोरीनाजमधली स्थिती इतकी वाईट आहे, अस तुम्हाला वाटतं का?' व्हिन्सेंटनं विचारलं. 'माझी नाही.' थोड थांबून जॅकनं उत्तर दिलं, 'आईनं मला थोडं वाचायला शिकवलं न् त्या आधारावर मी फोरमन झालो वेसमेसला जाण्याच्या रस्त्यावर माझं छोटं विटाचं घर आहे. आम्हाला कधी अन्न कमी पडत नाही. माझी तशी तक्रार नाही.'

खोकल्याची जबरदस्त उबळ आली न् तो थांबला व्हिन्सेंटला वाटलं, त्याची सपाट छाती आता फुटणार. दारापाशी जाऊन जॅक अनेकदा बाहेर थुकला. परत आपल्या जागेवर येऊन बसला.

'साहेब, मी एकोणतीस वर्षांचा असताना फोरमन झालो. माझी फुप्फुसं तेव्हापासूनच कामातनं गेलीत. तरीही गेल्या काही वर्षांत जरा बर चाललय; पण हे खाण-कामगार...' त्यानं दनीसबाईकडे पाहत विचारल, 'तुम्हाला काय वाटत, मी यांना दक्रुककडे घेऊन जाऊ?'

'जरूर. सगळं खर काय ते कळल्यानं काहीच बिघडणार नाही.'

जॅकनं अपराधी भावनेनं व्हिन्सेंटकडे पाहत म्हटलं, 'त्याचं काय आहे साहेब, किती झालं तरी मी एक फोरमन आहे. 'त्याच्याशी' मी थोडी तरी निष्ठा दाखवायला हवी दक्रुक तुम्हाला सगळं दाखवील.'

व्हिन्सेंट जॅकच्या मागे त्या कडक गारठ्यात निघाला. खाण-कामगाराच्या झोपड्या म्हणजे लाकडाची एकेक खोली होती. त्याच्या माडणीमागे कसलीही योजना नव्हती. आपोआप ती वस्ती घळीच्या उतारावर वेडीवाकडी पसरली होती. रस्त्यात इतकी घाण साचली होती की, त्यातून वाट काढणं मोठं कौशल्याचं काम होत. व्हिन्सेंट जॅकच्या मागे धडपडत चालत होता. दगड, धोंडे, ओंडके रस्त्यात ठायी ठायी पसरलेले होते. तो त्यांना अडखळत होता. अर्धा रस्ता चालून गेल्यावर ते दक्रुकच्या घरापाशी आले. छोटया खिडकीतून अंधुक प्रकाश दिसत होता.

दक्रुकच घर थट इतरांच्या घरासारखंच होतं. मातीची जमीन, गवत पसरलेलं छप्पर, भिंतीच्या फळयांमधल्या फटी बुजवलेल्या होत्या, वारा आत येऊ नये म्हणून. प्रत्येक कोपऱ्यात एकेक अंथरूण होतं. त्यातल्या एकावर आधीच तीन मुलं झोपली होती. एक स्टोव्ह, लाकडी टेबल आणि बाक, एक खुर्ची, भिंतीवर ठोकलेलं एक खोकं, त्यावर भाडी-कुंडी अस फर्निचर घरात होतं. दक्रुकनं सर्व बोरिन्स-प्रमाणे एक बोकड आणि काही उंदीर पाळलेले होते. अगदीच फाके पडले तर घरच्या घरी मास मिळत असे. बोकड मुलांच्या पलगाखाली झोपला होता. स्टोव्हच्या मागं कडब्यावर उंदरांचा मुक्काम होता.

दक्रुकबाईनं दाराची वरची फळी उघडून कोण आहे ते पाहिलं. दार उघडून दोघांना आत घेतल. तिनं दक्रुकबरोबर त्याच खाणीत त्याच्या लग्नापूर्वीपासून बरीच वर्षं काम केलं होतं कोळशाच्या गाड्या ढकलत न्यायच तिचं काम होतं. ती पार चेपून गेलेली दिसत होती. रंग उडालेली म्हातारी दिसत होती. तिचा सव्विसावा वाढदिवस अजून व्हायचा होता.

दक्रुक स्टोव्हपाशी खुर्चीवर बसला होता. जॅकला पाहून तो चटकन उठला 'या ऽऽ,' तो म्हणाला, 'बऱ्याच दिवसांनी येतो आहेस. बरं झालं आलास ते. हे तुझे मित्र...' व्हेर्नेनं ओळख करून दिली.

दक्रुक बोरीनाजमध्ये बढाई मारत असे की, खाण जीव घेऊ शकत नव्हती असा तो एकच माणूस होता. 'मी म्हातारा होऊन अंथरुणात मरणार.' तो नेहमी म्हणे. 'ती मला मारूच शकणार नाही. मी मारू देणार नाही.'

त्याच्या डोक्याच्या उजव्या बाजूला केसातनं लाल कातडीचा तुकडा चमकत होता. एकदा खाणीत उतरत असताना त्याचा पाळणा शंभर मीटर्स खाली कोसळला होता त्याची ती आठवण होती. त्याचे एकोणतीस सहकारी मारले गेले होते. तो चालताना लंगडत होता. त्याच्या भागात काम करताना एक छत कोसळून तो पाच दिवस अडकून पडला होता. तेव्हा त्याचा हा पाय चार ठिकाणी मोडला होता. दिव्याचा स्फोट होऊन तो एका कोळशाच्या गाडीवर फेकला गेला तेव्हा त्याच्या उजव्या बाजूच्या तीन बरगड्या मोडल्या त्या परत काही दुरुस्त झाल्या नव्हत्या पण तो झुजार वीर होता, भाडणारा कोंबडा. कशानंही हार मानणारा नव्हता. तो कपनीविरुद्ध वाटेल ते बोलत असे. त्यामुळ त्याला सगळयात वाईट खाण देण्यात आली होती. तिथनं कोळसा काढण मोठं जिकिरीचं काम होतं. त्याला जितका त्रास त्याच्या दुप्पट जोरान तो 'त्याच्या' विरुद्ध पेटून उठे 'ते' म्हणजे कधी न पाहिला—देखलेला पण सदैव अस्तित्वात असलेला त्यांचा शत्रू. त्याच्या हनुवटीवर एका बाजूला असलेल्या खळीनं त्याच्या लहानसर चेहऱ्याला एक प्रकारचा तिरकेपणा आला होता.

'तुम्ही फार योग्य ठिकाण निवडल आहे, व्हान गॉगसाहेब.' तो म्हणाला, 'बोरीनाजमधले आम्ही गुलामसुद्धा नाही आहोत, आम्ही शुद्ध जनावरं आहोत. मार्कासमध्ये आम्ही पहाटे तीन वाजता उतरतो. जेवणाची सुटी पधरा मिनिटं. सध्याकाळी चार वाजता काम संपतं. खाली अंधार असतो आणि भयंकर गरम असतं. आम्हाला उघड्या अगानं काम करावं लागतं. हवेत कोळसा आणि विषारी वायू भर-

लेला असतो त्यामुळे आम्ही श्वास घेऊ शकत नाही. जेव्हा कोळसा काढतात तेव्हा तिथं उभं राहता येत नाही. आम्हाला गुडघ्यावर रांगत काम करावं लागतं. आठ ते नऊ वर्षांपासून मुलं–मुली, सगळे खाली उतरायला लागतात. साधारण विसाव्या वर्षी आम्हाला ताप आणि फुप्फुसाचं दुखणं जडतं. विषारी वायूच्या स्फोटात किंवा पाळणा कोसळून आम्ही जर मेलो नाही तर आम्ही चाळीस वर्षांपर्यंत जगतो आणि टी. बी. होऊन मरतो, ' तो उजव्या कानावरचा व्रण खाजवत म्हणाला. ' मी खोटं बोलतोय का, व्हेर्ने ?' तो इतका उत्तेजित होऊन बोलत होता की, त्याचं सगळं बोलणं समजणं व्हिन्सेंटला जड जात होतं. त्याचे डोळे संतापानं लाल दिसत होते तरी त्याच्या तिरक्या खळीमुळे त्याचा चेहरा गंमतीदार वाटत होता.

' हे अगदी खरं आहे, दक्रुक. ' जॅक म्हणाला. दक्रुकबाई पलंगाच्या टोकाला कडेवर बसली होती. रॉकेलच्या चिमणीचा मंद उजेड तिच्या चेहऱ्यावर पडला होता. नवऱ्याचं बोलणं हजारदा ऐकलेलं असूनही ती परत लक्ष देऊन ऐकत होती. वर्षानुवर्षं कोळशाच्या गाड्या ढकलणं, तीन पोरांचा जन्म आणि या फाटक्या झोपडीत काढलेले कडक हिवाळे यामुळे तिची सगळी ताकद निघून गेलेली होती. दक्रुक बोलत राहिला.

' आम्हाला या सगळ्याच्या बदल्यात काय मिळतं, व्हान गॉग-साहेब ? ही असली खोली आणि श्वास चालू राहण्याकरता आवश्यक तेवढंच अन्न. आम्ही काय खातो ? ब्रेड, कडू चीज, काळी कॉफी, वर्षात एखाद-दुसऱ्या वेळेला मांस. त्यांनी दिवसाचे पन्नास पैसेही कापले तर आम्ही उपाशी मरू. त्यांचा कोळसा वर काढणं आम्हाला अशक्य होईल. म्हणूनच केवळ ते यापेक्षा कमी पैसे देत नाहीत. आम्ही प्रत्येक दिवशी थोडे थोडे मरत असतो, साहेब. आम्ही आजारी पडलो तर आम्हाला जास्तीचा नवा पैसा मिळत नाही. कुत्र्याच्या मौतीनं आम्ही मरतो. आमची बायका-पोरं शेजाऱ्यांच्या दयेवर जगतात. आठ ते चाळीस वर्षांपर्यंतची बत्तीस वर्षं काळ्या जमिनीत अन् मग त्या टेकडीपलीकडे एक खड्डा, त्यात सगळं विसरलं जातं. '

*

## तीन

व्हिन्सेंटच्या लक्षात आलं, हे कामगार दुर्लक्षित अन् अशिक्षित आहेत. बहुतेकांना लिहिता–वाचता येत नव्हतं; पण ही माणसं त्यांच्या कामात बुद्धिवान व हुशार होती. हिमतीची, मोकळ्या स्वभावाची आणि फार संवेदनाक्षम होती. ती थकलेली, तापानं मलूल झालेली होती. त्यांची चामडी रक्तहीन, निस्तेज दिसत होती. सूर्याची उन्हं फक्त रविवारीच अंगाला लागायची ! एखाद्या दुर्बळ, प्रतिकार करण्याची ताकद नसलेल्या माणसारखे त्यांचे डोळे होते. लहान, दुःखी !

व्हिन्सेंटला ती माणसं फार आकर्षक वाटली. झुन्डर्ट आणि



एटनच्या माणसासारखी साधी-भोळी, चागल्या मनाची होती. बोरीनाजचा स्वभाव कळायला लागल्यापासून त्या उजाड प्रदेशाचं उजाडपणही त्याला जाणवेनासं झालं.

तिथं आल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यानं त्याच पहिलं प्रवचन दिल. दनीसच्या बेकरीमागच्या मोकळ्या शेडमध्ये. त्यानं ती जागा झाडून घेतली, लोकांकरिता बाकडी नेऊन ठेवली. पाच वाजता सगळे सहकुटुंब तिथं जमले. सर्वांच्या गळ्याभोवती शाली आणि डोक्यावर टोप्या होत्या. व्हिन्सेंटनं उसन्या आणलेल्या रॉकेलच्या दिव्याचाच काय तो उजेड होता. सगळे खडबडीत बाकांवर बसून बायबल चाळणाऱ्या व्हिन्सेटकडे पाहात होते. काकडणारे हात काखेत घट्ट दाबून धरून त्याचं बोलण लक्षपूर्वक ऐकत होते.

व्हिन्सेंटनं त्याच्या पहिल्याच प्रवचनाकरिता योग्य सदेश निवडण्याची बरीच खटपट केली. शेवटी त्यानं निवडलं, 'त्या रात्री पॉलला असं दृश्य दिसलं की मेसेडोनियाचा एक माणूस त्याला विनवितो आहे की, 'मेसेडोनियात या आणि आम्हाला मदत करा.'

'मित्रानो,' व्हिन्सेंट म्हणाला, 'मेसेडोनियन माणस हीसुद्धा कामगारच होती. दुःखी, कष्टी आणि थकलेली; पण म्हणूनच आत्म्यानं ती अमर होती. त्यांना कधी शिळं न होणाऱ्या अन्नाची, परमेश्वराच्या शब्दांची गरज होती. परमेश्वराची इच्छा असते की, जीझसचं अनुकरण करणारी माणसं आयुष्य चागल्या रीतीनं उदात्त हेतूकरिता जगू शकतात आणि बोलावणं आल्यावर त्याच्या स्वर्गातल्या राज्यात शांती मिळविण्याकरिता निघून जातात.'

गावात आजारी माणसं बरीच होती. रोज तो एखाद्या डॉक्टरसारखी गावातनं फेरी मारायचा. त्याला शक्य होई तेव्हा त्यांना दूध, पाव, पांघरुणं, मोजे वगैरे गोष्टी पुरवायचा. विषमज्वर आणि विषारी तापानं वस्तीवर धाड घातली. साऱ्या वस्तीवर भीतीचं सावट पसरलं. आजाऱ्यांची संख्या वाढायला लागली.

सारं छोटं वेसमेस त्याला प्रेमानं 'व्हिन्सेटसाहेब' म्हणून हाक मारीत असे; पण अतर राखूनच. वस्तीत एक झोपडी अशी नव्हती की जिथं तो शुश्रूषेकरिता, किंवा अन्न घेऊन गेला नव्हता, जिथं त्यानं परमेश्वराचा सदेश पोचवला नव्हता. नाताळच्या बरंच आधी त्याला मार्कासजवळ एक रिकामा तबेला दिसला. शंभर माणसं बसू शकतील एवढा मोठा होता. तो उजाड होता, थड होता. पण तिथं व्हिन्सेटचं बोलण ऐकायला सारे गर्दी करीत. तो त्यांना बेथलेहेमच्या गोष्टी सागे. त्याला येऊन सहा आठवडे झाले. बोरीनाजमधली परिस्थिती दिवसेंदिवस वाईट होत चालली होती. पण तरीही त्या उजाड तबेल्यात काही काही चिमण्यांच्या उजेडात तो त्या थंडीनं काकडणाऱ्या काळतोंड्याना जीझस समजावून सागत होता. त्याच्या अतःकरणात थोडी ऊब निर्माण करायचा प्रयत्न करीत होता.

हवा परत बिघडली. काळे ढग बोरीनाजवर लोंबायला लागले. पावसानं रस्त्यात, घळीत चिखल माजला. नव्या वर्षादिनी जाँ बातिस्त वेसमेसला गेला आणि व्हिन्सेंटकरिता एक पत्र घेऊन आला. वर डाव्या कोपऱ्यात रेव्ह. पीटर्सनचं नाव होतं. व्हिन्सेट त्याच्या खोलीत पळाला. त्यानं थरथरत्या हातानं पाकीट फोडून वाचायला सुरुवात केली.

प्रिय व्हिन्सेंट,

इव्हॅन्जिलायझेशन समितीने तुझ्या कामाबद्दल बरेच ऐकले आहे आणि नव्या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांकरता तुझी तात्पुरती नेमणूक करण्यात येत आहे.

जूनअखेरपर्यंत सगळे व्यवस्थित चालल्यास तुझी नेमणूक कायम करण्यात येईल. तोपर्यंत तुला दरमहा पन्नास फ्रॅंक्स पगार मिळेल !

मला वरचेवर लिहीत जा आणि अशीच प्रगती चालू ठेव !

तुझा
**पीटर्सन**

तो पत्र हातात घट्ट पकडून अंथरुणावर पडला. अखेर त्याला यश मिळालं होत. त्याच्या आयुष्याचं काम सापडलं होतं. कधीपासून त्याला हेच हवं होतं फक्त त्याला सरळ हात घालण्याचं धैर्य त्याच्यापाशी नव्हतं. महिना पन्नास फ्रॅंक्स म्हणजे त्याच्या जेवण-खाण्याचा खर्च जाऊन उरतील इतके होते. आता कुणावर अवलंबून रहाणं नको !

तो टेबलापाशी बसला अन् अत्यंत उत्साहानं ओथंबलेलं अन् विजय झाल्याच्या आनंदाचं पत्र त्यानं वडिलांना लिहिलं. त्यानं लिहिलं की, आता त्याला घरच्या मदतीची गरज नव्हती आणि याचं सगळं श्रेय त्यानं घरच्यांना देऊन टाकल होतं. त्याचं लिहिणं झालं तेव्हा सध्याकाळ झाली होती. बाहेर पाऊस आणि विजाच्या कडकडाटान धुमाकूळ घातला होता. तो धावत खाली आला आणि आनदाच्या भरात पावसात बाहेर पडला. दनीसबाई मागं पळत आली, 'व्हिन्सेंटसाहेब ! कुठं चाललात ? तुमची हॅट आणि कोट—'

व्हिन्सेंटनं उत्तर दिलं नाही. तो जवळच्या बाधावर उभा राहिला. तिथून त्याला बोरीनाज दिसत होतं. ती धुराडी, कचऱ्याचे ढीग, छोट्या झोपड्या, लुकलुकणारे दिवे, मुंग्यासारख्या दिसणाऱ्या खाणी, बाहेर पडणाऱ्या काळ्या आकृती, दूर एक पाइन वृक्ष, समोर पांढरी झोपडी, शेजारी चर्च आणि एक जुनी गिरणी दिसत होती. ढगांनी आणि सावल्यांनी मिळून केलेला ऊन-सावलीचा विलक्षण खेळ होता. बोरीनाजला आल्यापासून प्रथमच त्याला मिशेल आणि रुईस डायलच्या चित्राची आठवण झाली.

*

## चार

आता अधिकृत इव्हॅन्जेलिस्ट झाल्यामुळे व्हिन्सेंटला कायम स्वरूपाच्या जागेची गरज वाटायला लागली. बरीच शोधाशोध केल्यावर, घळीच्या पायथ्याशी पाइन झाडामध्ये एक जुन, मोठं घर मिळालं. त्याला 'बालवाडी' म्हणत. पूर्वी कधी तरी वस्तीतल्या मुलांना तिथं नाच शिकविला जात असे. जागा साफसूफ करून व्हिन्सेंटनं त्याच्याकडची चित्रं तिथं लावल्यावर त्या जागेला जरा रूप आलं. रोज दुपारी तो चार ते आठ वर्षं वयांची मुलं जमवून त्यांना वाचायला शिकवू लागला आणि बायबलमधल्या सोप्या गोष्टी सांगू

लागला. आख्ख्या आयुष्यात हे एवढंच शिक्षण त्यांना मिळणारं होतं.

'त्या घरात शेगडी पेटवायची तर कोळसा कुठून मिळेल ?' व्हिन्सेंटनं जॅक व्हेर्नेला विचारलं, 'मुलांनाही ऊब हवी; शिवाय शेगडी असली तर रात्रीच्या सभाही जास्त वेळ घेता येतील !'

ती जागा मिळवून द्यायला जॅकनंच त्याला मदत केली होती. थोडं थांबून तो म्हणाला, 'उद्या दुपारी बाराला इथे या ! कोळसा कसा मिळवायचा ते तुम्हाला दाखवितो !'

व्हिन्सेंट दुसऱ्या दिवशी तिथं गेला तेव्हा काही कामगारांच्या बायका आणि मुलं त्याची वाट पाहात असलेली त्याला दिसली. त्यांनी त्यांचे काळे झगे घातले होते. डोक्याला निळे रुमाल बांधले होते. 'व्हिन्सेंटसाहेब, मी तुमच्याकरिता पिशवी आणली आहे !' व्हेर्नेची मुलगी ओरडली, 'तुम्ही सुद्धा भरायला आलं पाहिजे !'

झोपडयांमध्ये आपोआप तयार झालेल्या वळणा-वळणाच्या रस्त्यांवरून सगळी वरात निघाली. दनीसच्या बेकरीला वळसा घालून मार्कासससमोरून ते त्या कचऱ्याच्या डोंगराकडे गेले. एखाद्या ओंडक्यावर किडे चढावेत तसे ते सर्व बाजूंनी त्या डोंगराला चिकटले.

'आपल्याला अगदी वर जायला हवं व्हिन्सेंटसाहेब !' व्हेर्नेची मुलगी ओरडली, 'गेल्या काही वर्षांत आम्ही सगळा तळ साफ केलाय. मी तुम्हाला दाखविते कोळसा कसा निवडायचा ते !'


एखाद्या बोकडासारखी ती वर चढून गेली. व्हिन्सेंटला मात्र गुडघ्यांवर रांगत चढावं लागत होतं. खालचा कचरा सारखा घसरत होता. व्हेर्नेची मुलगी पुढं जाऊन चिखलाची लहान ढेकळं त्याला फेकून मारीत खिदळत होती. ती पोरगी मोठी गोड, लाल गालांची आणि चुणचुणीत होती. ती सात वर्षांची असतानाच व्हेर्ने फोरमन झाला होता. तिनं खाण आतून पाहिलीच नव्हती !

'चला लवकर, व्हिन्सेंटसाहेब !' ती ओरडली.

'नाही तर तुमचा नंबर शेवटचा लागणार !' तिच्या दृष्टीने ही सहलच होती. व्हेर्नेला कंपनीतून कमी किंमतीत कोळसा मिळत असे.

गाड्यांचं त्या ढिगाऱ्यात कचऱ्याची भर टाकण्याचं काम यांत्रिकपणे चालूच होतं. त्यामुळं जास्त वर जाणं शक्यच नव्हतं. त्या पिरॅमिडमधनं कोळसा शोधणं म्हणजे सोपं काम नव्हतं. व्हेर्नेच्या मुलीनं हातांची चाळणी करून नेमका कोळसा कसा मिळवायचा ते व्हिन्सेंटला शिकविलं. वाया जाणारा कोळसा म्हणजे कंपनीच्या दृष्टीनं काहीच नव्हतं. यातनं जे कामगारांच्या बायकांना मिळत असे ते बाजारात विकलं जाणं अशक्यच होतं म्हणून. ते सगळं पावसानं अन् बर्फानं ओलं झालेलं होतं. व्हिन्सेंटचे हात कापले जात होते. पण तरीही त्यानं पाव पिशवी भरलीच ! त्याच्या मतें तो कोळसाच होता. तोपर्यंत बाकीच्या बायकांच्या पिशव्या भरल्यासुद्धा.

पिशव्या बालवाडीत टाकून बायका रात्रीच्या स्वयंपाकाकरिता घरी पळाल्या. जाताना रात्री सगळ्यांना घेऊन प्रवचनाला येण्याचं वचन देऊन गेल्या. व्हेर्नेच्या मुलीनं व्हिन्सेंटला जेवायला बोलावलं अन् व्हिन्सेंटनं तावडतोब ते आमंत्रण स्वीकारलं. व्हेर्नेच्या घराला दोन खोल्या; शेगडया, जेवणाची एक खोली, अंथरुणं दुसऱ्या खोलीत. इतक्या सुखसोयी असूनही जॅकच्या घरात साबण नव्हता ! व्हिन्सेंटला

माहिती होतं की बोरिनच्या घरात साबण म्हणजे अशक्य कोटीतली, न परवडणारी गोष्ट होती. पोर असताना खाणीत उतरायला सुरुवात केल्यापासून ते मरेपर्यंत बोरिनच्या चेहऱ्यावरची कोळशाची धूळ पूर्णपणे कधीच जात नसे.

व्हेर्नेच्या मुलीनं त्याला घराबाहेर बादलीभर पाणी आणून दिलं. व्हिन्सेंटनं स्वच्छ होण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला. टेबलापाशी तो तिच्यासमोर बसल्यावर त्यानं पाहिलं, तिचा चेहरा धुळीनं अन् कोळशानं अजूनही काळा दिसत होता. त्याला वाटलं, आपणही असंच दिसायला हवं. ती त्याच्याशी मजेनं गप्पा मारीत होती.

'तुम्हाला एक माहिती आहे का व्हिन्सेंटसाहेब ?' जॅक म्हणाला, 'तुम्हाला इथं येऊन दोन महिने झाले; पण तुम्ही बोरीनाज पाहिलंच नाहीत !'

'खरं आहे, व्हेर्ने !' ओशाळून व्हिन्सेंट म्हणाला, 'पण हळूहळू माझ्या ओळखी व्हायला लागल्या आहेत !'

'मला ते नाही म्हणायचं !' जॅक म्हणाला, 'मला म्हणायचं आहे की तुम्ही फक्त जमिनीवरचंच आमचं जग पाहिलं आहे. ते काही फारसं महत्त्वाचं नाही. आम्ही फक्त झोपायला 'वर येतो. तुम्हाला जर आमचं आयुष्य खरंच जाणून घ्यायचं असेल तर तुम्ही एकदा खाणीत उतरायला हवं. तुम्हाला समजेल आम्ही पहाटे तीन ते सायंकाळी चारपर्यंत कसे काम करतो ते !'

'मला खरंच यायचंय !' व्हिन्सेंट म्हणाला, 'पण कंपनी परवानगी देईल का ?'

'ते मी अगोदरच विचारलं आहे !' तोंडात साखरेची वडी घोळवत अन् कडू कॉफीचे घुटके घेत जॅक म्हणाला, 'उद्या सकाळी मी सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करायला मार्कासमध्ये उतरतोय. पहाटे पावणेतीनला दनीसच्या घरासमोर तयार व्हा ! मी तुम्हाला घेऊन जाईन !'

ते सगळं कुटुंब व्हिन्सेंटबरोबर हॉलकडे निघालं. पण घरात असेपर्यंत ठीक असलेल्या जॅकला रस्त्यात थंडी वाजून खोकल्याची जबर उबळ आली. तो घरी परत गेला. व्हिन्सेंट हॉलवर आला तेव्हा दक्रुक आधीच येऊन स्टोव्हशी खटपट करीत असलेला दिसला.

'नमस्कार व्हिन्सेंटसाहेब !' त्याचं हसू त्याच्या चेहऱ्यात मावतही नव्हतं. 'छोटचा वेसमेसमध्ये हा स्टोव्ह पेटवता येणारा मी एकटाच ! आम्ही इथं समारंभ करायचो तेव्हापासून मला ते माहिती आहे. तो जरा त्रासदायक आहे; पण मला त्याच्या सगळचा खोडी माहीत आहेत !'

पिशव्यांमध्ये भरून आणलेला सगळा कचराच होता. दक्रुकची शेगडी आता चांगलीच पेटली होती. तो खुषीत लंगडत सगळीकडे फिरत होता. त्याच्या कानशिलावरचा व्रण रक्ताळल्यासारखा लाल दिसत होता.

व्हिन्सेंटच्या चर्चमधलं पहिलं प्रवचन ऐकायला छोटचा वेसमेसमधलं प्रत्येक कुटुंब हजर होतं. बाकं भरल्यावर जवळ राहाणाऱ्यांनी बसायला खोकी अन् खुर्च्या आणल्या. जवळजवळ तीनशे माणसं जमली. दुपारच्या बायकांच्या प्रेमळ वागण्यानंच व्हिन्सेंट आधी सद्गदित झाला होता. आता त्याला अभिमान वाटत होता की, आपण आपल्या स्वतःच्या चर्चमध्ये आपल्याला हवं ते, प्रामाणिकपणे सांगू शकतोय. अन् समोरच्या बोरिन्सच्या चेहऱ्यावरचं हसू पाहू शकतोय.

'असं म्हणतात,' व्हिन्सेंट म्हणाला, 'की आपण जगात परके आहोत; पण एकट नाही. आपला आकाशातला बाप आपल्याबरोबर आहे. या जगातले आपण यात्रेकरू आहोत. आणि आपलं आयुष्य हा या जगापासून स्वर्गापर्यंतचा प्रवास आहे.'

'दुःख हे आनंदापेक्षा केव्हाही जास्त बरं. एखाद्या पीडिताच्या घरी जाणं हे सुखी माणसाकडे जाण्यापेक्षा केव्हाही चांगलं. दुःखामुळं अंतःकरण शुद्ध होतं.'

'ज्यांचा जीझसवर विश्वास आहे ते जाणतात की, जगात दुःखाची अशी एकही जात नाही की जिच्यात आशेचा किरण नसतो. जन्माला येणं हेच अंधारातून उजेडाकडे जाण्यासारखं आहे.'

'परमेश्वरा, आम्हाला सुबुद्धी दे ! आम्हाला गरिबी अन् श्रीमंती दोन्ही नको! आमच्या योग्यतेपुरतं अन्न आम्हांला दे !'

'तथास्तु !'

दक्रुकबाई चटकन त्यांच्याजवळ आली. 'व्हिन्सेंटसाहेब, माझं सगळं आयुष्य दुःखात गेलं. त्यामुळं माझा देवावरचा विश्वासच उडाला होता. तुम्ही तो परत मिळवून दिलात. फार उपकार झाले !'

सगळे गेल्यावर व्हिन्सेंटनं हॉलला कुलूप लावलं आणि तो दनीसकडे परतताना विचार करायला लागला. गावकऱ्यांच्या आजच्या प्रतिसादावरून असं वाटत होतं की, आता त्याच्यात अन् त्यांच्यात




काहीच अंतर, दुरावा राहिलेला नव्हता. त्यांचा त्याच्यावर विश्वास बसलेला होता. या काळतोंड्यांची देवाचा प्रतिनिधी म्हणून मान्यता मिळाली होती. हे कशामुळे? त्याच्या नव्या चर्चमुळे? छे:! सुरुवातीला तो अधिकृतरीत्या इव्हॅन्जलिस्ट झालेला नव्हता हेही कुणाला ठाऊकं नव्हतं. त्याच्या प्रवचनात त्यामुळं काही फरक पडत नव्हता. तबेल्यातून चर्चमध्ये आल्यामुळं प्रवचनं चांगली होत असत, असाही भाग नव्हता.

दनीसकडे निजानीज झाली होती. बेकरीची भट्टी मात्र चालू होती. स्वयंपाकघरातच असलेल्या खोल विहिरीतून त्यानं बादलीभर पाणी काढलं अन् तो ते घेऊन वर गेला. आरसा भिंतीवर अडकवून त्यानं स्वत:कडे पाहिलं. त्याला वाटलंच होतं, व्हेर्नेकडे त्यानं नावाला तोंड धुतलं होतं. डोळ्यांच्या कडा, जवडा अजूनही काळेच होते. त्याला हसू आलं. असंच काळं तोंड घेऊन त्यानं नव्या चर्चमध्ये प्रवचन दिलं होतं. वडिलांनी अन् स्ट्राइकर काकांनी पाहिलं असतं तर ते घाबरलेच असते.

त्यानं पाण्यात हात बुडविले. ब्रुसेल्सहून येताना आणलेल्या साबणाचा फेस करून तो तोंडाला लावणार एवढ्यात त्याच्या डोक्यात काही तरी चमकलं. ओले हात हवेतच थबकले. त्यानं परत आरशात आपलं कोळशाचं काळं तोंड पाहिलं.

'अर्थात!' तो मोठ्यानं म्हणाला, 'म्हणून त्यांनी मला आपल्यात घेतलं!' त्यानं हात धुऊन टाकले अन् तोंडाला हात न लावता तो अंथरुणात शिरला.


*

## पाच

दुसऱ्या दिवशी सकाळी तो अडीच वाजता उठला. दनीसच्या स्वयंपाकघरातला वाळका ब्रेड खाऊन पावणेतीनला दारात जॅकची वाट पहात उभा राहिला. रात्री मुसळधार बर्फ पडलं होतं. रस्ता झाकला गेला होता. ते दोघं मार्कासच्या जवळ येताच चारी बाजूंनी कामगार बर्फातून वाट काढीत खाणीकडे येताना दिसले. कडाक्याची थंडी होती. लोकांच्या अंगांवर पातळ काळे कोट होते. त्यांनी ऊब येण्याकरिता खांदे आवळून धरले होते.

जॅकनं त्याला एका खोलीत नेलं. तिथं बरेच रॉकेलचे दिवे टांगून ठेवले होते. प्रत्येक दिव्याखाली नंबर होता. 'खाली जेव्हा अपघात होतो तेव्हा कोणती माणसं अडकली ते इथे नसलेल्या नंबरवरून कळतं.' जॅक म्हणाला.

कामगारांनी पटापट आपापले दिवे उचलले अन् ते समोरच्या विटांच्या इमारतींकडे निघाले. आत उतरायचे पाळणे तिथे होते. पाळण्याला एकावर एक असे सहा कप्पे होते. प्रत्येक कप्प्यात खालून कोळसा वर आणणारी गाडी मावत असे. दोन माणसांनाच एका कप्प्यात व्यवस्थित उभं राहून खाली जाता येई. पण कोळशाची थप्पी लावावी तशी पाच–पाच माणसं एका कप्प्यातून खाली उतरविली जात होती. जॅक फोरमन असल्यानं तो, व्हिन्सेंट

**जैसी दीपकळिका धाकुटी परी बहु तेजाते प्रकटी.... तैसी सदबुध्दि हे थेकुटी म्हणों नये।**

वृक्षवल्ली, वनचरे यांच्या सान्निध्यात
आणि निसर्गरम्य डोंगरदऱ्यांच्या
कुशीत वसलेल्या
या कारखान्यात
प्रज्वलित झालेला
आधुनिक उद्योगदीप आसमंतातला
अवघा काळोख उजळीत आहे.
चर्मोद्योग क्षेत्रांत आता
जगन्मान्य झालेले
'वासब' या भुकटीरूप द्रव्याची
निर्मिती आणि निर्यात करून
आपल्या परिसरातील
अवघ्या जनांना
स्वावलंबी बनविण्याचे कार्य करणारी
'आंबा टॅनिन' ची दीपकळिका
आता तेजाने प्रकटली आहे!

**मे. पोलसन लिमिटेड (आंबा टॅनिन डिव्हिजन)**
कारखाना : आंबा ( विशाळगड )
ऑफिस : रेल्वे स्टेशन समोर,
कोल्हापूर.
फोन : ४४०४

Jayendra

आणि एक माणूस, तिघच फक्त एका कप्प्यात उभे राहिले. त्यांना हलायला जागा नव्हती. डोकं वरच्या जाळीला लागत होत.

'हात सरळ ठेवा व्हिन्सेंटसाहेब ! जरा जरी बाजूला लागला तरी तुम्हाला हाताला मुकावं लागेल !'

सिग्नल मिळाला अन् दोन लोखंडी रुळांवरून पिंजरा खाली जायला लागला. त्या पाळण्यात अन् खडकाच्या भिंतीत अंतर नव्हतं. व्हिन्सेंटच्या अंगावर शिरशिरी आली. उजेडाचं जग अर्धा मैल मागं पडलं होतं अन् जर काही बरं-वाईट झालं तर मग मृत्यूच ! अशी भीती त्याला पूर्वी कधी वाटली नव्हती. अनोळखी प्रदेशात, त्या काळघा भगदाडात सरळ शिरायचं! तसं त्याला भ्यायचं काही कारण नव्हतं. कारण गेल्या दोन महिन्यांत इथे अपघात झाला नव्हता; पण मनातले विचार थांबू शकत नव्हते.

त्यान ही भीती जॅकला बोलून दाखविली. तो सहानुभूतीनं हसला. 'प्रत्येक कामगाराला हे वाटतं.'

'पण त्यांना आता सवयीचं झालं असेल ना ?'

'नाही. कधीच नाही. मरेपर्यंत पाळण्याची ही भीती त्याची मानगूट सोडीत नाही !'

'आणि तुम्हाला......'

'मीही आतनं तुमच्यासारखाच कापतो आहे. गेली तेहतीस वर्षं रोज आत उतरतोय !'

साडेतीनशे मीटर्संवर म्हणजे अर्ध्या अंतरावर पाळणा किंचित थांबला अन् पुन्हा चालायला लागला. बाजूच्या खडकांतून व्हिन्सेंटला पाणी झिरपताना दिसलं अन् तो परत शहारला. वर पाहिल की, आकाशातल्या ताऱ्याएवढा दिवसाचा प्रकाश दिसत होता. साडे-सहाशे मीटर्संवर ते बाहेर पडले; पण बाकीचे पुढे गेले. तो एक मोठा बोगदा होता. खडकात अन् मातीत खणलेला ! त्याला वाटलं होतं, आत अगदी भट्टी असणार. त्यामानानं तिथं थड होतं.

'हे काही फारसं वाईट नाही !' तो म्हणाला.

'नाही ना; पण इथं आता कुणीच काम करीत नाहीयं. इथला कोळसा पूर्वीच संपलाय. आता इथं सरळ वरून हवा मिळते; पण खाली गेलेल्या कामगाराना त्याचा काहीच उपयोग नाही !'

ते बोगद्यात जवळजवळ पाव मैल चालल्यावर जॅक वळला

'व्हिन्सेंटसाहेब, माझ्यामागं या; पण हळू ! जरा जरी घसरलात तरी सगळयाचीच गच्छती !'

व्हिन्सेंटच्या डोळयादेखत तो अंधारात दिसेनासा झाला. व्हिन्सेंट धडपडत पुढं निघाला. भिंतीत एक भगदाड सापडलं. एक लुकडा माणूस जाऊ शकेल एवढच ते भोक होतं. आत शिडी होती. पहिले पाच मीटर्सपर्यंत ठीक होत. नंतर नंतर व्हिन्सेंटला शिडीकडे पाठ करून उतरावं लागत होत. खडकातून पाणी झिरपत होतं. शिडी चिखलान भरली होती. तोंडावर गळणारे चिखलाचे थेंब त्याला जाणवले.

थोडया वेळाने तळाशी पोचल्यावर ते गुडघ्यावर रागत निघाले. आत गुहाची एक ओळच्या ओळ होती. एका गुहेत पाच कामगार काम करीत. एक कोळसा खणून काढीं, दुसरा तो पायांपासून दूर ढकली, तिसरा गाडीकडे नेई, चौथा गाडी भरी अन् पाचवा गाडी रुळावरनं ढकलीत नेई. सर्वांचे कपडे काळे. कोळसा भरणारा बहुधा लहान मुलगा असे. उघडा, काळा पडलेला. गाडी ढकलायचं काम मुली करीत. पुरुषांइतक्याच त्याही काळघा. छत गळत होतं. छोटे दिवे लावलेले होते. त्याचा जो उजेड पडेल तेवढाच ! रॉकेल वाच-विण्याकरिता तेही बारीक केले होते. हवा यायला कुठूनही जागा नव्हती. हवेत धूळ भरली होती. जमिनीतल्या नैसर्गिक उष्णतेमुळे कामगाराना काळचा घामाची आंघोळ होत होती. पहिल्या काही गुहामध्ये माणसं सरळ उभ राहून तरी काम करीत होती. पुढे गेल्या-वर गुहा लहान होत गेल्या. शेवटी शेवटी माणसं जमिनीवर पालथी पडून, कोपरावर टेकून भिंती फोडीत होती. जसजसा वेळ जात होता तसतशी माणसांच्या शरीराच्या उष्णतेमुळे हवा जास्त तापत होती, धुळीनं गच्च झाली होती. माणसांची नाकं-तोंड काळघा, तापलेल्या काजळीनं भरली होती.

'ही माणसं दिवसाला अडीच फ्रॅंक्स् मिळवितात!' जॅक व्हिन्सेंटला म्हणाला, 'तेही दारावरल्या अधिकाऱ्यानं कोळशाचा दर्जा मान्य केला तर ! पाच वर्षांपूर्वी तीन फ्रॅंक्स् मिळत; पण दरवर्षी पगार कमी कमी होतोय !'

त्यान छताला दिलेले टेकू तपासले. त्या कामगाराच्या जीवन-मर-णाचा निर्णय जणू ते टेकूच लावणार होते.

'तुमचा हा टेकू वाईट आहे.' त्यानं तिथल्या लोकांना सांगितलं. 'तो ढिला पडतोय. छत खाली वाकेल.'

त्या सर्वांतला जो पुढारी होता तो उसळून म्हणाला, 'टेकूला पैसे दिले की आम्ही ते करू. कामाचा वेळ त्यात घालवला तर कोळसा कोण काढील ? घरी उपाशी मरायचं ते इथ छताखाली मरू !'

शेवटच्या गुहेनंतरच भगदाड तर आणखीच भयानक होतं. तिथं शिडीही नव्हती. माती ढासळून माणसं मरू नयेत म्हणून मध्ये ओंडके लावले होते. जॅकनं व्हिन्सेंटचा दिवा घेतला न् तो उतरायला लागला.

'सावकाश व्हिन्सेंटसाहेब ! माझ्या डोक्यावर पडलात तर निकाल लागेल !'

ते आणखी पाच मीटर्स खाली उतरले. पाऊल नेमक कुठं पडतय् ते अधारात कळत नव्हतं.

खाली आणखी एक खाण होती. पण इथं कामगारांना गुहादेखील नव्हत्या. गुडघ्यावर टेकून, पाठी छताला लावून ते खडक फोडीत होते. व्हिन्सेंटला जाणवलं, वरच्या गुहा बऱ्याच थंड म्हणायला हव्यात. खाली जावं तशी उष्णता वाढत होती. जिभा कोरडया पडून बाहेर आलेल्या, उघडी अंगं धुळीनं भरलेली. काही न करताही त्याला वाटलं, आणखी एकही मिनिट इथं थाबणं अशक्य आहे ! कामगार भयानक कष्ट करीत होते. त्याच्यापेक्षा हजारपटीनी दमले होते; पण त्यांना क्षणभरही विश्रांती किंवा गारवा मिळणार नव्हता. विश्राती घेतली तर पुरेसा कोळसा नाही, कोळसा नाही म्हणजे दिवसाचे पन्नास पैसे नाहीत !

जॅक आणि व्हिन्सेंट पुढं निघाले. वाटेत त्याना गाडया पुढे जाऊ देण्याकरिता वारंवार थाबावं लागत होतं. हा रस्ता जास्त अरुंद होता. गाडया ढकलणाऱ्या मुली जास्त लहान, दहा वर्षांच्या आतल्या होत्या. त्याच्या मानान गाडया फारच जड होत्या.

शेवटच्या टोकाला आल्यावर जॅक म्हणाला, 'इकडे या व्हिन्सेंट-साहेब ! आपण सर्वांत खाली, सातशे मीटर्संवर जाऊ. जगात कुठेही

# भारतात सर्वात अधिक खपणारा

**कोणत्याही डिटर्जंट वडी अथवा बारपेक्षा**




# सुपर ७७७

लाखो लोकांचा आवडता आणि त्यांच्या मते:
सुपर ७७७ डिटर्जंट धुलाईचा बार
दीर्घकाळ टिकतो, विपुल शुभ्रता देतो,
साबणाच्या तुलनेने पैशाचीही बचत करतो.

**पैसे वाचवा, सफेदी वाढवा**

Shilpi-dm-6a/77 Mar

तुम्हाला असं दृश्य पाहायला मिळणार नाही !'

ते पाळण्यातनं तीस मीटर्सवर घसरत गेले. एका दुहेरी बोगद्यातनं ते अर्धा मैलपर्यंत चालत गेले आणि मग एका भोकापाशी परत आडवे पडून रांगत निघाले. जॅक म्हणाला, 'हा नवीन सापडलेला बोगदा ! जगातल्या कुठल्याही खाणीपेक्षा इथं कोळसा काढणं अधिक कठिण आहे !'

व्हिन्सेंट एका घुमटाच्या आकारातल्या जागेत आला. माणसाला उभं राहाता यावं इतपत जागा होती तिथे. आधी डोळ्यात बोट घातलं तरी दिसेना ! हळू हळू भिंतीवर चार ठिकाणी मंद उजेड दिसायला लागला. त्याचं अंग घामानं ओलं झालं होतं. कपाळावरची धूळ ओघळून डोक्यावर आली होती. तो धापा टाकीत उभा राहिला. श्वासाबरोबर जळती हवा आत शिरली, ओली आग ! ही मार्कासमधली सर्वांत वाईट जागा. एखाद्या मध्ययुगीन यातनातळासारखी !

'अरेच्या !' एक ओळखीचा आवाज आला.

'व्हिन्सेंटसाहेब आलेत ! काय साहेब, आम्ही दिवसाला पन्नास पैसे कसे मिळवितो हे पाहायला आलात नं ?'

'जॅकने दिवे तपासले. सर्वांच्या ज्योती निळ्या होत्या.

'त्यानं इथं यायला नको होतं.' दक्रुक व्हिन्सेंटच्या कानात कुजबुजला. त्याचे पांढरे डोळे चकाकले.

'त्याला इथंच रक्तस्राव होईल अन् आम्हाला त्याला गाडीत घालून वर न्यावा लागेल !'

'दक्रुक, सकाळभर हे दिवे असेच जळतात का ?'

'हो !' बेफिकिरीनं दक्रुक उत्तरला.

'विषारी वायू रोज वाढतोय. एकदा स्फोट झाला म्हणजे सगळाच त्रास मिटेल !'

'गेल्याच रविवारी हा बोगदा साफ केला होता !'

'पण तो परत भरतोय !' दक्रुक मजेत त्याचा व्रण खाजवीत म्हणाला.

'मग एक दिवस काम बंद ठेवा ! आम्ही परत साफ करून घेतो.'

कामगारांनी एकच गलका केला.

'पोरांच्या पोटात काय घालायचं आम्ही ? आधीच या पैशात भागत नाही. एक दिवस देऊन कसं चालेल ? आम्ही नसताना करा म्हणावं काय ते. पण आम्हाला चारजणांसारखं खाऊ देत !'

'ठीक आहे.' दक्रुक हसत म्हणाला.

जॅकनं घड्याळ निळ्या ज्योतीपाशी धरलं.

'नऊ.'

'चला. जेवायची वेळ झाली !'

घामेजलेली माणसं भिंतीच्या आधारानं टेकून जेवायला बसली. त्यांना सरपटत जरा थंड जागी जाता येणंही अशक्य होतं. कारण सुटी फक्त पंधरा मिनिटांचीच होती. नुसत्या जाण्या-येण्यातच तेवढा वेळ गेला असता. वाळका पाव अन् कडू चीजवर ते भुकेपोटी तुटून पडले होते. हातावरचा कोळसा घामासकट पावात झिरपत होता. प्रत्येकाजवळ बीअरची बाटली भरून कॉफी होती. त्यात पाव बुडवून ते खात होते. दिवसाचे तेरा तास काम अन् बदल्यात कॉफी, वाळका पाव अन् कडू चीज !

◻

आत उतरल्याला आता सहा तास होऊन गेले होते. व्हिन्सेंट हवेअभावी गुदमरायला लागला होता. हा छळ आणखी थोडा वेळही सोसणं त्याला शक्य नव्हतं. जॅकने 'आपण निघू या आता !' असं म्हटलं तेव्हा त्याला त्याचे पाय धरावेसे वाटले.

'दिव्याकडे लक्ष दे दक्रुक !' जॅक बोगद्यात शिरण्याआधी म्हणाला. 'तो बिनसला तर तुझी माणसं आधी बाहेर काढ !' दक्रुक कडवटपणे हसला.

'अन् ते आमचे पन्नास पैसे देतील आम्हाला ? कोळसा नाही निघाला तरी ?'

या प्रश्नांना उत्तर नव्हतं. जॅकइतकंच दक्रुकलाही माहिती होतं.

जॅकनं खांदे उडविले अन् तो बोगद्यातनं सरपटायला लागला. पाठीमागून व्हिन्सेंट यायला लागला. काळा घाम डोळ्यात जाऊन तो जवळजवळ आंधळाच झाला होता !

अशा तऱ्हेने अर्धा तास चालल्यावर ते पाळण्यापाशी आले.

पाळण्यात विहिरीतनं वर येणाऱ्या बादलीत बसल्यासारखं वाटत होतं. व्हिन्सेंट त्याच्या मित्राकडे वळून म्हणाला,

'मला एक सांगा, तुम्ही लोक आत का उतरता ? दुसरीकडे कुठे तुम्हाला काम मिळणार नाही का ?'

'वा ऽ, व्हिन्सेंटसाहेब, ते शक्य नाही ! कारण आमच्यापाशी पैसे नाहीत. अख्ख्या बोरीनाजमध्ये एकही कुटुंब असं नाही ज्यानं दहा फ्रँक्स् बाजूला काढून ठेवलेत. आणि खरं सांगू ? जरी पैसे असले तरी आम्ही जाणार नाही ! खलाशाला ठाऊक असतं– त्याला बोटीवर कोणकोणते धोके आहेत; पण तरीही किनाऱ्याला लागलं की त्याला समुद्राची ओढ लागते. तसं आमचं आहे. आम्हाला आमच्या खाणी आवडतात. वर असण्यापेक्षा खाली असणं आम्हाला आवडतं. फक्त आमचं मागणं इतकंच की आम्हाला माणसासारखं राहायला, जगायला मिळावं, जीव वाचविण्याकरिता पुरेसं संरक्षण मिळावं !'

पाळणा वर पोचला. उन्हात चकाकणाऱ्या बर्फानं भरलेल्या शेतातनं तो घरी गेला. आरशात पाहिलं. त्याचा चेहरा ठार काळा झाला होता ! अर्धवट भानावर असलेल्या अवस्थेत तो तसाच बाहेर पडला; ताज्या हवेत श्वास घेत. 'नाही, माझ्या मुलांना असली कामं करायची शिक्षा परमेश्वर देणार नाही ! मी आता पाहिलं ते सगळं स्वप्न होतं !'


॥ श्री कलेश्वर प्रसन्न ॥

व्ही. एस. माळंडकर

आणि कंपनी

फोन : ४५८०४४

ज्युवेलर्स

हनुमान मंदिर समोर, एन. सी. केळकर रोड, दादर, मुंबई-२८

B.Y.P


त्यातल्या त्यात सुखवस्तू असलेल्या दनीसच्या घरावरनं तो दक्कुच्या घरापाशी आला. त्याच्या हाकेला प्रथम कुणीच उत्तर दिलं नाही. थोड्या वेळानं दक्कुचा सहा वर्षांचा मुलगा बाहेर आला. ओढलेला, खुरटलेल्या अंगाचा; पण त्याच्यातही दक्कुसारखी झगडण्याची ताकद असल्याचं जाणवत होतं. दोन वर्षांनी तोही आत उतरेल, गाडीत कोळसा भरायला !

'आई कोळसा आणायला गेलीय !' तो म्हणाला.

'तुम्हाला थोडं थांबावं लागेल. मी धाकटयांना सांभाळतोय !'

अंगावर नुसता शर्ट घातलेली दक्कुची दोन मुलं जमिनीवर काही काडयांशी खेळत होती. व्हिन्सेंटनं त्यांच्याकडे टक लावून पाहिलं अन् तो शहारला. मोठा शेगडीत कोळसे घालीत होता; पण त्याची काहीच ऊब मिळत नव्हती. व्हिन्सेंटनं धाकटया दोघांना उचलून अंथरुणावर ठेवलं, त्यांना गळयापर्यंत पांघरुणं घातली. आपण या दुर्दैवी झोपडयांत का आलोत, हे त्याला कळेना. काही तरी करायला हवं. काही तरी सांगायला हवं. त्यांना मदत करायला हवी. त्यांना सांगायला हवं की, तुमच्या दुर्दैवाचे दशावतार मला पुरते कळलेत !

दक्कुची बायको घरी आली तेव्हा तिनं व्हिन्सेंटला ओळखलंच नाही. तिनं आणलेल्या वस्तू एका खोक्यात टाकल्या अन भराभरा कॉफी केली. कडू, काळी कॉफी ! तिला बरं वाटावं म्हणून व्हिन्सेंटनं ती प्यायली.




'हल्ली कचरा फारच वाईट आहे व्हिन्सेंटसाहेब !' ती म्हणाली. 'कंपनी जरासुद्धा कोळसा सोडीत नाही. या पोरांना ऊब कशी द्यायची सांगा. त्यांच्याकरिता या शर्टाखेरीज दुसरे कपडे नाहीत. मांजरपाटानं त्यांची कातडी सोलवटून निघते. दिवसभर अंथरुणात डांबलं तर त्यांची वाढ कशी व्हायची ?'

व्हिन्सेंटचा गळा दाटून आला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. असलं अमानवी दुःख त्यानं कधी पाहिलं नव्हतं. त्याला कळेना, ज्या बाईची मुलं गारठून मरायच्या पाळीला आलीत तिला परमेश्वराच्या प्रार्थनेचा अन गॉस्पेलचा काय उपयोग ? त्याचा या सगळयात संबंध कुठे येतो ? त्यानं खिशातून काही फ्रँक्स काढले अन दक्कुच्या बायकोला दिले.

'याचे मुलांना लोकरीचे कपडे आणा. प्लीज !'

याचा काही उपयोग नव्हता, त्याला कळत होतं. बोरीनाजमध्ये आणखी शेकडो मुलं अशी होती. हे कपडे फाटल्यावर दक्कुची मुलंही परत काकडणार आहेत, हेही त्याला ठाऊक होतं.

तो टेकडी चढून दनीसकडे परतला. बेकरीचं स्वयंपाकघर गरम, ऊबदार होतं. दनीसबाईनं त्याला तोंड धुवायला गरम पाणी दिलं, जेवण तयार केलं. तिच्या लक्षात आलं तो दमलाय. तिनं त्याच्या-करिता थोडं जास्तीचं लोणी बाजूला काढून ठेवलं.

व्हिन्सेंट वर त्याच्या खोलीत गेला. त्याचं पोट भरलं होतं. त्याचं अंथरूण मोठं, आरामशीर होतं. स्वच्छ गादी, उशीचा पांढरा अभ्रा, भिंतीवर जगातल्या थोर चित्रकारांची मुद्राचित्रं होती. त्यानं ड्रॉवर उघडून सगळे कपडे पाहिले. कपाटातले दोन बुटांचे जादा जोड पाहिले. त्याला वाटलं आपण खोटे आहोत, भित्रे आहोत. या खाण-कामगारांना गरिबीत तत्त्वज्ञान शिकवितो, आपण मात्र सगळ्या सुखसोयींनी सुसज्ज आयुष्य जगतो. तो ढोंगी होता, त्याचा धर्म निरुपयोगी होता. या कामगारांनी त्याला वास्तविक लाथ मारून बोरीनाजबाहेर हाकलून द्यायला हवं. त्यांचं दुःख वाटून घेणं, त्यात सहभागी होणं वगैरे सगळी ढोंगं होती. त्यांच्या आठवडयाइतकं जेवण त्याला काही काम न करता एका वेळेला मिळत होतं. या लोकांनी त्याच्या एकाही शब्दावर विश्वास ठेवायला नको होता. त्याची अवस्था फारच चमत्कारिक झाली !

त्याच्यासमोर दोनच मार्ग होते. रातोरात तोंड काळं करणं. त्यांना त्याचं सारं ढोंग लक्षात येण्याआधी किंवा त्यानंतर तरी खऱ्या अर्थानं परमेश्वराचा प्रतिनिधी म्हणून काम करणं.

त्यानं त्याचं सारं सामान, चित्रं, कपडे बॅगेत भरले. बॅग खुर्चीवर ठेवून पुढल्या दारी तो गेला. पाईन वृक्षांच्या त्या परिसरात काही झोपडया होत्या. थोड्या चौकशीनंतर त्याला त्यातली एक रिकामी दिसली. उतारावर बांधलेली, खिडकी नसलेली ती झोपडी होती. जमीन वापरून वापरून कठीण झालेली, बर्फ वितळून त्याचं पाणी वरून गळत होतं. सबंध हिवाळाभर झोपडी वापरात नसल्यानं भिंतीतल्या फटी तशाच होत्या. थंड वारा आत येत होता.

'ही जागा कुणाच्या मालकीची आहे ?' बरोबर आलेल्या बाईला त्यानं विचारलं.

'वेसमेसमधल्या एका व्यापाऱ्याची.'

'भाडं ठाऊक आहे का ?'

'महिन्याला पाच फ्रँक्स.'
'ठीक आहे. मी घेतो ही.'
'पण तुम्ही कसे राहणार इथं व्हिन्सेंटसाहेब ?'
**'का...'**
'पण...पण...ही घाणेरडी आहे. माझ्या घरापेक्षाही हे भयानक आहे. छोटचा वेसमेसमधलं कोणतंही घर इतकं वाईट नाही!'
'म्हणूनच मला ते हवंय्!'

तो टेकडी चढून परत वर आला. आता त्याला बरंच वरं वाटत होतं. दनीसबाई कशाला तरी त्याच्या खोलीत जाऊन आलेली होती अन् तिनं ते आवरलेलं सामान पाहिलं होतं.

'व्हिन्सेंटसाहेब, काय झालं? तुम्ही हॉलंडला अचानक परत का चालला आहात?' तिनं विचारलं.

'मी कुठेही जात नाहीय. मी बोरीनाजमध्येच राहणार आहे!'

'पण मग...' तिच्या चेहऱ्यावर गोंधळ उमटला. व्हिन्सेंटनं सांगितल्यावर ती हळूच म्हणाली,

'पण तुम्ही असे राहू शकणार नाही व्हिन्सेंटसाहेब! तुम्हाला त्याची सवय नाही. जीझसनंतर काळ बदलला आहे. आता प्रत्येकानं जितकं जमेल तितकं चांगलं आयुष्य जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तुम्ही किती चांगले आहात हे लोकांना तुमच्या कामावरनं कळतं.'

व्हिन्सेंट काहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. तो त्या व्यापाऱ्याकडे गेला, जागेचं भाडं भरलं अन् सामान त्यानं हलवलंसुद्धा. त्याचा पन्नास फ्रँक्सचा चेक आल्याबरोबर त्यानं एक लाकडी पलंग अन् जुनी शेगडी विकत घेतली. आता महिनाभर जेमतेम रोजचा पाव, कॉफी आणि चीज विकत घेण्याइतकेच पैसे उरले. छपरातनं पाणी गळत होतं, ती भोकं त्यानं चिखलानं बुजवली. भिंतीतल्या फटी बुजविल्या. आता तो अगदी इतरांसारखाच राहत होता. त्यांच्यासारखाच जेवत होता. तो त्यांच्यातलाच एक होता. आता त्याला त्यांना परमेश्वराची वचनं सांगायचा अधिकार होता. ✲

## सहा

बेल्जिअन कोळसा खाणीचा मॅनेजर, व्हिन्सेंटला वाटत होतं तसा पशू वगैरे नव्हता. वेसमेसमधल्या चारी खाणी त्याच्या ताब्यात होत्या. तो थोडा कठोर होता हे खरं; पण तरी त्याच्या डोळ्यात काही खरोखर सोसलेल्या माणसाचे सहानुभूतीचे भाव होते.

'हे सगळं खरं आहे. अन् ही जुनीच कहाणी आहे.'

व्हिन्सेंटनं आपलं म्हणणं भडाभडा मांडल्यावर तो म्हणाला, 'लोकांना वाटतं, जास्तीत जास्त फायदा उपटण्याकरता आम्ही त्यांना उपाशी ठेवतो. पण विश्वास ठेवा, मी सांगतोय ते फक्त खरंच आहे. हे पहा, पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय खाण-समितीचे अहवाल–

'अन् हे पहा'– टेबलावर पसरलेल्या नकाशावरची तळाची निळी रेघ बोटानं दाखवीत तो म्हणाला,

'बेल्जिअन् कोळसा खाणी या जगातल्या सर्वांत दरिद्री खाणी आहेत. कोळसा मिळणं इथं इतकं मुश्किल आहे की, बाजारात त्यावर काही फायदा मिळवणं कठीण आहे. आमचा खर्च सर्वांत जास्त अन् फायदा सर्वांत कमी; पण तरीही फायद्यात चाललेल्या खाणी-इतक्याच दराला आम्हाला कोळसा विकावा लागतो. कुठल्याही क्षणी दिवाळं निघेल अशी परिस्थिती आहे आमची. तुमच्या लक्षात येतंय् का?'

'लक्षात येतंय् माझ्या.'


'दिवसाला एक फ्रँक जरी आम्ही दिला तरी आमचा खर्च कोळशाच्या बाजारभावाहून वाढेल. खाणी बंद कराव्या लागतील अन् मग मात्र कामगार खरोखर उपाशी मरतील.'

'मालकांनी कमी फायदा घेऊन चालणार नाही का? तेवढेच कामगारांना जादा देता येतील.'

'नाही साहेब.' मॅनेजर मान हलवत म्हणाला.

'अखेर खाणी कशावर चालतात? इतर धंद्यांसारख्याच भांडवलावर, आणि हे भांडवल परत मिळवायलाच हवं. बेल्जिअन खाण संघटना आज फक्त तीन टक्के डिव्हिडंड देते. अर्धा टक्का जरी कमी केला तरी भागीदार भागीदारी काढून घेतील. म्हणजे आम्हाला खाणी बंद करण्यावाचून गत्यंतर नाही. परत खाण–कामगारांचं मरण आलंच. तेव्हा ही भयानक परिस्थिती निर्माण होण्याला आम्ही मालक किंवा मॅनेजर्स जबाबदार नाही, तर ही भौगोलिक परिस्थितीच कारण आहे. तुम्हाला दोष द्यायचाच तर तो परमेश्वराला द्यावा लागेल.'

त्याच्या त्या परमेश्वरावद्दलच्या उर्मट बोलण्यानं खरं तर

BEEJ 129-714

व्हिन्सेंटला धक्का बसायला हवा होता; पण तो, त्यानं जे सांगितलं त्याचाच विचार करत होता.

'पण कामाच्या तासाबाबत तरी तुम्ही काही करू शकाल की नाही? तेरा तास तिथं खाली म्हणजे अख्खी वस्ती जिवे मारण्यासारखं आहे.'

'नाही साहेब. हे म्हणजे पगारवाढीसारखंच झालं. ते तेवढाच कोळसा कमी काढतील. टनामागे खर्चच वाढेल.'

'एक गोष्ट नक्कीच सुधारता येईल.'

'तुम्ही कामाच्या धोक्यांबद्दल बोलणार आहात, हो नं?

'हो. निदान खाणीतल्या अपघाताची अन् बळीची संख्या तरी तुम्ही कमी करू शकाल.'

मॅनेजरन परत मान हलवली.

'नाही साहेब. या परिस्थितीत आम्ही थोडादेखील पैसा सुधारणांवर जास्तीचा खर्च करू शकत नाही. हे सगळं भयानक दुष्टचक्र आहे. मीही यात फट शोधण्याचा हजारदा प्रयत्न केला, काही सापडत नाही. मीही एके काळी चागला कॅथॉलिक होतो साहेब. आता हळूहळू नास्तिक व्हायला लागलोय. मला समजूच शकत नाही की, एका एवढ्या मोठ्या मानवी समाजावर शतकानुशतकं अन्याय होतो, माणसांची जनावरं होतात अन् तो आकाशातला बाप स्वस्थ बसतो!'

व्हिन्सेंटला शब्द सुचले नाहीत. बधिर डोक्यानं तो घरी परतला.

## सात

फेब्रुवारी महिना, वर्षातला सर्वांत वाईट महिना. सोसाट्याचे, रक्त गोठवणारे वारे दरीमधनं घोंघावत होते रस्त्यानं चालणंही अशक्य होत. कचऱ्यातल्या कोळशाची या दिवसांत सर्वांत जास्त गरज; पण वाऱ्यामुळे बायकांना त्या टेकड्यांवर जाऊन कोळसा शोधणही अशक्य होत होत. साध्या सुती कपड्याखेरीज अंगात घालायला काहीही गरम त्यांच्याजवळ नव्हतं.

मुलं दिवसचे दिवस अंथरूणात पडून राहत होती. गरम अन्न मिळण अशक्य होतं. कोळसाच नव्हता. खाली गेलेली माणसं त्या भट्टीतून वर आली की, एकदम बाहेरच्या गोठवणाऱ्या वाऱ्यात सापडत. बर्फ तुडवत घरी येत. थंडीनं अन् न्यूमोनियानं रोज माणसं मरत होती. मृतांच्या प्रार्थना व्हिन्सेंटला रोज म्हणाव्या लागत होत्या.

थंडीनं निळ्या पडलेल्या मुलांना लिहायला-वाचायला शिकवायचं त्यानं सोडून दिलं. सारा दिवस तो त्याना घेऊन कचऱ्याच्या टेकडीवर कोळसा गोळा करण्यात घालवायला लागला. आता तोंडाला मुद्दाम काजळ फासून घेण्याची गरज त्याला वाटत नव्हती. परका कुणी छोट्या वेसमेसला आला असता तर म्हणाला असता, 'आणखी एक काळतोंड्या.'

बरेच तास काम करून त्यानं अर्धी पिशवी भरून कोळसा गोळा केला. त्याचे थडीनं निळे पडलेले हात जागोजाग सोलवटले होते. चारच्या सुमारास तो वस्तीवर परत यायला निघाला. काही घरात तरी आज बायका नवऱ्यांना गरम कॉफी देऊ शकणार होत्या. मार्कासच्या फाटकापाशी तो पोचला अन् कामगाराचा लोंढा बाहेर पडला. काहीनी त्याला ओळखून 'नमस्ते' म्हटलं. बाकीची माणसं हात खिशात अन् चेहरे कोटाच्या कॉलरीत खुपसून घराच्या दिशेने निघाली.

सगळ्यात शेवटी एक म्हातारा बाहेर पडला. जबर खोकल्यानं त्याला चालणंही अशक्य होत होतं. बाहेर पडताच आलेल्या वाऱ्याच्या झोतानं तो कुणी तरी ठोसा मारल्यासारखा बर्फात पडला परत धडपडत उभा राहिला. वाऱ्याचा मार चुकवत हळूहळू चालायला लागला. त्याच्या खाद्यावर एक पिशवी होती, वेसमेसमधल्या कुठल्या तरी दुकानातनं मिळवलेली. तीवर काही लिहिलं होतं. व्हिन्सेंटनं डोळे ताणून ते वाचण्याचा प्रयत्न केला, 'नाजूक.'

घरोघर कोळसा वाटून झाल्यावर तो त्याच्या खोपटात आला. स्वतःला कपड्याचा एक एक जोड ठेवून जास्तीचे सगळे कपडे त्यानं बॅगेत कोंबले अन् तो बाहेर पडला. पाठीवर 'नाजूक' लिहून हिंडणाऱ्या म्हाताऱ्याला त्यानं एक जोड दिला. मुलासाठी काही कपडे ठेवले अन् ते फाडून त्यांच्या मापाचे शिवायला सागितलं आजाऱ्यांपैकी जे अजूनही मार्कासमध्ये उतरत होते त्याना मोजे दिले कोट एका गर्भारशी बाईला दिला तिचा नवरा काही दिवसांपूर्वीच मेला होता. पोराना जगवण्याकरता ती नवऱ्याऐवजी आत उतरत होती.

बालवाडी बंदच पडली होती तेंवढीच मुलं कोळसा गोळा करायला जात. तरीही त्या ओल्या कचऱ्यात पाय घालायची त्यांना भीती वाटे. व्हिन्सेंटनं ते काम अंगावर घेतलं अन् प्रत्येक झोपडीचे वार ठरवून घेतले. हळूहळू औषधं तयार करण, आजाऱ्याची सेवा हेच त्याला बायबलपेक्षा महत्त्वाच वाटायला लागलं प्रार्थना अन् प्रवचन या लोकांना न परवडणाऱ्या गोष्टी झाल्या.

मार्चमध्ये थंडी कमी झाली; पण तापानं त्याची जागा घेतली. व्हिन्सेंटनं पगारातले चाळीस फ्रॅंक्स् औषधावर खर्च केले. स्वतः अर्धपोटी राहून त्याची हाडं दिसायला लागली. आजारलेल्या अवस्थेत तो हिंडत-फिरत होता त्याची गालफडं वर आली. पेटलेले डोळे आणखीनच खोल गेले.

दक्रुकच्या मोठ्या मुलाला टायफॉइड झाला. घरात दोनच अंथरुणं. धाकटी दोघंही त्याच्याचजवळ झोपत. त्यांना खाली झोपवलं तर न्युमोनिआ होण्याची भीती होती. आई-वडील खाली झोपले तर दुसऱ्या दिवशी कामावर जाऊच शकले नसते. संध्याकाळी तो कामावरून परतल्यावर व्हिन्सेंट म्हणाला,

'दक्रुक, जेवायला बसण्याआधी मला जरा मदत कर!' खरं तर दक्रुक दमला होता. त्याची जखमही दुखत होती; पण तो न बोलता उठला. व्हिन्सेंटच्या झोपडीत पोचल्यावर व्हिन्सेटनं पलंगावरची एक चादर काढली अन् तो म्हणाला, 'उचल तिकडनं. तुझ्या मुलाकरिता हे तुझ्या घरी घेऊन जाऊ!'

दक्रुकनं दात आवळले.

'मला तीन मुलं आहेत. देवाच्या मनात नसेल तर त्यातलं एक कमी होईल; पण वस्तीत एकच व्हिन्सेंटसाहेब आहेत. ते गेलेले मला चालणार नाहीत!'

तो लगडत झपाट्यान झोपडीबाहेर पडला. व्हिन्सेंटनं पलंग खांद्यावर घेतला अन् दक्कुकच्या घरात आणून टाकला. आजारी मुलाला त्यावर ठेवल. दक्कुक अन् त्याची बायको त्याकडे पाहातच राहिली !

सध्याकाळी तो दनीसकडे गेला. त्यानं आपल अथरूण तयार करायला म्हणून थोडा कडबा मागितला त्यान जे केलं ते ऐकून दनीसबाई सर्दच झाली !

'अहो, तुमची जुनी खोली अजून रिकामी आहे. हे सगळ करण्यापेक्षा तुम्ही केव्हाही इथ येऊन राहू शकता !' ती म्हणाली.

'ते आता शक्य नाही !'

'मला ठाऊक आहे, तुम्हाला पैशाची काळजी आहे; पण तुम्ही त्याची फिकीर करू नका ! जाँ बातिस्त अन् मला चागले पैसे मिळतात. तुम्ही इथं मोफत राहा, आमच्याच घरातल्या माणसासारखे ! तुम्हीच नेहमी सागता नं, की परमेश्वराची सगळी मुल एकमेकाची भावडच आहेत म्हणून !'

व्हिन्सेंटला थडी वाजत होती. पोटात आग पडली होती. गेले कित्येक दिवस अगात असलेल्या तापानं तो खंगला होता, पुरेस अन्न नव्हतं. झोप मिळत नव्हती. वस्तीतल्या दारिद्र्यानं अन् दुःखानं त्याच डोकं फिरायची पाळी आली होती. वरच्या मजल्यावर खोलीत उबदार अंथरूण होतं. दनीसबाईन त्याच्या पोटातली खळगी भरून काढली असती. तिन त्याचा ताप जाईपर्यंत त्याची शुश्रूषा केली असती, चागल खायला-प्यायला घातलं असतं. तो कापत ग्लानीनं बेकरीतच पडता-पडता सावरला !

परमेश्वर त्याची परीक्षा पाहात होता. आता जर तो हारला असता तर आजवर केलेल्या कामावर पाणी पडलं असतं. वस्तीचे सर्वांत कठीण दिवस आता होते. आता तो घाबरून, आजारपणाला, उपासाना भिऊन पाय मागे घेणार होता का ? सगळ्या सुख–सोयी त्याला परत मिळत होत्या.

'तुम्ही फार चागल्या आहात दनीसबाई, परमेश्वर साक्षी आहे !' तो म्हणाला, 'तुम्हाला याचं बक्षीस तो नक्की देईल; पण तुम्ही मला माझ्या मार्गापासून परावृत्त करता कामा नये ! तुमच्याजवळ कडबा नसेल तर मला जमिनीवर झोपावं लागेल; पण कृपा करून दुसरं काहीही देऊ नका ! मला ते घेता येणार नाही !'

¤

झोपडीच्या एका कोपऱ्यात त्यानं कडबा पसरला पातळ चादर पाघरून तो झोपला. रात्रभर त्याला झोप आली नाही. सकाळी त्याला खोकला आलेला होता. डोळे खोबणीत आणखी खोल गेले होते. ताप चढला होता आणि अर्धवट शुद्धीत तो हालचाली करीत होता. शेगडीमध्ये कोळसा नव्हताच त्यानं कसाबसा थोडा वाळका ब्रेड पोटात ढकलला. अन् तो कामाकरता बाहेर पडला.

मार्च सरून एप्रिल उजाडला. परिस्थितीत थोडीशी सुधारणा झाल्यासारखी वाटली. वारे थाबले, उन्ह थोडी सरळ पडायला लागली. बर्फ वितळून काळी शेतं दिसायला लागली. पक्षी गाताना एकू येऊ लागले. झाडांना पालवी फुटली. तापाची साथ हटली, हवा गरम झाली तशा बायका कोळसा गोळा करायला बाहेर पडायला लागल्या. झोपड्यांमधल्या शेगड्या पेटायला लागल्या. पोरं अंथरुणाबाहेर आली व्हिन्सेंटनं बालवाडी परत सुरू केली. पहिल्या प्रवचनाला अख्खी वस्ती लोटली. चेहऱ्यांवर थोडी हास्याची रेषा दिसू लागली. माणसं डोकी वर उचलून पाहू लागली. दक्कुक स्वतःला बालवाडीतला फायरमन म्हणवीत असे. तो डोळ्याची जखम खाजवीत जोक मारायला लागला. 'बरे दिवस येतायत् !' व्हिन्सेंट व्यासपीठावरून उत्साहान ओरडला.

'परमेश्वरानं परीक्षा घेतली, तुम्ही सारे परीक्षेला उतरला आहात. सगळी दुखणी सपलीत. आता शेतं फिरून पिकतील; कामावरून तुम्ही परत आलात की घराबाहेर उन्हात आराम कराल ! पोरं आकाशातल्या पक्ष्यामागे धावतील, जगलात बेरी गोळा करतील. परमेश्वराकडे नजर उचलून पाहा ! आयुष्यातल्या सगळ्या चागल्या गोष्टी तुमच्यासमोर आहेत. परमेश्वर दयाळू आहे, न्यायी आहे, तुमच्या भक्तीचं आणि कष्टाच फळ तो तुम्हाला नक्की देईल ! त्याचे आभार माना ! चांगले दिवस आलेत !'

सर्वांनी मिळून देवाचे आभार मानले उत्साही वातावरणात ते एकमेकाना म्हणत होते, 'व्हिन्सेंटसाहेबाचं बरोबर आहे. वाईट दिवस सपलेत. हिवाळा संपलाय. चागले दिवस येतायेत !'

## आठ

काही दिवसांनतर व्हिन्सेंट अन् मुलाचा एक घोळका मार्कासमागे ढिगाऱ्यावर चढून कोळसा गोळा करत होते. अचानक त्यांना आत उतरायच्या ठिकाणच्या इमारतीतून छोट्या काळ्या आकृती बाहेर पडून सैरावैरा धावत असलेल्या दिसल्या.

'काय झालय ?' व्हिन्सेट ओरडला. 'तीन वाजले नाहीत अजून. सूर्य माथ्यावरदेखील नाही आलेला !'

'अपघात झालाय !' मोठ्या मुलांपैकी एक ओरडला. 'मी त्याना असं पळताना पाहिलंय पूर्वी. काही तरी मोडलय आत.'

आपापल्या पिशवीच्या तोंडावर हात घट्ट धरून ते सगळे धडपडत, घसरत खाली आले. शेतं काळ्या माणसांनी गजबजून गेली होती. ते सगळे खाली पोचेपर्यंत लोढा उलटा फिरला होता. वस्तीवरची बायका–मुल खाणीच्या दिशेनं धावत होती. बायकाच्या हातात तान्ही पोर होती.


व्हिन्सेंट फाटकापाशी पोचला तेव्हा त्याला ओरडा ऐकू आला. 'विषारी वायू ! विषारी वायू ! नव्या गुहेत ते सगळे अडकलेत !'

जॅक व्हेर्नेनं थंडीमुळ अंथरूण धरल होतं. तो वाऱ्याच्या वेगानं धावत आला. आजारपणानं त्याचं पार चिपाड झालं होतं. व्हिन्सेंटनं त्याचे खादे पकडले. 'काय झालं ? मला सांगा !'

'दक्कुकची गुहा ! आठवतात, निळे दिवे ? मला ठाऊक होत, हेच होणार !'


'किती ? किती जण आहेत ते ? त्याना बाहेर काढता नाही का येणार ?'

'बारा गुहा आहेत. तुम्ही पाहिल्यात की ! पाच माणसं एका गुहेत.'



तुमची बसायची
झकपक खोली

आमचा झटपट
वाळणारा पेंट




# यंदा तीन हात होऊन जाऊं द्यात !

तुमची बाहेरची बसण्याउठण्याची खोली म्हणजे कशी अगदी जिथल्या तिथे पाहिजे. कारण येणारा जाणारा ही खोली बघूनच तुमच्या विषयी अंदाज बांधत असतो. अशा महत्वाच्या खोलीला पेंट द्यायचा म्हणजे तो आकर्षक, टिकाऊ, खात्रीशीर शिवाय किफायतीही हवा !
नेरोलॅक सोल्जर ब्रॅण्ड वॉशेबल ऑइल बाउण्ड डिस्टेम्पर म्हणजे सर्व प्रकारच्या काटेकोर परीक्षांतून उतरलेला, आकर्षक मॅट फिनिश देणारा, अधिक काळ जशाचा तसा चांगला टिकणारा गुणी पेंट ! आमचा !



जमून
येणारा
एक
सुंदर
रंगयोग

**नेरोलॅक** सोल्जर ऑइल बाउण्ड डिस्टेम्पर

U-GND-120 MR

'त्याना वाचवता येणार नाही का पण ?'

'कोण जाणे. मी स्वयंसेवकाची तुकडी घेऊन आत उतरतोय.'

'मला येऊ द्या !'

'नाही. मला अनुभवी माणसं हवीत.' जॅक इमारतीकडे धावला.

पाढऱ्या घोड्याची गाडी आली. अनेक मेलेली माणसं तिनं टेकडीपलीकडे आजवर नेलेली होती. माणसं हळूहळू घराकडे परतू लागली. काही बायका झपाटल्यासारख्या रडत–ओरडत होत्या. बाकीचे डोळे विस्फारून शून्य नजरेनं पाहत होते. फोरमन शिरा ताणून ओरडत, धावपळ करत होते मदतीची पथक धावत होती.

अचानक आवाज थांबले. माणसाचा लहान घोळका इमारतीतून बाहेर पडला. त्याच्या हातात चादरीत गुडाळलेलं काही होत क्षणभर शांतता पसरली अन् एकदम हलकल्लोळ माजला.

'कोण आहे ते ? ते जिवंत आहेत का ? त्याची नावं सांगा हो ! आम्हाला त्याना पाहू द्या ! माझा नवरा तिथच आहे ! माझी मुल! माझी दोन बाळं त्याच गुहेत आहेत !'

गाडी थाववली गेली. एकजण म्हणाला, 'गाडी ढकणाऱ्यापैकी तिघंजण वाचलेत; पण ते जबर भाजलेत.'

'कोण आहेत ते ? अहो, त्यांची नाव तरी सागा ! दाखवा ! मला पाहू द्या ! माझं पोर खाली आहे ! माझं बाळ !'

त्या माणसान चादर दूर केली. नऊ वर्षांच्या दोन मुली, दहा वर्षांचा एक मुलगा, तिघंही बेशुद्ध होते. मुलांच्या घरच्यानी एकच आकात केला. त्यात दु खही होत, पोरं जिवंत असल्याचा आनंदही होता. चादर परत त्या मुलावर टाकून गाडी चालू लागली. व्हिन्सेंट अन् घरची माणसं धापा टाकत गाडीबरोबर धावत होती व्हिन्सेंटच्या पाठीमागे ओरडा वाढतच होता. त्यानं मान फिरवून पाहिल काळे ढीग क्षितिजावर उच उभे होते.

'काळं इजिप्त !' तो कळवळून ओरडला. 'काळं इजिप्त ! तुझे बळी तू घेतलेसच ! परमेश्वरा, हे का ? तू का केलस हे ?'

मुलं जबर भाजली होती. सगळी कातडी अन् केस जळून गेले होते. व्हिन्सेंट एका झोपडीत शिरला. पोराची आई कपाळ बडवून घेत होती. व्हिन्सेंटने मुलाचे कपडे काढले 'तेल ! तेल ! लवकर !' घरात असलेलं थोडंसं तेल त्यानं लावल 'बँडेज आणा !'

बाई वेडयासारखी त्याच्याकडे पाहत उभी राहिली. व्हिन्सेंट संतापून ओरडला, 'पोर वाचवायचय की नाही ? बँडेज !'

'माझ्याकडे काही नाहीय!' ती पुटपुटली. 'घरात पाढऱ्या कपडयाची चिंधोटीदेखील नाहीय हिवाळयातही नव्हती !'

मूल वेदनेन विव्हळलं. व्हिन्सेटनं स्वतःचे कपडे काढले. गजिफ्रॉक फाडला, बाकीचेही कपडे फाडले अन् मुलाला अख्खा बांधला.तेलाची बुधली घेऊन तो दुसऱ्या मुलीकडे वळला. तिलाही त्यानं बँडेज केलं. दहा वर्षांचा मुलगा अगदी मरायला टेकला होता. व्हिन्सेटकडे कपडे शिल्लक नव्हते. पँट काढून त्यानं अंडरवेअर फाडली अन् बँडेज केलं.

उघडया अंगावर कोट चढवून तो मार्कासकडे पळाला. बायकाचा आक्रोश दुरूनही ऐकू येत होता.

माणसं फाटकापाशी गर्दी करत होती. आत एका वेळी एकच मदत-पथक काम करू शकत होतं. गुहेपाशी जायचा रस्ता फारच अरुंद होता. व्हिन्सेंट एका असिस्टंट फोरमनला विचारत होता,

'काही आशा आहे ?'

'नाही. सगळे खलास झालेत '

'तिथपर्यंत जाता येणार नाही का ?'

'ते सगळे खडकाखाली गाडले गेलेत.'

'किती वेळ लागेल ?'

'आठवडे, कदाचित काही महिने.'

'पण का ? का ?'

'नेहमीच इतका वेळ लागतो.'

'म्हणजे सगळ संपलच.'

'सत्तावन्न माणसं अन् मुली !'

'सगळे गेले.'

'परत कधीच दिसायचे नाहीत.'

छत्तीस तासांनंतर मदत-पथक बदललं गेलं. फाटकासमोरून बायका हलायला तयार नव्हत्या माणसं त्यांना धीर देत होती; पण बायकाना माहिती होतं की, ती खोटं बोलतायत. ज्याच्या घरचं कुणीही गेल नव्हतं त्या बायका त्यांना कॉफी–पाव आणून देत होत्या. खचलेल्या त्या आया न् बायका अन्नाला शिवायला तयार नव्हत्या. मध्यरात्री केव्हा तरी जॅक व्हेर्नेला चादरीत गुडाळून वर आणलं. त्याला रक्तस्राव झाला होता दुसऱ्या दिवशी तो मेला.

अठ्ठेचाळीस तासानतर व्हिन्सेंटनं दक्कुकच्या बायका–मुलांना समजून घालून घरी आणलं. बारा दिवस मदत-पथकाचं काम चाललं होत. खाणीच काम बंद होतं. कोळसा निघत नव्हता, पगारही दिले जात नव्हते लोकांजवळचे बाजूला ठेवलेले पैसे कधीच संपून गेले, दनीसबाईनं भांडवल संपेपर्यंत पाव उधारीनं दिला. अखेर तिनंही काम बद केलं. कंपनीनं नवा पैसाही दिला नाही बाराव्या दिवशी मदत-पथकाला काम थांबवण्याचा हुकूम मिळाला. कामगाराना परत कामावर जाण्याच्या सूचना मिळाल्या. छोटया वेसमेसजवळ दमडाही नव्हता. फक्त उपास. सारी वस्ती हादरून गेली होती.

व्हिन्सेंटचा एप्रिलचा पगार आला. त्यानं वेसमेसला जाऊन सगळया पैशांचं अन्न आणून ते वस्तीत वाटलं. पुढले सहा दिवस निभले नतर जंगलात जाऊन त्यांनी गवत, पाला, बेरी आणल्या. पुरुष उदीर, गोगलगायी अन् कुत्र्या–माजराच्या शोधास निघाले. पोटातली आग शमवण्याकरता काहीही चाललं असत. व्हिन्सेंटनं ब्रुसेल्सला मदतीकरता लिहिलं; पण उत्तर आल नाही. कामगार, बायका–पोरांना डोळयांदेखत उपाशी तडफडताना पाहू लागले.

गेलेल्या सत्तावन्न माणसासाठी प्रार्थना करण्याची त्यांनी व्हिन्सेंटला विनती केली. शभरएक माणसांनी व्हिन्सेंटच्या छोटयाशा झोपडीत गर्दी केली. अपघात झाल्यादिवसापासून व्हिन्सेट फक्त कॉफीवर होता. उभं रहाण्याची त्याच्या पायात ताकद नव्हती. अगात ताप होता. मन निराशेनं भरून गेलं होतं. चेहऱ्यावरचं हाड न् हाड दिसत होतं, लाल दाढी वाढली होती. त्यानं अंगात जाडया-भरडया मांजरपाटाचे कपडे घातले होते. व्हिन्सेंट कडव्यावर पडला होता. मोडक्या तुळईवर एकच दिवा टागला होता. छतावर अक्राळ-विक्राळ सावल्या हालत होत्या.

थरथरत्या आवाजात त्यानं बोलायला सुरुवात केली. ती सारी फाटकी, जीर्ण शरीराची, मोडल्या मनाची काळतोंडी माणसं देवाकडे

पाहावं तशी त्याच्याकडे पहात होती. देव फारच दूर होता.

बाहेरून काही चमत्कारिक आवाज ऐकू आले. धाडकन् दार उघडून एक मुलगा आत आला. ' व्हिन्सेंटसाहेब, इथे आहेत, साहेब ! '

व्हिन्सेंट बोलायचा थांबला. शंभर बोरीन्सनी आपल्या माना वळविल्या. झकपक पोषाख केलेली दोन माणसं आत शिरली. दिव्याची ज्योत क्षणभरच मोठी झाली. साऱ्या चेहऱ्यांवर भीती उमटलेली व्हिन्सेंटला जाणवली.

' या, या, रेव्ह. द जोन्ग, रेव्ह. व्हान डेन ब्रिन्क ! ' पडल्या पडल्याच व्हिन्सेंट म्हणाला. ' मार्कासमध्ये जिवंत गाडल्या गेलेल्या सत्तावन्नजणांच्या आत्म्याकरिता आम्ही प्रार्थना करतो आहोत. तुम्हीही काही बोला ! '

धर्मगुरूंना भानावर यायला बराच वेळ लागला.

' छे ! हे...हे भयानकच आहे ! ' द जोन्ग ओरडले.

' आफ्रिकेच्या एखाद्या जंगलातच असल्यासारखं वाटतंय इथं ! ' व्हान डेन ब्रिन्क.

' यानं काय काय करून ठेवलंय इथं, देव जाणे ! '




' या लोकांना माणसात आणायला अजून कैक वर्षं लागतील ! ' द जोन्ग हाताची घडी घालत फिस्कारला, ' मी तरी सांगत होतो तुम्हाला, त्याची नेमणूक करू नका म्हणून ! '

' खरंय हो...पण पीटर्सन...अन् याची कुणाला कल्पना होती ? हा तर ठार वेडा माणूस आहे. '

' तो शहाणा आहे असं मला कधीच वाटलं नव्हतं. माझा कधीच त्याच्यावर विश्वास नव्हता. '

दोघंही उत्तम फ्रेंचमध्ये बोलत होते. तिथल्या कुणालाही त्यातला एक शब्द कळत नव्हता. त्यांच्या म्हणण्याचा पुरा अर्थ समजण्याची ताकद व्हिन्सेंटमध्ये नव्हती.

द जोन्ग गर्दीतून वाट काढीत व्हिन्सेंटजवळ येऊन म्हणाले,

' या डुकरांना आधी बाहेर घालव ! '

' पण प्रार्थना अजून संपली नाही. '

' हरकत नाही. आधी त्यांना बाहेर काढ ! '

माणसं काही न समजून हळूहळू बाहेर पडू लागली.

दोघं धर्मगुरू व्हिन्सेंटसमोर उभे राहिले ' हे काय करून घेतलंयस तू तुझं ? अन् प्रार्थना या अशा खबदाडात घ्यायची ? हा कुठला आदिमानवी पंथ तू सुरू केलायस ? काही सभ्यता, समंजसपणा म्हणून काही आहे का नाही ? हे वागणं ख्रिश्चन धर्मगुरूला शोभा देतं का ? तू वेडाबिडा आहेस की काय ? चर्चची चांगली शोभा करतो आहेस तू अशा वागण्यानं ! '

रेव्ह. द जोन्गनं क्षणभर श्वास घेतला. त्या पडक्या दरिद्री झोपडीवर, व्हिन्सेंट झोपला होता त्या कडब्यावर अन् अंगातल्या जाडयाभरडया कपडयांवर त्यानं नजर फिरविली. त्याच्या आजारलेल्या क्षीण डोळ्यांत पाहात ते म्हणाले,

' व्हान गॉग, चर्चचं सुदैव म्हणून आम्ही तुला तात्पुरती नेमणूक दिली. आता तुझी नेमणूक रद्द झालीय असं समजायला हरकत नाही. तू जो हा घाणेरडा अन् अशोभनीय प्रकार चालविला आहेस तो पाहून तुला सेवेची संधी परत कधीही दिली जाणार नाही. तुझ्या जागी तावडतोब नवीन माणसाची नेमणूक होईल. मी तुला वेडा म्हणूनच थांबतोय. खरं तर तुझ्यासारखा आमच्या चर्चला दुसरा शत्रूच नाही भेटला आजवर ! '

बराच वेळ शांतता पसरली, ' मग, व्हान गॉग, तुला काही म्हणायचंय यावर ? '

व्हिन्सेंटला ब्रुसेल्समधली त्यांनी नेमणूक नाकारली तो दिवस आठवला. आता त्याला काहीच वाटत नव्हतं.

' आपण निघूयाच आता. द जोन्ग, रेव्ह. व्हान डेन ब्रिन्क म्हणाले ' आपल्याला काही करता येईलसं वाटत नाही. प्रकरण बरंच हाताबाहेर गेलंय. वेसमेसमधे एखादं चांगलं हॉटेल मिळालं तर पाहू, नाही तर रात्रीच मोन्सला जाऊ ! '

## नऊ

दुसऱ्या दिवशी सकाळी काही प्रौढ खाण–कामगाराचा एक घोळका व्हिन्सेटकडे आला. 'साहेब,' ते म्हणाले, 'जॅक व्हेर्ने तर गेला. आता फक्त तुमच्यावरच आमचा भरवसा आहे. आम्हाला सागा, आता काय करायच ते. अगदी तशीच वेळ पडल्याखेरीज उपाशी मरायची आमची तयारी नाही. तुम्हीच 'त्यांना' आमच्या इच्छा सागू शकाल, तुम्ही त्याना भेटून या, मग तुम्ही सागाल तर आम्ही कामावर परतू, सागाल तर उपाशी राहू. आम्ही फक्त तुमचच ऐकू साहेब!'

बेल्जिअन खाण कंपनीच्या ऑफिसला स्मशानकळा आली होती. मॅनेजरनं व्हिन्सेटचं उत्साहान स्वागत केलं अन् त्याचं म्हणणं सहानुभूतीन ऐकून घेतल. 'मला माहिती आहे, व्हान गॉगसाहेब, की आम्ही प्रेतं वर न काढल्यानं कामगार रागावलेत; पण त्यान काय होणार? कपनीनं ती गुहा परत न उघडायच ठरविल आहे. त्याचा काही उपयोग नाही. एक महिनाभर लागेल ते खणून काढायला. अन् मिळणार काय? प्रेत एका थडग्यात आहेत, ती काढून दुसऱ्या थडग्यात घालायची.'

'अन् आतल्या सरक्षण–व्यवस्थेचं काय? तुम्हाला त्यात काहीच सुधारणा करता येणार नाहीत का? रोज दिवसाचे तेरा तास त्यानी मृत्यूच्या टांगत्या तलवारीखालीच काम केल पाहिजे का?'

'होय साहेब, त्यानी तेच केलं पाहिजे. कपनीकडे या सुधारणामध्ये घालायला पैसा नाही. कामगार आता हा तटा फार ताणायला लागलेत. ते हरणार आहेत. कारण त्याच्यासमोर आर्थिक कायद्याची पोलादी भित आहे. या आठवड्यात ते कामगार परतले नाहीत तर, मार्कास कायमची बद पडणार आहे. मग ते काय करणार आहेत? सागा!'

व्हिन्सेट पाय ओढीत छोटया बेसमेसकडे निघाला. 'कदाचित परमेश्वराला ठाऊक असेल.' तो स्वत.शीच कडवटपणे म्हणाला, 'कदाचित त्यालाही ठाऊक नसेल!'

तो आता कामगारांच्या दृष्टीनं निरुपयोगी होता, हे आता सरळ होत. तो आता त्याना कामावर परतायला सागणार होता. तेच मृत्यूच्या सतत सोबतीतले तेरा तास. त्याला मदत करता आली नव्हती. देवालाही त्याना मदत करता येणार नव्हती. तो मारे त्याना परमेश्वराचे शब्द ऐकवायला आला होता! पण आता त्याना तो सागणार होता की, त्यांचा वैरी ती कपनी नसून तो आकाशातला बापच आहे. पुढ काय बोलणार?

व्हिन्सेटनं त्याना कामावर परतायला सांगितल अन् त्याची त्याच्या दृष्टीन किंमत संपली. आता चर्चनं परवानगी दिली तरी तो त्याना प्रवचनं देऊ शकणार नव्हता. गॉस्पेलला काय अर्थ होता? देव कानात बोटं घालूनच बसला होता. त्याला पाझर फोडण्यात व्हिन्सेटलाही अपयश आलं.

अन् एकाएकी त्याला जाणीव झाली. त्याला ते पूर्वीपासूनच ठाऊक होतं की, जगात परमेश्वरच नाहीय. हे सगळ त्याच्याबद्दलच बोलणं म्हणजे पोरकटपणा होता. घाबरलेल्या, एकाकी माणसानं स्वत.ला धीर देण्याकरिता केलेली, एका कधी न संपणाऱ्या अंधाऱ्या रात्रीतली, ती वायफळ बडबड होती. देव नव्हताच. होता फक्त प्रचड गोंधळ. दुर्दैवी, कष्टदायक, क्रूर, छळणारा, आंधळा, न सपणारा गोंधळ.

## दहा

कामगार कामावर परतले. इव्हान्जेलायझेशन कमिटीनं तेओडोरस व्हान गॉगला झाल्या प्रकाराबद्दल लिहिलं त्यानी व्हिन्सेटला पैसे पाठविले अन् एटनला परतण्याबद्दल लिहिल. व्हिन्सेंट मात्र दनीसकडे परतला. त्यान बालवाडीला शेवटची भेट दिली. सगळी मुद्राचित्रं काढून आणली आणि पुन्हा एकदा त्याच्या खोलीत लावली.

पुन्हा एकदा दिवाळखोरी. नवीन उद्योग करायचा तर भांडवल हव. पैसा, काम, तब्येत, ताकद, नव्या कल्पना, उत्साह, इच्छा, महत्त्वाकांक्षा काहीच नव्हतं. आयुष्याचं लक्तर टांगावं अशी खुटीच नव्हती! सव्वीस वर्षांच वय, पाचवा पराजय. नव काही सुरू करायच तर अजीबात उत्साह जवळ नाही!

त्यान आरशात पाहिलं. कुरळ्या लाल दाढीनं चेहरा झाकला होता. केस विरळ होत चालले होते. ओठाची रेष तिरकी झाली होती. डोळे तर त्या खोबणीत कुठ हरवले होते. व्हिन्सेंट व्हान गॉगच म्हणून जे व्यक्तिमत्त्व होत ते सार आक्रसून, आतल्या आत विरून गेल होत.

दनीसबाईकडून त्यानं साबण उसना घेतला अन् डोक्यापासून पायापर्यंत स्वतःच शरीर खसखसून घासल. त्यानं स्वत.कडेच पाहिलं एके काळचं बळकट ताकदवान शरीर, आता अगदी चिपाडासारख झाल होत. त्यान नीट दाढी केली. चेहऱ्यावर ही सगळी हाड कुठून आली? त्याला आश्चर्य वाटलं. अनेक महिन्यानी त्यान त्याचे केस पूर्वीसारखे विंचरून नीट बसविले. दनीसबाईनं तिच्या नवऱ्याचे कपडे त्याला आणून दिले. कपडे करून तो खाली स्वयंपाकघरात आला. दनीस कुटुंबाबरोबर जेवायला बसला. खाणीतल्या हाहाःकारानतर आज प्रथमच अन्न म्हणावं असं काही त्याच्या पोटात जात होत. अन्नाची चव त्याला जाणवतच नव्हती. गरम लोकर चघळल्यासारखं त्याला वाटत होतं.

चर्चनं त्याला प्रवचनं द्यायला बदी केलीय हे त्यानं कुणाला सागितल नाही. पण कुणी त्याला त्याकरिता आग्रहही केला नाही. उलट प्रवचनाची त्याना फारशी फिकीरच नव्हती. व्हिन्सेंट त्यांच्याशी बोलेनासा झाला. जाता–येता कधी तरी 'नमस्ते' म्हणण एवढंच राहिलं. तो कुणाच्याही झोपडीत जाईनासा झाला, त्यांच्या दैनंदिन आयुष्यात रस घेईनासा झाला. विलक्षण समजूतदारपणे त्यानी त्याच्यातला हा बदल समजून घेतला, स्वीकारला. बोरीनाजमधल आयुष्य मागल्या पानावरून पुढे चालू राहिल.

आठवडे गेले. खाणं, झोपण अन् तासन्तास बसून राहणं यात

व्हिन्सेंटचा वेळ जात होता. अंगातला ताप हळूहळू निघत होता. ताकद अन् वजन परत मिळत होतं; पण डोळे मात्र काचेसारखेच होते. उन्हाळा आला. धुराडी, कचऱ्याचे डोंगर उन्हात चमकायला लागले. व्हिन्सेंट शेतात हिंडायला जाऊ लागला. कसल्याही आनंदाकरिता किंवा व्यायामाकरिता तो फिरत नव्हता. तो कुठं, कशाकरिता जातोय हे त्याच त्याला कळत नसे. उभं राहण्याचा, बसण्याचा, झोपण्याचा कटाळा आला की तो फिरायला बाहेर पडे.

त्याच्याजवळचे पैसे संपल्यावर काही दिवसांनी तेओच, त्याच्या भावाचं पॅरिसहून पत्र आलं सोबत काही पैसे होते. त्यानं बोरिनाजमध्ये वेळ वाया न घालविण्याबद्दल अन् काही नवं काम सुरू करण्याबद्दल लिहिलं होतं. व्हिन्सेंटनं पैसे दनीसबाईला देऊन टाकले. बोरिनाज आवडत होत म्हणून तो तिथं राहिला नव्हता दुसरीकडे कुठं जावं ते समजत नव्हत म्हणून तो तिथं राहिला होता इतकच.

त्याला देव सापडला नव्हता, त्याला तो स्वत ही सापडला नव्हता. आता त्याच्या आयुष्यातल्या एकमेव सख्याला तो हरवून बसला होता. सबंध हिवाळ्यात तेओन त्याला आठवड्यात एक किंवा दोन अशी लांब, प्रेमानं ओथंबलेली पत्रं लिहिली होती. आता पत्रं येणं अचानक थांबल. त्याचीही आशा संपली होती. व्हिन्सेंट आता एकटा होता, अगदी एकटा. अजून तो या जगात का आहे, त्यालाच कळत नव्हतं.

## व्हिन्सेंटनं खिशात हात घालून पेन्सिलीचा तुकडा अन् घरनं आलेलं एक पत्र काढलं. . . .

उन्हाळा सरला. व्हिन्सेंटच्या आत कुठ तरी जाणिवा हलायला लागल्या. त्याच्या आयुष्यात रस निर्माण होत नव्हता. मग तो दुसऱ्यांच्या आयुष्याकडे, पुस्तकाकडे वळला वाचनात त्याला नेहमीच अत्यंत आनंद मिळत असे अन् त्याच्या या सगळ्या रडकथेनंतर इतरांच्या यश–अपयश, वेदना आणि आनंद यात त्याला जास्तच रस वाटू लागला.

हवा बरी असली की तो शेतात जाऊन वाचीत बसे. पाऊस असला तर अंथरुणात पडून किंवा स्वयपाकघरात खुर्ची टाकून सारा दिवस वाचीत बसे. त्याच्याचसारख्या असख्य सामान्य माणसाच्या सुखदु:खाच्या, यशापयशाच्या कहाण्या. हळूहळू तो स्वत.चा विचार करायला लागला. 'मी अपयशी आहे. आता काय करणार आहे मी? मी काय करायला लायक आहे? जगात माझी जागा कुठं आहे?' प्रत्येक पुस्तकात तो या प्रश्नाचीच उत्तरं शोधायला लागला.

घरच्या पत्रातन त्याला त्याच्या उनाड वागण्याबद्दल बोलणी खावी लागत होती. वडील म्हणत होते, त्याच्या वागण्यानं त्यांना चारचौघात मान खाली घालावी लागत होती. आता तो काम कधी शोधणार आहे अन् कधी स्वत:चं स्वतः कमवायला लागणार आहे?

व्हिन्सेंटलाही नेमका हाच प्रश्न पडला होता. त्याला वाचण्याचाही उबग आला. पुस्तक हातात घेववेना. पुढले काही आठवडे त्याच्या सगळ्या जाणीवाच हरपल्यासारखं झालं होत. मानसिक स्वास्थ्य मिळवायला तो साहित्याकडे वळला होता, त्याचाही काही उपयोग झाला नाही. आयुष्यातल्या सर्वांत खालच्या पातळीवर तो होता. त्याला ते समजत होतं.

त्याला मधनच वाटायचं की आपण काही मूर्ख, वेडे नाही आहोत. जगाला देण्यासारखं आपल्याजवळ काही तरी निश्चित आहे; पण काय? चार–चौघासारखी कारकुनी किंवा धंदा वगैरे करण त्याला अशक्य होतं. त्याला जे जमेल असं वाटलं होत ते सर्व करण्याचा त्यानं प्रयत्न केला होता. त्याच्या दृष्टीनं आयुष्य सपल्यात जमा होतं. का? सगळेच रस्ते त्याच्याकरिता बद झाले होते. का?

प्रश्नच स्वत. उत्तर शोधत होते. ते सापडत नव्हतं. वडील पैसे पाठवून कंटाळले. पैसे येईनासे झाल्यावर व्हिन्सेंटचे उपाय परत सुरू झाले. तेओनं मध्यतरी परत सांधे जुळविण्याचा प्रयत्न केला, तेही जमलं नाही. वडिलांना मध्येच जबाबदारीची जाणीव होऊन ते पैसे पाठवीत. या सगळ्या काळात व्हिन्सेंट अर्धपोटी राहिला.

नोव्हेंबरमधला एक दिवस. रिकाम्या हातान, रिकाम्या मनानं व्हिन्सेंट मार्कासच्या परिसरात हिंडत होता. एका भिंतीपाशी गंजल्या चाकावर तो टेकला. खाणीच्या फाटकातनं एक म्हातारा कामगार बाहेर आला. त्याची काळी टोपी डोळ्यांवर ओढलेली, उतरलेले खांदे, हात खिशात, गुडघ्यांची हाडं वर आलेली. त्या माणसात काही तरी आकर्षण होतं. व्हिन्सेंटन खिशात हात घालून पेन्सिलचा तुकडा अन् घरन आलेल एक पत्र काढल. पत्राच्या पाठीवर भरकन् त्या म्हाताऱ्याचं चित्र रेखाटल.

व्हिन्सेटनं वडिलांचं पत्र काढलं. पाकिटाची एक बाजू कोरीच होती. थोड्या वेळान फाटकातून आणखी एक सतरा वर्षांचा तरुण कामगार बाहेर पडला. तो जास्त ताठपणे चालत होता. तो रेल्वेलाइनीपलीकडे दिसेनासा होईपर्यंत त्याच चित्र काढायला व्हिन्सेटला बराच वेळ मिळाला.

## अकरा

दनीसकडे त्याला बरेच कागदाचे तुकडे अन् जाड पेन्सिल मिळाली. आपली रेखाचित्र डेस्कवर ठेवून त्यानं त्याची कॉपी करायला सुरुवात केली. हात वळत नव्हता. मनातली रेष कागदावर उतरत नव्हती पेन्सिलीपेक्षा रबराचा वापर जास्त होत होता; पण त्यानं माघार घेतली नाही. त्या नादात दिवेलागण कधी झाली त्याला कळलच नाही. दनीसबाईच्या हाकेन तो जागा झाला.

'व्हिन्सेंटसाहेब, जेवण तयार आहे'

'जेवण! बाप रे, भलताच उशीर झाला!'

टेबलावर तो सारखा काही ना काही विषयावर बोलत राहिला. दनीस नवरा–बायकोंनी एकमेकांकडे सूचक नजरेनं पाहिल. जेवण झाल्याबरोबर त्यांची क्षमा मागून व्हिन्सेंट खोलीत पळाला. दिवा लावून त्यानं ती दोन्ही चित्रं भिंतीवर लावली अन् दूर होऊन तो ती पाहू लागला.

'छा:! वाईटच आहेत. पण उद्या कदाचित थोडं बरं जमेल!'

तो स्वतःशीच चमत्कारिकपणे हसत म्हणाला.

अंथरुणावर पडल्या पडल्या रॉकेलचा दिवा जमिनीवर ठेवून तो भिंतीवरच्या चित्रांकडे पहात राहिला. डोक्यात असंबद्ध विचार येत होते. त्याचं लक्ष भिंतीवर लावलेल्या इतर चित्रांकडे गेलं. सात महिन्यांपूर्वी वालवाडीतून ती चित्रं काढून आणल्यापासून तो खऱ्या अर्थानं त्यांच्याकडे आत्ताच पहात होता. त्याला एकाएकी जाणीव झाली, चित्रांचं जग त्याला परत बोलावीत होतं. एके काळी त्याला रेम्ब्राँ, मिय्ये, ज्युल ब्रुप्ते, दलाक्र्वा, मारीस ही माणसं ठाऊक होती. त्या चित्रांच्या सहवासात घालवलेला काळ त्याला आठवला. तेओला अन् आई-वडिलांना पाठविलेली मुद्राचित्रं आठवली. आपल्या दुःखांचा, अडचणींचा त्याला विसर पडला, त्याला गाढ झोप लागली. रॉकेलचा दिवा मंद होत विझून गेला.

## बारा

पहाटे अडीच वाजता तो जागा झाला तेव्हा त्याला खूपच ताजंतवानं वाटत होतं. उठून त्यानं कपडे घातले, त्याची पेन्सिल, कागद अन् पॅड घेऊन तो बाहेर पडला. मार्कासससमोरच्या त्याच जुन्या गंजलेल्या चाकावर बसून कामगार कामावर येण्याची वाट पहायला लागला.

त्याची पेन्सिल भराभर चालायला लागली. त्याला फक्त समोर दिसणारं दृश्य भराभरा कागदावर उतरवून ठेवायचं होतं. तासाभरानंतर सगळे कामगार आत गेल्यावर त्यानं पाहिलं. चेहरा नसलेल्या पाच व्यक्ती कागदावर उतरल्या होत्या. तो झपाट्यानं खोलीवर परतला. कपभर कॉफी घेतली. दिवस उजाडल्यावर त्या सर्व चित्रांची त्यानं कॉपी केली. अंधारात त्याला दिसलेली माणसं त्याच्या चांगल्या परिचयाची होती. ती आता स्वतःच्या स्मरणानं अन् त्या अंधारात केलेल्या चित्रांच्या आधारानं त्यानं रेखाटायला सुरुवात केली.

शरीरशास्त्र असं त्याच्या चित्रात नव्हतंच. आकृतींचं प्रमाण साफ चुकलेलं होतं. विनोदीच वाटत होती ती चित्रं; पण तरीही ती माणसं बोरीन्सच दिसत होती. व्हिन्सेंटनं ती सगळी फाडून टाकली. तो पलंगाच्या कडेवर बसला. आल्बेच्या पाणी आणणाऱ्या म्हातारीची कॉपी करायला लागला; पण मागच्या पार्श्वभूमीवरल्या आकाशाचं अन् रस्त्याचं अन् तिचं कुठं नातंच जमेना. तेही चित्रं त्यानं बोळा करून कोपऱ्यात फेकलं. खुर्चीवर बसून बोस्बूमचं एक निसर्गचित्र, एकच ढगाळ आकाशाच्या पार्श्वभूमीवरचं झाड कॉपी करू लागला. अगदी साधं. व्हिन्सेंटच्या लक्षात आलं जितकं साधं तितकंच कॉपी करायला ते अवघड.

सकाळ अशीच सरली. व्हिन्सेंटजवळचा शेवटचा कागद संपला तेव्हा त्यानं स्वतःचं सगळं सामान धुंडाळलं. त्याला दोन फ्रँक्स् सापडले. मोन्सला चांगला कागद अन् कदाचित् चारकोलची एखादी कांडी मिळेल या आशेनं तो बारा किलोमीटर्संवरच्या त्या गावी चालत निघाला. जाताजाता घराच्या दारात उभ्या असणाऱ्या बायकांना त्यानं औपचारिकपणे 'कसं काय ?' म्हटलं. वाटेवरच्या पातुराज या छोट्या गावातल्या बेकरीच्या खिडकीत एक बरी पोरगी दिसली. केवळ तिला पहाता यावं म्हणून त्यानं पाच पैशांचा एक पाव विकत घेतला.

पातुराज अन् वेसमेसच्या वाटेवरली शेतं पावसानं हिरवीगार दिसत होती. हिरवा खडू आणायला पैसे असतील तेव्हा इथं येऊन चित्रं करायची, त्यानं ठरवलं. मोन्सला त्याला चारकोल, जाड पेन्सिल अन् पिवळट गुळगुळीत कागदाचं एक पॅड मिळालं. त्या दुकानाच्या पुढल्या भागात काही मुद्राचित्रं लावली होती. व्हिन्सेंट चार तास त्यांच्यापुढं रेंगाळला. त्याला आपल्याला काही विकत घेता येणार नाही हे माहिती होतं. काही वेळानं दुकानदार त्याच्याजवळ आला अन् नकळत दोघंही त्या चित्रांवर चर्चा करू लागले.


'माफ करा हं, पण तुमचं एक चित्रं घेण्याइतकेही पैसे माझ्याकडे नाहीत !'

'पैसे नसले तरी परत कधी तरी या ती पहायला !'

तो रमतगमत बारा किलोमीटर्स चालत परत आला. काळ्या टेकड्यांमागे सूर्य मावळत होता. गुलाबी ढग क्षितिजावर तरंगत होते. क्यूसमेस एखाद्या चित्रातल्यासारखं दिसत होतं. ती शांत हिरवीगार दरी पाहून त्याला विलक्षण समाधान वाटत होतं. कशाचं ? त्यालाच कळेना.

दुसऱ्या दिवशी त्यानं मार्कासच्यामागे, टेकडीवर कोळसा गोळा करणाऱ्या बायकांची चित्रं काढली. दुपारी जेवणाच्या टेबलावर तो दनीसबाईला म्हणाला, 'जरा हलू नका हं ! मी आलोच !'

तो खोलीत गेला, कागद-पेन्सिल घेऊन आला. भराभरा त्यानं कागदावर त्यांची चित्रं काढली. दनीसबाई त्याच्यामागे येऊन उभी राहिली.

'व्हिन्सेंटसाहेब, तुम्ही तर चित्रकार आहात!'

व्हिन्सेंट सकोचला. 'नाही हो, मी आपला उगाच खेळतोय.'

'पण हे चांगलं दिसतंय.' दनीसबाई म्हणाली, 'मी जवळजवळ माझ्यासारखी दिसतेय!'

'जवळ जवळ, पण थेट नाही!' व्हिन्सेंट हसत म्हणाला.

त्याचा हा उद्योग त्यानं घरी कळवलाच नाही. ते काय म्हणतील ते त्याला ठाऊक होतं. 'हुं, आता हे नवं फॅड शिरलंय डोक्यात. जरा पोटा–पाण्याच्या उद्योगाला लागा म्हणावं आता!'

परत एकदा तो कामगारांच्या झोपडयात शिरला, पण या खेपेला त्याच्या हातात बायबलऐवजी कागद–पेन्सिल होती. जमिनीवर खेळणारी मुलं, घरकाम करणाऱ्या बायका, जेवायला बसलेली कुटुंबं, मार्कासची घुराडी, पाइन वृक्ष, पातुराजजवळ शेतात काम करणारे शेतकरी हे त्याचे विषय होते. हवा खराब असली की तो खोलीत बसून ती चित्रं दुरुस्त करी. मुद्राचित्राच्या प्रती करी. रात्री झोपताना त्याला दिसे की, सबंध दिवसभराच्या कामात एखादंदुसरंच चित्रं जरा बरं होतं; पण सकाळी उठला की त्याला ते सगळं वाईट दिसायला लागे, चुकीचं वाटे. मागचा पुढचा विचार न करता तो ते फेकून देई.

पण तो आनदात होता. त्याच्या दु:खाचा तो विचारच करीत नव्हता. वडिलाकडून, भावाकडून पैसा घ्यायची लाज वाटायला हवी हे त्याला कळत होतं; पण तो आपला चित्रंच काढीत होता.

काही आठवडयानंतर त्याच्या लक्षात आलं, कामात काही सुधारणा हवी असेल तर आणखी थोडी मुद्राचित्रं कॉपी करायला मिळवायला हवीत खरं तर तेओनं त्याला गेल्या वर्षात पत्र लिहिलं नव्हत, तरीही सगळा अभिमान गुडाळून ठेवून त्यान त्याला पत्र लिहिलं.

प्रिय तेओ,

माझ्या कल्पनेप्रमाणे तुझ्याकडे अजूनही 'शेतातली कामं' ही मिय्येची चित्रं आहेत. मला थोडया दिवसाकरिता पोस्टान ती पाठवशील का?

मी सध्या वोस्वूम अन आल्बेच्या मोठ्या चित्रांची कॉपी करतोय. तू ती पाहिलीस तर तुझी फारशी निराशा होणार नाही.

तुला शक्य ते पाठव अन् माझी काळजी करू नकोस. असच काम चालू राहिल तर मी परत एकदा मार्गावर येईन.

काम करता करता मध्येच तुला लिहितोय अन् मला परत कामाला लागायचंय तेव्हा थाबतो. चित्रं शक्यतो लवकर पाठवून दे.

तुझाच

**व्हिन्सेंट**

हळूहळू एक नवीच भूक त्याच्यात जागी झाली. कोणा कलाकाराशी आपल्या कलाकृतीविषयी बोलावसं त्याला वाटू लागलं. त्याची चित्रं वाईट आहेत हे त्याला कळत होतं; पण का ते त्याचं त्याला समजत नव्हतं कोणा तरी तिन्हाइतानं निष्ठुरपणे केलेल्या टीकेची त्याला गरज होती.

कुणाकडे जाणार? ही भूक पोटाच्या खऱ्या भुकेहून तीव्र होती. त्याचेच प्रश्न असणाऱ्या, त्याचीच भाषा बोलणाऱ्या माणसाच्या जगात जाण्याची त्याला आस लागली. त्याला आठवलं, मोव्ह अन मारीससारख्या माणसांनी सारं आयुष्य चित्रकलेला वाहिलं होतं. बोरीनाजमध्ये राहून या गोष्टीवर विश्वास बसणही अशक्य होतं.

एका पावसाळी दुपारी तो त्याच्या खोलीत चित्र काढीत बसला होता. अचानक त्याला ब्रुसेल्समधल्या पीटर्सनच्या स्टुडिओची आठवण झाली. ते म्हणाले होते, 'माझ्या सहकाऱ्यांना याबद्दल तू सांगू नकोस.' बस्, हाच माणूस मला मदत करील. त्यान स्वत:ची दोन-तीन चित्रं निवडली. तो ब्रुसेल्सला जायला निघाला.

खिशात फक्त तीन फ्रँक्स होते. आगगाडीनं जाता येणार नव्हतं. तो चालत निघाला. ऐंशी किलोमीटर्स. ती दुपार, रात्र, दुसरा सबंध दिवस तो चालत राहिला. ब्रुसेल्स तीस किलोमीटर्सवर राहिल. बूट फाटले होते. पायाचा अगठा त्यातनं बाहेर डोकावू लागला. आदलं वर्षभर वापरलेला कोट धुळीनं भरला होता. बदलायला कपडे वगैरे नव्हतेच. तिसऱ्या दिवशी त्यानं फक्त थंड पाण्यानं तोंड धुतलं.

बुटाच्या भोकाशी त्यानं पुठ्ठा बसविला अन भल्या सकाळी तो निघाला. पायांना बूट चावायला लागले, जखमेतून रक्त वाहायला लागल. बुटातला पुठ्ठा फाटला, पाण्यान पायावर फोड उठले त्याला भूक-तहान लागली. तो थकला; पण तो आनंदात होता.

तो खरोखर एका कलावताला भेटायला निघाला होता. ब्रुसेल्सच्या जवळ तो पोचला तेव्हा त्याच्या खिशात नवा पैसाही नव्हता. पीटर्सनचं घर त्याला पक्कं आठवत होतं. तो रस्त्यातन झपाट्यानं चालत होता. माणस दचकून बाजूला सरकत अन् त्याच्याकडे पाहून मान हलवत. व्हिन्सेंटचं कुणाकडेही लक्ष नव्हतं.

पीटर्सनच्या मुलीनं दार उघडल. व्हिन्सेंटचा भीषण अवतार पाहून ती घाबरली अन् ओरडत आत गेली. पीटर्सन बाहेर आले. क्षणभर त्यानं अनोळखी नजरेनं पाहिलं अन् ते एकदम आनंदाने ओरडले,

'व्हिन्सेंट! ये, ये. आत ये, पोरा. फार दिवसानी भेटतो आहेस.'

त्यानी व्हिन्सेंटला अभ्यासिकेत नेल अन् एका आरामशीर खुर्चीत बसविलं. आतापर्यंत ताणून धरलेली इच्छाशक्ती संपुष्टात आली. साऱ्या नसा सैल पडल्या. व्हिन्सेंटला श्वास घेण जड जायला लागलं.

'माझ्या मित्राची एक खोली जवळच आहे, व्हिन्सेंट' पीटर्सन म्हणाले, 'तू आघोळ कर अन् विश्राती घे!'

'हो, मी फारच दमलोय. माझ्या लक्षातच आलं नव्हतं.' रेव्हरंडनं त्यांची हॅट उचलली अन् व्हिन्सेंटबरोबर ते बाहेर पडले. शेजारी–पाजारी चमत्कारिक नजरेनं पाहात होते.

'आज रात्रभर तुला झोप हवी असेल. उद्या दुपारी मात्र जेवायला घरी ये. आपल्याला खूप बोलायचय!'

व्हिन्सेंटनं टबमध्ये आघोळ केली. सहाच वाजले होते; पण व्हिन्सेंट उपाशी पोटीच झोपला. दुसऱ्या दिवशी सकाळी देखील केवळ भुकेपोटी त्याने डोळे उघडले दहा वाजले होते पीटर्सनच्या मित्रानं त्याला रेझर, कगवा अन् कपडे साफ करायचा ब्रश दिला. नीटनेटकं दिसण्याच्या बऱ्याच प्रयत्नानतर बुटाखेरीज बाकी सगळं जमलं.

भुकेन व्हिन्सेंटच्या पोटात आग पडली होती जेवताना पीटर्सन ब्रुसेल्समधल्या चालू घडामोडीबद्दल बोलत राहिले. व्हिन्सेंट सगळी लाजलज्जा सोडून अधाशीपणे अन्नावर तुटून पडला. जेवण झाल.

दोघंजण अभ्यासिकेत आले.

'अरे वा ! तुम्ही बरंच काम केलेलं दिसतंय. भिंतीवरची सगळी चित्रं नवी आहेत !' व्हिन्सेंट म्हणाला.

'हो.' पीटर्सन उत्तरले, 'प्रवचनं देण्यापेक्षा चित्रं काढण्यात हल्ली मला जास्त रस वाटायला लागलाय.'

व्हिन्सेंट गालात हसला. 'तुमच्या खऱ्या कामाचा वेळ इकडं वाया घालवल्याची टोचणी तुम्हाला लागत नाही का अधनंमधनं ?'

पीटर्सन हसले. 'तुला रूबॅन्सचा एक किस्सा ठाऊक आहे का ? तो स्पेनमध्ये हॉलंडचा राजदूत म्हणून असताना दुपारचा वेळ राजवाड्याच्या बागेत चित्र करण्यात घालवीत असे. एकदा एक स्पॅनिश दरबारचे मानकरी तिथून जाताजाता म्हणाले, 'राजकारणी माणसं फावल्या वेळात चित्रंही काढतात तर !' त्यावर रूबॅन्स उत्तरला, 'नाही, नाही, चित्रकार फावल्या वेळात राजकारण करतात !'

त्यातली खोच समजून व्हिन्सेंट अन् पीटर्सन दोघंही मोकळेपणानं हसले. व्हिन्सेंटनं त्याचं पाकीट उघडलं.

'मीही हल्ली चित्रं करतो. मी तीन रेखाटनं आणलीत तुम्हाला दाखवायला. तुम्हाला त्याबद्दल काय वाटतं ते सांगा.'

पीटर्सन त्रासले. नव्यानं सुरुवात करणाऱ्या माणसाच्या कामावर टीका करणं हे महाकठीण कर्म होतं. तरीही त्यांनी ती चित्रं बोर्डवर लावली अन् ते दूर उभे राहिले. व्हिन्सेंटला मनातनं धाकधूक वाटत होती. सगळी चित्रं त्याला तिथं पाहताना फारच पोरकट वाटत होती.

'मला वाटतं, तू तुझ्या मॉडेल्सच्या फार जवळ जाऊन काम करतोस, हो नं ?' पीटर्सन म्हणाले.

'हो. कारण मी कामगारांच्या झोपड्यांमध्ये जाऊन काम करतो. तिथं जागा फार थोडी असते.'

'अच्छा, पण त्यामुळे त्यात यथार्थदर्शनाचा अभाव जाणवतो. तुझ्या विषयापासून दूर राहून काम करायचा प्रयत्न कर. वस्तू तुला जास्त स्पष्ट दिसतील.'

'काही झोपड्या बऱ्यापैकी लांब-रुंद आहेत. त्यातली एक मी भाड्यानं घेईन, स्टुडिओ म्हणून.'

'चांगली कल्पना आहे.'

थोड्या शांततेनंतर ते सावकाशपणे म्हणाले, 'तू कधी रेखाटनाचा अभ्यास केलायस का ? चौकोन आखलेल्या कागदावर मापं घेऊन चित्रं काढली आहेस ?'

'ते कसं करतात मला माहिती नाही. मी खरं तर कधी चित्रकला शिकलोच नाही. मला वाटलं की, असंच शिकत जातात.' व्हिन्सेंट ओशाळून म्हणाला.

'नाही, असं नाही. प्राथमिक तंत्र शिकलंच पाहिजे. ये, मी तुला सांगतो यात कुठं चुकलंय ते.'

फूटपट्टीनं त्यांनी त्या बाईच्या चेहऱ्याभोवती चौकोन काढला. व्हिन्सेंटला त्याच्या प्रमाणातली चूक दाखवून परत त्यावर दुरुस्ती करीत समजावून सांगितली. मागं सरकून पाहत ते म्हणाले, 'हं, आता ते रेखाटन प्रमाणात बरोबर आहे असं आपल्याला म्हणता येईल.'

व्हिन्सेंटही त्यांच्याजवळ उभा राहिला. चित्रात रेखीवपणा, अचूकता आली होती हे निश्चित, पण आता ती बोरिन खाण-कामगाराची बायको वाटत नव्हती. जगातल्या कुठल्याही वाकून काम करणाऱ्या स्त्रीचं चित्रं होतं ते. काही न बोलता व्हिन्सेंट बोर्डाजवळ गेला. शेगडीशी काम करणाऱ्या बाईचं दुसरं चित्र त्यानं दुरुस्त केलेल्या चित्राशेजारी ठेवलं. 'हं......माझ्या लक्षात आलं, तुला काय म्हणायचंय. मी चित्र निर्दोष केलं पण त्याचं व्यक्तिमत्त्व घालवलं.' पीटर्सन म्हणाले.

ते दोघं बराच वेळ असेच उभे राहिले. पीटर्सन अनिच्छेनं म्हणाले, 'तुला ठाऊक आहे व्हिन्सेंट, की ती उभी बाई काही वाईट नाही, रेखाटन वाईट आहे, तंत्र साफ गेलंय, चेहरा तर जवळजवळ नाहीच आहे; पण तरीही माझ्या हातातनं जे उतरत नाही ते त्यात तू उतरवलंयस, काय आहे ते ?'

'मलाही माहिती नाही. मला ती जशी दिसली तशी मी काढली.'

आता पीटर्सन बोर्डापर्यंत गेले. त्यांनी दुरुस्ती केलेलं चित्रं टोपलीत फेकून दिलं. 'काही हरकत नाही ना ? एवीतेवी मी ते खराबच केलंय.' ते व्हिन्सेंटजवळ येऊन त्या दुसऱ्या चित्राकडे पहात बसले. बऱ्याच वेळा त्यांनी काही बोलण्याकरिता तोंड उघडलं; पण त्यांना शब्द सापडेनात. शेवटी ते म्हणाले, 'व्हिन्सेंट, मला हे मान्य करायची बिलकुल इच्छा नाही, पण मला ती बाई चक्क आवडायला लागलीय. ती प्रथम भयंकर वाटली मला; पण तू काही तरी तिच्याकडून व्यक्त केलंयस.'

'तुम्हाला ते मान्य करायची इच्छा का नाही ?'

'कारण मला ते आवडायला नकोय. ते चूक आहे. ठार चूक ! चित्रकलेच्या कुठल्याही प्राथमिक वर्गात तुला ते फाडून टाकायला लावतील; पण तरीही ते आत कुठं तरी मला जाणवतंय, तिला कुठं तरी पाहिल्यासारखं मला नक्की जाणवतंय.'

'तुम्ही बोरीनाजला होतात तेव्हा पाहिलं असेल.' व्हिन्सेंट कोरडेपणानं म्हणाला.

पीटर्सननं चमकून व्हिन्सेंटकडे पाहिलं. तो मुद्दाम तिरकं बोलतोय असं त्यांना वाटलं. 'बरोबर आहे तुझं. तिला चेहरा नाहीय अन् ती

काशिनाथ नारायण परांजपे
सोने-चांदीच्या व मोत्यांच्या दागिन्यांचे व्यापारी
७२, बंडू गोखले पथ (काऊ लेन) मुगभाट, मुंबई ४.
फोन-३५५१७६

नेमकी कुणीच नाहीय. बोरीनाजमधल्या साऱ्या बायका तिच्यात एकवटल्यात. हेच तू नेमकं व्यक्त केलंयस व्हिन्सेंट, अन् अचूक रेखाटनापेक्षा हे हजारपटीनी महत्त्वाच आहे हो, मला तुझी बाई आवडलीय ती माझ्याशी सरळ काही सवाद साधण्याचा प्रयत्न करतेय.'

व्हिन्सेंट कापत होता; पण त्याला काही बोलायचं धाडस झालं नाही. पीटर्सन अनुभवी, धदेवाईक चित्रकार होते. त्याना जर खरोखरच चित्र आवडलं असेल तर – – – –

'तू हे मला देऊ शकशील व्हिन्सेंट ? मला माझ्या भिंतीवर ते लावायला आवडेल. ती बाई अन् मी. आमची सुरेख दोस्ती होईल!'

---

## तेरा

---

व्हिन्सेंटनं छोटया वेसमेसला परतायचं ठरवलं. रेव्ह. पीटर्सनन त्याला एक बुटांचा जुना जोड अन् परतीचं गाडीभाडं दिलं. व्हिसेंटनं ते निव्वळ मैत्रीच्या भावनेन घेतलं. तिथं देण्या-घेण्याचे हिशोब राहिले नव्हते.

गाडीत बसल्या बसल्या व्हिन्सेंटच्या लक्षात दोन गोष्टी आल्या. रेव्ह. पीटर्सननं इव्हॅन्जेलिस्ट म्हणून त्याला आलेल्या अपयशाचा चुकूनदेखील उल्लेख केला नाही. उलट कलावंत म्हणून बरोबरीनं वागवलं. त्याना त्याचं चित्र ठेवून घ्यावसं वाटावं इतकं मनापासून आवडलं होत, ही खरी परीक्षा होती.

'त्यांनी मला सुरुवात करून दिलीय.' तो स्वतःशी म्हणाला. 'त्यांना माझं काम आवडलंय, आता इतराना आवडायला काहीच हरकत नाही.'

दनीसकडे तो पोचला तेव्हा 'शेतातील कामाचं' पार्सल येऊन पडलं होतं; पण सोबत तेओच पत्र वगैरे काहीच नव्हतं. पीटर्सनच्या भेटीनं त्याचा उत्साह वाढला होता. तो मिथ्येत गुतून गेला. तेओनं काही मोठया आकाराचे कागद पाठविले होते थोडयाच दिवसांत व्हिन्सेटन 'शेतातल्या कामा'ची पहिली दहा पानं संपविली. आता त्याला नग्न चित्राचा अभ्यास करण्याची गरज वाटायला लागली. बोरीनाजमध्ये नग्न मॉडेल म्हणून त्याला पोज करायला कुणी मिळणं शक्यच नव्हतं. त्यानं द हेगच्या गुपिल्सच्या मॅनेजरला, टेर्स्टीजला, वार्गचं 'चारकोलमध्ये अभ्यास' पुस्तक पाठविण्याबद्दल लिहिलं.

मध्यंतरी पीटर्सनच्या सल्ल्याप्रमाणे छोटं वेसमेस रस्त्यावरची एक मोठी झोपडी महिना नऊ फ्रॅंक्स् भाडयानं त्यानं घेतली. या वेळेला सर्वांत चागली झोपडी त्यानं निवडली. लाकडी तख्तपोशी, दोन मोठया खिडक्या, पलग, एक खुर्ची अन् शेगडी अशा सुखसोयी तिथं होत्या. चित्रं करताना मागं-पुढं होता येण्याइतकी जागा तिथं होती. आदल्या हिवाळयात व्हिन्सेंटन मदत केली नव्हती असं एकही माणूस बोरीनाजमध्ये नव्हतं त्यामुळं मॉडेल म्हणून बसायला कुणीच कुरकुर केली नाही. रविवारी कामगार त्याच्याकडे येत. त्याना ती सगळी मजाच वाटे. त्याला चित्र काढताना बघायला येणाऱ्यांनी घर गजबजून जाई.

'चारकोलचा अभ्यास' द हेगहून आलं. टेर्स्टीजनं 'रेखाटनाचा अभ्यास' हेही बार्गचं पुस्तक पाठवलं. व्हिन्सेटचे दोन आठवडे भरपूर कामात गेले.

आधीची पाचही अपयशं त्याच्या मनातनं पार निघून गेली. कलानिर्मितीइतका निखळ आनद परमेश्वराच्या सेवेतही त्याला मिळाला नव्हता. अकरा दिवस त्याच्या खिशात पैसा नव्हता. दनीसबाईकडून उधारीनं पाव आणून तो खात होता; पण त्यान स्वतःशीसुद्धा कुरकुर केली नाही. मनाची भूक भागत होती. पोटाच्या भुकेचं काय महत्त्व ?

एक आठवडाभर तो रोज सकाळी अडीच वाजता मार्कासवर जात होता. त्यानं तिथल्या दृश्याच एक मोठं चित्र तयार केलं. रस्त्याच्या कडेची निष्पर्ण झाडं, बर्फातनं वाट काढत जाणारे स्त्री-पुरुष कामगार, खाणीची घुराडी, आकाशाच्या पार्श्वभूमीवर फिक्कट दिसणारे कचऱ्याचे ढीगच ढीग. त्यांची कॉपी करून त्यानं तेओला पोस्टानं पाठवून दिली.

असं दिवस-रात्र काम करण्यात दोन महिने गेले. त्याला वाटलं, आपण थोडी प्रगती केली आहे. हाताला थोडी सफाई आली आहे. त्याला एखाद्या निष्णात शिक्षकाची गरज वाटायला लागली. या कलेतल्या सगळ्या खाचा-खोचा, तत्रं जाणून घ्यायची गरज भासायला लागली. ते शिक्षण मिळवण्याकरता त्यानं वाटेल ते केलं असतं. त्या शिक्षकाचे जोडे पुसले असते, त्याचा स्टुडिओ दिवसातनं दहा वेळा झाडला असता.

ज्यूल ब्रतो हा चित्रकार पूर्वीपासून त्याचा आवडता. तो कूरिएरला राहात असे. बोरीनाजपासून एकशेसत्तर किलोमीटर्स अतरावर. खिशातले पैसे संपेपर्यंत त्यानं गाडीनं प्रवास केला. पुढे पाच दिवस तो चालला. पावाच्या तुकड्याकरता एखाद्या दुसऱ्या चित्राच्या बदल्यात त्यानं भीकही मागितली. कूरिएरला पोचल्यावर त्यानं पाहिल, ब्रतोनं विटाचा अलिशान स्टुडिओ बांधला होता. त्याचा धीर खचला. दोन दिवस स्टुडिओभोवती घिरटया घालून तो वेसमेसकडे परत निघाला. खिशात नवा पैसा नाही. पीटर्सननं दिलेले जोडे जीर्ण झालेले, अशा अवस्थेत एकशेसत्तर किलोमीटर्सची चाल सुरू झाली.

घरी आला तेव्हा पत्र किंवा पैसे, काहीच आलेलं नव्हतं. तो अंथरुणावर पडला. आजूबाजूच्या बायकांनी त्याची शुश्रूषा केली. उरलंसुरलं अन्न त्याला दिलं. त्याचं वजन बरंच उतरलं होतं. गालफडं पुन्हा आत गेली होती. ताप चढत होता; पण त्याच्या मनातलं चित्र स्पष्ट होतं. निर्णयाची वेळ अगदी जवळ येऊन ठेपली होती भविष्याबद्दलचे प्रश्न मनात उसळ्या घेत होते.

एक दिवस तब्येत थोडी बरी असताना तो अथरुणात बसल्या बसल्या तेओडोर रूसोच्या एका चित्राची कॉपी करत होता. कुणी तरी सरळ दार उघडून आत आलं.

तो तेओ होता. त्याचा धाकटा भाऊ.

## चवदा

तेओ काही वर्षांत खूपच बदलला होता. तेवीस वर्षांच्या तेओचा चित्रविक्रेता म्हणून पॅरिसला चांगला जम बसला होता. त्याच्या सहकाऱ्यांना अन् घरातल्यांना त्याच्याबद्दल आदर वाटत होता. समाजात प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या सगळ्या गोष्टी त्यानं आत्मसात केल्या. कपडे, बोलणं, वागणं. आत्ताही त्याचे कपडे अतिशय नीटनेटके, फॅशनेबल होते. त्याचा चेहरा तसा नाजूक; पण कपाळ मात्र खास व्हान गॉग घराण्याचं, भव्य होतं. गडद तपकिरी केस, सौम्य डोळे, एकूण तो देखणा होता.

तेओ झोपडीच्या दाराला टेकून भयचकित नजरेनं व्हिन्सेंटकडे पहात होता. काही तासांपूर्वीच त्यानं त्याचं पॅरिसचं घर सोडलं होतं. तिथं सुरेखपैकी लुई फिलीपच्या काळचं मऊ फर्निचर होतं. ऐसपैस बाथरूम, कपाटं, मंद प्रकाशाचे दिवे असं सगळं सजवलेलं होतं. पण व्हिन्सेंटचा राजवाडा विलक्षणच होता. घाणेरडी गादी, जुनी चादर, खडबडीत जमीन अन् भिंती, तो स्वतः अस्वच्छ, दाढीमिशांचं जंगल चेहऱ्यावर माजलेलं.

'तेओऽ... ... ...'

तेओ त्याच्याजवळ आला. 'व्हिन्सेंट, हे असं काय झालंय रे? काय करून घेतलंस हे स्वतःचं?'

'कुठं काय, काही नाही. मी बरा आहे आता. जरा आजारी होतो.'

'पण हे... हे... खोपट. हे काही तुझं घर नसणार, नाही ना?'

'हेच घर. का? काय वाईट आहे? मी हे स्टुडिओ म्हणून वापरतो.'

'व्हिन्सेंट!' त्यानं भावाच्या केसातनं हात फिरवला. त्याचा गळा भरून आला. त्याला बोलवेना.

'तू आलास, बरं वाटलं तेओ.'

'मला आधी सांग, तू आजारी कशानं पडला होतास? काय झालं?' व्हिन्सेंटनं त्याला कूरिएरबद्दल सांगितलं.

'तू त्रास करून घेतलास स्वतःला. आल्यापासून नीट खाणं–पिणं तरी आहे का तुझं? स्वतःची काळजी घेतोस?'

'या कामगारांच्या बायकाच घेतात माझी काळजी!'

'हो, पण तुझं खाणं... तुझं सामान कुठंय? इथं तर काहीच दिसत नाही.'

'बायका थोडं काही तरी रोज आणतात. पाव, कॉफी, नाही तर चीज.'

'पण पाव–कॉफी खाऊन तुझी ताकद भरून येणार आहे का? अंडी, भाजी, मांस वगैरे का आणत नाहीस?'

'ह्या सगळ्याला पैसे पडतात तेओ, इथेसुद्धा.'

तेओ खाली बसला.

'मला माफ कर व्हिन्सेंट. माझ्या लक्षातच आलं नाही!'

'जाऊ दे रे, तुला जमलं तेवढं तू केलंस. मी आता बरा होतोय. थोड्या दिवसांत अगदी ठणठणीत होईन.' तेओनं जाग यावी तसे डोळे चोळले.

'पण मला काहीच कसं कळलं नाही? मला वाटलं, तू... व्हिन्सेंट... पण काहीच कळलं नाही.'

'अरे जाऊ दे ना! विसरून जा. मला सांग पॅरिस काय म्हणतंय? तुझं कसं चाललंय? एटनला आई-वडिलांकडे गेला होतास?'

तेओ उठला. 'जवळपास कुठं दुकान वगैरे आहे? काही विकत मिळेल का?'

'वेसमेसला गेलास तर मिळेल; पण ते नंतर बघू. तू ती खुर्ची ओढ न् बैस. मला बोलायचंय तुझ्याशी. दोन वर्षं झाली रे आपण भेटल्याला.'

तेओनं हळुवारपणे भावाच्या चेहऱ्यावरून बोटं फिरवली. 'आधी तुला बेल्जिअममधलं सगळ्यात चांगलं जेवण खायला घालतो. तुला उपास घडलेत, दुसरं काही नाही. नंतर औषध देऊन मऊ गादीवर झोपवतो. मला जरा जरी कल्पना असती ना... मी येईपर्यंत हलू नकोस.'

तेओ बाहेर पडला. व्हिन्सेंटनं पेन्सिल उचलून कामाला सुरुवात केली. अर्ध्या तासानं तेओ आला. बरोबर दोन मुलं होती. त्यांच्या



रडणारा म्हातारा : १८८२

हातात दोन चादरी, 'उशी, काही भाडी, ताटल्या, अन्नाचे पुडे होते. तेओनं अंथरुणावरच्या चादरी बदलून व्हिन्सेटला झोपवलं.

'आता ही शेगडी कशी पेटवायची?' त्याचा सुरेख कोट काढून ठेवून शर्टाच्या बाह्या मागे सारत तो म्हणाला, 'तिथं काही कागद अन् काटक्या आहेत. त्या पेटव अन् मग त्यात तो कोळसा घाल.'

तेओन त्या कचऱ्याकडे पाहिलं. 'कोळसा! ह्याला कोळसा म्हणायच?'

'तेच आम्ही वापरतो. थांब. मीच तुला दाखवतो'...तो अंथरुणातनं उठू लागला. तेओ ओरडला, 'उठू नकोस, मूर्ख! अन् परत हाललास तर रट्टा खाशील.'

किती तरी दिवसानी व्हिन्सेंटच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. तो अंगातला ताप विसरला. तेओन अडी उकडली, ताजं दूध गरम केलं. पाव भाजला. आपल्या भावाकडं प्रेमान पाहतानाच व्हिन्सेंटचं पोट भरलं.

एकदाचं जेवण तयार झालं. तेओनं जेवणाचं टेबल पलगाजवळ ओढलं. वर स्वत.चा पाढरा टॉवेल घातला. अंडी बशीत फोडली. लोणी काढल. 'ह, चल. आ कर. किती तरी दिवसांनी आज तू पुरं जेवण जेवणार आहेस.'

'तेओ, माझं मला जेवता येईल. उगाच काय...'

तेओन चमचा त्याच्या तोंडाशी धरला.

'आता आ कर मुकटयान. नाही तर डोळयात जाईल.' जेवण झालं. व्हिन्सेंटनं मान उशीवर टेकली. समाधानान त्यान सुस्कारा टाकला. 'अन्नाची चव चागली असते. मी विसरलो होतो.' तो म्हणाला.

'आता परत तू काही एवढयात विसरणार नाहीस.'

'आता बोल गुपिल्स कस चाललंय? बाहेरच्या बातम्या नाहीत किती वर्षांत. मला उपास घडलाय मोठा'

'मग थोडा आणखी उपाशी राहा. हे झोपेचं औषध. शात पडून राहा अन् ते अन्न जरा पचू दे.'

'पण मला झोपायचं नाहीय तेओ, मला गप्पा मारायच्यात.'

'तुला कुणी विचारलय का? हा हुकूम आहे. आता शहाण्यासारखं हे पी. झोप झाली की तुला झकासपैकी स्टेक करून घालतो म्हणजे तू ठणठणीत होशील'

व्हिन्सेंट सध्याकाळपर्यंत झोपला. जाग आली तेव्हा तेओ खिडकीशी बसून त्याची चित्र पहात असलेला दिसला व्हिन्सेट बराच वेळ त्याच्याकड पहात राहिला. तेओच लक्ष गेल्यावर तो उठला.

'मग? कस वाटतय आता? तुला छान झोप लागली होती.'

'चित्रं कशी वाटली? आवडल का एखाद?'

'जऽऽरा थाब. तेवढं स्टेक करतो. बटाटेसुद्धा सोलून तयार आहेत.' त्यानं वाटीत गरम पाणी आणलं, 'रेझर तुझा घेऊ की माझा, व्हिन्सेंट?'

'दाढी केल्याशिवाय मला स्टेक खाता येणार नाही का?'

'नाही साहेब. तोडही स्वच्छ धुवायला लागेल, केस नीट विंचरायला लागतील. ह, हा टॉवेल, गळयाभोवती गुडाळ.'

त्यानं व्हिन्सेंटची दाढी केली, तोड स्वच्छ धुतल, केस् विंचरले अन् स्वत.चा एक स्वच्छ शर्ट त्याला घातला.

'आता कसं! आता तू व्हान गॉग दिसतोस.'

'तेओ, स्टेक जळलं.'

तेओनं टेबलावर जेवणाची तयारी केली. गरम दूध ठेवलं.

जेवणानतर तेओनं व्हिन्सेटच्या पाइपमध्ये पॅरिसहून आणलेली तबाखू भरली. 'ओढ. हे चूक आहे खरं म्हणजे, पण चालेल.'

समाधानानं पाईप ओढणाऱ्या व्हिन्सेंटकडे पहाता पहाता तेओला त्याचं लहानपण आठवलं. आई-वडिलांपेक्षाही व्हिन्सेटला त्याच्या आयुष्यात महत्त्वाचं स्थान होतं. व्हिन्सेटशिवाय आयुष्य अपुरं होतं. दोघांनीही एकमेकाच्या डोळयानी जग पहाण्याचा प्रयत्न केला होता. म्हणूनच व्हिन्सेंटला या खबदाडातनं बाहेर काढून त्याच्या पायावर उभा करायला हवा होता. तो अगदी लहान पोर होता अजून. स्वतःची ताकद त्यानं ओळखली नव्हती.

'व्हिन्सेंट', तेओ म्हणाला, 'तुला एक-दोन दिवसात थोडं बरं वाटेल. मग मी तुला एटनला घेऊन जाणार आहे.'

व्हिन्सेटन पाइपचे झुरके घेतले काही तरी बोलायला हवं होतं. तेओला समजेल सागितल तर. 'तेओ, घरी जाण्यान काय होणार? घरात मला काहीच स्थान नाहीय. त्याचा माझ्यावर विश्वास नाही. मला वाटतं दूर रहाणं जास्त बरं. त्यांनाही त्रास नको मी चक्रम आहे वेडयासारख काही तरी करत रहातो कुठलीही गोष्ट मी विचार न करता करून टाकतो; पण म्हणून मी काही नालायक माणूस नाहीय. फक्त माझा उत्साह, माझ्या ऊर्मी चांगल्या कामाकरता वापरल्या जाव्यात एवढाच प्रश्न आहे. उदाहरणार्थ मला चित्रं अन् पुस्तकांचं वेड आहे रोजच्या पावाइतकीच त्याची मला गरज आहे. तू समजतोस मला काय म्हणायचय.'

'मला कळतं व्हिन्सेंट, पण तुझ्या वयाच्या माणसानं नुसती चित्रं पहाण किंवा पुस्तक वाचण म्हणजे नुसताच वेळ घालवणं आहे. पाच वर्षं झाली, तू पोटा-पाण्याचा काही उद्योग केला नाहीस. तुझी ताकदही या काळात कमी होत गेली.'

व्हिन्सेटनं तंबाखू पाईपमध्ये भरली. तो पेटवायचा मात्र तो विसरून गेला.

'खरच. मी क्वचितच पैसा मिळवला. मित्रानीच मला बरेचदा मदत केली या बाबतीत माझा माझ्यावर आता विश्वास नाही. पुढचं मलाही कठीण दिसतय. पण तरीही हे माझं अवमूल्यनच आहे का? मी जे करतोय तेच मला केल पाहिजे तेओ. मी जर अभ्यास केला नाही तर मी सपल्यातच जमा आहे'

'तू काही तरी सांगायचा प्रयत्न करतोयस. पण मला फारस काही समजतयस वाटत नाही.' तेओ म्हणाला.

व्हिन्सेंटनं पाईप पेटवला. 'आपण रिसवेकच्या जुन्या गिरणीजवळून चालत होतो, आठवत? तेव्हा आपलं बऱ्याच गोष्टीबाबत एकमत झाल होतं.'

'पण तू बदललायस, व्हिन्सेट.'

'मी गोष्टी नाकबूल करतोय अस समजू नकोस. माझा अप्रामाणिकपणाही मी प्रामाणिकपणे कबूल करतोय. माझा प्रश्न इतकाच आहे की, माझा जगाला कोणत्या मार्गान काही उपयोग होऊ शकेल?'

तेओन त्याला दूध गरम करून दिल. 'हे घे, अन् फार दमू नकोस.'

व्हिन्सेंटनं एका दमात पेला रिकामा केला. ओठाच्या कडेला साचलेलं दूध न पुसता तो बोलत राहिला, 'मनातले विचार बाहेर दिसतात का? आत कुठं तरी आग लागलेली असते अन् तिची ऊब मिळवायला जवळ कुणीही येत नाही. जाणा-येणाऱ्यांना फक्त बाहेर येणारा धूर दिसतो. आपण ती आतली आग जागती ठेवायला हवी. आज ना उद्या, कुणी तरी ती ऊब मिळवायला नक्की येईल.'

तेओ उठला अन् पलंगावर बसला. 'मला कशाची आठवण झाली ठाऊक आहे?'

'नाही.'

'रिसवेक्‌ची गिरणी.'

'हं, ती. छान होती नाही?'

'अन् हो, आपलं लहानपणही छान होतं.'

'ते तुझ्यामुळे व्हिन्सेंट. माझ्या पहिल्या आठवणी तुझ्याबरोबरच्या आहेत.'

बराच वेळ कुणी बोललं नाही.

'व्हिन्सेंट, मी तुझ्यावर केलेले आरोप घरच्यांचे आहेत, माझे नव्हेत. तुझ्या लक्षात आलं असेल, त्यांनीच मला मागे लागून तुला परत आणण्याकरता इथं पाठवलं.'

'ते म्हणतात ते काही खोटं नाही, तेओ. त्यांना माझे प्रश्न समजत नाहीत अन् माझ्या संपूर्ण आयुष्याच्या संदर्भात त्यांना वस्तुस्थितीचा विचार करता येत नाही इतकंच. त्यांच्या दृष्टीनं मी चुकतोय. तुला रस्ता सापडलाय. मला त्याचा आनंद आहे. मी मनापासून बोलतोय हे. त्यांना तुझं जास्त प्रेम वाटणं अगदी स्वाभाविक आहे. फक्त तुला माझ्यात सर्वसामान्य माणसापेक्षा काही निराळं दिसलं तर मला बरं वाटेल.'

'जाऊ दे रे. मी तुला वर्षभर लिहिलं नाही ते आळसानं. झुन्डर्टच्या शेतातून तुझा हात हातात घेऊन फिरताना तुझ्याबद्दल जितका विश्वास मला वाटे तितकाच अजूनही वाटतो. आता मात्र तू सतत माझ्याजवळ असायला हवंस.'

व्हिन्सेंट हसला. तेओ एकदम सावरून बसला. 'हे बघ, आताच काय तो निकाल लावून टाकू. मला वाटतं, तुला काही तरी नेमकं करायचंय. तुझ्या दृष्टीनं ते योग्य आहे, इतरांच्या दृष्टीनं नसेल. पण तुला त्यातच आनंद अन् यश मिळणार आहे. काय करायचंय तुला? मला गुपिलसनं दुप्पट पगार द्यायला सुरुवात केलीय. एवढ्या पैशांचं काय करायचं मला कळत नाही. तुला मदत हवी असेल तर सांग, तुझं काम आपण भागीदारीत करू. तू काम करायचंस, मी पैसा द्यायचा. पुढे कधी तरी तू ते फेड. आता बोल, काय आहे तुझ्या मनात?'

व्हिन्सेंटनं त्याच्या चित्रांच्या गठ्ठ्याकडे नजर टाकली. तेओ त्याच्याकडे पाहत होता. त्याच्या डोळ्यांत उत्सुकता दिसत होती.

'विलक्षण आहे.' व्हिन्सेंट पुटपुटला, 'मी कधीचं हेच सांगायचा प्रयत्न करतोय. पण माझं मलाच ठाऊक नव्हतं.' तेओचं लक्ष चित्रांकडे गेलं. 'मला वाटलंच होतं.'

व्हिन्सेंट आनंदानं थरथरत होता. 'तेओ, माझ्याआधी तुलाच ते कळलं होतं. मला भीती वाटत होती. मला काही तरी करायलाच हवं. चित्रं काढायची मला जबरदस्त इच्छा होती; पण मी कधी ते केलं नाही. मला वाटलं, त्यामुळं माझ्या कामात व्यत्यय येईल. आता मी सत्तावीस वर्षांचा आहे. इतकी वर्षं या झगड्यात गेली. माझ्यासारखा मूर्ख जगात कुणी नसेल.'

'काही हरकत नाही, व्हिन्सेंट. उशीर झाला असला तरी तुझ्याजवळ इच्छा आहे, निश्चय आहे. अन् तू काय म्हातारा थोडाच झालायस?'

'अजून दहा वर्षं आहेत. एवढ्या वेळात काही चांगलं काम व्हायला हरकत नाही.'

'अलबत्. तुला जिथं राहायचंय तिथं राहा. पॅरिस, ब्रुसेल्स, ॲमस्टरडॅम, द हेग. तू सांग, मी तुला दरमहा पैसे पाठवीन. कितीही वर्षं लागोत. तू जोपर्यंत आशा सोडत नाहीस तोपर्यंत मला धीर आहे.'

'नाही. आता मी आशा सोडणार नाही. इतक्या वर्षांनंतर मला आयुष्याचा अर्थ गवसलाय. तेओ, तुला कळतंय? मला चित्रकार व्हायचंय. मला व्हायलाच हवं. बाकीची कामं माझ्याकरता नव्हतीच म्हणून मला त्यात अपयश आलं.'

'आता तू लवकर बरा हो. तुला हॉलंड, पॅरिस, कुठं जायचं तिथं घेऊन जाईन मी.'

व्हिन्सेंट ताडकन् उठून उभा राहिला. 'आपण निघायचं.आत्ताच्या आत्ता. थांबायला वेळ नाही. ब्रुसेल्सची गाडी नऊ वाजता आहे.'

'अरे, पण तुला प्रवास करवणार नाही, तू आजारी आहेस.'

'जुनं झालं ते. आजच्या इतकं बरं मला कधीच वाटलं नव्हतं. ऊठ, दहा मिनिटं राहिलीत. बॅग भर अन् निघ.'



तेओने दरमहा पैसे पाठवायचे.
व्हिन्सेंटने फक्त काम करायचे.
काही काळ घरी-एटनला.
काही काळ द हेगला.
चार-सहा वर्षे अशी निघून गेली.
हेगला दोन वर्षे एका वेश्येबरोबर व्हिन्सेंटने संसारही केला.
त्याला कुणी समजूच शकत नव्हतं. सगळीकडे परका. झिडकारला गेलेला.
पॅरिसला भावाकडे राहिला तेवढा काळ काय तो सुखाचा. आनंदाचा.
पण या वातावरणात कलानिर्मिती होत नाही म्हणून पुन्हा अस्वस्थता. बेचैनी.
आर्लेला स्थलांतर. निसर्गाशी एकरूपता साधण्यासाठी.
दिवसभर तळपत्या उन्हात काम करून उकळता निसर्ग कागदावर उतरवण्याची जबरदस्त धडपड.
पिवळ्या रंगाची साक्षात अनुभूती !
राहत्या घरालाही पिवळा रंग दिला होता. घराला सगळेजण ' पिवळे घर ' असेच म्हणत.
उन्हात काम केल्यामुळे मेंदूवर परिणाम झालेला होता.
आब्सिथ-दारूचे-व्यसन . . . .
उपासमार चालूच होती.
त्यात एक दिवस पोल गोगँ आला. तोही त्याच्यासारखाच भणंग पण असामान्य प्रतिभावंत चित्रकार, देशाच्या कोपऱ्यात कुठंतरी आजारी, निर्धन अवस्थेत राहात होता. व्हिन्सेंटनंच त्याला त्याच्याबरोबर काम करायला आर्लेला बोलावून घेतलं होतं.
गोगँ आला तोच मुळी एक जबरदस्त वादळ घेऊन. ( १८८८ )

¤

## पंधरा

दोघं गळ्यात गळा घालून भेटले. व्हिन्सेंटनं त्याला घर दाखवलं, त्याचं सामान लावायला मदत केली. पॅरिसची हालहवाल विचारली. किती तरी वेळ ते उत्साहानं बोलत राहिले.

' तू आज काम करणार आहेस गोगँ ?'

' तुला काय वाटतं, मी गाडीतनं उतरल्याबरोबर पॅलेट घेऊन कामाला लागावं ?'

' मी नुसतं विचारलं.'

' परत असले मूर्ख प्रश्न विचारीत जाऊ नकोस.'

' मीही आज सुट्टी घेतो. चल, तुला गाव दाखवतो.'

त्यानं गोगँला टेकडी दाखवली, मेरीचा चौक, बाजार अन् गावाची मागची बाजू दाखवली. झोव्ह शेतात नांगरट करीत होते. त्यांचे तांबडे झगे चमकत होते. रोमन वागेतनं पलीकडे गेल्यावर आर्लेझियन बायका ये-जा करताना दिसत होत्या. व्हिन्सेंट त्या किती सुंदर आहेत ते गोगँला समजावून सांगत होता.

' तुला आर्लेझियन्सबद्दल काय वाटतं ?'

' मला काही दम दिसत नाही.'

' त्यांची कांती बघ लेका, बांधा नाही. सूर्यानं त्यांना दिलेला रंग बघ !'

' इथल्या माड्या कशा आहेत ?'

' पाच फ्रँक्सवालीच घरं आहेत सगळी, झोव्ह लोकांची.'

ते पिवळ्या घरात परतले. भिंतीवर त्यांनी एक पेटी अडकविली. त्यात त्यांनी अर्धे पैसे ठेवायचे, तंबाखू, घरभाडं, इतर काही अनाहूत खर्च असल्यास त्यातनं घ्यायचे ठरलं. घेतलेल्या पैशांचा हिशेब ठेवण्याकरिता त्यावर एक कागद-पेन्सिल ठेवली. दुसऱ्या पेटीत बाकीचे पैसे ठेवले, चार भागांत. दर आठवड्याच्या अन्नाकरिता.

' तू स्वयंपाक चांगला करतोस ना गोगँ ?'

' उत्कृष्ट. मी बोटीवर होतो.'

' मग यापुढं तू स्वयंपाक करशील. फक्त आज तुझ्या आगमना-प्रीत्यर्थ मी सूप करणार आहे.'

रात्री त्यानं केलेलं सूप खाणं गोगँला अशक्य झालं.

' हे सूप म्हणजे तुझ्या रंगांचं कालवण केल्यासारखंच केलंयस तू.'

' मी रंगांचं कालवण करतो !'

'तू अजून इम्प्रेशनिझमच्याच मागे आहेस. तू सध्याची पद्धत सोडून दे. तुझ्या स्वभावाशी ती जुळत नाही.'

व्हिन्सेटन वाडगा बाजूला सारला.

'पहिल्या दृष्टिक्षेपात तू हे सागतोस अं? नामी टीकाकार आहेस.'

'मग तूच बघ, तू काही अंधळा नाहीस. ते भडक पिवळे घे. उदाहरणार्थ. त्याची काही पद्धतीन माडणी केलीयंस का?'

व्हिन्सेंटनं भिंतीवरल्या चित्राकडे नजर टाकली.

'तुला माझ्या सूर्यफुलाबद्दल एवढंच म्हणता येतय?'

'नाही दोस्ता, मला टीका करण्यासारख्या अनेक गोष्टी त्यात दिसतायत!'

'त्यांच्यात?'

'त्याच्यात. तुझी रगसंगती एकसुरी, अपूर्ण आहे.'

'हे खोटं आहे.'

'खाली बैस व्हिन्सेट. खुनशी नजरेनं असा पाहू नकोस माझ्याकडे. मी वयानं आणि अकलेनं बराच मोठा आहे तुझ्यापेक्षा तू अजून तुला सापडलेला नाहीयंस. माझं ऐक, मी तुला थोडं शिकवणार आहे.'

'माफ कर, मला त्याची गरज नाही पॉल.'

'मग आधी तुझं डोकं जरा साफ कर. दिवसभर त्या मेसिओनेर अन मोंतिचेल्लीची स्वप्नं बघतोस. तुला ते जोपर्यंत चांगले वाटतात तोपर्यंत तू चागला कॅनव्हास करू शकणार नाहीस.'

'मोंतिचेल्ली मोठा चित्रकार होता. त्याच्या काळात कुणालाही नव्हती एवढी रंगांची समज त्याला होती.'

'तो मूर्ख दारूड्या होता, दुसरं काही, काही नाही.'

व्हिन्सेंट ताडकन् उठला अन् जळजळीत नजरेनं गोगँकडे पाहायला लागला. त्याच्या धक्क्यानं सूपचा वाडगा फरशीवर पडून फुटला.

'तू त्याच्याबद्दल असं बोलच परत! मला तो माझ्या भावाइतकाच आवडतो. त्याच्या दारूबद्दलच्या ह्या सगळ्या गावगप्पा आहेत. दारुड्या माणूस मोंतिचेल्लीसारखी चित्रं नाही काढीत. तशी चित्रं काढायला मोठी प्रतिभा असावी लागते. सहा मूळ रगांचं मिश्रण, करीत असलेल्या गोष्टीची पूर्ण पूर्वतयारी हे करायला डोकं ताळ्यावरच असावं लागतं. ज्या बयेनं या गावगप्पा सुरू केल्यात तिच्यात अन् तुझ्यात काही फरक नाही.'

'माकडा माकडा हुप् तुझ्या शेंडीला......'

तोंडावर कुणी तरी पाण्याचा सपकारा मारावा तसं व्हिन्सेंटला वाटलं त्यानं स्वत.ला शांत करण्याचा खूप प्रयत्न केला; पण अशक्य झालं. तेव्हा तो स्वत.च्या खोलीत गेला अन् त्यान धाडकन् दार लावून घेतलं.

□

जे कलाकार गोगँला आवडत ते व्हिन्सेंट निकालात काढी. व्हिन्सेंटचे सगळे देव गोगँ उडवून लावी. प्रत्येक गोष्टीवर त्यांच्यात दुमत होतं. दुसरा कोणताही विषय निघाला तरी हरकत नव्हती; पण चित्राचा विषय निघाला की गाडी मूळ पदावर येई अन् चित्राशिवाय तर त्याना दुसरा विषय नव्हता. तेच त्यांच अन्न होतं, जीवन होतं. जिवाच्या आकांतानं दोघंही आपापलं म्हणणं माडीत. एकमत झालं तरी ते त्याच हिरीरीनं बोलत. तोंडातन जळते निखारे पडल्यागत शब्द बाहेर पडत

'तू कधीच कलावंत होऊ शकणार नाहीस व्हिन्सेट', गोगँ म्हणाला. 'तू निसर्ग पाहून स्टुडिओत येऊन काम करायला हवंस.'

'मला शातपणे काम करायचंच नाहीय शंखा, म्हणून तर मी आर्लेला आलोय.'

'हे सगळ काम म्हणजे निसर्गाची कॉपी आहे नुसती तू उत्स्फूर्त काम करायला हवंस.'

'उत्स्फूर्त! परमेश्वरा!'

'आणखी एक तू सराकडे शिकायला हवं होतंस. चित्र अमूर्त असतं तू सांगतोस त्या नीतिमत्तेच्या कथाना त्यात जागा नसते.'

'मी नीतिमत्तेच्या गोष्टी सागतो? खूळ लागलय तुला.'

'तुला व्याख्यानं द्यायची असतील तर परत चर्चकडे जा. चित्र म्हणजे रंग, रेषा अन् आकार अन् एवढच. चित्रकार हा निसर्गातले अलंकारिक आकार पुनर्निर्माण करू शकतो.'

'अलंकारिक कला? तुला निसर्गात एवढच दिसतं? तू स्टॉक एक्स्चेंजमध्ये जा परत. तिथेच शोभशील.'

'मी गेलो तर दर.रविवारी तुझं व्याख्यान ऐकायला चर्चमध्ये येईन. तुम्हाला काय मिळत हो निसर्गातन?'

'मला लय मिळते, जगण्याची लय. मी सूर्य करतो तेव्हा त्याच्या आवर्तनाचा प्रचंड वेग लोकाना जाणवावा अशी माझी इच्छा असते. त्याच प्रकाश देण अन् उष्णतेच्या प्रचड वेगवान लाटा निर्माण करणं जाणवायला हवय. मी शेतं काढतो तेव्हा कणसातला धान्याचा कण न् कण आपल्या जन्माकरिता झगडताना मला दाखवायचा असतो. सफरचंद काढताना त्याच्या सालातनं आतला टटतटून भरलेला रस जाणवून द्यायचा असतो.'

'व्हिन्सेंट, तुला कितीदा सांगितलं की, चित्रकारानं थिअरी बोलू नये.'

'हा द्राक्षांचा मळा बघ, गोगँ. बघ, द्राक्षं आता फुटतायत असं वाटतंय. या ओहोळाचं अभ्यासचित्र पाहा. त्यात ओतलं गेलेलं टनावर पाणी माणसाना जाणवायला हवं. माणसाच चित्र काढताना त्याचं सारं आयुष्य, त्याचं दुःख, त्यानं पाहिलेलं, केलेलं, सोसलेलं सारं काही त्यात यायला हवं.'

'तुला काय म्हणायचय?'

'हेच गोगँ. माणसाच आयुष्य, शेतं, द्राक्षांचा रस हे सारं एकच आहे. या गोष्टींचं एकत्र येण हीच आयुष्याची लय आहे. या लयीवर आपण नाचतो. माणसं, सफरचदं, घोडे, तू न् मी. तुझं उद्या द्राक्षात रूपातर होऊ शकतं. कारण तू अन् द्राक्षं एकच आहात. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्याचं, त्या रोपाच जमिनीशी जे नातं असतं, तेच शेताबरोबर असतं. मला तो सूर्य, शेतकऱ्याला, रोपं, जमीन, नांगर या सगळ्याना न्हाऊ घालताना दाखवायचाय. ही विश्वाची लय, ज्या लयीत जगात गोष्टी घडतात, ती कळली की मग तुम्हाला आयुष्य कळत. तोच परमेश्वर आहे.'

'आपलं अगदी बरोबर आहे, हवालदार.' गोगँ म्हणाला.

व्हिन्सेंट त्याच्या उद्रेकाच्या टोकावर होता. त्याचं अंग थरथरत होतं. गोगँच्या शब्दांनी त्याला मुस्कटात बसल्यासारखं झालं. तो

सर्वात अधिक शक्तिशाली धुलाईची पावडर




# नवीन फॉर्म्यूला डेट
# अधिक शक्तिशाली
# भरपूर फेस
# ताजा सुगंध

शानदार सफेदी, डेटची सफेदी

Shilpi dm 11b/76 mar

मूर्खासारखं तोंड उघडं टाकून उभा राहिला.

'याचा अर्थ काय? आपलं बरोबर आहे, हवालदार!'

'याचा अर्थ कॉफी अन् आब्सिथ घ्यायची वेळ झालीय.'

¤

उन्हाळा त्याच्या सर्व अस्त्रांनिशी तळपत होता. सगळीकडे रंगांचं साम्राज्य पसरलं. हिरवे, निळे, पिवळे अन् लाल रंग डोळ्यांना त्रास होईल इतके तळपत होते. सूर्यानं स्पर्श केलेली वस्तू तत्काळ पेट घेत होती. उन्हाच्या झळांनी ऱ्होनवर कंप उठत होता.

सूर्यानं त्या दोघा चित्रकारांना भाजून काढलं, वादळानं त्यांना होलपाटून टाकलं. दिवसभर उन्हात काम करून रात्र गडद झाल्यावर ते घरी परतत.

व्हिन्सेंट–एक ज्वालामुखी, गोगँ–उसळता रस. त्यांच्यात एक झगडा आकाराला येत होता. रात्री अतिश्रमांनी झोप येईनाशी झाली की, ते एकमेकांचा सूड घेत. दुसरं करमणुकीचं साधनच नव्हतं. गोगँ व्हिन्सेंटला पेटवत असे अन् तो थरथरायला लागला की, एकच वाक्य त्याच्या तोंडावर फेकत असे, 'आपलं म्हणणं बरोबरंय, हवालदार.'

'व्हिन्सेंट, तुला रंगवणं जमत नाही हे आश्चर्य नाही. बघ, या स्टुडिओतला पसारा. देवा, तुझा डच मेंदू मिय्ये अन् मोंतिचेल्लीने व्यापलेला नसता तर तुझ्या आयुष्यातही थोडा नेटकेपणा आला असता.'

'तुला काय करायचंय? तुझ्या स्टुडिओचं तू पाहा.'

'आता विषय निघालाच आहे तर सांगतो. तुझ्या रंगपेटीइतकाच तुझ्या डोक्यात गोंधळ झाला आहे. तुला अजूनही दगाचं...'

'दगा! मिय्येच्या जवळपास लावता येईल असं काही केलंय का त्यानं?'

'मिय्ये? तो भावनावाला...तो?'

मिय्येच्या ह्या अपमानानं व्हिन्सेंट फुलून उठला. तो त्याचा गुरु, आध्यात्मिक पिता होता. तो गोगँच्या मागे धावत सुटला. गोगँ पुढं पळत होता. या खोलीतनं त्या खोलीत. घर लहान होतं. व्हिन्सेंट ओरडत होता, हातवारे करीत होता. त्या अनोळखी प्रदेशात दोघांचं युद्ध चालूच होतं.

निसर्ग अन् स्वतःला एकत्र आणून आपलं उद्दिष्ट साध्य करण्याकरता दोघंही वेड्यासारखे काम करत होते. दिवसभर रंगांचं युद्ध. रात्री एकमेकांच्या अहंकारावर प्रहार. त्यांचं गोडीतलं बोलणंही तारस्वरातच असे. तेओ पैसे पाठवत होता. दारूत अन् तंबाखूत ते पैसे संपवत होते. उन्हाळ्यानं भूक लागत नव्हती. त्यांना वाटे, आब्सिथमुळे त्यांना शांत वाटेल. परिणाम नेमका उलटा होई.

एका भीषण वादळानं त्यांना घरात राहणं भाग पाडलं. गोगँला काम करता येईना. व्हिन्सेंटला चिथावण्यात तो सारा वेळ घालवत असे. नुसत्या तत्त्वांकरता इतकं संतापताना त्यानं कुणालाच पाहिलं नव्हतं.

व्हिन्सेंट गोगँची करमणूक बनला होता. गोगँ स्वतःची करमणूक करवून घेत होता.

'थंड हो रे व्हिन्सेंट.' वादळाच्या पाचव्या दिवशी तो म्हणाला. घरात चाललेल्या वादळापुढं बाहेरचं वादळ म्हणजे केवळ झुळूक ठरत होती.



आर्मंड रूलँ : १८८८ (आर्ल)

'तुझं तू बघ, गोगँ!'

'हे असंच होतं, व्हिन्सेंट. माझ्या संगतीत येऊन चर्चा करणारे अनेक वेडे झालेत.'

'तू मला भीती दाखवतोस?'

'नाही. पूर्वसूचना देतोय.'

'ती तुझ्याजवळच ठेव.'

'ओ. के. पण काही झालं तर माझ्यावर नाही.'

'पॉल, आता हे भांडण पुरे. तू माझ्यापेक्षा मोठा चित्रकार आहेस, मान्य. तू मला बरंच काही शिकवू शकतोस हेही मान्य; पण म्हणून मी तुला माझा उपहास करू देणार नाही. मीही नऊ वर्षं मेहनत केलीय अन् या रंगांतनं सांगावं असं माझ्याजवळ काही आहे. आहे की नाही? कबूल कर. बोल, गोगँ.'

'आपलं बरोबर आहे, हवालदार.'

¤

वादळ शांत झालं. आर्लेझियन्स घराबाहेर पडायला लागले. सूर्य पुन्हा तळपायला लागला. आर्लचं वातावरण बिघडलं. गुन्हेगारी वाढली. पोलिसांचं कामही वाढलं. लामार्टीन चौकात मारामाऱ्यांचे देखावे रोज दिसू लागले. आता आर्लच्या सहनशक्तीची सीमा झाली होती.

व्हिन्सेंटला त्या पॅरिशियन वार्ताहराची आठवण झाली.

'हे काय असेल?' त्यानं स्वतःला विचारलं.

'भूकंप की क्रांती?'

हे चालू असतानाच त्याचं उघड्या डोक्यानं काम करणं चालू होतं. आतनं जाणवणाऱ्या प्रचंड खळबळीला वाट मिळवण्याकरता त्याला सूर्याची गरज भासे. मेंदू उसळत होता, कॅनव्हासमागून कॅनव्हास संपत होते.

गेल्या नऊ वर्षांतली मेहनत या काही क्षणी कामी येत होती. एखाद्या चुटपुटत्या क्षणी आपण पूर्ण कलाकार आहोत ही जाणीव

त्याला होत होती. अशी चित्रं परत त्याच्याच्यानं होणार नव्हती.

तो सकाळपासून रात्री दिसेनासं होईपर्यंत काम करत होता. दिवसाला दोन, क्वचित तीनसुद्धा चित्रं तो पूर्ण करत असे. एकेक चित्र म्हणजे त्याच्या आयुष्याचा एकेक लचका होता. जगण्याची वर्ष महत्त्वाची नव्हती. त्या वर्षात तो काय करत होता ते महत्त्वाचं होतं. त्याच्या चित्रांवरनं काळ मोजला जात होता, कॅलेंडरच्या पानांनी नव्हे.

त्याला वाटलं, त्याची कला आता परमोच्च बिंदूला पोचली आहे. त्याच्या आयुष्यातला हा सर्वात महत्त्वाचा काळ होता. ते किती टिकणार होतं कोण जाणे. त्याला फक्त चित्रं अन् चित्रंच काढायची होती. हा क्षण पकडून ठेवायला हवा, लांबवायला हवा.

अपुरी झोप, अपुरं खाणं, उन्हात काम, दारू, तंबाखू, प्रतिभेचा प्रचंड स्रोत. त्याचं उत्तेजन वाढायला लागलं. पिवळं घर वादळाच्या धक्क्यांनी हादरायला लागलं.

गोगँ व्हिन्सेंटचं चित्र करत होता. व्हिन्सेंट एक स्थिरचित्र करत होता. व्हिन्सेंटनं गोगँचं चित्र पाहिलं. प्रथमच गोगँला त्याच्याबद्दल काय वाटत होतं ते त्याला स्पष्ट झालं.

'हा निश्चितच मी आहे.' तो म्हणाला, 'पण वेड लागल्यानंतरचा मी आहे.'

संध्याकाळी ते कॅफेत गेले. व्हिन्सेंटनं एक फिकी आब्सिन्थ मागवली. अचानक त्यानं पेला गोगँला फेकून मारला. गोगँनं तो चुकवला. त्यानं व्हिन्सेंटला हातात उचलून घरी आणलं, अंथरुणावर ठेवल्या ठेवल्या त्याला झोप लागली.

सकाळी जाग आल्यावर तो शांतपणे म्हणाला, 'गोगँ, दोस्ता, मला अस्पष्ट आठवतंय की, मी तुला मारलं, काल रात्री.'

'अरे जाऊ दे यार, मी ते विसरून गेलोय.' गोगँ म्हणाला.

'पण ते पुन्हा कधी तरी होईल. मला लागलं असतं तर मी भडकून तुला मारलंही असतं. मला तुझ्या भावाला लिहायची परवानगी दे; मी परत येतोय म्हणून.'

'नाही! नाही! पॉल, तसं करू नकोस. हे घर मी तुझ्यासाठी मांडलंय. तू जाऊ नकोस.'

दिवसभर हा वाद चालला. गोगँला रोखण्याची व्हिन्सेंटनं शर्थ केली. तो त्याच्या विनवण्या करत होता, धमकावत होता, तो रडलासुद्धा. त्याचा विजय झाला. त्याचा मित्र न रहाता तर तो त्याचा मोठा पराभव ठरला असता.

रात्र झाली. गोगँ दमला. तो झोपायला गेला. पिवळ्या घरातली प्रत्येक खोली या तणावानं भरलेली होती. गोगँला झोप येईना. पहाटेच्या सुमाराला त्याला डुलकी लागली.

कसल्याशा भासानं तो जागा झाला. व्हिन्सेंट त्याच्या पलंगावर ओणवा होऊन त्याच्याकडे रोखून पाहात असलेला दिसला.

'तुला काय झालंय व्हिन्सेंट?' त्यानं विचारलं. व्हिन्सेंट दारा-




महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (मर्यादित) कृपानिधी ९ वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८ फोन २६११२१

तनं बाहेर पडला अन् आपल्या खोलीत जाऊन शांत झोपला.

दुसऱ्याही दिवशी गोगँला अशीच जाग आली. व्हिन्सेंट तसाच, त्याच्याकडे पहात होता.

'व्हिन्सेंट, झोपायला जा.'

व्हिन्सेंट गेला.

दुसऱ्या दिवशी रात्री जेवताना त्यांच्यात परत सूपवरनं कडाक्याचं भांडण झालं.

'तू त्यात रंग ओतळायस, माझी नजर चुकवून.' गोगँ ओरडला.

व्हिन्सेंट हसला. भिंतीपाशी जाऊन त्यानं खडूनं लिहिलं,

'मी माझंच भूत आहे.
पण मी मनानं शहाणा आहे.'

□

काही दिवस अगदी शांत गेले. व्हिन्सेंट लहरी अन् खचलेला दिसत होता. तो गोगँशी क्वचित बोलत होता. त्यानं या दिवसांत ब्रश उचलला नाही, वाचन केलं नाही. खुर्चीत बसून तो खिडकीबाहेर आकाशात बघत राही.

चौथ्या दिवशी त्यानं गोगँला बाहेर चलण्याविषयी विचारलं. बाहेर वादळ सुटलं होतं.

'बागेत फिरायला चल. मला तुझ्याशी बोलायचंय.'

'आपल्याला इथं बोलता येणार नाही का ?'

'नाही, मला बसून बोलता येत नाही. मला चाललं पाहिजे.'

'ठीक आहे.'

वादळाला तोंड देत ते शहराच्या डाव्या रस्त्यानं चालायला लागले. बागेतले सिप्रस वाकून जमिनीला टेकत होते.

'काय बोलायचंय तुला ?' गोगँनं विचारलं. त्याला व्हिन्सेंटच्या कानात ओरडावं लागत होतं. शब्द वाऱ्यावर अस्पष्ट होत होते.

'पॉल, मी काही दिवस विचार करतोय, मला एक सुंदर कल्पना सुचली आहे.'

'तुझी कल्पना मला आवडली नाही तर मला माफ कर.'

'आपण चित्रकार म्हणून अपयशी ठरलो आहोत.'

'काय ? मोठ्यानं बोल.'

'आपण चित्रकार म्हणून अपयशी ठरलो आहोत.'

'का ?'

'कारण आपण एकेकटे काम करतो.'

'हे काय नवीन ?'

आपण काही चांगलं करतो, काही वाईट करतो अन् ते सगळं एका कॅनव्हासमध्ये कोंबतो.'

'पुढं ?'

'तुला बोथ् भावंडं माहिती आहेत ? डच चित्रकार. एकाला निसर्गचित्र चांगलं जमत होतं, दुसऱ्याला आकृती. त्यांनी एकत्र चित्र करायला सुरुवात केली. एक त्या चित्रातला निसर्ग काढत असे, दुसरा आकृती. ते यशस्वी झाले.'

'बरं, या प्रस्तावनेचं तात्पर्य ?'

'काय ? ऐकू येत नाही ?'

'मी म्हटलं पुढं सांग.'

'आपण तेच केलं पाहिजे पॉल. सरा, तू, लोत्रेक, रुसो, मी.




स्पर्शिले तव लावण्य
तरलभाव नयनांत त्या!

डोळे म्हणजे सौंदर्याचा स्पर्श! त्यात दोष म्हणजे सौंदर्यात उणेपणा. तो टाळायला चष्मा हवा. पण आजच्या काळात चष्मा म्हणजे अडगळ. मुलीचे लग्न जमायला त्याची अडचण. आजोबांना तो सांभाळण्याची अडचण. आईला स्वयंपाकघरात त्याची अडचण. बाबांना सर्वत्रच त्याची अडचण. म्हणूनच विज्ञानाने दिला अदृश्य चष्मा. कॉन्टॅक्ट लेन्स. दोन प्रकारात उपलब्ध. कठीण किंवा नरम प्लॅस्टिक. डोळ्यांवर चपखल बसणारे कमी नंबर घालवणारे आधुनिक साधन—

कॉन्टॅक्ट लेन्स

अद्यावत कॉन्टॅक्ट लेन्ससाठी एकच नांव

शिरोडकर

चष्म्याचे व्यापारी
दादर टी.टी. • दादर (पश्चिम)
वांद्रे

Radical

आपण एकाच कॅनव्हासवर काम केलं पाहिजे. सरानं वातावरण, सेझाननं पृष्ठभाग, लोत्रेकनं आकृती, मी सूर्य, चंद्र, तारे... आपण एक थोर कलाकृती निर्माण करू.'

'माकडा, माकडा...' गोगँ हसत सुटला. 'हवालदार, ही जगातली सर्वात थोर कल्पना आहे. मी हसतोय, माफ करा.' तो हसता हसता फूटपाथवर बसला. त्याला हसताही येईना.

व्हिन्सेंट स्तब्ध उभा होता.

आकाशातनं हजारो काळे पक्षी घोंघावत आले. त्यांनी व्हिन्सेंटवर हल्ला केला. त्याला टोची मारल्या. त्याच्या साऱ्या अंगातनं ते उडत होते. त्यांच्या काळ्या पंखांनी त्याला वेढून टाकल.

गोगँ उठला.

'चल व्हिन्सेंट, आपण लुईकडे जाऊ. तुझी ही अमूल्य कल्पना साजरी करू.'

व्हिन्सेंट निमूटपणे गोगँच्या मागनं रुदेरी कोलेन्कडे निघाला

गोगँ एका मुलीबरोबर वर गेला.

रॅचेल कॅफेत व्हिन्सेंटच्या मांडीवर बसली.

'तू माझ्याबरोबर वर येणार नाहीस?'

'नाही.'

'का?'

'माझ्याकडे पाच फ्रँक नाहीत.'

'मग त्याऐवजी मला तुझे कान देशील?'

'हो.'

थोड्याच वेळानं गोगँ खाली आला. दोघं पिवळ्या घराकडं निघाले. गोगँनं जेवण तयार केलं. ते संपवून तो काही न बोलता बाहेर पडला. त्यानं लामारटीन चौक जेमतेम ओलांडला होता. त्याला मागनं ओळखीचा पायरव ऐकू आला. तो गर्रकन् वळला.

व्हिन्सेंट हातात वस्तरा घेऊन त्याच्या अंगावर धावला.

गोगँ त्याच्याकडे नुसता पहात राहिला.

व्हिन्सेंट दोन फुटांवरच थांबला. अंधारात त्यानं गोगँकडे पाहिलं, मान खाली घातली अन् तो वळून घरी गेला.

गोगँनं एका हॉटेलात खोली घेतली. दार आतून बंद करून तो झोपला.

व्हिन्सेंट पिवळ्या घरात परतला. वर त्याच्या झोपण्याच्या खोलीत गेला. त्यानं आरसा उचलला. याच आरशात बघून त्यानं अनेकदा स्वत:चं चित्र केल होतं. त्यानं भिंतीजवळच्या टेबलावर तो ठेवला.

त्याला त्याचे लाल डोळे त्यात दिसले.

त्यानं वस्तरा उचलला. गळ्यापाशी पोलादाचा थंड स्पर्श त्याला जाणवला.

कानात विचित्र आवाज होत होते.

आर्लेझिअन सूर्याच्या ज्वाळा त्याच्यात अन् आरशात पसरल्या.

त्यानं फटकन् उजवा कान कापून काढला.

व्हिन्सेंटनं वस्तरा खाली टाकला. डोकं टॉवेलनं गुंडाळलं. रक्ताचे थेंब जमिनीवर सांडत होते. त्यानं बेसिनमध्ये पडलेला कान उचलला. धुतला. कागदाच्या अनेक तुकड्यामध्ये गुंडाळला. ते पुडकं वर्तमानपत्रात गुंडाळलं.

त्यानं डोक्यावर टोपी घातली. तो बाहेर पडला. लामारटीन चौकातन टेकडीवर चढला. मेझाँ द तोलेरांसची बेल दाबली.

एका मोलकरणीन दार उघडलं.

'रॅचेलला पाठवा.'

क्षणात रॅचेल आला.

'अरे, व्हिन्सेंट तू? काय हवंय?'

'मी तुझ्यासाठी काही तरी आणलंय.'

'काय? भेट?'

'हो.'

'तू किती चागला आहेस!'

'जपून ठेव ती. माझी आठवण आहे.'

'काय आहे ते?'

'उघड, दिसेल तुला.'

तिनं ते सगळे कागद काढले. भयचकित नजरेनं ती कानाकडे पहात राहिली. पुढल्याच क्षणी ती बेशुद्ध होऊन पायऱ्यावर कोसळली.

व्हिन्सेंट परत फिरला. टेकडी उतरून लामारटीन चौकातनं तो घरी आला. दार बद करून तो झोपून गेला.

सकाळी साडेसातला गोगँ परत आला तेव्हा त्याला पिवळ्या घरापुढे गर्दी दिसली.

'काय केलंत तुम्ही तुमच्या मित्राला, साहेब?' एका माणसानं कडक आवाजात विचारल.

'मला माहिती नाही.'

'तुम्हाला माहिती आहे...तो मेलाय.'

गोगँला भानावर यायला बराच वेळ लागला त्या गर्दीतल्या नजरा जणू त्याच्या चिंध्या करत होत्या.

'आपण वर जाऊ. आपल्याला सगळा खुलासा होईल.' तो कसं-बसं म्हणाला.

खालच्या खोल्यांमध्ये ओले टॉवेल्स पडले होते. वर जाणाऱ्या जिन्यावर रक्ताचे डाग पडले होते. पलंगावर व्हिन्सेंट पडला होता. गोगँन हलकेच त्याच्या अंगाला हात लावला. अंग गरम होत. गोगँच्या अंगात एकदम बळ आलं.

'साहेब, याला फार काळजीपूर्वक उठवा!' तो पोलीसप्रमुखाला म्हणाला, 'माझ्याबद्दल विचारलं त्यान, तर सागा मी पॅरिसला गेलो म्हणून. मी त्याच्या नजरेस पडलो तरी घोटाळा होईल!'

पोलीसनं डॉक्टर अन् गाडी बोलावली. त्यानी व्हिन्सेंटला दवाखान्यात नेलं.

## सोळा

अखेर डॉक्टर आणि तेओच्या सल्ल्यानुसार त्यानं एक वर्ष सँ रेमीच्या वेड्यांच्या इस्पितळात मुक्काम टाकला.

हळूहळू अशक्तपणा जाऊन काम करण्याची इच्छा व्हायला लागली. डॉक्टर पेरोंनी एक खोली स्टुडिओकरिता दिली. व्हिन्सेंटनं खिडकीतून बाहेर पाहिलं. सिप्रसचे प्रचंड वृक्ष, मागे जांभळ्या टेकड्या, गुलाबी हिरवं आकाश, चंद्रकोर...त्याची निसर्गाशी परत एकदा समोरासमोर गाठ पडली होती.

त्यानं तेओला लांब पत्रं लिहिली. त्यात रंग, ब्रश, कॅनव्हान्स अन् पुस्तकं मागविली.

'इतरांच्या दृष्टीनं मी कोण आहे? नालायक, उनाड, मूर्ख, ज्याला समाजात काही स्थान नाही असा एक वेडा...मला माझ्या कलाकृतींमधून हे दाखवायचंय की अशा नालायक, वेड्या माणसाच्या काळजातही काही घडत असतं...'

हळूहळू त्याच्याकरिता इस्पितळाची दारं उघडली गेली. त्याला बाहेर जाऊन काम करता येऊ लागलं.

सिप्रसचे वृक्ष.

इजिप्शिअन स्तंभासारखे ते आकर्षक होते. जमिनीतून वर उसळून जणू आकाशाचं छत फाडायला निघाले होते.

जुनी सवय पुन्हा जागी झाली. प्रत्येक कोऱ्या कॅनव्हासचं रोज संध्याकाळी निसर्गाच्या कवितेत रूपांतर व्हायला लागलं. त्याची संवेदनक्षमता, ताकद, आत्मविश्वास एकदा बळावला.

'माझ्यात निर्मितीची प्रचंड शक्ती मला जाणवते आहे अन् मला माहितीय, एक दिवस असा येईल जेव्हा मी सतत उत्कृष्ट कलाकृती निर्माण करेन...'

ह्या आवेगात तीन महिने गेले.

आर्लला राहिलेली चित्रं आणायला तो निघाला.

रात्री परत आलाच नाही.

दुसऱ्या दिवशी तारास्कोन सँ रेमीच्या रस्त्यावर चिखलाच्या डबक्यात पालथा पडलेला सापडला.

पुन्हा आजारपण, अशक्तपणा, सक्तीची विश्रांती.

तेओची पत्रं हा एकमेव आधार होता.

तेओनं लग्न केलं होतं. तो बाप होणार असल्याची बातमी



सिप्रसचे वृक्ष :
१८८९
( सँ रेमी )

त्याच्या पत्रात कळली.

व्हिन्सेंटचा आजार पळाला.

'माफ कर व्हिन्सेंट, मी तुला बाहेर जायला परवानगी देणार नाही !' डॉक्टरानी खडसावलं

'मला माझ्या स्टुडिओत तरी काम करण्याची परवानगी द्याल ना ?'

'नाही !'

'मग मी आत्महत्या करू डॉक्टर ?'

त्याना वाटतं, मला चित्रामुळेच वेड लागलंय

.. एका अर्थी ते खरंच आहे...चित्रकार जे पहातो त्यात तो इतका गुतला जातो की त्याच्या उरलेल्या आयुष्यावर त्याचा काही तावाच उरत नाही...

'मला आयुष्यात आणि चित्रातसुद्धा परमेश्वराशिवाय जगता येईल; पण माझ्यातली निर्माण करण्याची शक्ती नाहीशी झाली तर मात्र मला जगणं अशक्य होईल.

'माझ्यासारख्यानं आजारी पडून चालणार नाही...कला मत्सरी असते...तिची जागा आजारपणानं घेतलेली तिला चालत नाही... पण मी चित्रं काढण्याकरता जगतोय... माझ्या शरीराचे चोचले पुरवण्याकरता नाही.

'माझ्या डोक्यात चालणाऱ्या घडामोडींचा परिणाम म्हणजे एकामागून एक संपणारे कॅनव्हास...लोक म्हणतील हे जरा जास्तच वेगानं चाललंय...तू त्यांना उत्तर दे की, तेच जरा जास्त वेगानं पहातायत...'

सं रेमीत वर्ष गेल वेडाचे झटके दर दोन तीन महिन्यांच्या अन्तरानं येतच होते.

तेओनं एकदा पत्र लिहिलं.

'तुझा एक कॅनव्हास चारशे फ्रँकसना विकला गेलाय...अभिनंदन. या पैशातन डॉक्टरांनी परवानगी दिली तर पॅरिसला ये...'

त्याच्या हयातीत विकलं गेलेल हे पहिल अन् शेवटच चित्र

तेओला मुलगा झाला. त्याचही नाव व्हिन्सेंटच ठेवल.

व्हिन्सेंटनं थोडी वाट पाहिली. त्याला तो प्रदेश आवडला होता.

'शेतात कापणी चालल्येय .. एक छोटी आकृती आपलं काम संपवण्याकरता ह्या कडाडलेल्या उन्हात भुतासारखं काम करतेय... मला तिच्यात मृत्यूच प्रतिबिंब दिसतय... ते पीक म्हणजे मानवता. पण मृत्यूचं हे दर्शन मुळीच क्लेशदायक नाही...'

त्यानं हॉस्पिटल सोडलं.

पिसारोच्या सल्ल्यावरून तेओन त्याची ओव्हेरच्या डॉक्टर गाश-कडे पाठवणी केली. तेओनं एका पत्रात लिहिलं—

'व्हिन्सेंट, मी सांगतो, तुझे सूर्यफुलाचे अन् पिवळ्या घराचे कॅनव्हास मी डॉक्टर गाशेना दाखवले तेव्हा त्याच्या डोळ्यात पाणी आलं. मला म्हणाले, 'व्हान गॉग, तुमचा भाऊ एक थोर कलाकार आहे. कलेच्या इतिहासात ह्या सूर्यफुलाच्या पिवळ्या रगासारखा पिवळा रग झाला नाही. केवळ ह्या कॅनव्हासमुळं तुमचा भाऊ अमर होईल...'

ओव्हेरमध्ये त्याचा चित्रकाराचा दिनक्रम सुरू झाला. डॉक्टर


With Best Compliments From

**SIDDHO MAL PAPER CONVERSION CO.,**

A House For Quality Flexible Packaging Items

**611, Kailash Building, 26, Kasturba Gandhi Marg, New Delhi 110001 (India)**

Phones : 46333 & 40953 ❋ Grams : SIMASO ❋ Telex : ND 3331

*Manufacturers and Exporters of Quality Flexible Packaging Items*

Specialising in :

SOPHISTICATED COATINGS & LAMINATIONS

**Gravure Printing on :**

★ CELLOPHANE
★ ALUMINIUM FOILS
★ POLYETHYLENE
★ PAPER & BOARDS

WAXED WRAPPERS TO MEET ALL REQUIREMENTS

Finished Packaging Materials To Suit All Packing Machines

गाशे त्याच्या चित्रांचे अक्षरशः वेडे होते. तो काम करायला, जेवायला त्यांच्या घरी जात असे. त्यांची त्याच्यावर मायाच जडली होती.

'तो वेडा आहे, खरंच आहे. पण मग काय ! सगळेच कलावंत वेडे असतात. तेच तर त्यांच्यातलं सगळ्यात चांगलं. उत्तम मानवाचा आत्मा वेडा असतो ..'

पण त्याचं हे अचानक कामाला लागणं तात्पुरतं होतं. पूर्वी दिवसाचे चोवीस तास अपुरे पडत. आता काम करण्याचा आवेग, उसळणारं रक्त, सारं नाहीसं झालं. निसर्गातली दृश्यं त्याला क्वचितच मोह पाडत होती.

तो आता थकला होता. गेली दहा वर्षं अव्याहतपणे चाललेली तडफड, उत्तेजित अवस्था, शारीरिक, मानसिक छळ आता जास्त काळ सहन करणं त्याला शक्य नव्हतं.

रस्त्यातनं चालताना तो स्वतःशीच बडबडत असे. 'मी इतकी चित्रं केली, आता मला नव्यानं सांगण्यासारखं काही राहिलेलं नाही. मियप्रेबाबाचं बरोबर होतं. दुबळेपणानं स्वतःला व्यक्त करण्यापेक्षा काहीच न बोललेलं बरं.'

साऱ्या जूनमध्ये त्यानं फक्त पाच कॅनव्हास केले. तो विलक्षण थकला होता. त्याला रिकामं, भकास वाटत होतं. जणू त्यानं केलेल्या शेकडो चित्रांनी त्याच्या रक्ताचा एक एक थेंब शोषून घेतला होता.

तशात तेओ आणि छोटा व्हिन्सेंट आजारी पडले. तो काळजीनं वेडापिसा झाला. असह्य झालं तेव्हा पॅरिसला गेला.

'मला फक्त मुलाची काळजी नाही वाटतं व्हिन्सेंट, व्हालादोंची वाटते.' तेओ.

'का ?'

'त्यानं मला राजीनामा द्यायला लावण्याची धमकी दिलीय. मी नव्या चित्रकारांच्या नादाला लागून धंद्याकडे दुर्लक्ष करतो असं त्याचं म्हणणं आहे.'

'मग तू काय करशील तेओ ? नवं दुकान काढशील ?'

'कसं काढणार ? माझ्याजवळ पैसा नाही.'

'जर माझ्यावर हजारो फ्रॅंक्स् असे वाया...'

'चूप व्हिन्सेंट ! चूप ! त्याचा काही संबंध नाही.'

छोटयाला बरं वाटल्यावर व्हिन्सेंट ओव्हेरला परतला.

□

पण त्याला काम जमेना. पुढला झटका जुलैत येऊ घातला होता. त्याला भीती वाटत होती की, येणाऱ्या झटक्याच्या काळात तो काही तरी भयानक करणार आहे, त्याचा तेओला अतिशय त्रास होणार आहे.

'मी तुला सतत ओझं होऊन राहिलो आजपर्यंत...इथे येऊन मी कामाला सुरुवात केली... पण ब्रश हातातनं गळून पडतो.. मला तुला खूप काही लिहावंसं वाटतंय... पण आता इच्छाच उरली नाहीय...माझा कुणालाच उपयोग नाही, असं वाटतं...'

रंगवायचं होतं ते रंगवून झालं होतं, त्याच्यातलं उत्तम ते सर्व संपलं होतं.

जुलै मध्यावर आला.

तो गाशेंकडे जातच होता. ते तावातावानं त्याच्या चित्राबद्दल चर्चा करीत.



डॉक्टर गाशे : १८९०
( ओव्हेर )

'सोपं साधं असणं किती अवघड असतं.'

त्याचं मात्र त्यांच्या बोलण्याकडे लक्ष नसायचं.

'ते माझ्या चित्राबद्दल बोलत नाहीयेत. मी ती केली नाहीत. मी कधी चित्रंच केली नाहीत. त्यांना कधी ब्रश लावल्याचं मला आठवत नाही ... ती दुसऱ्याच कुणी केलीयत ...'


अल्बेर ओरिटा नावाच्या समीक्षकानं त्याचं प्रथमच कौतुक केलं होतं.

'रंगाचं चित्रातल्या आकारांशी असणारं नातं फक्त ह्याच चित्रकाराच्या चित्रांत जाणवतं. कलेच्या इतिहासातला सर्वश्रेष्ठ रंगतज्ज्ञ ...'

'तेओ, अल्बेर ओरिटांना सांग की, माझ्या चित्रावर काही लिहीत जाऊ नका ... त्यांचा माझ्या चित्रांबद्दल काही तरी गैरसमज झालाय ... प्रसिद्धी ही खरोखर मला गोंधळून टाकते, मला चोरटयासारखं वाटतं ... काम करणं ठीक आहे; पण त्याबद्दल कुणी बोलायला लागलं की मला त्रास होतो ...'

तो अस्वस्थ होता. तेओची नोकरी सुटली तर कसं होणार ? तो रस्त्यावर पडेल ? जो, बाळ अन् आपलं कसं होणार ? अन् आता किती दिवस त्याच्या जिवावर जगायचं ? त्याला घर, संसार आहे. येणाऱ्या झटक्यातनं आपण बरे झालो नाही तर तेओ काय करील ? आपल्याला वेडयांच्या इस्पितळात बंद करून टाकेल ?

'मी आता वेडा नाही ... मी चांगला आहे ... मी माझा स्वतःचा मालक आहे ... पण पुढल्या झटक्यानं जर मेंदू कायमचा




ज्ञानियाच्या राजाने पसायदान मागितले, ते सर्वांच्याच कल्याणासाठी. कारण 'मैत्र जीवाचे' निर्माण होऊन, सहकार्याच्या भावनेने आणि परस्पर जिव्हाळ्याच्या भूमिकेतून सारे समाजजीवन संपन्न व्हावे हाच उत्कट उद्देश त्यामागे होता.

नेमकी तीच तत्त्वे सतत जतन करून, अतिशय जिव्हाळ्याच्या भूमिकेतून बँक ऑफ महाराष्ट्र सुरुवातीपासूनच प्रयत्नमग्न आहे... कर्तव्याची ज्योत तेवती ठेवून, ती निष्ठापूर्वक प्रगतीच्या दिण्डीमध्ये सामील झालेली आहे... सर्वांना बरोबर घेऊन!

# बँक ऑफ महाराष्ट्र

(राष्ट्रीयीकृत बँक)

११७७ बुधवार पेठ, बाजीराव रोड, पुणे ४११ ००२

PRATIBHA 7728

बिघडला तर मला जीव देण्याचंही कळणार नाही ... मी संपून जाईन ... मी काय करू रे तेओ ... काय करू ? ... '

त्यानं ईझल घेतलं, टेकडी चढून तो कॅथॉलिक चर्चच्या मागल्या शेतात गेला.

दुपारी बाराच्या सुमारास उन्हं कडाडली. अचानक काळ्या पक्ष्यांचा थवा घोंघावत आला. त्यांनी सूर्य झाकोळला. त्यांच्या पंखांच्या काळ्या सावलीत व्हिन्सेंट बुडून गेला. तो काम करीत होता. त्या पिवळ्या शेतावरच्या आकाशात त्यानं पक्षी काढले. काम संपल्यावरच त्याला शुद्ध आली. त्यानं चित्राच्या कोपऱ्यात लिहिलं 'शेतावरचे कावळे'. चित्र उचलून तो चालायला लागला. ⌑

रविवार उजाडला.

एका रविवारीच त्यानं स्वतःचा कान कापून घेतला होता. त्या यातनानाट्याचा अखेरचा अंक सुरू झाला होता.

'माझं शरीर अजून काही काळ, सहा ते दहा वर्षं तग धरेल. आयुष्याचा कमी-जास्त काळ माझ्या दृष्टीनं महत्त्वाचा नाही. एक गोष्ट मात्र मला पक्की माहिती आहे; येत्या काही वर्षांत मी काही तरी विलक्षण निर्माण करणार आहे ... '

ते विलक्षण त्यानं निर्माण केलेलं होतं. आता जगाला सांगण्यासारखं काही उरलेलं नव्हतं. जगाला त्याची किंमत कळायला अजून वेळ होता; पण त्याचा त्यानं मात्र विचारही केलेला नव्हता. त्यानं त्याचं काम केलं होतं. आता हा शेवट होता. त्याला ते आधीच कळलं होतं. स्पष्ट दिसलं ... आता !

त्याला आता अखेरचा निरोप घ्यायचा होता. कसंही असलं तरी तो ज्या जगात राहिला होता ते जग चांगलं होतं. गोगँ म्हणाला होता, 'विषावरोबर त्याचा उताराही असतो,' तसं !

'ह्या जगानं मला काहीही दिलं नाही ... पण तरीही मी त्याचं काही देणं लागतो, कारण इतकी वर्षं मी ह्याच जगात काढली. कृतज्ञता म्हणून मी काही चित्रं ठेवून जाणार आहे. ती कुणाला आवडावी म्हणून केलेली नाहीत; पण अत्यंत प्रामाणिकपणे मानवी भावना व्यक्त करण्याकरिता केलेली आहेत ! ... '

पण शब्द हे त्याचं माध्यम कधीच नव्हतं. त्यानं खरा शेवटचा निरोप रंगवायला हवा !

पण शेवटचा निरोप कधीच रंगविता येत नाही ! त्यानं चेहरा सूर्याकडं वळवला. कुशीत रिव्हॉल्वर दावलं अन् खटका ओढला. तो खाली कोसळला. त्यानं चेहरा मातीत खुपसला. जणू तो त्याच्या आईच्या गर्भात परत चालला होता.

## सतरा

चार तासांनी तो फरफटत राव्हूच्या कॅफेत शिरला. राव्हूची बायको त्याच्यामागनं खोलीत गेली. तिनं जिन्यावर गळलेलं रक्त पाहिलं आणि धावत जाऊन डॉक्टर गाशेंना बोलावून आणलं.

'व्हिन्सेंट, व्हिन्सेंट, बाळा, काय करून घेतलंयस तू !' गाशे कळवळून म्हणाले.

'मला वाटतं, मी काही तरी घोटाळा केलाय.'



मृत्युशय्येवर व्हिन्सेंट : जुलै १८९०
डॉक्टर गाशेंनी केलेलं रेखाटन ( ओव्हेर )

डॉक्टर गाशेंनी जखम पाहिली.

'व्हिन्सेंट, पोरा, किती त्रास करून घेतला असशील जिवाला ! मला कसं कळलं नाही ? आम्हाला सगळ्यांना तू हवायंस, व्हिन्सेंट ! तू का सोडून चाललायस आम्हाला ? अजून तुला किती तरी सुंदर चित्रं करायची आहेत.'

'माझ्या कोटाच्या खिशातनं मला पाईप काढून देता का ?'

डॉक्टरांनी पाईप भरून व्हिन्सेंटच्या तोंडात दिला.

'काडी ... '

'देतो हां .. '

व्हिन्सेंटनं शांतपणे झुरका घेतला.

'व्हिन्सेंट, आज रविवार, तुझा भाऊ दुकानात नाहीय. त्याचा घरचा पत्ता सांग.'

'मी सांगणार नाही.'

'पण त्याला लवकर कळवायला हवं.'

'तेओचा रविवार खराब होता कामा नये. तो आजारी आहे. त्याला विश्रांती मिळायला हवी.'

सिते पिगालचा पत्ता व्हिन्सेंटकडनं काढणं अशक्य होतं. डॉक्टर गाशे सारा दिवस त्याच्याजवळ बसून होते. रात्री ते मुलाला, पॉलला तिथं बसवून विश्रांतीकरता घरी गेले. व्हिन्सेंट त्याच्याशी एक अक्षर न बोलता पाईप ओढत राहिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तेओ गुपिल्समध्ये गेला तेव्हा गाशेंची तार तिथं येऊन पडलेली होती. त्यानं पोंत्वाजची पहिली गाडी पकडली. ओव्हेरला पोचल्याबरोबर घोडागाडीत उडी मारली.

'तेओ !'

तेओनं गुडघे टेकत लहान मुलासारखं त्याला मिठीत घेतलं. त्याला बोलवेना. डॉक्टर आले, तेओ त्यांच्याबरोबर बाहेर गेला.

'काही आशा नाही. गोळी काढण्याकरता मी ऑपरेशन करू शकत नाही. तो फार अशक्त आहे. तो अशा ताकदीचा नसता



तेओ व्हॉन गॉग

'असं सोसणारा...समजून घेणारा भाऊ कुणाला मिळाला नसेल...'

तर खरं तर जागीच संपायचा.'

दिवसभर तेओ त्याचा हात हातात घेऊन त्याच्या उशाशी बसून राहिला. रात्र झाली. खोलीत ते दोघंच राहिले. ब्रबन्टमधल्या लहानपणच्या आठवणी जाग्या व्हायला लागल्या.

'तुला रिसवेकची गिरणी आठवते, व्हिन्सेंट ?'

'ती छान होती.'

'आपण ओढ्याकाठानं चालत जायचो.'

'अन् उभ्या शेतात जेव्हा खेळत असू तेव्हा तू असाच माझा हात धरून ठेवायचास, आठवतं ?'

'आठवतं.'

'आर्लेच्या हॉस्पिटलमध्ये मला झुंडर्टची नेहमी आठवण यायची. आपलं दोघांचं लहानपण चांगलं होतं, तेओ. स्वयंपाकघराच्या मागच्या बागेत आपण खेळायचो, आई आपल्याकरता चीज केक करायची.'

'ते खूप लांब गेल्यासारखं वाटतं, व्हिन्सेंट.'

'...हो...हो...आयुष्य मोठं आहे. तेओ, तुझी काळजी घे, तब्येत सांभाळ, माझ्याकरता. जो अन् छोट्याची काळजी घे. त्यांना कुठं तरी खेड्यात घेऊन जा. त्यांच्या तब्येती सुधारतील अन् गुपिल्स-कडे राहू नकोस. त्यांनी तुझं सारं आयुष्य वापरलं, तुला काही दिलं नाही.'

'मी माझी गॅलरी उघडणार आहे, व्हिन्सेंट. माझं पहिलं प्रदर्शन म्हणजे संपूर्ण व्हिन्सेंट व्हान गॉग असेल...तू जसं दिवाणखान्यात तुझ्या हातांनी लावलंयस तसं..'

'माझं काम...माझ्या आयुष्याची किंमत मोजली मी त्याकरता...'

रात्र शांत झाली.

पहाटे एकच्या सुमारास व्हिन्सेंटनं मान किंचित वळवली अन् तो पुटपुटला,

'तेओ, मी...निघतो आता.'

त्यानं डोळे मिटले.

---

## अठरा

---

'**आ**ई, त्याच्या वियोगाच्या दुःखाचं वर्णन करणं अन् सांत्वन करणं अशक्य आहे. ही वेदना मला आयुष्यभर साथ करणार. आपल्याला एवढंच म्हणता येईल की, आयुष्यभर त्याला न मिळालेली शांती त्याला आता मिळाली आहे. जीवन त्याच्या दृष्टीनं फार कठीण होतं. आता मात्र नेहमीप्रमाणेच (तो गेल्यावर) सगळ्यांना त्याची थोरवी जाणवायला लागलीय. आई, आम्ही खरोखर एका रक्ताचे होतो...'

तेओ सिते पिगालला परतला. दुःखानं तो पूर्ण खचला होता.

त्याचा त्याच्या मनावरचा ताबा सुटला.

सहाच महिन्यांनी, जवळजवळ व्हिन्सेंट गेला त्याच दिवशी तेओनं जगाचा निरोप घेतला.

ओव्हेरचा सूर्य जेव्हा आपली आग पाखडत असतो तेव्हा तेओ व्हिन्सेंटच्या सूर्यफुलांच्या सावलीत शांतपणे विसावलेला असतो.

**स मा प्त**

आम्ही आणि बदमाष काळ : पृष्ठ ७५ वरून

काळात सरकारविरोधी बोलला तो प्रत्येक लेखक आविष्कार-स्वातंत्र्याचा कट्टर पुरस्कर्ता होऊ पाहतो आहे. गांधीच्या खुनाच समर्थन करणाराच वाङ्मय छापून एकटेपणान सरकारचा रोष ओढून घेणं, खटल्याना तोंड देण हेच आविष्कारस्वातंत्र्याचं एकमेव चिन्ह आहे, अशा थाटात बोलल जात आहे, लिहिलं जात आहे. आविष्कारस्वातंत्र्याच्या बाजून निवडणुकीत अहमहमिकेनं उभे राहिलेले किती तरी जण विद्याधर पुंडलिकांच्या 'सती'प्रकरणाच्या वेळी त्यांच्यावर चालून गेलेले आपण पाहिले आहेत. तिथे विरोधी पक्ष आविष्कारस्वातंत्र्याच्या परीक्षेत नापास झाले हे कबूल करावंच लागेल आणीबाणीत निषेध केला नाही म्हणून काही आम्ही कायमचे भित्रे ठरत नाही, हे खर असेल तर निर्बंध सैल झाल्यावर आविष्कारस्वातंत्र्याच्या गर्जना करून सदासर्वकाळ निर्भय ठरणंसुद्धा बरोबर नाही एका विशिष्ट परिस्थितीमधल्या प्रतिक्रियेला इतकं अवास्तव महत्त्व न देता प्रत्येक परिस्थितीमध्ये साहित्यिक म्हणून आपली भूमिका टिकविता येणं शिकावंच लागणार आहे.

जनता पक्षाचा विजय झाला आणि पु. ल. देशपांडे राजकारणातून दूर झाले. इतक्या तातडीन की, जनता पक्षाच्या विजयसभेला ते आले नाहीत. टेप पाठविली. 'पु ल. काय स्वत ला जे. पी. समजतात की त्यांच्या भाषणाची टेप ऐकावी!' अस लोक म्हणताना आढळले. संशय वाटावा इतक्या त्वरेनं ते दूर झाले 'सैनिकाचा गणवेश उतरवून विदूषकाचा चढवण्यास मी आता उत्सुक आहे' ही त्यांची प्रतिक्रियाही खुमासदारच होती. पण विदूषकाचा गणवेश चढविण्याची इतकी घाई का? आणीबाणी उठली म्हणजे समाजपरिवर्तनाच काम यशस्वी झालं, संपल असं का मानायच? दोन महिन्यात सामाजिक क्रांती आणि भारतात घडेल असं समजायच का? इथे जरा मोठा धोका दिसतो. कायदा करून साहित्यिकांना क्रांतिदूत बनविणं चूक आहे. साहित्याच वाटोळं होईल पण क्रांतीचही होईलच! मात्र परत एकदा कुठे तरी हस्तीदंती मनोऱ्यात जाऊन बसण्याची अवास्तव इच्छा यात कुठे तरी डोक वर काढते आहे असा भास होतो परत एकदा काळाशी काहीही दुवा (relevance) नसलेलं वाङ्मय निर्माण करण्याची ही नादी तर नाही ना? हा धोका लक्षात घेऊनच दुर्गाबाई लेखकांनी सामाजिक क्रांतीच्या चळवळीतून स्वत ला वगळू नये अस परत परत सुचवीत आहेत. म्हणजे त्यानी भाववाढ, महागाई, नसबंदी, मूलभूत हक्क, लोकशाही अशा विषयावर कथा-कविता-नाटक पाहायची का? असा विनोदी सवाल विचारून या प्रश्नाला बगल देण्यात कुणाचच भल होणार नाही. 'उदराच मरण भेडसावीत असताना पाखराच्यावर कविता लिहिण्यात समाधान मानणारा पूर्णपणे प्रामाणिक असूच शकत नाही.' अस जे सार्त्र म्हणतो ते समजून घेण आणि त्या संदर्भात वर्तमानाशी आपलं नातं कोणतं ते ठरवण अतिशय आवश्यक आहे.

निवडणुकीनतरही दुर्गाबाई जनता पक्षाच्या व्यासपीठावर दिसल्या म्हणून काहींनी फार कटू टीका केली. 'साहित्यिकाना खाली पाहण्याची पाळी त्यांच्यामुळे येते आहे,' असे उद्गार काढले. सरकारी पारितोषिकाच्या यादीत माजगावकर, थत्ते यांची नाव दिसताच परत एकदा स्फोट झाला. ते 'झोळ्या घेऊन उभे आहेत,' एवढ्या एका वाक्यातून त्यांच्या सगळ्या निर्भयतेचा धिक्कार करण्यात आला. दुर्गाबाई, थत्ते, माजगावकर यांनी आपापल्या वैयक्तिक भूमिका वेळोवेळी प्रसिद्धही केल्या आहेत. कदाचित त्यांचं चुकत आहे असं अनेकाना प्रामाणिकपणे वाटत असेल. ते म्हणण्याचा हक्कही मान्यच करावा लागेल. पण टीकेची ही पातळी अतिशय हीन आहे. शाळा-मास्तरीपद्धतीन प्रत्येक कृती तपासून पाहून श्रेष्ठ–कनिष्ठ ठरविणं आपल्या या बदमाष काळात शक्य आहे का की, जो काळ इतका बदमाष आहे की, भले भले भ्रमतात– यशवंतराव चव्हाणांना बिनविरोध निवडून आणा अस कुणी म्हणतात, एखादा 'बाबा' राजकारणी मायाजालात फसतो, दुसरा एखादा मोठा बाबा आणीबाणीला अनुशासनपर्व म्हणतो! आमच्या टीकेची पातळी पुन्हा पुन्हा सुटते, दर्जा घसरतो, वैयक्तिक राग-द्वेष डोक वर काढतात; असं नेहमी का घडत? टीका करताना आम्ही सामाजिक संदर्भ पूर्णपणे विसरून जातो हेच त्याच कारण नसेल ना?

## : ७ :

आणीबाणीच्या काळात आविष्कारस्वातंत्र्याची पायमल्ली झाली तेव्हा मराठी साहित्यिक कसे वागले याची ही चर्चा! पुष्कळ झाली आहे, होणारही आहे आणीबाणी का आली? असा प्रश्न साहित्यिकाना किंवा बुद्धिजीवींना विचारता येईल का? अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य हा मूलभूत हक्कच आहे आणि कोणत्याही लोकशाही सरकारन तो आपणहून दिलाच पाहिजे, ही भूमिका तत्त्वतः निर्दोषच आहे. तरीही आपलं स्वातंत्र्य शासनानं जपावं, आपल्याला बहाल कराव अशी वृत्ती घातकच ठरणार आहे, ठरली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात साहित्यिक, बुद्धिजीवी यानी राजकारण झिडकारलं. कारण त्यात पुष्कळचं धुरळा अगावर उडतो. समाजकारण, समाजकल्याण, सामाजिक समता, जागृती या सगळ्या सरकारच्या जबाबदाऱ्या मानण्यात आल्या. 'लोककल्याणकारी' अस स्वत ला म्हणवून घेणाऱ्या सरकारवर त्या सर्व जबाबदाऱ्या सोपवण हे सुद्धा तत्त्वतः बरोबरच होत. परिणाम असा झाला की, समाज आणि शासन या दोहोंशी सबंधच राहिला नाही. वचक राहण्याची बातच सोडा. सबंध आलाच तर तो बहुतेक वेळा प्रथम शासकीय मान्यता मिळविण्यासाठी आला. शासनान स्वातंत्र्य द्याव, पारितोषिक द्यावीत, शिष्यवृत्त्या द्याव्यात, परदेशी जाण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. परिणामी साहित्यिकांवर-बुद्धिजीवींवर शासनाची एक प्रकारची नैतिक सत्ताच निर्माण झाली आणीबाणीच्या काळात असे अनेक सरकारी नोकरीत खितपत पडण्यात आनद मानणारे क्रांतिकारक मला भेटत. सत्याग्रह त्याना मान्य नव्हता. रक्तरंजित क्रांतीचा 'बौद्धिक' ध्यास त्यांनी धरलेला

होता. पण सरकारी नोकरी आणि तिचे सर्व लाभ सोडायची तयारी नव्हती. विचारस्वातंत्र्याकरिता कोणतीही प्रत्यक्ष किंमत देण्याचं आम्ही टाळलं. कदाचित त्यामुळंच शासनाला फारसा धाक उरला नाही. जर साहित्यिकांच्यावर बंधनं आणली तर ते फारसा त्रास देणार नाहीत, शाब्दिक मारामारीपलीकडे जाणार नाहीत. त्यातही काही शासनाकडेच स्तुतिपाठक म्हणून राबवता येतील हे राज्यकर्त्यांनी ओळखलं. 'यांचं ऐकलं पाहिजे' असं न वाटता 'यांना सहज हाताळता येईल' असंच शासनाला वाटत राहिलं आणि तसंच झालं. आणीबाणीच्या काळात साहित्यिकांनी घोर अपमान सोसले, सोल्झेनित्सीन, पास्टरनाक यांच्या तोडीचं दुःख अनुभवलं, याच्यावर विश्वास ठेवणं फार कठीण आहे. निर्बंध उठताच मात्र सोल्झेनित्सीनच्या तोडीस तोड आपण आहोत, असा अभिनिवेश प्रत्येकाच्या बोलण्यात दिसू लागला आहे. लेखनस्वातंत्र्यासाठी आजपर्यंत जगभर ज्यांनी लढा दिला ते आमचे कोण आहेत? आमचं त्यांच्याशी नातं कोणतं? हा प्रश्न स्वतःला विचारायला हवा. परदेशगमनाची फॅशन असलेल्या आपल्या काळात 'माझा एक दूरचा मावसभाऊ लंडनमध्ये असतो' असा अभिमान बाळगणारे किती तरी मध्यमवर्गीय आपण पाहतो, तसाच हा प्रकार आहे. व्यक्ती, विचार, आविष्कार यांच्या स्वातंत्र्यासाठी धडपडलेले परदेशी लेखक आमच्या मंडळींचे 'दूरदूरचे मावसभाऊ' आहेत. त्यांच्याशी सख्खं म्हणण्यासारखं नातं आमच्या लेखकांचं नाही. ते निर्माण करायचं असेल तर अधिक जागरूक सामाजिक जाणीव बाळगणं अतिशय जरूरीचं आहे.

येते वर्ष–सहा महिने वरवरच्या सामाजिक जाणिवेमधून पुष्कळच साहित्य उत्पन्न होणार आहे, होऊ घातलेलं आहे. 'स्थानबद्ध पतीकडे डोळे लावून बसलेल्या गृहिणीवर कविता, तुरुंगात अडकलेल्या मुलाची आठवण काढत आईचा मृत्यू किंवा उलट दाखवणारी कथा, तुरुंगात झालेलं मनोमीलन, राजबंद्यांचा छळ हे आणि असे अनेक विषय भराभर वाङ्मयात येतील. बांगला देशचा लढा झाला तेव्हाही असाच महापूर येऊन गेला. हे येणारं साहित्य तर अधिक घातक आहे. कारण त्यातली सामाजिक जाणीव अनुभवशून्य असणार. त्या अर्थानं ते चैतन्यशून्यच असणार. लेखकाच्या दर्जाप्रमाणे त्याची वाचनीयता कमी-अधिक ठरेल एवढंच. 'परकाया प्रवेशा'च्या थोतांडामधून असं पोचट साहित्य आमच्याकडे फार मोठ्या प्रमाणावर येतं. ऐतिहासिक कादंबऱ्या, चरित्रात्मक कादंबऱ्या–नाटकं ही त्याची उत्तम उदाहरणं. शिवकालीन पात्रंसुद्धा धडाधड शाब्दिक कोट्या करत असतात. त्या काळची उपलब्ध कागदपत्रं तसं मुळीच दाखवत नाहीत. एक नटवी बीभत्सता, खोटेपणा अशा अनुभवहीन, कळाहीन लेखनात येतो. तो टाळायचा असेल तर सामाजिक जाणीव सखोल पाहिजे, जागरूक पाहिजे. आधी प्रचीती हवी, मग निर्मिती व्हावी. प्रचीतीविण बोलणे। ते अवघे कंटाळवाणे। तोंड पसरूनी सुणे। भुंकोन गेले॥ ही शोकांतिका टाळायला हवी. परिवर्तन चालू असलेल्या समाजात तर ही जाणीव जास्तच डोळस असायला हवी–परिवर्तनकाळातले विविध ताणच अतिशय गुंतागुंतीचे असतात. समाजाबद्दलचं हे स्वारस्य अनेक मार्गांनी व्यक्त होईल. एखाद्या सामाजिक घटनेबद्दल अतिशय चीड, एखाद्या सर्वमान्य तत्त्वाचा मनःपूर्वक धिक्कार यातूनही ती आस्था व्यक्त होऊ शकेल. मनःपूर्वकतेचा प्रश्न आहे, अनुभवाचा प्रश्न आहे. अनुभव आपल्या कल्पनेतून काहीच्या काही रंगवण्यापेक्षा त्यांना सामोरं जाण्याचा प्रश्न आहे–सामाजिक अनुभवांना सामोरं जाऊन, पत्करून, पचवून मग कलावंत म्हणून स्वतंत्रपणे निर्मिती करण्याचं स्वातंत्र्य असलंच पाहिजे. स्वातंत्र्य टिकवायचं असेल तर स्वतःच्या भ्रामक हस्तीदंती मनोऱ्यातून लेखकानं–विचारवंतानं स्वतःहून बाहेर आलं पाहिजे.

साहित्यिक आणि बुद्धिजीवी एका प्रकारे निष्क्रिय असणार हे मान्यच करावं लागेल. तसं असूनही त्यांना स्वतंत्र ठेवणंही अत्यावश्यक आहे. सेन्सॉरशिप नकोच; परंतु अनुभवाची सत्ता चालली पाहिजे, काल्पनिकतेची नको. डोळस सामाजिक जाणीव असलेल्या कलावंतामध्ये अशा प्रकारची अप्रत्यक्ष, सामाजिक जाणिवेतून, शुद्ध अनुभवातून विकसित होणारी सेन्सॉरशिप जागी होत असते आणि तिच्या विकासाबरोबरच त्याचं स्वातंत्र्यही जास्तीत जास्त पक्कं होत असतं. अशा प्रकारची enriched, enlightened सेन्सॉरशिप जर जागी होत असेल तरच कलावंतांचं संपूर्ण स्वातंत्र्य हे एक सर्वश्रेष्ठ सामाजिक मूल्य आहे, असं म्हणता येईल. तसं करता येईल! ●



# ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे : पृष्ठ ८ वरून

दुसरीकडे खर्च केला. मी तो दुसरीकडे खर्च केला हे वाईट झाले. पण त्या वाईटातून औदुबरयात्रा सफल झाली हे चागले झाले. आता तुमच्या कपाटाचा प्रश्न उभा राहिला. तो सुटेल.'

मी म्हटल 'आणखी अॅडव्हान्स देऊ का?'

मिस्त्री म्हणाले, 'छे! औदबुरयात्रेसाठी तुमचे पैसे हाती आले तुमच्या कपाटासाठी असेच दुसरे अॅडव्हान्स येतील.'

मी म्हटल 'पण उशीर लागल.'

मिस्त्री म्हणाले, 'मुळीच नाही. परमेश्वरी योजना ठरलेल्या असतात. कमी पडले की तो देतो. तो देत राहतो. आपण घेत रहायचं. हिशेबाचं पुढे त्याच्यावर भार टाकल्यापासून ससाराला कधी कमी पडलं नाही. तुमच्यासारखे येतात, पैसे देऊन जातात. संसार चालत राहतो.'

माझ्यासारखे येतात, मिस्त्री म्हणाले, पैसे देऊन जातात, त्याप्रमाणे झाले. आधी कपाटाच्या निमित्ताने, नंतर माझ्या मित्राची कामे त्यांना देण्यासाठी मी त्यांच्याकडे जात राहिलो. पुढे माझ्या कपाटाची व मित्राच्या कामाची सबब बाजूला पडली. तिथे जे दुसरे येत त्यात मीही दाखल झालो इतरासारखे मिस्त्रीचे बोलणे ऐकण्यास मी जाऊ लागलो.

मिस्त्रीवर सकटे सारखी येतच होती! इतकी सकट परपरा मी पाहिली नव्हती. पैशाचे संकट नेहमीचेच होते. कधी एकदम गावाकडे पैसे पाठवावे लागत. कधी स्वत चे आजारीपण, कधी दुकानाचे भाडे थके, कधी वीजबिल. दड भरल्याशिवाय एकदाही मिस्त्रीनी वीजबिल भरले नाही. त्याची धावपळ पहावत नसे. मग कधी पैसे पुढे करी. ते घेतल्यावर वीज तोडायला माणूस आल्यावर वीजबिलाचे पैसे एका मित्राने दिले हे सांगताना परमेश्वर ते कसा गोवतील हे त्याचे वाक्य माझ्यासमोर येई. माझे दातृत्व माझ्याकडून परमेश्वराकडे गेल्याचे पाहून मला काही वाटत नसे. शेवटी परमेश्वरानेच मला पैसे पुढे करण्याची बुद्धि दिली नाही का?

परमेश्वर आणि व्यवहार अशा दोन लाइनीवर मिस्त्रीचे विचार समांतरपणे धावत असत. आपल्या मुला-बाळाना, बायकोला दोन वेळा खायला मिळावे, अगभर वस्त्र मिळावे, इनका प्रपच प्रत्येकाने साधावा आणि परमार्थाचीही कास सोडू नये. स्वत च्या घरच्या अडचणी सागता सागता ते परमार्थाची फोड करीत ते सागत, पुष्कळाना वाटते की प्रपंच व परमार्थ हे दोन मार्ग भिन्न आहेत. पण माझे गुरु म्हणत, ज्याला प्रपच करता येत नाही त्याला परमार्थही साधता येणार नाही. प्रपचात राहूनच परमार्थाकडे मन जाईल असे आचारण ठेवले पाहिजे. स्वत सकट कोणाला कोणत्याही बाबतीत न फसविता पूर्ण ऐहिक सुख प्राप्त करून घेणे म्हणजेच प्रपच साधणे होय. तो साधला म्हणजे त्यातच परमार्थ सापडेल!

मला मिस्त्रीचे हे तत्त्वज्ञान आकर्षक वाटेच; पण माझ्यासारखे जे दोघे-चौघे तिथे येत त्यानाही ते आवडे. मिस्त्रीनी आम्हाला कधीही हे करा ते करा असे सागितले नाही. त्याचे बोलणे आत्मशोधाचे असे. ते म्हणत,

'मी परमेश्वराला सागतो, माझ्या हातून सत्कर्मच घडव; पण माझ्या हातून सत्कर्मच घडावयाची असतील तर ईश्वराची प्रीति मला सपादन केली पाहिजे. ईश्वराची प्रीति सपादन करावयाची तर मला त्याची भक्ती करायला हवी ईश्वराच आणि भक्तीचं अस त्रागडं आहे. मी शहाणपणानं वागावयाचं म्हणजे मला सुबुद्धी झाली पाहिजे आणि सुबुद्धि देणारा कोण? तर परमेश्वर! प्रपंचात काय किंवा परमार्थात काय, आपण कुठून निघालो तरी परमेश्वराशीच येतो.'

मिस्त्रीकडे येणारे आम्ही चौघे, दुकानात इकडे तिकडे, कुठे जागा असेल तिथं बसत असू. कुणी फळी खाली टाकून बसे, कुणी सालपटावर बसे. कुणी छोटं स्टूल पुढे ओढी मग आम्हापैकी कुणी तरी चहा मागवी. कधी दोन चहा मागवून चौघात पीत असू. व्यवहाराच्या दृष्टीतून आमचा दर्जा मिस्त्रीहून किती तरी वरचा होता. आमच्यापैकी कुणीही एकानं मिस्त्रीच्या दुकानाची पागडीसह रक्कम सहज एका मुठीन दिली असती; पण इथे दुकानात बसल्यावर त्यांच्यासमोर मी मला बिगारीतला वाट आणि ते एम् ए. वाटत. ते केवढचा तरी वरच्या अवस्थेला पोहोचलेला पुरुष होते. ते सागू लागले, की आम्ही स्तब्ध ऐकत असू. ते म्हणत,

'एकूण या मार्गानं त्रागडी फार! आता पुरुषार्थ म्हणजे काय? पुरुषार्थ म्हणजे प्राप्तव्य वस्तूची इच्छा. कशामुळे उत्पन्न होते? प्रेमामुळ. प्रेम का उत्पन्न होत? प्रेम सुखापासून उत्पन्न होत. सुख कस होतं? सुख विषयापासून मिळते. आणि विषय कशामुळे मिळतो? द्रव्यामुळे, म्हणूनच द्रव्य प्राप्त करण हा पुरुषार्थ होय; पण हा पुरुषार्थ साध्य झाला की संपलं का? नाही. केवळ पैसा मिळविण्यान काही होत नाही. दुसरा उद्देश जर साध्य झाला नाही तर सर्वच वाया! हा दुसरा उद्देश म्हणजे परमार्थ—विवेकाचा व प्रपंचात राहूनच परमार्थ साधण्याचा! हा उद्देश विसरला जातो. बरे, प्रपंच सोडून परमार्थ करीत बसण्याऱ्याना सर्व साधत का? नाही ..फक्त परमार्थात शिरणारे बहुतेक आळशी बनतात. आपल्या बायका-पोराना उपाशी मारतात. आपला भार समाजावर टाकून कोठे तरी हिंडतात.'

मिस्त्रीचे हे ऐकताना मला बरे वाटे. म्हणजे मी पोटासाठी नोकरी करीत आहे, यात पाप नाही. ती करायला हवी. आता अध्यात्माचा प्रश्न आहे. तो मिस्त्री सोडवतीलच. असे मनात येई. आम्ही तिथे बसणारे अस्वस्थ होतो. आम्हाला काय कमी होते? घरी सर्व सुखसोयी होत्या. उत्तम बगला, उत्तम वस्त्रप्रावरणे, उत्तम अन्न, सर्व होते; पण नव्या वस्तू घेण्याला अंत नाही. त्यायला नि खायला किती मिळाल तरी अंत नाही. हे सर्व कशासाठी. याचे उत्तर त्या वस्तूमध्ये कुठे नव्हते. सर्व भोग आम्हाला बेचव झाले होते. याचा अर्थ आम्ही विरक्त झालो होतो असाही नव्हे, कुठे तरी पाल चुकचुकत होती, गड्या! तुझे आयुष्य चाललंय ते काही खरे नव्हे.

रोजच्या भागवायच्या घडपडीत मिस्त्री थकून जात. 'अरे! जर थोडं स्वास्थ्य लाभलं तर अध्यात्मात आपण कुठच्या कुठे

उडी घेऊ,' असं त्यांना वाटे. त्यांनी समोर लावून ठेवलेला अभंग त्या उडीचं द्योतक होता. द्वारकेचा राणा–पांडवांघरी आहेत. प्रत्येक भक्ती करणारा पांडव आहे आणि त्याच्या मनात श्रीकृष्ण परमात्मा आहे. घरातले आजार, दुकानात मधूनच येणारी बेकारी, मुलांचे प्रश्न त्यांना स्वास्थ्य लाभू देत नव्हते. मधूनच ते एखादी मोठी पूजा बांधीत. आम्ही त्यासाठी रुपया–दोन रुपये देत असू. मधूनच ते चार दिवस गाणगापूर किंवा औदुंबरला जाऊन येत. हे सर्व ओढाताण असताना, संसाराच्या पाशात राहूनही देवाचं करता येतं हे सिद्ध करीत. हे सर्व त्यांच्या शारीरिक शक्तीला झेपत नसे. आजारी पडत आणि पैसे नसल्यामुळे कॉर्पोरेशनच्या दवाखान्यात रांगेत तासन्तास उभे राहून औषध घेऊन येत. अंगात ताप असताना दुकानात कामे करीत. तेवढ्यात त्यांचा एखादा निर्जळी उपवास येई. तोही पाळत.

आणि आयुष्यातलं आणि मनातलं आम्हाला सांगत, 'परमेश्वर परीक्षा पाहतोय. माझा कणा मोडायला पाहतोय; पण म्हणावं, हा मिस्त्री साधा दिसला तरी तुझा अंत पाहिल. त्याला असं सोडायचं नाही. माझ्या भक्तीच्या गळाला तो लागलाय. मारील पाच-पंचवीस उड्या. शेवटी हातात येईल.' पहाटे उठून गार पाण्याने स्नान करून मिस्त्रींचे पूजा, पोथीवाचन. जप चाले. ते सर्व झालं पाहिजे. 'ते झालं की धंद्यात काही होवो, आपण डरत नाही.' ते म्हणत, 'हे बघा! 'आधी प्रपंच करावा नेटका' एवढंच मी ध्यानात ठेवलं नाही. 'नेटका'चा अर्थ कुणाला कळत नाही. नेटका म्हणजे धर्माला अनुसरून. वाटेल त्या साधनाने पुष्कळ पैसा मिळवून संसार नेटका म्हणजे रेलचेल, चैनीनं करावा असा अर्थ नव्हे. माझ्या मनात असतं तर मलाही असा पैसा मिळविता आला असता. चैनीनं राहता आलं असतं; पण ते करायचं नाही–'

मिस्त्रींचं हे म्हणणं मात्र खरं नव्हतं. त्यांनी किती–त्यांच्या भाषेत–आपटली असती तरी त्यांना असा पैसा मिळविता आला नसता. तो त्यांचा पिंड नव्हता. ते आम्हाला जमलं होतं. म्हणून आम्हाला जास्त कळत होतं. एवढंच न पटणारं वाक्य सोडल्यास मिस्त्री न पटणारं कधी बोलले नाहीत. त्यांची परमेश्वरभक्तीची तगमग वाढू लागली तशी त्यांची स्वप्नं वाढू लागली. त्यांनी एक स्कीम काढली. शहरात राहून आपले उद्योग करीत असता चिंतन नीट होत नाही. त्यासाठी शहराबाहेर पण जवळ अशी सोय हवी. ईश्वरचिंतनाची ओढ लागली की, तिथं जाऊन राहता यायला हवं. अशा जागी चार लहान खोल्या, एक छोटं देऊळ बांधावयाचं. एक माणूस तिथं भाकऱ्या करून द्यायला ठेवावयाचा. आपण एकटे किंवा बायकोसह तिथं जाऊन दोन–चार दिवस रहावयाचं. बस्! सकाळ–संध्याकाळ नामस्मरण, भजन, पोथीवाचन. आनंदात काळ घालवून, ताजेतवाने होऊन परत संसाराची लढाई लढायला यायचं.

मिस्त्रींना आम्ही रोज 'त्या कल्पनेचे काय झाले?' असे विचारू लागलो. आम्हीसुद्धा शहरातल्या धबडग्यास कंटाळलो होतो. खोल्या बांधायला हातभार लावायचं आम्ही कबूल केलं; पण मिस्त्रींना वीज-बिल भरता येत नाही, तिथं जमीन व चार खोल्या ते कसे बांधणार हेही आमच्या डोक्यात आलं




नाही. कारण मिस्त्रींची योजना चपखल होती. आपल्यासारखे वाटणारे चार मित्र त्यांनी गोळा केले. गवंडी, मिस्त्री. फक्त बांधकामाच्या खर्चाशिवाय काही खर्च नव्हता. प्रत्येकानं आठवड्यातले दोन दिवस या कामाला द्यावयाचे. आम्ही अक्षरश: या कल्पनेन वेडे झालो. आम्हालाही या स्कीम-मध्ये घ्यायची मिस्त्रींना विनंती केली. आम्हाला गवंडीकाम किंवा सुतारकाम येत नव्हतं तर आम्ही गवंडी व सुतार देऊन त्यांचा रोजसुद्धा दिला असता.

मिस्त्रीची ही स्कीम केव्हा सुरू होणार याची आम्ही वाट पाहत होतो; पण मिस्त्रीचा योगक्षेमाचा झगडा याच वेळी तीव्र झाला. जागा पाहायला जाणं, गवंडी व मिस्त्री मिळविणं कशालाच त्यांना वेळ नव्हता. त्यांच्या घरी लागोपाठ सर्वांना फ्ल्यू झाला. त्यांनी एका ऑफिसची दहा कपाटांची ऑर्डर घेतली होती, ती कपाटं परत आली. त्यांचा मुलगा नापास झाला. वडील गेल्या-मुळं त्यांना गावी जावं लागलं.

मध्यंतरी मीही माझ्या कामासाठी महिनाभर बाहेर होतो. येताच मिस्त्रींकडे गेलो. ते एकटेच शांतपणे रंधा मारीत बसले होते. मी म्हटलं, 'चहा सांगतो.' ते म्हणाले, 'सांगा.' चहा सांगून आलो नि विचारलं, , मिस्त्री ! त्या खोल्या बांधायच्या स्कीमचं कुठपर्यंत आलं ?'

मिस्त्री खोल्यांचं विसरून गेले होते. इतक्या आणीबाणीच्या गोष्टी मध्ये घडल्या असाव्यात. मग आठवलं. ते म्हणाले,

'ती स्कीम केव्हाच बारगळली. जमीन मिळाली नाही, पैसे जमेनात आणि त्या गोष्टींचा बोलूनही उपयोग नाही, आता ते तसलं सगळं सोडलं आहे. परमेश्वरच सोडला. इतके दिवस मी त्याच्या मागं लागलो. म्हटलं, आता तू माझ्या मागे लाग. सकाळची पूजा-जप सारं टाकलं. ठरवलं, काही करा-यचं नाही देवाचं ! उपवास सोडले, पूजा बांधावयाच्या सोडल्या, औदुंबर सोडलं. सकाळी एक नमस्कार तेवढा ठोकावयाचा. आता हे दुकानातलं काम नि आपण. बघू या ! एकदा बायका-पोरांना तरी सुख देऊन बघू.'

मिस्त्रीचं ऐकत असता मी घाबरून मनात 'छे छे ! असं कसं होईल ?' असं ओरडत होतो. मिस्त्री, अहो बुवा ! ही माघार कशासाठी ? मिस्त्री ! माघार तुम्हाला शोभत नाही. तुमच्या भक्तीला लांछन आहे हे मिस्त्री ! एक तरी तुमच्यासारखा आहे, असं समाधान होतं. आमच्यासारखे सगळेच आहेत. तुम्ही मार्ग काढीत होता. आम्ही तुमच्यावर निर्भर होतो मिस्त्री ! पुन्हा सुरू करा सगळं पूर्वीसारखं. येऊ द्या अड-चणी. आम्हाला ऐकवा मिस्त्री, ते तुमचं अध्यात्म ऐकवा ! किती छान दिवस गेले.

पण आमचा टाहो वाया गेला. मिस्त्रींनी देवाचं बोलणं सोडलं ते सोडलंच. आम्ही काही काळ जात राहिलो; पण ते रंधा मारीत काम करीत बसत. 'या बसा' या-पलीकडे शब्द बोलत नाहीसे झाले. मग नाइलाजानं आम्ही त्यांचं दुकान सोडलं.

तेव्हापासून माझ्या मनाचं पोतं रिकामं पालथं टांगून आहे. मन कुठं तरी आधार शोधीत आहे. जे जगतो आहे त्यात राम नाही. मन उदास झालं आहे. मिस्त्रीसारखा कुणी सापडेल या शोधात किंवा मिस्त्रीचं अध्यात्म ऐकायला पुन्हा बोलावतील या आशेत मी रोज संध्याकाळी हिंडतो आहे. ●


Remember Morarjees
for
Finer Fabrics

**Morarjee Goculdas Spg. and Wvg. Co. Ltd.**

Dr. Ambedkar Road, Parel, Bombay 400012.

Telephones : 440021, 448621.


Offer it with pride...
smoke it with pleasure!
PANAMA
The cigarette that
blends superb quality
with freshness
Panama
20
CIGARETTES
A GOLDEN TOBACCO PRODUCT
everest/118r/GT
STATUTORY WARNING: CIGARETTE SMOKING IS INJURIOUS TO HEALTH.

MANOOS ( Weekly ) 6 Rupees Regd No. PNC-68

